# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

**एम. ए. भाग-२ : समाजशास्त्र**

**सत्र-४ : पेपर क्रमांक** SOC 007

# समाजशास्त्रीय सिद्धांतातील सद्यकालीन प्रवाह

**(Recent Trends in Sociological Theory)**

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०१५

**द्वितीय आवृत्ती :** २०१७

**तृतीय सुधारित आवृत्ती :** २०२०

एम. ए. भाग २ (सत्र ४ : समाजशास्त्रीय सिद्धांतातील सद्यकालीन प्रवाह) करिता

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ८००

■

**प्रकाशक**

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**

कुलसचिव,

शिवाजी विद्यापीठ,

कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक**

**श्री. बी. पी. पाटील**

अधीक्षक,

शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,

कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-81-8486-639-1

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) पी. आर. शेवाळे**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**समाजशास्त्र अभ्यासमंडळ**

अध्यक्ष – **डॉ. मच्छिंद्र सकटे**

सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज, उंब्रज, जि. सातारा

- **डॉ. अरुण विठ्ठल पौडमल**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज (के.एम.सी.)
  कोल्हापूर
- **डॉ. मच्छिंद्र ज्ञानू सकटे**
  सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप महाविद्यालय,
  उंब्रज, जि. सातारा.
- **प्रा. डॉ. जे. एच. कराडे**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती प्रतिमा शहाजीराव पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. संजय हिंदुराव शिंदे (सनदे)**
  सरदार बाबासाहेब माने कॉलेज,
  रहिमतपूर, जि. सातारा
- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती के.आर.पी. कन्या महाविद्यालय,
  उरुण-इस्लामपूर, जि. सांगली.
- **डॉ. सतीश सर्जेराव देसाई**
  एस. एम. डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज,
  मिरज, जि. सांगली

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**समाजशास्त्रीय सिद्धांतातील सद्यकालीन प्रवाह**
**एम. ए. भाग–२ : समाजशास्त्र**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–४ घटक क्रमांक |
|---|---|
| **प्रा. राजेंद्र पुंडलीक पवार** वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड | १ |
| **प्रा. पी. एस. साळुंखे** के. बी. पी. कॉलेज, उरुण–इस्लामपूर | २, ३ |
| **प्रा. सी. आर. खंडागळे** कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली | ४ |

■ **संपादक** ■

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज,
उंब्रज, जि. सातारा

**प्रा. पी. एस. साळुंखे**
के. बी. पी. कॉलेज, उरुण–इस्लामपूर,
जि. सांगली

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण विभागांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी समाजशास्त्र विषयाची निवड केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मी हार्दिक स्वागत करतो. या अभ्यासक्रमात तुम्ही समाजशास्त्राचे सत्र पद्धतीनुसार एकूण आठ पेपर्स अभ्यासणार आहात. त्यापैकी सत्र ४ साठी पेपर क्र. SOE 007 ''समाजशास्त्रीय सिद्धांतातील सद्यकालीन प्रवाह'' असा आहे. या पेपरमध्ये एकूण चार अध्ययन घटक समाविष्ट असून त्यांचे लेखन अत्यंत सुलभपणे व पद्धतशीरपणे केलेले आहे. त्यामुळे तुम्हा विद्यार्थ्यांना भारतातील ग्रामीण विकासाचे यथार्थ आकलन होईल याची मला खात्री आहे.

'समाजशास्त्रीय सिद्धांतातील सद्यकालीन प्रवाह' या पेपरमध्ये चार घटकांचा समावेश केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने नवप्रकार्यवाद आणि नवमार्क्सवाद, लोकान्वय पद्धती आणि घटनाशास्त्र सिद्धांत, समाज रचना आणि व्यक्ती, संरचनावाद आणि उत्तर-संरचनावाद या घटकांच समावेश केला आहे.

शेवटी संपादक या नात्याने मी सर्वप्रथम मा. कुलगुरू डॉ. डी. बी. शिंदे, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दूर शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. एम. ए. अनुसे, शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र विभागप्रमुख व अभ्यासमंडळाचे चेअरमन डॉ. राजेंद्र पाटील, अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. मच्छिंद्र सकटे, समाजशास्त्र विद्याशाखेशी संबंधित सर्व प्राध्यापक आणि दूर शिक्षण केंद्रातील सर्व प्रशासकीय सेवकांचे मोलाचे सहकार्य मिळाल्यामुळेच मला संपादकीय जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडणे शक्य झाले हे मी प्रामाणिकपणे कबूल करू इच्छितो. वरील सर्वांचा मी शतशः ऋणी आहे.

■ **संपादक** ■

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज,
उंब्रज, जि. सातारा

**प्रा. पी. एस. साळुंखे**
के. बी. पी. कॉलेज, उरुण-इस्लामपूर,
जि. सांगली

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | नवप्रकार्यवाद आणि नवमार्क्सवाद | १ |
| २. | लोकान्वय पद्धती आणि घटनाशास्त्र सिद्धांत | ३२ |
| ३. | समाज रचना आणि व्यक्ती | ५५ |
| ४. | संरचनावाद आणि उत्तर–संरचनावाद | ७७ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# सत्र ४ : घटक १

## नवप्रकार्यवाद आणि नवमार्क्सवाद

## Neo Functionalism and Neo Marxism

घटक संरचना :

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ नव प्रकार्यवाद : जेफ्री सी. अलेक्झांडर

हेगेलीयन मार्क्सवादी : जार्ज लुकास व अंटीनो ग्रामसी

टिकात्मक / मूल्यमापनात्मक सिध्दांत

जर्गन हेबरमास यांचे योगदान

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक संज्ञा

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

४.६ स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

अ. Neo functionalism: Jeffery. C. Alexander

नव- प्रकार्यवाद : - जेफ्री सी. अलेक्झेंडर

ब. Hegelian Marxism: Georg Lukacs, Antonio Gramsci

हेगेलीयन मार्क्सवादी: जार्ज लुकास व अंटीना ग्रामसी

क. Critical Theory:

टिकात्मक / मुल्यमापनात्मक सिध्दांत

ड. Contribution of Jurgen Habermas

जर्गन हेबरमास यांचे योगदान

## नवप्रकार्यवाद आणि नवमार्क्सवाद : NEO FUNCTIONALISM AND NEO MARXISM

### १.१ उदिदष्टये (Specific Objectives)

प्रस्तुत अभ्यासात पूढील उदिदष्टये निश्चित केली आहेत

१. समाजशास्त्रातील नव विचारप्रवाह अथवा सिध्दांताची विद्यार्थ्यांना माहिती करुन देणे विशेष: नवप्रकार्यवाद आणि नवमार्क्सवाद

२. नवप्रकार्यवाद आणि नवमार्क्सवादावरील समिक्षणात्मक सिध्दांताची विदयार्थ्यांना ओळख करुन देणे.

३. नवप्रकार्यवाद आणि नवमार्क्सवादावर विद्यार्थ्यांच्या विश्लेषणात्मक कौशल्याचा विकास करणे.

### १.२ प्रस्तावना : INTRODUCTION

समाजशास्त्रीय विश्वामध्ये प्रकार्यवादी व मार्क्सवादी सिध्दांताना विशेष महत्वाचे स्थान आहे. इतकेच नसून आजपर्यंतच्या सर्व समाजशास्त्रीय विचार आणि सिध्दांतांचा मुळ पाया प्रकार्यवाद आणि मार्क्सवाद यावरच आधारीत आहे. मार्क्सवादावरच आधारीत आहे. मार्क्स प्रकार्यवादाचा सैध्दांतिक पाया व्यवस्थेच्या तत्वावर (Social order) आधारीत आहे तर मार्क्सवादाचा समाजशास्त्रीय विश्लेषणाचा भर व्यवस्थेचा तात्वीक विरोध संघर्ष, तणाव व शोषण हा राहीला आहे. हे दोन्ही सिध्दांत समाजशास्त्रीय बौध्दिकतेची परस्परविरोधी दोन टोके असून एक परिवर्तनापेक्षा व्यवस्थेला महत्व देतो तर दुसरा परिवर्तन विषेशता क्रांतिकारी परिवर्तनाला महत्व देतो.

आपण प्रस्तुत विषयात नवप्रकार्यवादी व नवमार्क्सवादी विचारप्रवाहाचा अभ्यास करणार आहोत. प्रकार्यवाद आणि मार्क्सवादी सिध्दांत हे समाजशास्त्रीय विश्वातील लोकप्रिय सिध्दांत आहेत. आज अधुनिक समाजशास्त्रामध्ये सैध्दांतिक परिवर्तनाचे जे आव्हान निर्माण झाले त्याचा एक प्रभावी परिणाम म्हणून नवप्रकार्यवाद व नव मार्क्सवादाकडे पाहावे लागले. १९९० मध्ये रशियाचे विघटन झाल्याने मार्क्सवाद दुर्बल व अशक्त झाला. परंतु उत्तर आधुनिक सिध्दांताचे नव्याने विशलेषण सुरू केले. नवप्रकार्यवादी सिंध्दात टॉलकॉट पारसनच्या नव्या संदर्भाचा शोध घेतात. म्हणजेच परंपरागत प्रकार्यवादाला नव्या रुपात मांडायचा प्रयत्न करतात. नवप्रकार्यवादाची सुरवात व शेवट टॉलकॉट पार्सन्सवरच होतो. नव प्रकार्यवाद म्हणजे (Old wine in new bottle) होय.

नवप्रकार्यवादाप्रमाणे नवमार्क्सवाद ही एका नव्या सिध्दांताच्या स्वरूपात समोर आला आहे. आधुनिक सिध्दांतकाराच्या मते मार्क्सचे सिध्दांत आजच्या आधुनिक समाजाच्या विश्लेषणासाठी उपयुक्त नाहीत. रूढीवादी अथवा स्थापीत मार्क्सचे सिध्दांत नुसार आजच्या आधुनिक कार्पोरेट भांडवलदाराचे विश्लेषण करता येणार नाही. नवमार्क्सवाद म्हणजे फ्रँकफर्ट स्कूलची नवीन आवृत्ती, फ्रँकफर्ट स्कूलनेच नवमार्क्सवाद म्हणजे ज्यामध्ये कोणताही सामाजिक सिध्दांत अथवा विश्लेषणाला मार्क्स, फ्रडरिच व एजिंलसच्या विचारांना आपला मुळ संदर्भ बनवते म्हणजेच मार्क्सवादी विचाराचाच मुलाधार हा नव मार्क्सवादाचे वैशिष्ट्य ठरते.

जेफ्री अलेक्झेंडर यांनी आपल्या Neo – functionalism या ग्रंथात नवप्रकार्यवाद व नवमार्क्सवादी सिध्दांतात पुढील तीन स्वरूपाच्या समानता दाखवल्या आहेत.

१) नवप्रकार्यवाद आणि नवमार्क्सवाद हे दोन्ही सिध्दांत मुळ सिध्दांतातील उणीवा दर्शवितात.

२) दोन्ही सिध्दांत विरोधी विचार परंपरेचा समावेश करतात व मुळ विचारांना सोडत नाहीत.

३) हे दोन्ही सिध्दांत म्हणजे नवीन सिध्दांत निर्मीती नाही, तर मुळ मार्क्सवाद आणि प्रकार्यवादाचाच हा विकसीत किंवा सुधारणावादी सिध्दांत आहे.

### १.३ NEO FUNCTIONALISM:-

**जेफ्रे. सी. अलेक्झेंडर यांचा नवप्रकार्यवाद Jeffrey. C. Alexander:-**

अमेरिकेत जेफ्रे सी. अलेक्झेंडर यांना नवप्रकार्यवादाचा जनक The father of Neo functionalism असे संबोधले जाते. अलेक्झेंडर यांच्या १९८५ मध्ये प्रकाशीत झालेल्या.

१) Neo functionalism – 1985

२) Neo functionalism and beyond-1998

या दोन प्रसिध्द ग्रथांमुळे नवप्रकार्यवाद समाजशास्त्रीय विश्वात प्रथम पुढे आला आणि प्रसिध्द झाला. नवप्रकार्यवादी सिध्दातांत जेफ्रे अलेक्झेंडर यांची सैध्दांतिक बैठक अत्यंत महत्वाची असून त्याशिवाय आपण नवप्रकार्यवादाची व्याख्या करु शकत नाही.

**नवप्रकार्यवाद विकास : Development of Neo functionalism :**

सैध्दांतिक चळवळ अथवा सैध्दांतिक परिवर्तनाचे एक आव्हान म्हणून नवप्रकार्यवादाच्या इतिहासाकडे पहावे लागेल. नवप्रकार्यवादाचा जन्म १९५० मध्ये जर्मनीत झाला व नंतर १९८५ मध्ये प्रथमत: जेफ्री अलेक्झेंडर यांनी आपल्या Neo functionalism या ग्रंथांमध्ये समाजशास्त्रीय विश्वात प्रसिध्द झाला. युरोपातील, विशेषत: जर्मनीतील समाजशास्त्राच्यावर टॉलकॉट पारसन्स प्रभाव होता. जर्मन समाजशास्त्रज्ञ लुहमन यांनी आपल्या The Differentation of society १९८२ च्या ग्रंथांत पारसन्स यांच्या सिध्दांताचा नव्याने शोध घेतला. जर्मन समाजशास्त्रज्ञ हेबरमास ने देखील पारसन्स यांच्या व्यवस्था सिध्दांतामध्ये सुधारणा केल्या. पारसन्स यांच्या कार्यवादातून ज्या नवप्रकार्यवादचा जन्म झाला त्याचा विकास जर्मनीत झाला. थोडक्यात जर्मनीमध्ये १९८० च्या दशकात पारसन्स यांच्या रचनात्मक व कार्यात्मक सिध्दांताचे समीक्षण करण्याची जी नव्या पिढीतील समाजशास्त्राची सैध्दांतिक चळवळ सुरू झाली, त्यालाच नवप्रकार्यवादी सिध्दांत असे म्हणता येईल.

याबाबत स्वत: जेफ्रे अलेक्झेंडर म्हणतात की, नवप्रकार्यवाद हा एक नवीन अथवा विकसीत सिध्दांत नसून तो केवळ प्रकार्यवादाचा एक झुकलेला वळलेला मार्ग आहे किंवा तो एक कल आहे, ती प्रवृत्ती म्हणता येईल.

जेफ्री अलेक्झेंडर यांच्या मते नवप्रकार्यवाद म्हणजे संरचना कार्यवादी सिध्दांताला सैध्दांतीक फरक मिळवून देण्याच्या दृष्टीने व वैचारिक व्यापकता करण्याच्या दृष्टीने टिकात्मक आत्मसमिक्षण होय. थोडक्यात टॉलकॉट पारसन्स यांनी समाजरचनेच्या अभ्यासामध्ये ज्या विचारांची मांडणी योग्य प्रकारे केली नाही, अशा विचारांना नवप्रकार्यवादामध्ये स्थान देण्यात आले आहे.

जेफ्रे अलेक्झेंडर यांनी संरचना प्रकार्यवादावर ज्या टिका केल्या त्यांचा अभ्यास करून त्यांनी नवप्रकार्यवादाची मांडणी केली.

१) संरचनाप्रकार्यवादात व्यक्तीला गौण स्थान

२) संघर्ष व सामाजिक परिवर्तनाकडे दुर्लक्ष

३) व्यवस्था स्थितीशीलतेला अवास्तव महत्व

४) एकता व तत्ववादाला अवाजवी महत्व

५) संरचनात्मक प्रकार्यवाद हा अनुभवनिष्ठ व वस्तूनिष्ठतेपासून दूर आहे.

यांनी वरील टिकांचा अभ्यास करून नवप्रकार्यवादात यावर मात कशी करता येईल यासंबंधी प्रामाणिक प्रयत्न केला.

जेफ्रे अलेक्झेंडर यांच्या मते नवप्रकार्य हा नविन सिध्दांत निर्मीतीचा प्रयत्न नसून ती फक्त एक प्रवृत्ती आहे. अलेक्झेंडर यांनी नव प्रकार्यवादी सिध्दांताच्या पुढील प्रवृत्ती विशद केल्या.

१) **Neo functionalism is Multi Dimensional :**

म्हणजे नवप्रकार्यवादात Macro विश्लेषणाचा समावेश आहे. नवप्रकार्यवाद हा बहुआयामी असून सुक्ष्म आणि विशाल म्हणजेच मीड व गारफिकेल तसेच मार्क्स, डरखीम यांच्या विशाल सिध्दांताचा समावेश आहे.

२) **Left Orientation :**

नवप्रकार्यवाद हा वामपंथी अथवा ..... विचारसरणीकडे झुकलेला आहे. पारसन्स च्या परंपरागत प्रकार्यवादाला आपला दर्जा आणि आधुनिकता या बद्दलचा असणारा आग्रह बदलण्याची गरज आहे.

३) **Democratic Analysis :**

परंपरागत प्रकार्यवाद हा यथास्थितीचे समर्थन करतो. सहाजिकच तो सामाजिक समानता व श्रेष्ठजनाचे समर्थन करतो. हा समाज नष्ट करून प्रकार्यवाद विश्लेषण हे अधिक लोकतंत्रात्मक पध्दतीने होण्याची गरज आहे.

४) **Conflict – Orientation :**

परंपरागत प्रकार्यवाद हा व्यवस्था टिकवून ठेवणे, सामाजिक संघर्षाचे नियंत्रण करणे, सामाजिक तणावाच्या प्रबंधनाची चर्चा करतो. संरचनात्मक प्रतिमान टिकवून ठेवण्यावर भर देतो. परंतू नवप्रकार्यवाद हा संघर्षाचे महत्त्व कमी करत नाही, तर संघर्ष व तणावाच्या विश्लेषणावर भर देतो.

५) **Reactivity :**

व्यवस्थेचा परिवर्तन हा नियम असून व्यवस्थित अनिश्चितता येते. हे सत्य नाकारून चालणार नाही. नवप्रकार्यवादाला नवे काहीतरी सृजनात्मक करावे लागले. आंतरक्रियाच्या स्तरावर ही (interaction level) ही सृजनात्मक किंवा रचनात्मकता येऊ शकते.

**नवप्रकार्यवादाची वैशिष्ट्ये : Characteristics OF NEO FUNCTIONALISM**

जेफ्री अलेक्झेंडरच्या नव प्रकार्यवादाची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतील :

१) **Neo functionalism is Reconstriaction of functionalism :**

स्वत: अलेक्झेंडर हे नवप्रकार्यवादला एक नवीन सिध्दांत न मानता परंपरागत प्रकार्यवादाचीच एक सुधारीत आवृती मानतो नवप्रकार्यवाद हा जुन्या प्रकार्यवादाचेच एक विकसीत किंवा सुधारीत प्रतिमान आहे.

२) **Neo Functionalism is Post Positivism :**

समाजशास्त्र हे अनुभवाधिष्ठित व प्रत्यक्षवादी विज्ञान आहे या मताला काही शास्त्रज्ञाचा विरोध आहे कारण समाजशास्त्र हे समजण्यावर (Understanding) वर भर देतो निरिक्षणावर (Observation) नाही. उत्तर प्रत्यक्षवाद्याच्या मते समाजशास्त्राने सिध्दांत व अनुभवधिष्ठता या दोन्ही तत्वावर भर दिला पाहिजे.

नवप्रकार्यवादी सिध्दांत हा अनुभवधिष्ठित तथ्ये व सिध्दांत या दोहोचा स्विकार करतो.

३) **Neo functionalism : It is a Multi Dimensional Sociology :**

नवप्रकार्यवाद हा अनेकविध प्रकारच्या सिध्दांताचा स्विकार करतो. सिध्दांत निर्मितीच्या अनेक पध्दती (Methods) संकल्पना व मान्यता असतात. नवप्रकार्यवाद मुक्तपणे विविध सिध्दांतांना आपल्यामध्ये सामावून घेतो.

४) **Action is alternative :**

नवप्रकार्यवादानुसार कर्त्याची क्रिया ही मुक्त असते व कर्ता स्वत: इच्छेनुसार क्रियेचा (Action) निवड करत असतो टॉलकॉट पारसन्सचा प्रकार्यवादामध्ये कर्त्याच्या क्रियेचा संबध हा व्यवस्थेच्या (Order) अस्तित्वाशी जोडला आहे. पारसन्सच्या मते कर्त्याच्या क्रिया या नेहमी मुल्यात्मक, आदर्शात्मक व उद्देशात्मक व उद्देशपूर्ण असतात. परंतू नवप्रकार्यवाद हा क्रियेची नवीन व्याख्या करतो.

५) **Complexity of Symbols :**

नवप्रकार्यवाद हा प्रतिकांना Symbols खूपच काळजीपूर्वक समजून घेण्यावर भर देतो. प्रतिकांचा संबंध हा क्रियेशी असतो. कर्त्याच्या Actor क्रियेमध्ये प्रतिकांची भूमीका अत्यंत महत्वाची असते. प्रतिकांना समजून घेणे हे अत्यंत जटील व गुतांगुंतीचे असते. नवप्रकार्यवाद प्रतिकांना व त्यातील जटीलता समजून घेण्यावर विशेष भर देतो.

**RECONSTRUCTION OF CLASSIC SOCIOLOGY : Jaffrey Alexander :**

जेफ्रे अलेक्झेंडर याचा नवप्रकार्यवादाची नवीन संरचना निर्माण करतो. पारसन्स यांचा प्रकार्यवाद हा व्यक्तीवादाचा कटट्र विरोधक होता. परंपरागत प्रकार्यवाद हा रूढीवादी व परिवर्तन विरोधी आहे. आदर्शवादी आहे. हा रूढीवादी परिवर्तनविरोधी आदर्शवादी प्रकार्यवाद जेफ्रे अलेक्झेंडर नाकारतो.

जेफ्रे अलेक्झेंडर यांचा नवप्रकार्यवादाची निर्मिती करताना त्यांचा कल संघर्षाकडे आहे. नवप्रकार्यवादात क्रांतीकारी तत्वाचा समावेश आहे. अलेक्झेंडर यांनी नवप्रकार्यवादाच्या माध्यमातून टॉलकॉट, पारसन्स यांच्या सिध्दाताना नवसंजीवनी दिली आहे. जेफ्रे अलेक्झेंडर यांचे अत्यंत महत्वाचे कार्य म्हणजे त्यांनी टॉलकॉट पारसन्स यांच्या सैध्दांतिक समाजशास्त्राला सुधारीत स्वरूपात पुर्नस्थापित (Reconctraction of classic sociology) केले आहे.

जेफ्रे अलेक्झेंडर यांच्या **Theoretical logic in sociology – 1982 :**

हा ग्रंथ या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण आहे. टॉलकॉट पारसन्स यांचा Structure of social action या ग्रंथात सिध्दांत निर्मितीचा प्रश्न उचलला आहे. या ग्रंथात पारसन्स यांनी सिध्दांताचे ऐतिहासिक विश्लेषण केले असून विलफ्रेड परेटो, डरखिम, मॅक्स वेबर, आदींच्या सिध्दांताचे विश्लेषण केले आहे. पारसन्सनी यांच्य ग्रंथात क्रियेचा सिध्दांत मांडला आहे.

जेफ्रे अलेक्झेंडर यांचे वरील ग्रंथ हा अनेक अर्थाने पारसन्सच्या समकक्ष आहे. अलेक्झेंडर आपल्या ग्रंथात पारसन्स यांच्या अनुभवाधिष्ठित प्रत्यक्षवादाचा विरोध करतो व उत्तर प्रत्यक्षवादावर (Post Positivism) भर देतो. तसेच जेफ्रे अलेक्झेंडर यांचा मतानुसार Classical Sociology ने आदर्शवाद आणि भौतिकवादाच्या विरोधाला दूर करू शकले नाहीत. अलेक्झेंडर यांच्या Theoretical logic व पारसन्स यांची Social Action यामध्ये बरीच समानता असली तरी अलेक्झेंडर यांनी पारसन्सच्या विश्लेषणात बरीच सावधानता बाळगली आहे.

**Neo – Functionalism and Jaffrey Alexaznder :**

जेफ्रे अलेक्झेंडर आपल्या नवप्रकार्यवादात पूढील महत्वपूर्ण तत्वाची चर्चा करतो.

१) जेफ्रे अलेक्झेंडर आपल्या नवप्रकार्यवादात प्रकार्यवाद या शब्दाच्या अर्थावरच प्रश्न उपस्थित करतो. कारण या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. रॉबर्ट मर्टन यांनी प्रकार्य या शब्दाचा अर्थ तीन प्रकारे स्पष्ट केला. व्यवहारात प्रकार्य या शब्दाचा अर्थ कार्य असा आहे तर गणितात त्याचा अर्थ, कार्यकारण असा आहे समाजाशास्त्रात याचा अर्थ क्रियेशी (Action) जोडला आहे.

१. समाज ही मुक्त स्वरूपाची व्यवस्था असून तिच्या मध्ये विविधता असते. एका संपूर्ण समाजाचे विश्लेषण Open and plural रूपात झाले पाहिजे. नवप्रकार्यवादात समाजव्यवस्था आणि व्यवस्थेतील घटकांच्यामध्ये असणाऱ्या पारस्पारीक संबंधाना महत्त्व असते.

२. क्रिया (Action) व संरचना दोन्ही परस्परात प्रभावीत करतात. संरचना (Structure) जशी क्रियांना

ठरवते. त्याचप्रमाणे क्रिया देखील संरचनेवर प्रभाव टाकतात म्हणून क्रिया व संरचनेचे विश्लेषण मुक्तपणे केले पाहिजे.

३. जेफ्रे अलेक्झेंडर यांच्या मते सामाजिक ऐक्य ही पूर्णत्वाला घेऊन जाणारी नाही तर सामाजिक एकात्मता निर्माण करण्याचा तो एक प्रयत्न असू शकतो आणि विचलन (Deviance) तसेच संघर्षाला (Confict) वास्तव मानले पाहिजे.

४. नवप्रकार्यवादामध्ये व्यक्तीमत्व (Personality) संस्कृती (Culture) व समाज (society) यांना भिन्न – भिन्न स्वरूपात बघितले पाहिजे. परंगरागत प्रकार्यवादाने व्यक्तीमत्व विकास, संस्कृती व समाजव्यवस्था ही अभ्यासपध्दती स्विकारली असली तरी व्यवस्थेतील परिवर्तन व त्यामुळे निर्माण होणारी अव्यवस्था व त्यासंबधीची नियंत्रणात्मक व्यवस्था यांचा अभ्यास नवप्रकार्यवादात महत्वाचा मानला आहे.

५. सामाजिक परिवर्तनाकरीता विभेदीकारण असणे गरजेचे आहे. अलेक्झेंडर यांच्या मते समाजातील परिवर्तन व्यक्ती वर्चस्व आणि विविध संस्थांच्या रचनात्मक बदलामुळे होऊन येत असते.

६. समाजशास्त्रीय विश्लेषणात ज्या संकल्पना (Concept) वापरल्या जातात त्या स्वतंत्रपणे विकसित केल्या पाहिजेत. संकल्पनाच्या व्याख्या स्वतंत्रपणे दिल्या पाहिजेत. संकल्पना व सिध्दातांची मांडणी स्वतंत्रपणे समाजशास्त्रीय आधाराशिवाय असली पाहिजे.

२. जेफ्रे अलेक्झेंडर यांच्या मते, विज्ञान भौतिक असो सामाजिक त्याने अनुभवधिष्ठता व तर्काच्या आधारे आपले निष्कर्ष काढले पाहिजेत.

नवप्रकार्यवादी सिध्दांताच्या क्षेत्रात अलेक्झेंडर यांची बैठक महत्त्वाची आहे. सिध्दांत हे वस्तूस्थिती निष्कर्ष असतात. सामान्यत: सामाजिक शास्त्रे सिध्दांताना अनुभवाधिष्ठत तथ्यच्यामध्ये गुंतवतात. टॉलकॉट पारसन्स यांनी याच्या आधारे आपली सिध्दांत निर्मिती केली आहे.

उदा. मॅक्स वेबरनी आपल्या Protestant ethics and sprite of capitalism सिध्दांत व्यक्तीचा धर्म अथवा जीवनविषयक दृष्टिकोण व्यक्तीचे आर्थिक वर्तन निश्चित करतात. आता या पध्दतींचा समाजशास्त्रात असा प्रयोग केला जाईल की वेबरच्या या सिध्दांताला घेऊनच क्षेत्रातील तथ्ये (field survey) एकत्रीत केली जातील.

याचा परिणाम असा होईल की जे वेबरच्या सिध्दांताला अनुकूल आहे अशीच तत्वे प्रकाशात आणली जातील. तथ्याची जमवाजमव सिध्दांत कल्पनेनुसार (Hypothesis) केली जात असल्याने अशा प्रकारचा प्रत्यक्षवाद हा सिध्दांताला नाकारत नाही.

३. नवप्रकार्यवादामध्ये अलेक्झेंडर अशा प्रकारचा रूढ प्रत्यक्षवाद स्विकारत नाही. टॉलकॉट पारसन्स यांनी देखील आपल्या प्रकार्यवादात याच प्रकारच्या प्रत्यक्षवादी अध्ययन पध्दतीचा वापर केला आहे. अलेक्झेंडर यांनी या प्रत्यक्षवादाला उलट केला.

अलेक्झेंडर यांच्या मते :

सिध्दांत व गैरअनुभविक सिध्दांत यात फार मोठा फरक वा अंतर असते. म्हणूनच आम्ही जो काही प्रंबध अथवा सिध्दांत तयार करू याचे अनुभविक व सैध्दांतिक विश्लेषण फारच स्पष्ट असले पाहिजे. असे होऊ नये की सिध्दांताच्या अनुमोदनात अनुभवधिष्ठित विश्लेषण करून आपल्या कर्तृत्वाचा तो शेवट मानावा.

थोडक्यात अलेक्झेंडर यांचा हा तर्क फारच शक्तीशाली आहे.

४. जेफ्रे अलेक्झेंडर आपल्या नवप्रकार्यवादात उत्तर प्रत्यक्षवाद (Post-Positism) ही एक महत्वाची पध्दती मानतो. विज्ञानाने सिध्दांत व अनुभव या दोन्ही तत्वावर भर दिला पाहिजे. नवप्रकार्यवादी सिध्दांत व सिध्दांत व तथ्य यात फरक करत नाहीत. अनुभविक तथ्याचे निर्धारण सिध्दांत करतात. कोणतेही तथ्य सिध्दांताला नाकारत नाही.

जेफ्रे अलेक्झेंडर उत्तर प्रकार्यवादाला एक महत्वाची पध्दती मानतो म्हणूनच तो पारसन्स व इतर समाजशास्त्रज्ञाच्या परंपरागत प्रत्यक्षवादाला पूर्णपणे नाकारतो.

५. जेफ्रे अलेक्झेंडर यांचा असा विश्वास आहे की उत्तर प्रत्यक्षवादी (Post Positivism) पध्दतीमुळेच समाजशास्त्र योग्य निष्कर्ष देऊ शकेल. उत्तर प्रत्यक्षवाद हा तर्कावर (Logic) आधारीत आहे.

जेफ्रे अलेक्झेंडर यांचा नेहमीच असा प्रयत्न होता की समाजशास्त्राला एक सैध्दांतीक तर्क द्यावा. यासाठी त्यांनी क्रिया (Action) आणि व्यवस्थेच्या संकल्पना मांडल्या. अलेक्झेंडर यांच्या संकल्पना अशा आहेत की समाजशास्त्रीय विश्लेषणात त्या यशस्वीपणे लागू केल्या जाऊ शकतात.

थोडक्यात जेफ्रे अलेक्झेंडर यांनी पारसन्स यांच्या सिध्दांताना नवसंजीवनी दिली.

पाल कोलोमी याबाबत म्हणतात :

अलेक्झेंडर पारसन्सच्या प्रकार्यवादाच्या टिकेत कंजुषी केली नाहीत. तो सर्व दृष्टीने नवप्रकार्यवादाच्या सिध्दांत निर्मितीत प्रामाणिक राहिला. त्याने फारच स्पष्ट शब्दात पारसन्सच्या सिध्दांताना नाकारले आहे.

शेवटी अलेक्झेंडर म्हणतो :

आजच्या नागरी राज्यानी परस्पर विरोधी वर्गाला शक्तीशाली बनवले आहे. लिंग व वयातील भेद वाढले आहेत. धार्मिक कट्टरवाद फोफावत आहे. गरीब माणसाचे जीवन पूर्णपणे उध्वस्त झाले आहे. आणि म्हणूनच अमेरिकेत ज्या प्रकारचे सामाजिक अध्ययन होत आहे. त्यापासून कुणालाच फायदा नाही. मग अशा या प्रकार्यवादाला आम्ही का म्हणून स्विकारायचे म्हणूनच प्रकार्यात्मक सैध्दांतीकता व अनुभविकतेचा त्याग करणेच योग्य आहे.

### १.२.१.१: स्वयं अध्ययनाचे प्रश्न

**एका वाक्यात उत्तरे लिहा**

१) नवप्रकार्यवादाचा जनक कोण आहे ?

२) Neo functionalism and beyond हा ग्रंथ कोणी लिहीला ?

३) नवप्रकार्यवादाचा जन्म कोणत्या देशात झाला ?

४) जेफ्रे अलेक्झांडर आपल्या नवप्रकार्यवादात कोणती पध्दती महत्वाची मानतो ?

५) जेफ्रे अलेक्झांडर यांनी नवप्रकार्यवादात कोणाच्या सिध्दांतावर टिकात्मक भाष्य केले ?

इ) **HEGELIAN MARXISM: Georg Lukacs & Antono Gramsci**

**हेगेलियन मार्क्सवाद : जॉर्ज लुकास आणि ॲन्टोनो ग्रामसी**

**Introdution**

कार्ल मार्क्स आणि त्यांच्या मार्क्सवादी सिध्दांताचे अधिराज्य अनेक दशक समाजशास्त्रीय विश्वावर होते व आज सुध्दा मार्क्सवादाला प्रमाण मानणारा खूप मोठा समाजशास्त्राचा वर्ग आहे. मार्क्स आपल्या विचारामध्ये अर्थिक शक्ती याच व्यवस्थेचा परिवर्तन याच शक्ती नियंत्रित करतात. मार्क्सनी सामाजिक व्यवस्थेची व्याख्या उत्पादन पध्दती, उत्पादन संबध व अर्थसंख्येच्या संदर्भातच केली आहे. उत्पादन मार्क्सनी श्रमिक व कामगार वर्गाला एका सामाजिक शक्तीच्या स्वरूपात पूढे आणून उत्पादन संबंधातील विरोध व शोषण हेच **आज हासीक परिवर्तनाला कारण** मानले व हेच कारण भांडवलशाहीच्या विनाशाला व साम्यवादी समाजाच्या निर्मितीत महत्वाचे ठरणार आहे. मार्क्सचे हे विचार आजसुध्दा समाजशास्त्रीय विश्वात खूपच प्रसिध्द आहेत.

रशिया मध्ये मार्क्सप्रणीत साम्यवादाचा पराभव झाला. मार्क्सवाद अशक्त व दुर्बल ठरला असला तरी हा दोष मार्क्सच्या सिध्दांताचा नसून अत्यंत चुकीच्या पध्दतीने रशियात मार्क्सप्रणीत साम्यवाद राबवला गेला असे मानणारा एक मोठा वर्ग समाजशास्त्राचा आहे. याच वेगाने मार्क्सच्या सिध्दांताचे नव्याने विश्लेषण सूरू केले. इतकेच नव्हे तर मार्क्सच्या सिध्दातांतील दोष, उणीवा मांडण्याचा प्रयत्न केला व याचाच एक परिणाम म्हणून नवमार्क्सवाद neo – Marxism सिध्दांत रूपाने पुढे आला. यामध्ये जार्ज लूकास, ग्रामशी, हेबरमास अलथूसर या नव मार्क्सवादी समाजशास्त्रज्ञाचे योगदान अंत्यत महत्त्वाचे ठरते.

**फ्रँकफर्ट स्कूल ही नवमार्क्सवादाची जननी**

जर्मनीमधील फ्रॅकफर्ट या शहरात २३ फेब्रुवारी १९२३ संशोधन संस्था स्थापन केली. हा नवमार्क्सवादी शास्त्रज्ञाचा समूह होता. मार्क्सच्या आर्थिक निर्धारकवादी विचारांशी प्रामाणिक राहून या समूहाने एक समिक्षणात्मक सिध्दांतप्रणाली (critical theory) विकसीत केली. परंतु जर्मनीमध्ये नाझीवादाचा प्रणेता हिटलर सत्तेवर आल्याने या संस्थेच्या अभ्यासकांनी अमेरिकेत जाऊन आपल्या विचारांची मांडणी सुरु ठेवली यालाच 'फ्रँकफर्ट स्कूल' असे म्हटले जाते.

फ्रँकफर्ट स्कूलचा मूख्य उद्देश कार्ल मार्क्स यांच्या विचारांना चालाना देणे हा असला तरी मार्क्सच्या सिध्दांताचे नव्याने विश्लेषण करून मार्क्सवादाला एक नव्या सुधारणावादी स्वरूपात पुढे आणणे हा होता. या शास्त्रज्ञाचा असा विश्वास होता की मार्क्सवादाला जिवंत ठेवायचे असेल तर त्यात संशोधन करण्याची गरज आहे व याच गरजेतून नव मार्क्सवाद जन्माला आला.

नवमार्क्सवाद्याच्या मते रूढीवादी मार्क्सप्रणीत सिध्दांत आजच्या आधुनिक समाजाशी अनुकूल बरोबर नाहीत. मार्क्स कालीन भांडवलशाही व्यवस्था बदलून तिच्या ठिकाणी कार्पोरेट भांडवलवाद कमजोर आहे. मार्क्सनी मांडलेला इतिहासवाद चूकीचा आहे म्हणून मार्क्सवादाचे विश्लेषण समाजाच्या नव्या संदर्भात करावे.

नवमार्क्सवादी समाजशास्त्रज्ञ हिच मोहिम चालवत आहेत. फ्रँकफ्रट स्कूलने नवमार्क्सवादाला जन्म दिला. नवमार्क्सवाद म्हणजे कोणताही समाजशास्त्रीय सिध्दांत वा विश्लेषण मार्क्स, फ्रेडरिच व एंजिलस ला आपला मूळ संदर्भ बनविते. नव मार्क्सवादात मार्क्सवादी विचारांचा आधार घेतला जातो. पण इतर सामाजिक सिध्दांतांच्या परंपरानांही मुक्तपणे सामावून घेतले जाते.

**NEO MARXISM :- GEORG LUKACS**

**नव– मार्क्सवादात जॉर्ज लुकास यांचे योगदान :**

जॉर्ज लुकास यांना नवमार्क्सवादी समाजशास्त्रज्ञ म्हणून समाजशास्त्रीय विश्वात ओळखले जाते. जॉर्ज लूकास यांनी आपल्या History of class consiciousness या ग्रंथात नवमार्क्सवादी सिध्दांताची मांडणी केली. लूकास यांनी या ग्रंथात मार्क्स आणि परंपरागत मार्क्सवादावर प्रखर भाष्य केले इतकेच नव्हे तर पारंपारिक मार्क्सवादी विचारसरणीला एक प्रकारे वैचारिक आव्हान दिले.

१९९२ च्या रशियातील ग्रोर्बाचव्हे यांच्या लोकशाहीवादी क्रांतीमुळे रशियात साम्यवादाचा प्रयोग फसला. स्टॅलनिच्या साम्यवादी हुकुमशाही राजवटीत मानवतेचाच गळा घोटला गेला. त्याचबरोबर जर्मनी ऑस्ट्रिया, हंगेरी यासारख्या राष्ट्रांत साम्यवादी राजवटी धडाधड कोसळून पडू लागल्या. मार्क्सनी श्रमिक दीन, दलीत गरीबांच्या उध्दारासाठी जो आदर्श साम्यावादी समाजरचनाचे स्वप्न दाखवले होते ते भंग पावले. याउलट या साम्यवादाने लाखाचे बळी घेतले. वास्तववाद आणि आदर्श साम्यवाद यातील अंतर अनेक सामाजिक विचारवंतांच्या समोर आले. अशा स्थितीत लुकास यांनी आपल्या History of class consciousness या ग्रंथांत कर्तव्यनिष्ठ राजवटी आणि कट्टर साम्यवादी विचारसरणीवरच प्रश्नचिन्ह उभे केले. लुकास यांनी या ग्रंथांत पारंपारिक मार्क्स वादाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले.

जॉर्ज लुकास यांनी आपल्या नवमार्क्सवादा अलगीकरण कलापानिकवाद, सापेक्षवाद, वर्गजाणीव इ. संकल्पनाच्या साह्याने कार्ल मार्क्स यांच्या सिध्दांताचे टिकात्मक समिक्षण केले. लुकास यांनी या ग्रंथात मार्क्सवादी सिध्दातांची सापेक्षतावादी (subjectivity) बाजू मांडण्याचा प्रयत्न केला.

**मार्क्सच्या सिंध्दांतावर जार्ज लूकास यांचे टिकात्मक समीक्षण :**

जार्ज लूकास यांनी आपल्या History of class consciousness या ग्रंथांत आपल्या नव –मार्क्सवादी सिध्दांतात मार्क्सच्या विचाराचे टिकात्मक समिक्षण केले. लुकास यानी भांडवलशाहीतील आर्थिक संबंधांची व्यवस्था, त्यातील व्यक्ती त्यांचे विचार, कृती यात निर्माण होणाऱ्या दंडात्मक घटकांचा आणि आधुनिक मार्क्सवादातील दोषाचे स्पष्टीकरण करून मार्क्सवादाला एक नवा चेहरा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला.

लुकास यांनी मार्क्सच्या काही विचारांचे पुढील प्रमाणे टिकात्मक समिक्षण केले.

१. लुकास यांचे मते, मार्क्सनी आपल्या वर्ग आणि वर्गसंघर्षाच्या सिध्दांतात शोषणावर आधारित भांडवलशाहीचे व त्यातील उत्पादन प्रणाली व उत्पादन साधन यातील विरोधाभासाचे चित्रण करून भांडवलदार व श्रमिकांच्या वर्गसंघर्षातून, क्रांतीद्वारे भांडवलशाहीचा किनारा व निर्माण होऊ घातलेल्या साम्यवादी समाजाचे चित्र रंगवले आहे.

लुकास यांचे मते

१) मार्क्सनी या सिध्दांतात वस्तूनिष्ठतेला (objective) अवास्तव महत्व दिले आहे.

२) कामगार व श्रमिकांचे शोषण भावनिकतेच्या अंगाने वा भावनिक दृष्टिकोणातून स्पष्ट केले आहे.

लूकास यांचे मते, श्रमिक वर्गाला अपेक्षित असणारा बदल केवळ भांडवलदाराच्या उत्पादन साधनावर मालकी प्रस्थापित केल्याने होणार नाही. त्यासाठी श्रमिक वर्गाला त्यांच्यावर झालेल्या अन्यायामुळे प्रतिकार करण्याच्या उद्देशाने ज्या कृती करणे आवश्यक आहे. त्या कृतींना विशेष महत्व आहे.

२ कार्ल मार्क्स यांनी सामाजिक परिवर्तनाबाबतचे विचार स्पष्ट करताना नैतिक मूल्यांच्या पातळीवर भांडवलदार आणि कामगार यांच्यातील परस्पर संबंधाचा विचार करण्याचा प्रयत्न केला.

परंतू लूकास याचे मते

भांडवलशाहीमधील आर्थिक संपत्तीचा अधिकाअधिक वापर, आधुनिक बाजारपेठाचे स्वरूप ( New Market System ) आणि भांडवलदार वर्गाची विवेकशील कृती इ. परिणाम भांडवलदार व श्रमिकांच्या पारंपारिक संबंधाच्या निश्चितीमध्ये होतो. मार्क्सनी आपल्या विश्लेषणात या सर्वच बाबींकडे दुर्लक्ष केले आहे.

३) मार्क्स यांनी उत्पादन प्रक्रियेतील निर्मीती करण्याच्या कामगाराच्या कृतीला वस्तूनिष्ठ अभ्यासाचा घटक समजले आहे. परंतू लूकास यांचे मते प्रत्यक्षात ती कामगाराच्या श्रमाचा भाग आहे

४) जार्ज लूकास यांनी मार्क्सच्या सिध्दांताचे विश्लेषण पुढील दोन घटकांच्या आधारे केले आहे.

### २) मार्क्सच्या सिध्दांताचे पूनर्वलोकन : Review of Marx Theories

जार्ज लुकास यांनी मार्क्सच्या सिध्दातांचे पूर्नलोकन करताना मार्क्सच्या मूड, आर्थिक विचाराशी प्रामाणिक राहून मार्क्सच्या आर्थिक विचारांना चालना देण्याचा प्रयत्न केला.

जार्ज लूकास यांनी मार्क्सच्या सिध्दांतातील वस्तूची निर्मिती कामगराकडून होते आणि कामगाराच्या श्रमावरून वस्तूचे मूल्य निश्चित होते या विचाराचे खंडण केले.

लूकास यांचे मते

भांडवलशाही समाजरचनेत व्यक्तीच्या अपरिचित वस्तूच्या निर्मितीची प्रक्रिया आणि तिला मिळणारी बाजारपेठ ठरत असते. त्यामूळे मार्क्सची वस्तूबाबतची संकल्पना काल्पनिक आहे.

मार्क्सची वस्तूबाबतची संकल्पना काल्पनिक असून लूकास यांनी वास्तव स्वरूप देण्याचा देण्याचा प्रयत्न

केला. मार्क्स ची वस्तूची संकल्पना केवळ आर्थ्रिक घटकापूरती मर्यादित होती. लूकास यांनी संपूर्ण समाज व्यवस्थेच्या संदर्भात तीची मांडणी केली.

मार्क्स यांच्या मते शोषणावर असधारित भांडवलशाही समाजरचना कामागाराच्या विदारक स्थितीस कारणीभूत आहे.

यावर भाष्य करताना लुकास म्हणतात

भांडवलशाही मध्ये व्यक्तीच्या (भांडवलदार वा श्रमिक यांच्या वाट्याला असलेले जीवन ही एक नैसर्गिक प्रक्रिया असून व्यक्तिच्या कृतीचा तो एक परिणाम आहे.

**२) वर्ग चेतना Class – Consciousness**

लूकास यांचे मते भांडवलशाही पूर्वीच्या गुलामगिरी वा संरजामशाही समाजरचनेत वर्ग जाणीव निर्माण होऊ शमली नाही, परंतु भांडवलशाहीमध्ये आर्थिक संबंधावर निर्माण झालेल्या संबंधातून वर्ग जाणीव निर्माण होऊ लागली लूकास यांचे मते भांडवलशाहीमध्ये भांडवलदार वर्गापेक्षा श्रमिक कामगार वर्गात वर्गचेतना मोठया प्रमाणात निर्माण होते. कारण या वर्गाकडे बौध्दीक आणि संघटित शक्ती असल्याने ते भांडवलदार वर्गाविरूध्द संघर्ष निर्माण करू शकत होते.

**लुकास यांचे मते :**

श्रमिक अथवा कामगार वर्गातील वर्गजाणीव **(Class Consciousness)**

केवळ त्याच्या अर्थिक गरजांच्या पूर्तता करून घेण्याइतपत सीमित ठेवून भांडवलशाही व्यवस्थेला विरोध करण्याच्या कामगाराच्या प्रयत्नांना यश आले असते.

थोडक्यात मार्क्सनी वर्गचेतनेला आर्थिक घटकांशी जोडले आहे तर लूकास यांनी वर्गचेतनाचा संबंध विशिष्ट वर्गातील व्यक्तीच्या विचारांशी जोडला आहे.

थोडक्यात लूकास यांनी आपल्या नव मार्क्सवादात परंपरागत मार्क्सवादाला नवा चेहरा प्राप्त करून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. नवमार्क्सवादात त्याचे योगदान निश्चीतच प्रशंसनिय व उल्लेखनिय असेच आहे.

**NEO-MARXISM :- ANTONO GRANSCI**

**Or NEO-GRAMSCIAN THEORY**

नवमार्क्सवादात ॲन्टोनो ग्रामसी यांचे योगदान / नव ग्रामसी सिध्दांत

**Introduction :**

**प्रस्तावना :**

नवमार्क्सवादात एक अत्यंत प्रभावी शास्त्रज्ञ म्हणून ॲन्टोनो ग्रामशी यांचा उल्लेख करावा लागेल. ग्रामसी हा एक मानवतावादी विचारवंत होता व फॅसीझमचा कट्टर विरोधक होता. ग्रामसी हा लोकशाहीचा पुरस्कर्ता

असून कामगार चळवळी Labour movement या लोकशाही पध्दतीने झाल्या पाहिजेत असा आग्रह धरला. यामध्येच त्यांचे मार्क्स किंवा परंपरागत मार्क्सवादाशी वेगळेपण जाणवते. ग्रामसी यांनी बौध्दीक, शैक्षणिक, इटलीचा इतिहास राजकीय पक्ष, फॅसीझम हेजेमनी (वर्चस्ववाद) फ्रायडवाद आदी विषयावर लिखाण केले.

ग्रामसी यांनी

1. The modern prince and other writings 1959
2. Selechon from the prison Note book
3. Selechon form political writings 1971
4. The Revolution against capital 1977

हे नवमार्क्सवादी साहित्य व शोधनिबंध लिहले. ग्रामसी यांच्या या साहित्याने नवमार्क्सवादाला सर्वाधिक प्रभावी व गतिमान केले. आजच्या आधुनिक मार्क्सवादात Discourse Analysis विमर्श विश्लेषणाचे मूळ हे ग्रामसी यांच्या मार्क्सवादात दिसून येते. म्हणूनच नव ग्रामसी सिध्दांताला विमर्श विश्लेषण असेही संबोधले जाते.

आपण प्रस्तुत विषयात ग्रामशी यांच्या नवमार्क्सवादाचा थोडक्यात आढावा घेऊ.

**विमर्श विश्लेषण / नव ग्रामसी सिध्दांत**

**Discourse Analysis or Neo Gramscian Theory**

नवग्रामशी सिध्दांताचा मुख्य उद्देश हाच आहे की, मार्क्सवादाचे नूतनीकरण होणे आवश्यक आहे. मार्क्सकालीन समाज आणि भांडवलशाहीची जी रचना होती तीचे स्वरुप पूर्णपणे बदलले आहे. आणि म्हणूनच इतर सामाजिक सिध्दांताच्या परंपरेचा स्विकार करुन मार्क्सचे विश्लेषण नव्याने केले पाहिजे हे विश्लेषण स्पष्ट असावे ते रुढीवादी असू नये. ग्रामसी सिध्दांत हा विमर्शाला म्हणजेच विमर्श विश्लेषण सिध्दांताच्या विश्लेषणात्मक (Hermeneytic) रुपात प्रस्तूत करतो. नव ग्रामसी सिध्दांताचे असे मत आहे की सामाजिक शास्त्रात विश्लेषण आणि भविष्य वर्तवण्याची आवश्यकता नाही. विमर्शात सामाजिक संबंधाचे विश्लेषण झाले पाहिजे आणि मानवाला इतिहासाची केवळ निर्मिती मानली पाहिजे.

**ॲन्टीनो ग्रामसी यांचे नवमार्क्सवादी विचार**

आधुनिक नव मार्क्सवादावर ग्रामशी यांच्या विचारांचा विशेष प्रभाव दिसून येतो. ग्रामसी हा मार्क्सच्या आर्थिक निर्धारणवाद आणि द्वंदात्मक भौतिक वादाच्या स्पष्ट विरोधात होता. ग्रामशी यांच्या मते समाजात शासक आणि आहेरे वर्ग शक्तीशाली असतो. या वर्गाची हेजेमनी अथवा प्रभूत्व (Hagemony) नाहीरे अथवा सर्वहारा श्रमीक वर्गावर असते. हा वर्ग नाहीरे अथवा श्रमीक वर्गावर प्रभूत्व गाजवतोच शिवाय कुटूंब, धार्मिक समस्या, शाळा, प्रसारमाध्यमे यावरही त्याचे प्रभूत्व (Hagemony) असते व त्याच माध्यमातून तो काम करतो. ग्रामशी यांच्या मते जो पर्यत मुल्य आणि मान्यतेच्या श्रेत्रात आहेरे वर्गाचे प्रभूत्व (Hagemony) नष्ट केली

जात नाही. तो पर्यत कामगार चळवळ यशस्वी होणार नाही.

१) ग्रामसी यांनी मार्क्सच्या आर्थिक निर्धारणवादाचे खंडण केले व मार्क्सच्या आर्थिक निर्धारकवादी (Economic determinst) विचारांना आधुनिक विचारांकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. ग्रामसी यांच्या मते मार्क्सचे आर्थिक विचार काल्पनिक दैववादी आणि तांत्रिक स्वरुपाचे आहेत.

२) ग्रामसी यांनी मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिक वादाचे खंडण केले. मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवाद हा अर्थ संस्थेतील परिवर्तनाचा आदिम साम्यवादापासून साम्यवादापर्यतचा इतिहास आहे. ग्रामसी यांच्या मते ऐतिहासिक घडामोडी अथवा परिवर्तन हे आपोआप किंवा सहज होत नाही. मार्क्सनी समाजपरिवर्तन अथवा क्रांती साठी फक्त आर्थिक कारणावर विशेष भर दिला आहे. परंतू क्रांतीसाठी विचारसरणी (Ideology) महत्वाची ठरते.

३) ग्रामसी यांच्या मते क्रांतीसाठी समाजातील बौध्दिक वर्गाची भूमिका महत्वाची ठरते नाही रे अथवा सर्वहारा वर्गाकडून क्रांती होत नसते तर प्रथमत: जनसामान्याच्या मध्ये क्रांतीची विचारसरणी विकसीत व्हावी लागते. समाजातील बौध्दिक वर्ग अशा प्रकारच्या विचारांची (Ideology) मांडणी करतो व जनसामान्य अथवा नाही रे वर्ग ज्याची प्रत्यक्ष अमंलबजावणी करु शकतो. नाहीरे वर्गाला अथवा जन सामान्यांना स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव नसते. त्याच्यात स्वअस्तित्वाची जाणीव निर्माण करणे व क्रांतीसाठी त्यांना प्रेंरित करणे हे काम समाजातील बौध्दिक वर्गाचे असते. ग्रामशी यांचे मते

क्रांतीच्या माध्यमातून केवळ समाजातील आर्थिक उत्पादनाची साधने व त्यावरील मालकी आणि शासन सत्ता हस्तगत करुन चालत नाही तर क्रांतिकारी वर्गाने समाजाच्या सांस्कृतिक घटकावर नियंत्रण अथवा प्रभूत्व प्रस्थापित करणे आवश्यक ठरते.

४) ग्रामसी यांचे मते विचारसरणी (Ideology) मुळे समाजात स्थिरता निर्माण होते. प्रस्थापित विचारसरणी ला विरोध करणारी आणि समाजातील वेगवेगळया संस्था आणि सामाजिक स्वरातून निर्माण होणारी नवीन विचारसरणी प्रत्यूत्तर म्हणून आपले वर्चस्व प्रस्थापित करते १९२० च्या कालखंडात वर्तमानपत्रे (Press) हे एक वर्चस्व निर्माण करणारे माध्यम होते. वृतसंस्थाच्या साहाय्याने वैचारिक वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात होता. परंतु त्याचबरोबर धर्मसंस्था शिक्षण आणि सामाजिक सांस्कृतिक समुहाची भूमिका देखील प्रेस इतकीच महत्वाची होती कारण यांच्या माध्यमातून शासनावर टिका केली जात होती. समाजातील वर्तमानपत्रे आणि अशा संस्था नवीन विचारसरणी विकसित करुन सामाजिक चळवळीच्या साहाय्याने शासनाला विरोध करत होत्या.

५) ग्रामसी यांनी आपल्या नवमार्क्सवादात theory of hegemony स्पष्ट केली. ग्रामशी या संकल्पनेबाबत म्हणतो की सत्ताधारी वर्गाकडून केले जाणारे 'सांस्कृतिक नेतृत्व' Hegemony म्हणजे केवळ पोलिस यंत्रणेच्या साहाय्याने सत्ता प्रस्थापित करणे असा नसून शासक अथवा आहेरे चा वर्ग आपली प्रभूत्व अथवा नियंत्रणासाठी कुटुंब, धर्मसंस्था, शिक्षण संस्था, वृत्तपत्रे इत्यादी सामाजिक संस्थांव्दारे नियंत्रण अथवा वर्चस्व प्रस्थापित करत असतो.

ग्रामसी यांनी आपल्या नवमार्क्सवादात theory of hegemony अथवा वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. त्यातून दबावगट (pressure group) निर्माण होतात. हे दबावगट शासन आणि समाजातील अन्य सांस्कृतिक क्षेत्रात एक माध्यम म्हणून भूमिका पार पाडतात याचबरोबर दुसऱ्या बाजूला समाजातील काही दबावगट शासनाला विरोध करत असतात व हे दबावगट नवे विचार आणि सामाजिक चळवळीच्या साहाय्याने प्रस्थापित शासनव्यवस्थेला आव्हान करतात.

थोडक्यात ग्रामसी यांनी Hegemony आणि सांस्कृतिक नेतृत्व यांचा संबंध स्पष्ट केला आहे. समाजातील बुध्दीवादी वर्ग अथवा सांस्कृतिक नेतृत्वाला सोबत घेऊन शासन व भांडवलशाही कशी काय कार्य करते व त्याला जनसामान्याच्याकडून कशी मान्यता मिळवली जाते याचे स्पष्टीकरण केले आहे. ग्रामशी यांच्या मते जोपर्यंत मूल्य अथवा मान्यतेच्या क्षेत्रात शासक अथवा बुर्जवा तत्वाचे प्रभूत्व अथवा नियंत्रण (Hegemony) नष्ट केली जात नाही तो पर्यत कामगार चळवळी यशस्वी होणार नाहीत. आर्थिक तत्वाच्या विरोधात वैचारिक संघर्षाची आवश्यकता आहे.

**विमर्श विश्लेषण :**

गिडेन्स यांनी विमर्श या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करताना म्हटले की विमर्श सामाजिक जीवनाच्या विशिष्ट क्षेत्रात चिार करण्याची पध्दती आहे उदा. अदिवासी गुन्ह्याचा असा विचार करतात की गुन्हेगार हा जन्मता असतो. असा विचार ज्या विशिष्ट समाजाचा आहे त्यास विमर्श म्हणतात थोडक्यात विशिष्ट बाबीकडे पाहण्याचा विचार करण्याचा जो दृष्टीकोण आहे त्यास विमर्श असे म्हणतात. भारतीय जनता पक्ष हा हिंदूत्वादी पक्ष्ज्ञ आहे. हिंदुत्व हा एक विमर्श आहे. हिंदूत्वाबाबतचा एखाद्याा राजकीय पक्षाबाबतचा हा विचार कदाचीत सत्य असू शकतो किंवा चूकीचा असू शकतो परंतू सामाजिक जीवनाबाबत लोकांच्या विचार करण्याच्या पध्दतीलला विमर्श असे म्हणतात.

ग्रामसी यांच्या मार्क्सवादी विचारावर नंतर विमर्श विश्लेषणाच्या दृष्टीकोणाचा विकास केला गेला ग्रामसी यांनी मार्क्सविषयी जे विचार मांडले, त्या विचारांचे विश्लेषण ग्रामसी नंतरच्या समाजशास्त्रज्ञानी केले ते थोडक्यात पुढीलप्रमाणे.

१. समाजवादी समाजाची निर्मीती लोकशाही व्यवस्थेद्वारा होऊ शकते-

कार्ल मार्क्स लोकशाही व्यवस्थेला नाहीरे वर्गाच्या शोषणाचे हत्यार मानतो. लोकशाही ही भांडवल शाहीची जननी असून ती समजावादी समाजाच्या निर्मीतीत अडथळा ठरते असा मार्क्सचा निष्कर्ष आहे. ग्रामसी मार्क्सच्या या निष्कर्षाला नाकारतो ग्रामसीच्या मते उदारमतवादी चेहरा असलेली लोकशाही व उदारमतवादी भांडवलदार वर्ग समाजवादी व्यवस्था निर्माण करण्यात सहायक ठरू शकतात मानवीय चेहरा असणारी लोकशाही समाजवादी समाजाच्या स्थापनेकरीता सहायक ठरते. ग्रामसी हा एक मानवतावादी विचारवंत होता. ग्रामसीचा लोकशाहीवर विश्वास होता. म्हणूनच ग्रामसी यांनी कामगारांच्या लोकशाहीपध्दतीच्या चळवळचे समर्थन केले.

रशियन साम्यवादी क्रांतीकारक लेनीन यांनी असे म्हटले होते की आपण एकाच वेळेला बुर्जुआ संस्थांना (लोकशाही) तिलांजली दिली पाहिजे. लोकशाही ही भांडवलवादी संस्था असून श्रमीक वर्गासाठी या संस्थेची कोणतीच प्रासंगीकता असणार नाही. ग्रामसी यांनी लेनीनच्या विचाराला विरोध केला असून असा अशावाद व्यक्त केला की उदारमवादी, मानवीय चेहरा असणारी लोकशाही व भांडवलवादी मानवीय चेहारा असणारी लोकशाही व भांडवलवादी संस्था समाजवादी समजाची स्थापना करण्यसाठी सहायक ठरतात.

२. आधुनिक समाजाच्या विश्लेषणासाठी ग्रामसीचे चिार अधिक प्रासंगिक आहेत:-

आजच्या आधुनिक समाजाच्या विश्लेषणासाठी परंपरागत मार्क्सवादी दृष्टीकोण चुकीचा आहे कारण आजच्या अधुनिक समाजातील जटीलता व गुंतागुंत सामाऊन घेण्याची क्षमता तिच्यामधे नाही. आजच्या आधुनिक समजासाठी मार्क्र्सचे क्लासीकल मॉडेल अपयशी ठरले आहे.ग्रामशी यांनी अधुनिकसमाजाच्या विश्लेषणासाठी ज्या दृष्टीकोणाचा (।चचवतंबी) विकास केला आहे तो अधुनिक समजासाठी यशस्वी ठरला आहे. तो इंग्लड सारख्या देशावर लागू करण्यात आला आहे. ग्रामसी यांच्या विमर्श विश्लेषणाला, लॅकलेव मौफेयानी भाषाशास्त्राच्या संदर्भात लागू केले होते. निकोप व पोर्टेलॉजने ग्रामसीच्या विचारावंर राजकीय समाजशास्त्राचा विकास केला जेम्स, ग्रीक ने ग्रामसीच्या मार्क्सवादला विमार्श विश्लेषणाबरोबर जोडण्याचे काम केले. थोडक्यात विमर्श विश्लेषणाचे विचारौपन ग्रामशीच्रूा मार्क्सवादातच आहे.

३. मार्क्स व ग्रामसी यांच्यातील सैध्दांतीक फरक :

ग्रामसी हा मार्क्सवादीच होता ग्रामसी आपल्या सिध्दांताचा अथवा समाजशास्त्रीय विश्लेषणाचा मुळ आधार मार्क्सचे सिध्दांतच मानतो परंतू तो आपले समजाशास्त्रीय विश्लेषण करताना इतर सामाजिक सिध्दांतानाही मुक्तपणे सामाऊन घेतो.

१. मार्क्स सामाजिक परिवर्तनाचे विश्लेषण वर्गीय संघर्ष व उत्पादन पध्दतीतील बदलातच करतो परंतू ग्रामसी सामाजिक परिवर्तनाचे विश्लेषण करताना प्रतिके भाषा विचार, राजकारण यांच्या निर्णायक भूमीकांना महत्व देतात.

२. मार्क्स वर्गसंघ संघर्षाचे मुळे कारण वर्ग मानतो वर्गीय स्वनेतच संघर्षाची बीजे दडलेली असतात वर्गीय शोषनातून संघर्ष निर्माण होतो परंतू ग्रामसी वर्गसघर्षाला मुलभूत संघर्ष मानात नाही. एखादा धार्मीक अथवा जातीय संघर्ष हा वर्गसंघर्ष असू शत नाही. समाजात वैचारीक धार्मीक, जातीय, वांशीक संघर्ष देखील असू शकतात.

३. ग्रामसीचे विमर्श विश्लेषण मार्क्सच वर्गीय विश्लेषण नाकारते ग्रामसीच्या मते जे घटक अन्य वर्गाशी संबंध ठेवतात ते वर्गाच्या ऐत्याहासीक विकसात महत्वपूर्ण भूमीका पार पाडतात.

४. परंपरागत मार्क्सवाद असे गृहीत धरता की सामाजिक विकासात बुध्दीवाद आणि विवेकाला फक्त नफा आणि वर्गीय व्यवहारातच बघीतले जाते. ग्रामसी यांचा असा तर्क आहे की अधुनिक समाजात परवर्तन आणि स्पर्धेचा व्यवहार पहावयास मिळतो. ज्ञान मिमांसा हे सामाजिक शास्त्राचे ध्येय असले पाहिजे ज्ञानाचा पाया

हा या तथ्यावर अधारीत होता की वस्तूनिष्ठता व निर्धारणवादाच्या सर्व संकल्पनेचा अस्विकार केला पाहिजे.

५. मार्क्सचे सिध्दांत हे संपूर्ण मानवी अथवा जागतीक व्यवस्थेसी संबंधीत व व्यापाक आहेत तर ग्रामसी आपल्या वर्ग आणि दंद्वात्मक भौतिकवादाचे विश्लेषण फक्त इटलीच्या ऐतिहासीक संदर्भातच करतो.

ग्रामसी यांची विमर्श विश्लेषण उत्तर मार्क्सवादी आणि उत्तर ग्रामसी आहेत. ते आर्थिक निर्धारणवादी नाहीत विमर्श विश्लेषणात भाषिक तत्वज्ञान संरचनावाद आणि उत्तर आधुनिकतावादी आहेत. ग्रामसीचे विमर्श विश्लेषण हे व्यापक आहेत. ग्रामसी यांच्या विमर्श विश्लेषणाचे महत्वपूर्ण मुद्दे म्हणजे

(१) विमर्श विश्लेषण हे ऐतिहासिक विकासात भौतिक तथ्यांना जितके महत्व देते तितकेच महत्व विचार भाषा प्रतिके या तथ्यांना देते.

(२) विमर्श विश्लेषणाच्या महत्वपूर्ण विचार म्हणजे भौतिक तथ्यांना भाषा आणि वैचारिक तथ्याशिवाय विश्लेषीत करता येत नाहीत.

(३) समाजाची वास्तविकता आणि वस्तूनिष्ठता भाषा आणि प्रतिकांच्या माध्यमानीच निर्धारित होते.

(४) समाजातील संरचनात्मक परिवर्तनाला फक्त भौतिक वा आर्थिक घटक जबाबदार नसून राजकारण व सत्ता अथवा प्रभूत्व हे घटकही महत्वपूर्ण असतात.

ग्रामशी यांनी मार्क्सवादाचे जे विश्लेषण केले त्याच आधारावर नव मार्क्सवादी विचारवंतानी विमर्श विश्लेषणाची निर्मिती केली. विमर्श विश्लेषण हे ग्रामशीचे योगदान आहे. विमर्श विश्लेषण हे एक व्यक्तीगत दृष्टीकोन (Subjective Approach) आहे जो भाषा प्रतिक आणि विचाराच्या चेतनेव्दारा मानवी क्रियेचा उगमाचा शोध घेतो. त्याचबरोबर सामाजिक संरचनेच्या भौतिक आर्थिक संरचनेलाही महत्व देतो.

**१.२.२.१: स्वयं अध्ययनाचे प्रश्न :**

१) फ्रँकफर्ट स्कूलची निर्मिती कोणत्या देशात झाली.

२) फँकफर्ट स्कूलचा उद्‌देश काय आहे.

३) जॉर्ज लुकास यांनी लिहिलेला ग्रंथ कोणता.

४) विमर्श विश्लेषण ही संकल्पना कोणी मांडली.

५) कामगार चळवळी लोकशाही पध्दतीने झाल्या पाहिजेत असा आग्रह कोणी धरला.

**१.२.३ समीक्षणात्मक / टिकात्मक सिध्दांत : CRITICAL THEORY**

**प्रस्तावना :**

समीक्षणात्मक अथवा टिकात्मक सिध्दांताचा मुख्य उददेश हाच होता की, मार्क्सवादी बौध्दीक परंपरा व समाजवादी विचारप्रवाह जीवंत ठेवणे व त्यासाठी मार्क्सच्या विचारावर नव्याने भाष्य वा संशोधन करणे इतकेच नव्हे तर मार्क्सच्या विचारातील चुकांचा स्पष्ट निर्देष वा उणीवा वर बोट ठेवून मार्क्सवादाला एका नव्या स्वरुपात प्रस्तुत करणे कारण रुढीवादी मार्क्सवाद अथवा मार्क्सच्या आर्थिक निर्धारणवादाच्या आधारे आधुनिक

समाजाचे विश्लेषण करणे शक्य नाही. मार्क्सनी ज्या भांडवलीशाहीचे विश्लेषण केले आहे ती भांडवलशाहीचे स्वरुप आधुनिक काळात बदलले आहे. कार्पोरेट भांडवलवादाचे विश्लेषण मार्क्सच्या मूळ सिध्दांतानूसार होणे शक्य नाही म्हणूनच समीक्षणात्मक सिध्दांतात समाजशास्त्रीय विश्लेषण करताना मार्क्सला विश्लेषणाच्या केंद्रस्थानी ठेवून सध्य परिस्थितीत त्याची नव्याने मांडणी करणे आणि इतर सामाजिक सिध्दांताला मुक्तपणे सामावून घेणे.

नवमार्क्सवादात पूढील तीन दृष्टीकोन महत्वाचे ठरतात.

१) नव ग्रामसी सिध्दांत : अन्टिनो ग्रामशी

**Neo gramscian Theory**

२) विश्लेषणात्मक मार्क्सवाद

**Analytical Marxian**

गेरालड कोहेन, जोन एलस्टर, प्रेजवोस्की आणि जोन रोमेर

३) समीक्षणात्मक / टीकात्मक दृष्टीकोन **Critical Theory**

**हबेरमास व लूई अल्थूजर**

१९२३ मध्ये जर्मनीमध्ये फॅक्रफर्ट या शहरात Institute of Social Research ही संशोधन संस्था स्थापन केली. हा नवमार्क्सवादी समाजशास्त्राचा समूह होता. मूळ मार्क्सच्या विचारासी प्रामाणिक राहून या समुहाने एक समीक्षणात्मक / टिकात्मक (critical theory) विकसीत केली. मार्क्सच्या विचाराना चालना देण्याबरोबरच मार्क्सच्या सिध्दांताचे नव्याने विश्लेषण करुन मार्क्सवादाला एका नव्या बौध्दीक शक्तीच्या स्वरुपात पुढे आणणे व मार्क्सवादाचे नव्याने संशोधन करुन नवीन समाजशास्त्रीय सिध्दांताची निर्मिती करणे व नवमार्क्सवादात इतर समाजशास्त्रीय सिध्दांताना मुक्तपणे सामावून घेणे.

मार्क्सच्या आर्थिक निर्धारणवादाचे समीक्षण अथवा critical theory मध्ये ॲन्टीनो ग्रामसी, गेरालड कोहेण, हेबरमासस, लूई अलथजर आदी समाजशास्त्राचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे.

**टिकात्मक सिध्दांताचा उद्देश :**

समीक्षणात्मक अथवा critical theory चे मूख्य उददेश पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) कार्ल मार्क्सच्या विचारांचे विशेषत: निर्धारणवादाचे टीकात्मक परिक्षण करणे मार्क्सच्या विचाराचे नवशास्त्रीय स्वरुपाच्या आधारे खंडन करणे.

२) मार्क्सवादाचे नवीनीकरण करणे मार्क्सला नवीन स्वरुपात प्रस्तूत करणे मूळ मार्क्सवादी विचाराशी प्रामाणिक राहून आधुनिक समाजाशी सुसंगत अशी नव्याने मार्क्सवादाची मांडणी करणे.

३) समाजशास्त्रीय विश्लेषणात मार्क्सवादी सिध्दांताबरोबरच अन्य समाजशास्त्रीय सिध्दांताला मुक्तपणे

सामावून घेणे.

४) मार्क्सवादी सिध्दांताना निगमनात्मक (deductive) विधी विज्ञानाच्या (Nomology) व्यवस्थेप्रमाणे विकसित करणे.

५) विज्ञानवाद आणि प्रत्यक्षवादाचे (positivism) टिकात्मक परिक्षण करणे.

६) आधुनिक समाजव्यवस्था व समाजशास्त्रीय अभ्यासपध्दती जी अवास्तव वैज्ञानिक पध्दतीला महत्व देते त्याचे टिकात्मक परिक्षण करणे.

७) आर्थिक घटकाबरोबर सांस्कृतिक घटक जे आधूनिक समाजात प्रभावी ठरतात त्याचे समीक्षण करणे.

८) राजकीय घटक धार्मिक घटक प्रसार माध्यमे तसेच वैचारिक घटकांना मार्क्सवादी विश्लेषणात महत्व देणे.

९) मार्क्सवाद जो सापेक्षित सत्याच्या विरोधी आहे त्या सापेक्षीक सत्याची पडताळणी करणे आधूनिक समाजाची टिका फक्त आर्थिक निर्धारण वादाच्या आधारे होवू शकत नाही. सत्य विश्लेषणाचे अनेक तर्क आहेत अनेक तर्काच्या आधारे आधुनिक समाजाचा अभ्यास करणे.

थोडक्यात समीक्षणात्मक सिध्दांतकार फक्त मार्क्सवादावर टिकाच करत नाहीत तर मार्क्सवादाची पुन:निर्मिती करण्याचा प्रयत्न करतात. यात प्रामुख्याने ग्रामशी, कोहेन, हेबरमास, अलथूजर आदी शास्त्रज्ञानाच्या योगदानाचा थोडक्यात आढावा घेणे समीक्षणात्मक सिध्दांत समजून घेण्याच्या दृष्टीने महत्वाचे ठरेल.

**टिकात्मक सिध्दांतात नवमार्क्सवादाचे योगदान**

**Contribution of Critical Theory of Neo-marxis**

कार्ल मार्क्सच्या सिध्दांताचे टिकात्मक परिक्षण करणा-या नवमार्क्सवादी सिध्दांतकारामध्ये प्रामूख्याने ॲन्टीनो ग्रामसी गेरालड कोहेन,लुई अलथूजर,हेबरमास इत्यादी विचार करणे महत्वाचे ठरेल या सर्वच सिध्दांतकाराच्या मते रुढींवादी मार्क्सवाद आधूनिक समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी असमर्थ आहे मार्क्सवादाचे अध्ययन नव्या अभ्यासपध्दती व्दारे केले पाहिजे मार्क्सचे मूळ विचारावर संशोधन करुन मार्क्सवादाला नवीन स्वरुपात प्रस्तूत करण्याची गरज आहे

**१) ॲन्टिनो ग्रामसी :**

आपण प्रस्तुत विषयात या नवमार्क्सवादी विचारवंताचा थोडक्यात आढावा घेऊ

मार्क्सच्या सिध्दांताचे टिकात्मक समीक्षण करणा-या शास्त्राच्या संप्रदायामध्ये ग्रामसी यांचे विशेष स्थान आहे ग्रामसी हा इटलियन नवमार्क्सवादी होतो. ग्रामशी हा मानवतावादी विचारवंत असून लोकशाही (democracy) व्यवस्थेचा कट्टर पूरस्कर्ता होता ग्रामसी यांनी कामगाराच्या लोकशाही पध्दतीच्या चळवळीचे समर्थन केले इटलीच्या इतिहास, राजकीय पत्र, हेजेमनी आणि फायडवाद आदी विचारांनी ग्रामशींना नवमार्क्सवादात केंद्रीय स्थान मिळाले ग्रामशीच्या मार्क्सवादाला विमर्श विश्लेषण (Discourse Analysis) असेही म्हणतात

ग्रामशी मार्क्सच्या आर्थिक निर्धारणवादी आणि द्वंद्वात्मक भौतिकवादाच्या विरोधात होता. ग्रामशीनी मार्क्सच्या आर्थिक निर्धारणवादाचे खंडण केले. ग्रामशीच्या मते शासक व भांडवलदाराचा वर्ग हा शक्तीशाली असतो. या वर्गाची हेजेमनी (प्राधान्य – Hegemony) असते. हे नेतृत्व हे नेतृत्व कुटुंब ,धर्म, शिक्षण इत्यादी असते. सर्वहारा वर्गावरील ही हेजेमनी नष्ठ केल्याशिवाय किंवा समाजाच्या विविध क्षेत्रातील ' आहेरे' वर्गाची ही प्रभूत्व (Hegemony) नष्ट केल्याशिवाय कामगार चळवळ यशस्वी होणार नाही. आर्थिक तत्वाच्या विरोधात वैचारिक संघर्षाची आवश्यकता आहे.

ग्रामशी मार्क्सचे वर्ग विश्लेषण व वर्गसंघर्ष विचारांना नाकारतो. ग्रामशीच्या मते लोकशाही व्यवस्था खऱ्या अर्थाने समाजवादी समाजाची स्थापना करण्यास सहाय्यक ठरू शकते. उदार अणि मानवीय चेहरा असणारी लोकशाही व्दारे समाजवादी समाजाची निर्मिती करता येते. ग्रामशीच्या मते प्रतिके, भाषा, विचार आणि राजकारण सामाजिक परिवर्तनामध्ये निर्णायक भूमिका पार पाडत असतात. ग्रामशीच्या मते वर्ग संघर्षाचे मूळ कारण फक्त आर्थिकच नसते, तर समाजात वैचारिक, धार्मिक, जातिय, वंशीक, आर्थिक इत्यादी कारणेही संघर्षाला जबाबदार असतात.

थोडक्यात ग्रामशीचे विश्लेषण हे आधूनिक समाजाच्या विश्लेषणासाठी अधिक संयुक्तीक ठरते.

**२) लुईस अल्थूसर : Louis Althusser**

प्रसिध्द फ्रेंच समाजशास्त्रज्ञ लूई अल्थूजर यांचे मार्क्सवरील समीक्षणात्मक सिध्दांतामध्ये महत्वाचे योगदान आहे. अल्थूजर यांनी भाषाशास्त्राच्या आधारे मार्क्सचे नव्याने विश्लेषण केले. तो मार्क्सवादी संरचनेचा जनक होता. रशियातील स्टलीनच्या भ्रष्ट साम्यवादाचा तो कट्टर विरोधात होता. अल्थूजर हा मानवतावादी विचारवंत असून आपल्या विचारांनी त्यांनी मार्क्सवादी विचारांना खोलवर प्रभावित केले. अल्थूजरचा मूख्य उद्देश हाच होता की मार्क्सवादाला एक सामाजिक व ऐतिहासिक विज्ञानाप्रमाणे मांडले पाहिजे. अल्थूजर यांनी मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवादाची नव्याने मांडणी केली मार्क्सच्या आर्थिक निर्धारणवादाचा विरोध केला

अल्थूजर यांच्या मते मार्क्सचा आर्थिक निर्धारणवाद कमजोर आहे. समाज हे एक आर्थिक व्यवस्था,राजकीय पध्दती व विचाराचे मिश्रण आहे. समाजात परिवर्तन फक्त आर्थिक कारणामुळे होत नसून त्यास अन्य कारणेही जबाबदार ठरतात. मार्क्सनी मांडलेला मानव समाजाचा इतिहास चुकीचा आहे एकरेषीय उत्क्रांतीव्दारे निर्माण झालेल्या व्यवस्था व क्रांती व्दारे एका व्यवस्थेची दुसरीने जागा होणे व त्याव्दारे भांडवलवादाचा विनाश होऊन साम्यवाद निर्माण होणे या कल्पनेशी अल्थूजर सहमत नव्हता. अल्थूजर यांचे मते इतिहासाच्या विकासाची प्रक्रिया मुक्त असते. ऐतिहासिक परिवर्तन समाजाच्या असय्य प्रतिवाद आणि प्रतिरोधाच्या प्रक्रियेने होत असते.

मार्क्स आपल्या ऐतिहासिक भौतिकवादात मानवाला महत्व कमी देतो. मार्क्सच्या भौतिकवाद मानवतावाद विरोधी आहे. मार्क्सचा सिध्दांत मानवी अस्तित्व नाकारतो. अल्थूजर यांचा असा आग्रह आहे की समाजशास्त्रीय विश्लेषणात व्यक्ती महत्वपूर्ण आहे. वर्ग, समुदाय अथवा समाजापासून व्यक्तीला वेगळे पाहता कामा नये व्यक्ती हीच समाज निर्माण करते आणि म्हणूनच समाजात व्यक्तीच्या अस्तित्वाचा स्वीकार केला पाहिजे.

मार्क्स आपल्या विचारात विचार व अमूर्त घटकांना एक मिथक मानतो. भौतिकवादाचा अट्टाहासापोटी विचारांना मानवाच्या अमूर्त विचाराचे महत्व कमी करतो. परंतु अल्थूजर यांच्या मते विचारप्रवाह (Ideology) किंवा अमूर्त विचारसरणी एक सामाजिक वारंवारता म्हणून स्वीकार केला पाहिजे.

**लूईस अल्थुजर यांचा संरचनात्मक मार्क्सवाद**

**Althussers Structural Marxism**

संरचानात्मक मार्क्सवादाचा प्रणेता म्हणून अल्थुजर यांना ओळखले जाते. अल्थुजर यांनी मार्क्सच्या सिध्दांतानी ऐतिहासीवादी आणि प्रघटनावादी म्हटले आहे आणि त्याच्या पर्यायी रुपात संरचानावाद प्रस्तूत केला इतकेच नव्हे तर अल्थूजर यांनी मार्क्सच्या सिध्दांताची व्याख्या भाषाशास्त्राच्या आधारे केली आहे यालाच संरचानात्मक मार्क्सवाद म्हटले जाते. संरचनात्मक मार्क्सवादाची वैशिष्टे पुढीलप्रमाणे

१) अल्थुजर यांचे मते मार्क्सप्रणीत आर्थिक शक्ती संरचनेची व्यवस्था व परिवर्तन व पुर्ननिर्मितीसाठी महत्वपूर्ण असली तरी कुंटूंब, शाळा, धर्म इ. घटक शक्ती समाजरचना टिकवून (order) ठेवण्यासाठी सहाय्यक ठरतात.

२) वर्गाची प्रभूता, शिस्त, राज्य व कायद्याचे नियंत्रण इ. घटक सामाजिक सरंचनेची पुर्ननिर्मिती किंवा पुर्नउत्पादन करीत असतात.

३) अधिसरंचना दोन प्रकारची असते.

१) वैचारिक अलथूलर यांच्या मते आधीसरंचनेत राज्यसंस्था अनेक प्रकारच्या दमनात्मक पध्दती (पोलिस, सैन्य, अधिसंरचनेचा दुसरा प्रकार वैचारिक असतो यामध्ये राज्य वर्तमानपत्रे रेडिओ टीव्ही, प्रसारमाध्यमाच्या द्वारे आपल्या व्यवस्थेचे पध्दतशीर पणे वैचारिक दमन करते उदा. नाझीवाद किंवा साम्यवादामध्ये या वैचारिक साधनाद्वारचे अन्य विचाराचे दमन करून आपल्या नाझीवाद व साम्यवादाचे वैचारिक समर्थन केले गेले.

२) अल्थुजर यांनी स्टॅलनिच्या भ्रष्ट साम्यवादावर कडाडून टीका केली. स्टॅलीन यांनी अनेक यूक्त्या व प्रयूत्या व प्रयुकत्यांचा व दमनतत्रांचा अवलंब करून मानवतावादाचा खून केला साम्यवादाच्या ऐतिहासिक प्रक्रीयेसी जोडला होता त्याला स्टॅलनिने दमनतंसत्राच्या चौकटिक बंदीस्त कैले.

४) अल्युजर यांनी भाषिक संरचनावादाला मार्क्सवादला लागू केले. संरचनावादाचा मुळ आधार भाषिक असून अल्युजर यांनी या सामान्य संरचनावादाला मार्क्सच्या सिध्दांताना लागू केले.

**१.२.३.१: स्वयं अध्ययनाचे प्रश्न:**

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) विश्लेषणात्मक मार्क्सवादी शास्त्रज्ञ कोण.

२) समीक्षणात्मक सिध्दांतात कोणाचे योगदान महत्वाचे आहे.

३) कामगार चळवळी लोकशाहीद्वारे यशस्वी होऊ शकतात हा विचार कोणी मांडला.

४) मार्क्सवादी असून लोकशाहीचा पुरस्कार करणारा समाजशास्त्रज्ञ कोण.

५) भाषा शास्त्राच्या आधारीत नवमार्क्सवादाचे विश्लेषण कोणी केले.

**CONTRIBUTIONS OF JURGEN HABERMAS**

**जर्गन हेबरमास यांचा नवमार्क्सवादी सिध्दांत :**

**प्रस्तावना (Introduction)**

प्रसिध्द जर्मन नवमार्क्सवादी समाजशास्त्रज्ञ युरेगन हेबरमास फ्रॅंकफर्ट स्कूलचा एक महान नवमार्क्सवादी शास्त्रज्ञ आहे. हेबरमास हा मूळ मार्क्सवादी सिध्दांतकार असून त्याने आपल्या नवमार्क्सवादात अन्य समाजशास्त्रीय सिध्दांत परंपरांना घेऊन मार्क्सच्या सिध्दांतावर समीक्षणात्मक सिध्दांताची (critical theory) निर्मिती केली. हेबरमास यांनी अत्यंत सूक्ष्म आणि शास्त्रीय पध्दतीव्दारे मार्क्सच्या सिध्दांताची चिकित्सा केली. हेबरमास हे फ्रॅंक्रफर्ट विद्यापीठात समाजशास्त्राचे प्राध्यापक होते. हेबरमास हा जर्मन विचारप्रवाहाची निर्मिती असून त्याच्या नवमार्क्सवादाचा आधार बुध्दीवाद हाच आहे. हेबरमास हा पुर्णपणे डाव्या विचारसरणीचा विचारवंत असून हेगेल कांत, हुर्सेल, होरखेमर, एर्डोनो या विचारवंताचा विशेष प्रभाव त्याच्यावर आहे. इतकेच नव्हे तर संरचनात्मक कार्यवादी टॉलकॉय पारसन्स यांचाही प्रभाव हेबरमासच्या सिध्दांतावर आहे. म्हणूनच हेबरमास हे प्रकार्यवादी पार्सन्स व मार्क्सवादी फ्रॅंकफर्ट स्कूलचा समर्थक आहेत.

हेबरमास यांनी आपल्या नवमार्क्सवादी सिध्दांताव्दारे मार्क्सवादाला एक बौध्दिक व समाजवादी शक्ती म्हणून जिवंत ठेवण्याचे एक महान कार्य केले. मार्क्सवादात नव्याने संशोधन केले व मार्क्सवादाला एक बौध्दिक शक्ती म्हणून सुधारात्मक स्वरुपात प्रस्तूत केले. हेबरमास यांच्या या नवमार्क्सवादाचा प्रस्तुत विषयात आपण थोडक्यात आढावा घेऊ.

**हेबरमास यांची ग्रंथसंपदा :**

युरेगन हेबरमास यांनी आपले नवमार्क्सवादी विचार प्रस्तूत करताना अत्यंत समृध्द अशी ग्रंथसंपदा निर्माण केली त्यातील काही महत्वपूर्ण ग्रंथ पूढीलप्रमाणे

1. **Theory and practice – 1963**
2. Knowledgey and Human Interests - 1968
3. Toward a Rahonal society - 1970
4. Communication and exolution of society - 1979
5. The Theory of communicative Action - 1981

6. The Philosophical Discourse of modernity - 1988

7. Post metaphysical Thinking – 1992

**हेबरमास यांची अभ्यासपध्दती / सिध्दांतनिर्मितीचा दृष्टीकोण**

**Study Method of Jurgen Hebarmas**

जर्गन हेबरमास मुळ स्वरुपात मार्क्सवादी असून त्याच्या सिध्दांताचा मुख्य आधार कार्ल मार्क्सच आहे. पण त्याचबरोबर हेबरमास यांच्या नवमार्क्सवादी सिध्दांतावर मॅक्स वेबर , फ्रायड, नोम चोम्स्की या समाजशास्त्रज्ञांचाही प्रभाव होता. हेबरमास यांच्या सैंध्दांतिक अभ्यासपध्दतीचे प्रमुख लक्षण हेच आहे की तो मूळात मार्क्सवादी आहेच पण अन्य सैध्दांतिक परंपरांनाही हेबरमास यांनी सहजपणे स्विकारले आहे. मार्क्सवादी सिध्दांतासह अन्य सैध्दांतिक परंपराना घेऊन हेबरमास यांनी critical theory समीक्षणात्मक सिध्दांताची निर्मिती केली. समीक्षणात्मक सिध्दांताचा उद्देश अभिव्यक्तीशील क्रियाच्या माध्यमाने सांस्कृतिक उत्क्रांतीच्या उच्च अवस्थेला समजून घेणे. हेबरमास रुढ मार्क्सवादाला छेद देऊन एका व्यवस्थित सिध्दांताची रचना करतो व दूसरे म्हणजे आपल्या सिध्दांतात विवेकशीलतेवर भर देतो.

समाजशास्त्रीय विचारवंत हेबरमास यांना चिकित्सात्मक / समीक्षणात्मक सिध्दांतकार म्हणून ओळखले जाते. हेबरमास मुलत: मार्क्सवादीच आहे. स्वत:ला ते वामपंथीय मानतात. पण त्याचबरोबर परंपरागत मार्क्सवादाला नाकारतो. मार्क्सच्या सिध्दांतात किंवा परंपरागत मार्क्सवाद हा आधूनिक समाजाची पूर्णपणे विसंगत असून त्यात सूधारणा झाल्या पाहिजेत असा आग्रह धरतो. हेबरमास आपल्या सिध्दांतात रुढ मार्क्सवादावर प्रखर टिका करतो त्याचबरोबर व्यवहार आणि सिध्दांताला जोडू शकतो. विवके आणि बुध्दीवादाला आपल्या नवमार्क्सवादाचा आधार बनवतो. हेबरमास यांनी आपल्या सिध्दांतात भाषेचे नियम आणि व्याकरणाच्या नियमाप्रमाणे समाजाला अभिव्यक्तीशील स्वरुपात पस्तूत केले आहे. हेबरमास भाषा आणि अभिव्यक्तीशीलतेला आपल्या सिध्दांताचा केंद्रीय आधार मानतो. हेबरमास सिध्दांत निर्मितीबाबत मार्क्सवादावर आग्रही असला तरी अन्य समाजशास्त्रीय सिध्दांताना आपल्या सिध्दांत निर्मितीत महत्व देतो. मॅक्स वेबर आणि टॉलकॉय पारसन्य यांच्या सैध्दांतिक संकल्पनांचाही विशेष प्रभाव हेबरमास यांच्या नवमाकर्सवादावर आहे.

हेबरमास यांचा सैध्दातिक दृष्टीकोणाचा मुख्य आधार ज्ञान हेच आहे. ज्ञान पुढील तीन प्रकारचे असते.

**1. We develop knowledge for certain purpose**

ज्ञान हे उद्देशपुर्ण असते व आपण ज्ञानाचा विकास विशिष्ट उद्देशाच्या प्राप्तीसाठी करत असतो. उदा. एखाद्या विद्यार्थ्याने इतिहासामध्ये एम.ए करणे हे इतिहासाचे प्राध्यापक होण्याच्या उद्देशाने युक्त असू शकते. ज्ञानप्रांप्तीचा हेतू हाच मानव व मानवेत्तर प्राण्यात फरक करतो. मानवी कौशल्य आणि संचारक्षमता भिन्न भिन्न प्रकारच्या ज्ञानाचा विकास करते. उद्देशपूर्ण ज्ञानावर आधारीत सिध्दांताना हेबरमास अनुभविक विश्लेषणात्मक सिध्दांत म्हणतो येथे ज्ञान हे प्रत्यक्षवादी बनते व प्रत्यक्षवादी ज्ञान संचाराच्या माध्यमाने संपूर्ण समाजात प्रसारित होते.

## 2. Knowledge fulfills our practical interests

हेबरमास या ज्ञानाच्या दुसऱ्या प्रकाराला hermeneutics असे संबोधतो. ज्ञान हे मानवी जीवनाच्या गरजाशी जोडलेले असते. व्यवहारिक ज्ञान ज्या सिध्दांताना जन्म देते त्यालाच hermeneutics म्हणतात. व्यावहारिक ज्ञान हे मानवी आंतरक्रियेत उपयोगी येते व भाषेच्या माध्यमातूनच मायनवी आंतरक्रिया अर्थान्वित हेतात. hermemeutics किंवा भाष्यशास्त्र ho symbolic interaction ehonomethodology संरचनावादी इ. ही भाष्यशास्त्राचीच उदाहरणे आहेत. मानवी आंतरक्रिया या रोजच्या व्यावहारिक जीवनाचे अंग असून संचार किंवा संम्प्रेषण या अर्थाने व्यावहारिक हेतूना पूर्ण करतात.

## 3. Knowledge is emancipalory

ज्ञान हे मानवाला तारणारे किंवा मानवाचे उध्दारक असते. याचा संबंध हा मानवी आंतरक्रिया आणि संचारासीआहे.ज्ञान हे critical theory समीक्षणात्मक सिध्दांताला जन्म देते. या ज्ञानात व्यक्ती आंतरक्रियेचा लाभ घेऊन समाजाचे अहित करते. अहित करण्याचा हेतू शक्तीच्या माध्यमानी प्राप्त होतो. समाजात या कारणामूळेच शक्तीच्या प्राप्तीसाठी संघर्ष होतो.

**हेबरमास यांच्या नवमार्क्सवादाची व समीक्षणात्मक सिध्दांताची वैशिष्ठे**

हेबरमास एक महान समाजशास्त्रज्ञ होता. त्याने फक्त मार्क्सवादावर टिकाच केली नाही तर मार्क्स आणि मार्क्सवादावर संशोधन करून मार्क्सवादाची पुन:निर्मिती केली. हेबरमास यांनी मार्क्सवादाचा अस्विकार करण्याचे महत्वाचे कारण म्हणजे मार्क्सवादाला आधूनिक समाजासाठी अधिकाधिक प्रासंगिक बनवने. हेबरमास मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाला आर्थिक निर्धारणवादाच्या बंदीस्त चौकटीतून मुक्त करून अभिव्यक्तीच्या क्षेत्रात आणतो. आधुनिक समाजाचे विश्लेषण फक्त आर्थिक निर्धारणवादाने होणे शक्य नाही. आधुनिक समाजात अनेक तर्काव्दारे समाजाचे विश्लेषण करावे लागेल.

हेबरमास समाजाच्या विश्लेषणासाठी एक असा नवीन सिध्दांत निर्माण करु इच्छित होता की जो मार्क्सच्या सिध्दांताचे संशोधन करेल व समाज विश्लेषणाचा एक पर्याय मांडू शकेल यासाठी त्यांनी टॉलकॉट पारसन व मॅक्स वेबर सहीत फ्रायड च्या मनोविश्लेषणात्मक सिध्दांत आणि विविध सैध्दांतिक परंपराचा मुक्तपणे स्विकार केला.

१. मॅक्स वेबर यांच्या विवेकशीलता वा बुध्दीवादाचा विशेष प्रभाव हेबरमास यांच्या सिध्दांतावर आहे. संस्कृतीच्या उत्क्रांतीच्या विश्लेषणात हेबरमास वेबर यांचा उत्क्रांतीवादाचा आधार होता. मॅक्स वेबर यांच्या मते समाजशास्त्र ज्या ज्ञानाची निर्मिती करते त्याला ऐतिहासिक मर्यादा असून ज्ञान हे काल व समाजसापेक्ष असते. व्यक्तीची विवेकपूर्ण अथवा बौध्दिक क्रिया (Rahonal Achon ) नवीन ज्ञानाच्या निर्मितीस सहाय्यक ठरते. वेबरप्रमाणेच हेबरमास म्हणतात व्यक्तीच्या क्रिया या तार्किक आणि उद्देशपूर्ण असतात. ज्ञानाची निर्मिती या क्रियाव्दारेच होते.

२. फ्रायडच्या मनोविश्लेषणात्मक सिध्दांताचा प्रभाव हेबरमास यांच्या समीक्षणात्मक सिध्दांतावर आहे. हेबरमास यांनी मानसशास्त्रीय सिध्दांत व्यक्तीगत पातळीवर कोणती भूमिका पार पाडली पाहिजे याचे स्पष्टीकरण

देतात. मानसशास्त्रीय सिध्दांत हे व्यक्तीच्या आंतरक्रियामध्ये अडथळा ठरत असले तरी त्यांचा अंतिम हेतू व्यक्तीच्या आंतरक्रियांचे संघटन घडवून आणण्यातच असतो.

फ्रायडने आपल्या संस्था स्थापनेत मनोविश्लेषणाला आधार बनवले तर हबरमास यांची critical theory एक अभिव्यक्तीशीलतेचा (communicative action) चा सिध्दांत आहे.

३. हेबरमास यांच्या समीक्षणात्मक सिध्दांतावर भाषाशास्त्राचा विशेष प्रभाव आहे. याबाबत नोम चोम्स्की पासून प्रभावित होता याच्या मते भाषेला प्रयोगात आणून सार्वभौमिक नियम तयार करु शकतो. हेबरमास अभिव्यक्तीशीलता आणि भाषा यांना आपल्या विश्लेषणाचा केंद्रीय आधार मानतो. हेबरमास भाषेच्या या नियमाना संस्कृतीच्या उत्क्रांतीच्या अभ्यासासाठी लागू केले. भाषेचे नियम किंवा व्याकरणाच्या नियमाप्रमाणे समाजाला अभिव्यक्तीशीलतेच्या संदर्भात मांडले.

४. हेबरमासचा सिध्दांत हा अभिव्यक्तीचा विवेकी सिध्दांत आहे. हेबरमास यांना अशा समाजाची अपेक्षा आहे की जो स्वतंत्र आणि अभिव्यक्तीने परिपूर्ण असेल. हेबरमासच्या सिध्दांताचा मुख्य उद्देश अभिव्यक्तीशील क्रियाच्याव्दारे सांस्कृतिक विकास समजून घेणे. हेबरमास अशा सिध्दांताची निर्मिती करतो. जो अभिव्यक्तीशीलतेला प्राधान्य देतो. अभिव्यक्ती विवेकाला एक निश्चित स्थान असते. हेबरमास यांनी यांचे महत्व आपल्या सिध्दांतात अधोरेखित केले आहे. हेबरमास अभिव्यक्तीशीलता व भाषा यांना केंद्रीय आधार मानतो.

५. हेबरमास यांच्या सिध्दांताचे महत्वाचे वैशिष्टे हेबरमास आधुनिक समाजाच्या विश्लेषणासाठी एक असा सिध्दांत निर्माण करण्याच्या प्रयत्नात होता की जो मार्क्सच्या सिध्दांताचे संशोधन करेल व त्याचबरोबर आधुनिक समाजाच्या विश्लेषणाचा एक पर्याय देखील मांडू शकेल. हेबरमास यांचा मुख्य उद्देश हाच होता की मार्क्सवादाची शास्त्रीय चिकित्सा करणे.

६. हेबरमास यांच्या सिध्दांताचा मुख्य आधार ज्ञान हाच आहे. ज्ञान हा विकासाचा मूलमंत्र असून मानवी विकासासाठी ज्ञानाची प्राप्ती ही प्रथम आवश्यकता आहे. ज्ञान हीच विकासाची गरज आहे. अशा प्रकारच्या ज्ञानावर अधारित सिध्दांताना हेबरमास अनुभवधिष्ठीत विश्लेषणात्मक (empirical - analytics Theories) म्हणतात.

७. हेबरमास यांनी मानसशास्त्रीय सिध्दांत व्यक्तीगत पातळीवर कोणत्या स्वरुपाच्या भूमिका पार पाडतात. आणि सामाजिक दृष्टीकोणातून मानसशास्त्रीय सिध्दांतानी कोणती भूमिका पार पाडली पाहिजे. यासंबंधी स्पष्टीकरण देतात. हेबरमास यांच्या मते मानसशास्त्रीय सिध्दांत हे व्यक्ती व्यक्तीतील आंतरक्रियामध्ये अडथळा ठरत असेल तरी त्यांचा अंतिम मानवी आंतरक्रियामध्ये संघटन घडवून आणणे हाच असतो.

**मार्क्सवादाची चिकित्सा / आलोचना**

**CRITICIZE OF KARL MARX AND MARXIAN THEORY**

हेबरमास यांनी फ्रँकफर्ट स्कूल च्या विचार धारेला पूढे नेण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. फ्रँकफर्ट स्कूल ची मूख्य विचारधारा हीच होती की मार्क्सवादाचे विश्लेषण समाजाच्या नव्या संदर्भात करणे गरजेचे आहे. मार्क्सचा

आर्थिक निर्धारण वाद कदाचित मार्क्सकालिन समाज विश्लेषणासाठी ठीक आहे.पण आधूनिक समाजाची व्याख्या मार्क्सच्या आर्थिक निर्धारणवादाद्वारे होऊ शकत नाही. सद्य परिस्थितीत मार्क्सचा आर्थिक निर्धारणवाद चूकीचा आहे. कारण समाज एकदम बदलला आहे. मार्क्सनी ज्या भांडवलवादाचे विश्लेषण केले त्या भांडवलवादाचे स्वरुपच बदलले आहे. आज आधूनिक समाजात कार्पोरेट भांडवलवाद अस्तित्वात आला आहे. भांडवलशाहीचा मानवतावादी चेहरा व उदार लोकशाही व्यवस्था अस्तित्वात आली आहे व या स्थितीत मार्क्सवादाचे नवीनीकरण होणे आवश्यक आहे. मार्क्सच्या कालीन जी समाज आणि भांडवलशाहीची रचना होती ती आज अस्तित्वात नाही आणि म्हणूनच इतर सामाजिक सिध्दांताच्या परंपराचा स्विकार करुन मार्क्सचे विश्लेषण नव्याने केले पाहिजे. हे विश्लेषण स्पष्ट असावे ते रुढीवादी असू नये.

समाजशास्त्रीय विश्वात हेबरमास यांना चिकित्सात्मक किंवा अलोचनात्म्क सिध्दांतकार म्हणून ओळखले जाते. हेबरमास मूलत: मार्क्सवादी आहे. परंतू मार्क्सच्या सिध्दांतावर प्रखर टिका करतो.

**१) मार्क्सच्या 'श्रम' या संकल्पनेवर टिका**

हेबरमास यांनी मार्क्सच्या श्रमाच्या संकल्पनेवर आक्षेप घेतला हेबरमास यांचे मार्क्स आणि रुढ मार्क्सवादी प्रत्यक्षवादी शिकार ठरले आहेत. मानवाची व्याख्या फक्त श्रमातच केली आहे. मार्क्सनी श्रमाची व्याख्या ही मानवाची उद्दिष्टपूर्ण तार्किक क्रिया अशीच केली आहे. मार्क्सनी आपल्या ऐतिहासिक भौतिकवादात श्रम या संकल्पनेचा अर्थ समाजरचनेचा अनूषंगाने विचारात घेतल्यामूळे तो चूकीचा ठरतो. हेबरमास मार्क्सच्या श्रमाच्या संकल्पनेबाबत म्हणतो.

१ मार्क्सनी मानवाचे सर्वात मोठे वैशिष्ठे फक्त श्रमातच बघितले मानवी विचार आणि मुल्याना महत्व दिले नाही.

२ मार्क्स यांनी श्रम या संकल्पनेचा सामाजिक अर्थाने विचार केला नाही. केवळ उद्दिष्टपूर्तीचे एक साधन या अर्थानेच श्रमाचा विचार केला.

३ कार्ल मार्क्स यांनी श्रम ही संकल्पना स्पष्ट करताना केवळ भांडवलशाही व्यवस्थेच्या संदर्भात विचार करुन साम्यवादी समाजव्यवस्थेत श्रमाला महत्व प्राप्त होईल अशी अपेक्षा व्यक्त केली.

४ एक सामाजिक प्रक्रिया म्हणून मार्क्सनी श्रमाचा अर्थ लक्षात घेतला नाही. श्रमाचा एक मानवी आंतरक्रिया म्हणून विचार केला नाही.

५ मार्क्सनी श्रमाचा अर्थ खूपच संकूचित अर्थाने स्पष्ट केला वास्तविक श्रम ही एक संघटित सामाजिक आंतरक्रिया आहे.

हेबरमास यांच्या मते श्रम ही केवळ विशिष्ट उद्देशपूर्तीचे साधन नसून ती एक मानवी आंतरक्रिया आहे. सामाजिक जीवनामध्ये श्रमाचा अर्थ विशिष्ठ क्रियेपूरता मर्यादित नसून श्रम ही एक आंतरक्रिया म्हणून अभ्यासता येते. कामगार आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी विचारपूर्वक श्रम ही क्रिया करत असतो. श्रमाच्या संकल्पनेला मानवी

आंतरक्रियाच्या स्वरुपात अभ्यासने आवश्यक आहे. श्रम ही फक्त हेतू साध्य करण्याची प्रक्रिया नसून ती एक अशी सामाजिक प्रक्रिया आहे की ज्याद्वारे सामाजिक संघटन घडून येते. आजच्या आधुनिक समाजात श्रम ही एक आंतरक्रिया म्हणून तीला महत्व प्राप्त झाले आहे. श्रम करण्याबाबत असणारे निर्बंध आधूनिक समाजात नष्ठ झाल्याने व श्रमाला स्वैर आंतरक्रियेचे स्वरुप आल्याने निश्चितच आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे.

**२) मार्क्सचा आर्थिक निर्धारणवाद आधूनिक समाजासाठी चूकीचा आहे**

हेबरमास यांच्या मते मार्क्सच्या आर्थिक निर्धारणवाद व उत्पादन पध्दती वा उत्पादन संबंधाच्या सिध्दांताद्वारे आजचे आधूनिक सांस्कृतिक व राजकीय जीवन समजून घेणे अश्यक्य आहे. मार्क्सचे हे आर्थिक सिध्दांत आजच्या समाजास लागू होत नाही. कदाचित मार्क्सकालिन कालखंड भांडवलवाद आणि राज्यसंस्था वेगळया असतील. राज्यसंस्था आर्थसंस्थेत ढवळा ढवळ करीत नसेल पण आज परिस्थिती बदलली आहे.राज्यसंस्थाच अर्थव्यवस्थेत आर्थिक धोरण व अर्थ नितिमध्ये निर्णायक महत्वाची ठरली आहे. राज्यसंस्था सर्व प्रकारचे आर्थिक निर्णय घेते. उदा. भारतात १९९२ मध्ये जो आर्थिक उदारवाद, खाजगीकरण, उदारीकरण आले ते निर्णय तत्कालिन पंतप्रधान पी.व्ही. नससिंहराव यांनीच घेतले होते.

हेबरमास म्हणतात अर्थव्यवस्था समाजाचे वा राज्याचे निर्धारण करते हा मार्क्सचा विचार आज आधुनिक समाजासाठी चूकीचा असून राज्यसंस्थाच अर्थव्यवस्थेची दिशा ठरवते. म्हणूनच मार्क्सची श्रम व उत्पादनाची संकल्पना सांस्कृतिक व राजकीय जीवनाला समजण्यासाठी असमर्थ आहे.

**३) आधुनिक समाजात शोषणाचे स्वरुप बदलले आहे.**

कार्ल मार्क्स यांनी भांडवलशाहीची व्याख्या शोषण या संकल्पनेद्वारे केली आहे. मार्क्सच्या मते भांडवलशाहीचे सर्वात महत्वाचे वैशिष्टे म्हणजे शोषण परंतू हेबरमास यांना हे मान्य नाही हेबरमास म्हणजे आजच्या आधूनिक भांडवलशाही व्यवस्थेत लोकशाहीचा उदार चेहरा समोर आला आहे. श्रमीक कामगाराचा आर्थिक स्तर उंचावला आहे. कामगराचा जीवनस्तर उंचावला आहे. कामाच्या ठिकाणी कामगार कल्याणाच्या अनेक योजना राबवल्या जात आहेत.

हेबरमास यांच्या मते या बदललेल्या उदार व मानवतावादी भांडवलशाही रचनेत आपल्याला श्रमीक वर्गाच्या जीवनाविषयी पून्हा एकदा विचार करावा लागेल. रुढीवादी मार्क्सवाद यासाठी अप्रासंगिक आहे. हेबरमास यांचे मत आजचे श्रमीक कामगार आर्थिकदृष्टया वंचित राहिले नाहीत व ना त्याचे आर्थिक शोषण होते त्यामूळे त्यांना क्रांती करण्याची गरज नाही.

**४) सोव्हिएट रशियात मार्क्सवाद पराजीत झाला.**

सेवीयत रशियात मार्क्सच्या साम्यवादाचा भयानक व क्रूर चेहरा सामोरा आला. मार्क्सच्या साम्यवादातील आदर्शचा खून पडला. लाखे निरपराध मारले गेले. स्टलीनच्या कालखंडात मानवतावादाचा बळी गेला शेवटी रशियाला प्रचंड मोठया आर्थिक विभिन्न अवस्थेला तोंड दयावे लागले. एक किला गहू साठी कित्येक किलोमीटरच्या रांगा लागायच्या या परिणाम सोवीयत रशियाचे विघटन झाले. साम्यवाद गळून पडला रशियाने

लोकशाही व भांडवलदाराचा स्विकार केला.

हेबरमास यांच्या मते मार्क्सचा हा सिध्दांत की भांडवलाच्या विकासाबरोबर क्रांती येईल हे खोटे ठरले करण आजच्या विकसित भांडवलशाहीत कामगाराची समृध्दी वाढली आहे. भांडवलवाद आणि राज्य दोन्हीही कल्याणकारी बनले आले.

**५) मार्क्सची उत्क्रांती वा विकासाची संकल्पना चूकीची आहे.**

मार्क्सच्या मते अर्थसंस्था अथवा उत्पादन पध्दतीचा विकास सामाजिक परिवर्तनाला कारणीभूत ठरते. समाज बदलला म्हणजे फक्त उत्पादनपध्दती वा उत्पादन साधने बदलली. अर्थसंस्थेतील परिवर्तन हेच सामाजिक परिवर्तन होय.

हेबरमास यांच्या मते समाजात परिवर्तन उत्क्रांती अथवा विकास फक्त उत्पादन पध्दती आणि संबंधानीच झाला नाही तर त्यासाठी धर्म, विचार, मूल्ये वा अन्य सांस्कृतिक कारणेही जबाबदार आहेत. प्रत्यक्षात उत्क्रांती अथवा विकास ही एक फारच व्यापक सामाजिक प्रक्रिया आहे. मार्क्सनी त्याकडे खूपच संकूचित अर्थाने बघितले. अधिसंरचनेच्या निर्मितीत संचाराची माध्यमे आहेत आणि अधिसंरचनेच्या निर्मितीत त्याचे योगदान असते. थोडक्यात हेबरमास यांनी मार्क्सच्या सामाजिक परिवर्तन वा मानव विकासाच्या सिध्दांताला आर्थिक निर्धारणवादाच्या चौकटीतून बाहेर काढले. व अभिव्यक्तीच्या श्रेत्रात आणले.

थोडक्यात हेबरमास हा मार्क्सवादी असून मार्क्सच्या विचारासी प्रमाणिक राहून आधूनिक समाजासाठी मार्क्सवादाला प्रासंगिक वा सुसंगत बनवने हाच हेबरमास यांच्या नवमार्क्सवादाचा उद्देश होता.

**१.२.४.१: स्वयं अध्ययनाचे प्रश्न :**

१) नॉलेज ॲण्ड ह्युमन इंन्ट्रेस्ट हा ग्रंथ कोणी लिहिला.

२) हेबरमास आपल्या नवमार्क्सवादी सिध्दांताचा केंद्रीय आधार काय मानतो.

३) हेबरमास यांच्या नवमार्क्सवादावर कोणत्या शास्त्रज्ञाचा प्रभाव आहे.

४) हेबरमास यांच्या नवमार्क्सवादावर कोणत्या सिध्दांताचा प्रभाव आहे.

५) हेबरमास सामाजिक परिवर्तनासाठी अर्थसंस्थेतील परीवर्तनाबरोबर कोणते घटक महत्वाचे मानतो.

**१.३ सारांश :**

नवप्रकार्यवादी व नवमार्क्सवादी सिध्दांतकारांनी सुधारात्मक स्वरुपात प्रकार्यवाद व मार्क्सवादाचे जे नवीनीकरण केले त्यामुळे समाजशास्त्रीय विश्वात एक मोठी क्रांती झाली. परंपरागत समाजशास्त्राला अधिक शास्त्रीयता व बौध्दिकतेचे धक्के बसले. नवमार्क्सवाद व नवप्रकार्यवादामुळे समाजशास्त्रीय विश्वात एक मोठी क्रांती झाली. या सिध्दांतकाराने समाजशास्त्रीय विचारांचा एक नवा शास्त्रीय व बौध्दिकदृष्ट्याा समृध्द वारसा निर्माण केला.

**१.४ : पारीभाषीक संज्ञा :**

१. Left orientation - डाव्या विचारसरणीकडे झुकलेला

२. Post Positivism - उत्तर अधुनिकता वाद

३. Reconsrtion of Classic Sociology - सैध्दांतिक समाजशास्त्राची पुर्नबांधणी

४. Subjectivity - सापेक्षता वाद

५. Class Consciousness - वर्गजाणीव / वर्गचेतना

६. Hegemony - वर्चस्ववाद / प्रभुत्व

७. Discourse Analysis -विमर्श विश्लेषण

८. Pressure group - दबाव गट

९. Hermemeatics - भाष्यशास्त्र

१०. Empirco analytics theories - अनुभवीक विश्लेषणात्क सिध्दांत

**१.५.: स्वयंअध्ययनासाठी प्रश्न**

१ जेफी अलेक्झांडर यांचा नवप्रकार्यवादी सिध्दांत स्पष्ट करा.

२ जॉर्ज लुकास यांचे नवमार्क्सवादी विचार स्पष्ट करा.

३ ॲन्टिनो ग्रामशी यांची विमर्श विश्लेषण ही संकल्पना विषद करा.

४ ग्रामशी यांचे नवमार्क्सवादातील योगदान स्पष्ट करा.

५ मार्क्सवादातील समीक्षणात्मक सिध्दांत स्पष्ट करा.

६ हेबरमास यांची मार्क्सवादावरील टिका स्पष्ट करा.

७ हेबरमास यांच्या नवमार्क्सवादी सिध्दांताची वैशिष्टये लिहा.

८ हेबरमास यांचे नवमार्क्सवादावरील विचार स्पष्ट करा.

**१.६. स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे :**

**१.२.१.१**

१. जेफ्री सी. अलेक्झांडर २. जेफ्री सी. अलेक्झांडर ३. जर्मनी

४. उत्तरप्रत्यक्षवाद ५. टॉलकॉट पारसन

**१.२.२.१**

१. १९२३ (जर्मनी) २. मार्क्सच्या सिध्दांताच्या नवीनीकरण ३. ..........

४. ॲन्टिनो ग्रामशाी ५. ॲन्टिनो ग्रामशी

**१.२.३.१**

१. गेरॉल्ड कोहेण व जोन रोमेट २. युरेगन हेबरमास ३. ॲन्टिनो ग्रामशी ४. ॲन्टिनो ग्रामशी

५. लुई अलथुजर

**१.२.४.१**

१. युरेगन हेबरमास २. भाषा व अभिव्यक्तीशीलता व ज्ञान ३. मॅक्स वेबर, सिग्मंड फ्राईड व नोम चोस्की ४. फ्राईड यांचा मनोविश्लेषणात्मक सिध्दांत, वेबर यांचा क्रिया सिध्दांत व चोस्की यांचे भाषाशास्त्र ५. धर्म विचार मुल्ये व सांस्कृतिक कारण

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :**

१ जेफी अलेक्झांडर यांचा नवप्रकार्यवादी सिध्दांत स्पष्ट करा.

२ जॉर्ज लुकास यांचे नवमार्क्सवादी विचार स्पष्ट करा.

३ ॲन्टिनो ग्रामशी यांची विमर्श विश्लेषण ही संकल्पना विषद करा.

४ ग्रामशी यांचे नवमार्क्सवादातील योगदान स्पष्ट करा.

५ मार्क्सवादातील समीक्षणात्मक सिध्दांत स्पष्ट करा.

६ हेबरमास यांची मार्क्सवादावरील टिका स्पष्ट करा.

७ हेबरमास यांच्या नवमार्क्सवादी सिध्दांताची वैशिष्टये लिहा.

८ हेबरमास यांचे नवमार्क्सवादावरील विचार स्पष्ट करा.

**अधिक वाचनासाठीचे संदर्भ ग्रंथ**

**Readings**

1] Ritzer¸ George 2000 :

Sociological theory (International editions 2000) New York mcgraw Hill 2000

2] Jonathan H Turner:

The structure of sociological theory ( 4th edition) Jaipur and

New Delhi Rawat 1995

3] Jeffery c Alexander:

New functionalism and After 1998

4] M francis Abrams :

Modern sociological theory : An introduction

5] Ritzer George :

Post modern social theory sociology and sociological theory

6] Dr. Subhash Toshnewal :

Neo-currents in sociological Theories 2011 Managesh Prakshan Nagpur

7] Collins Ramdeal :

Sociological Theory ( Indian edition) Jaipur and New Delhi Rawat - 1997.

●●●

# सत्र ४ : घटक २
# लोकान्वय पध्दती आणि घटनाशास्त्र सिध्दांत
# Ethnomethodology and Phenomenology

घटक संरचना :


२.० प्रस्तावना

२.१ उद्दिष्टे

२.२ विषय विवेचन

२.२.१ लोकान्वय पध्दती : गारफिंकल यांचे योगदान,

लोकान्वय पध्दतीमधल्या मुलभूत संकल्पना, पारंपारिक समाजशास्त्रावरील टीका.

२.२.२.१ स्वयंअध्ययनासाठीचे प्रश्न

२.२.२ एर्व्हिन गॉफमन यांची नाटकीतंत्र संकल्पना

२.२.३ एडमंड हसरेल यांचे घटनाशास्त्र व आल्फ्रेड शूटज यांचे घटनाशास्त्र

२.२.३.२ स्वयंअध्ययनासाठीचे प्रश्न

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक संज्ञा

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठीचे प्रश्न

२.७ संदर्भ ग्रंथ


## २.० प्रस्तावना :

घटनाशास्त्र सिध्दांत आणि लोकान्वय पध्दती हे प्रामुख्याने व्यक्ती वर्तनासंबंधीचे अभ्यास करणारे सूक्ष्म सिध्दांत (Micro Theories) म्हणून ओळखल्या जातात पैकी घटनाशास्त्र सिध्दांत (Phonomenology) म्हणजे Sociology of everday life किंवा दैनंदिन स्वरुपाच्या घडून येणाऱ्या मानवी घटनांचे अभ्यास करणारे समाजशास्त्र म्हटले जाते. मानवी जीवनाशी संबंधित दैनंदिन घटनांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करत असताना, 'एखाद्या विशिष्ट सामाजिक घटने अंतर्गत असणाऱ्या व्यक्तींच्या मधील संवादाचे स्वरूप अभ्यासणे, प्रत्यक्ष घटनांचे निरीक्षण करुन घटनेचा अनुभव घेणे, घटनेचे स्वरुप जाणून घेत असताना घटनेबाबत वर्णन करुन त्याचे विश्लेषण करणे या सर्वांचा त्यामध्ये समावेश केलेला असतो. घटनाशास्त्राचे अभ्यासक प्रत्यक्ष घटना घडत असताना निरीक्षणाद्वारे, घटनेचा अनुभव घेवून, घटनेशी संबंधित असणाऱ्या

व्यक्ती, वर्तनाचा अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतात. घटनाशास्त्र मुख्यत: व्यक्ती एखाद्या वस्तू अथवा घटने संदर्भात त्याच्या दृष्टीकोनातून कसा अर्थ निश्चित करतात किंवा त्याबद्दल त्याची असणारी जाण (Conciousness) अभ्यासण्याचा प्रयत्न करते. म्हणून घटनाशास्त्र सिध्दांत हा एक सापेक्षवादी (Subjective) किंवा सृजनशील (Creative) स्वरुपाचा असून त्यामध्ये प्रत्यक्ष घटनेत सहभागी असणाऱ्या व्यक्तींच्या मनोभूमिकेतून घटनेचा असणारा अर्थ अभ्यासला जातो. त्यामध्ये त्रयस्त स्वरुपात संशोधकाप्रमाणे घटनेचा अभ्यास केलेला नसतो. म्हणून समाजशास्त्राच्या अभ्यासासाठीसुध्दा सर्व प्रथम ज्या व्यक्तींचा मिळून समाज तयार होतो. अशा व्यक्तींच्या दृष्टीकोनातून सामाजिक घटनांचा अर्थ कसा निश्चित केला जातो याबद्दल अभ्यास करणे गरजेचे आहे. सामाजिक जीवनामध्ये व्यक्ती व्यक्तींच्या मध्ये घडून येणाऱ्या आंतरक्रियांचा अर्थ जाणून घेतल्यास त्यांच्यामध्ये ज्या स्वरुपाचे संवाद घडून येतात. त्यांचा अर्थ जाणून घेण्याचा प्रयत्न घटनाशास्त्रामध्ये केलेला असतो. घटनाशास्त्र सिध्दांत प्रामुख्याने वस्तुनिष्ठ (Objective) दृष्टीकोनातून घटनांचा अभ्यास करणाऱ्या, अभ्यासकांवर टीका करताना, घटनेचे वास्तविक स्वरुप जाणून घेण्यासाठी खऱ्या अर्थाने घटनाशास्त्राचा दृष्टीकोन कसा उपयुक्त ठरतो या सबंधी त्यामध्ये विशेष महत्त्व दिले आहे. घटनाशास्त्र सिध्दांताचे अभ्यासक म्हणून एडमंड हसरेल आणि आल्फ्रेड शूरज या दोन विचारवंताचे विचार या दृष्टीकोनांच्या संदर्भात विशेष महत्त्वाचे समजले जातात.

त्यानंतरच्या लोकान्वय पध्दतीचा दृष्टीकोन (Ethnomethodology) हा मानवी आंतरक्रियांचे स्वरुप समजून घेण्यासाठी केला जातो. या दृष्टीकोनानुसार बहुतांशी मानवी क्रियांच्या पाठीमागे, आंतरक्रियेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्ती व्यक्तींच्या मध्ये एखाद्या प्रसंगाबाबत परस्पर सहमती घडवून आणण्यामध्ये सहमती होत असते. थोडक्यात, ज्या वेळी व्यक्ती-व्यक्तींच्या मध्ये एखाद्या घटने संदर्भात कितीही मतभेद अथवा विरोध असला तरी, त्यांच्यातील देवाण-घेवाण ही तडजोडीच्या मार्गातून सहमतीकडे वाटचाल करणारी असते. १९४५ मध्ये हॅराल्ड गॅरफिंकल या अभ्यासकाने, न्यायलयातील कामकाज संदर्भात घडणाऱ्या वकिल आणि आरोपी यांच्यांतील संवादांचा वारंवार अभ्यास करुन 'लोकान्वय पध्दत' सर्व प्रथम विकसित केली. त्यांच्या मते, न्यायालयीन कामकाज करत असताना, वकिल आणि आरोपी परस्परांना उत्तरे देत असताना किंवा त्यांच्यातील संवाद घडवून येत असताना ज्या एका विशिष्ट पध्दती (Method) वापरतात, त्यावरुन त्यांनी जी संज्ञा तयार केली त्याला लोकान्वय पध्दती (Ethnomethodology) असे म्हटले आहे. The term 'ethnomethodology' given its Greek roots, literally means the methods of ordinary people that are used on a daily basis to accomplish their everdaty needs. थोडक्यात, Ethnomethodology या संज्ञेचे मूळ ग्रीक भाषेत असून त्याचा अर्थ, ज्यावेळी सर्वसामान्य व्यक्ती आपल्या रोजच्या व्यवहारामध्ये, आपल्या विविध गरजांची पूर्तता करण्यासाठी ज्या संवाद पध्दती उपयोगात आणतात. त्याला लोकान्वय पध्दती असे म्हटले जाते. लोकान्वय पध्दती च्या संदर्भात अनेक प्रकारचे विश्लेषण केले जाते. काही अभ्यासकांच्या मते, Ethno या शब्दाचा अर्थ 'व्यक्ती' असून Method म्हणजे पध्दती आहे. व Logy म्हणजे अभ्यास म्हणून Ethnomethodology म्हणजे ज्यावेळी, एखाद्या समस्येबाबत व्यक्ती-व्यक्तीच्या मध्ये सहमती घडवून आणण्याच्या दृष्टीने, व्यक्तीकडून ज्या पध्दतींचा अवलंब केला जातो. त्याला लोकान्वय पध्दती म्हणतात.

' Studies in Ethnomethodology ' या हॅराल्ड गारफिंकल यांच्या स्वत:च्या पुस्तकामध्ये त्यांनी

असे म्हटले आहे की, दैनंदिन व्यवहारामध्ये, समूहजीवनात बहुतांशी व्यक्ती सफाईदारपणे आपल्या हेतू आणि उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी, ज्या प्रकारच्या हावभाव आणि निरनिराळ्या कृतीचा विचारपूर्वक वापर करतात. त्या संबंधीचा शोध घेण्याची पध्दती म्हणजे 'लोकान्वय पध्दती' म्हणतात.

## २.१ उद्दिष्टे :

लोकान्वय पध्दती आणि घटनाशास्त्र या युनिटचा अभ्यास करताना प्रामुख्याने –

अ) सर्व प्रथम लोकान्वय पध्दतीचा जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हेरॉल्ड गारफिंकल यांच्या लोकान्वय पध्दती मधल्या मूलभूत संकल्पनाचा अभ्यास करणे, शिवाय व्यक्ती व्यक्तींच्या आंतरक्रियांचे अर्थ जाणून घेणे व लोकान्वय सिध्दांताद्वारे पारंपारिक समाजशास्त्रीय अभ्यासावर झालेल्या टीकांचा अभ्यास करणे.

ब) आल्फ्रेड यांच्या घटनाशास्त्र सिध्दांताचा अर्थ जाणून घेत असताना, घटनाशास्त्र हे दैनंदिन स्वरुपात घडून येणाऱ्या सामाजिक घटनांचा अभ्यास करणारे कशा प्रकारचे समाजशास्त्र आहे यांचा अर्थ जाणून घेणे.

क) शेवटी पीटर बर्जर आणि लूकमन यांनी व्यक्ती व्यक्तींच्या मधील आंतरक्रियांच्या मधून सामाजिक वास्तव घडवून आणण्याचा प्रयत्न घटनेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्तींच्याकडून कशा प्रकारे होतो. या संबंधीचा अभ्यास करणार आहोत.

## २.२ विषय विवेचन :

समाजशास्त्र म्हणजे Science of Society किंवा समाजाचा वैज्ञानिक पध्दतीने अभ्यास करणारे शास्त्र संबोधले जाते परंतु ज्या व्यक्तींचा मिळून समाज तयार होतो अशा व्यक्तींच्या वर्तनामुळे समाजव्यवस्था आकाराला येत असते. म्हणून व्यक्ती–व्यक्तींच्या मधील आंतरक्रियांचा अर्थ समजून घेण्यासाठी म्हणून, व्यक्तींच्या कृती आणि वर्तनांचा देखील अभ्यास ज्या सिध्दांताच्या माध्यमातून केला जातो. अशा सिध्दांताला सूक्ष्म सिध्दांत किंवा (Micro Theories) असे म्हणतात. या सिध्दांतामध्ये घटनाशास्त्र (Phenomenology) लोकान्वय पध्दत Ethnomethodology सांकेतिक आंतरक्रियावाद (Symbolic Interactionism ) सारख्या सिध्दांताचा समावेश होतो.

सदरच्या घटकांमध्ये लोकान्वय पध्दती, आणि घटनाशास्त्र या दोन सिध्दांताचे स्वरुप जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. सर्व प्रथम घटनाशास्त्र किंवा सामाजिक घटनांचा अन्वयार्थ अभ्यासकांना सामाजिक कारणांचा विचार न करता घटनेत सहभागी असणाऱ्या व्यक्तींच्या वर्तनांचा विचार केला जातो. कारण घटनेशी संबंधित असणाऱ्या व्यक्तींचा घटनेकडे पहाण्याचा दृष्टीकोन कशा स्वरुपाचा असतो व व्यक्ती त्या अनुषंगाने कशा स्वरूपाचे वर्तन आणि कृती करतात. याचा अभ्यास करताना घटनाशास्त्र सिध्दांताद्वारे आल्फ्रेड शूटज यांनी जे विचार मांडले. त्या विचारांचा आढावा घेणार आहोत.

त्याच बरोबर लोकान्वय पध्दती किंवा Ethnomethodology म्हणजे अशा स्वरुपाची अभ्यास पध्दती आहे की ज्यामध्ये व्यक्ती व्यक्तींच्या मध्ये होणाऱ्या संभाषणाद्वारे तसेच परस्परांच्या कृती, भाषा,

संवाद यांचा उपयोग करुन व्यक्ती परस्परांवर कशा प्रकारे प्रभाव टाकतात की, ज्यामुळे एखाद्या सामाजिक घटनेचा अर्थ जो आपणास सर्वसामान्य स्वरुपाचा जरी वाटत असला तरी, व्यक्ती व्यक्तींच्या मधल्या आंतरक्रियांचे सखोल अध्ययन जाणून घेण्यासाठीच्या लोकान्वय पध्दती या अभ्यास समाजशास्त्रामध्ये महत्त्वाचा आहे.

शेवटी Social Construction of Reality किंवा सामाजिक वास्तवतेची रचनात्मक मांडणीच्या अभ्यासात पीटर बर्जर आणि लूकमन या अभ्यासकांनी, देखील एखाद्या सामाजिक घटनेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्ती आपआपल्या वर्तन प्रकारांद्वारे किंवा कृतीद्वारे घटनेशी असणारी वास्तवता दाखविण्याचा प्रयत्न कशा प्रकारे करतात. याचा आढावा घेतानासुध्दा व्यक्ती व्यक्तींच्या मधील आंतरक्रिया आणि वर्तन याच घटकांना विशेष प्राधान्य देतात. थोडक्यात Subjective & Objective या दोन संकल्पनांपैकी Subjective Sociology किंवा व्यक्तीसापेक्ष समाजशास्त्र आणि त्यामध्ये असणारे अभ्यास दृष्टीकोन सामाजिक घटनांचा अन्वयार्थ शोधण्याचा प्रयत्न करतात.

**लोकान्वय पध्दतीमधील हॅराल्ड गारफिंकल यांचे योगदान :**

आपल्या सभोवतालच्या सामाजिक जीवनातील मानवी घटनांचा अर्थ आणि स्वरुप जाणून घेण्यासाठी म्हणून, व्यक्ती ज्या वर्तन पध्दतींचा अवलंब करतात त्या वर्तन पध्दतींचा अभ्यास समजून घेण्यासाठी 'लोकान्वय पध्दती' Ethnomethodology हा सैध्दांतिक दृष्टीकोन उपयुक्त ठरतो. हा दृष्टीकोन हॅराल्ड गारफिंकल या विचारवंताने विकसित केला. समाज जीवनातील व्यक्तींच्या दैनंदिन कृती आणि दैनंदिन जीवनामध्ये परस्परांशी संपर्क ठेवण्यासाठी व्यक्ती करत असलेला प्रयत्न यांचा अभ्यास केला जातो. व्यक्ती आपल्या कृती करताना जे संभाषण करतात त्या संभाषणामधून लोकान्वय पध्दतीला अभ्यासाचा धागा मिळतो. बहुतांशी व्यक्ती इतरांशी संपर्क ठेवत असताना वर्तन पध्दतीचे भान ठेवून भूतकाळातील घटनांचा आणि शब्दांचा आधार घेवून घटनांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करते.

हॅराल्ड गारफिंकल या अमेरिकन विचारवंताने हा दृष्टीकोन विकसित केला. हॅराल्ड गारफिंकल यांचा जन्म २९ ऑक्टो. १९१७ मध्ये 'न्यूजर्सी' या ठिकाणी झाला. या दृष्टीकोनाद्वारे समाजातील रोजच्या जीवनात आढळणाऱ्या व्यक्ती आणि त्याचे सामाजिक विश्व, व्यक्ती-व्यक्तींच्या मधील आंतर क्रियांचे स्वरुप, त्यांच्यामधील संभाषण पध्दती इ. बद्दलचा आढावा घेतला जातो. ज्या एखाद्या विशिष्ट सामाजिक घटनेमध्ये समाविष्ट असणाऱ्या व्यक्ती घटनेच्या अनुषंगाने परस्परांशी कशा प्रकारे वर्तन करतात त्यासाठी कोणत्या युक्त्या, ज्ञान आणि संभाषण कौशल्याचा अवलंब करुन सर्वसामान्य व्यक्ती त्यामधून मार्ग काढण्याचा प्रयत्न करतात. या संबंधीचा अभ्यास 'लोकान्वय पध्दती' शी संबंधित आहे.

व्यक्ती-व्यक्तींच्या मध्ये घडून येणाऱ्या सामाजिक आंतरक्रियांचा अर्थ जाणून घेण्यासाठी लोकान्वय पध्दतीचा दृष्टीकोन उपयुक्त असतो. या दृष्टीकोनानुसार, आंतरक्रिया मध्ये समाविष्ट असणाऱ्या व्यक्ती, परस्परांमध्ये सहमती दर्शविण्याच्या हेतूने वर्तन करीत असतात. म्हणजेच घटनेशी संबंधित असणारे वास्तव (Reality) हे परस्परांच्या सहमताशी निगडीत असते.

**घटना विश्लेषण करण्याच्या व्यक्तींच्या लकबी (Accounts)**

लोकान्वय पध्दतीच्या अभ्यासात प्रामुख्याने व्यक्ती एखाद्या घटने संदर्भात कौशल्याने आपली मते कशा प्रकारे स्पष्ट करते आणि मुख्यत: आपले मत अथवा विचार इतरांवर बिंबवण्यासाठी भाषेतील विशिष्ट शब्दावर जोर देऊन घटने संदर्भातील वास्तव (Reality) कसे निर्माण करते. या संबंधीच्या अभ्यासात विशेष महत्त्व दिले आहे. म्हणजेच व्यक्ती-व्यक्तीच्या आंतरक्रियांचा अभ्यास करताना, त्या आंतरक्रियेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्ती भाषेच्या अथवा संभाषणाच्या आधारे आपले स्थान कशा प्रकारे दर्शवितात म्हणजेच To do interaction is to tell interaction व्यक्ती आंतरक्रियेत केवळ कृती करत नसतात. तर त्या कृती इतरांना समजावण्याचा प्रयत्न करतात. तोंडी आंतरक्रिया होत असताना व्यक्ती त्यांच्या भाषेशी संबंधित लोकतंत्राचा (folk Technique) अवलंब करतात. उदा. सकाळी उशिरा उठणाऱ्या व्यक्तीला मराठी भाषिक व्यक्ती 'कुंभकर्ण जागा झाला' अशी उपमा देतात किंवा शब्दप्रयोग वापरतात. थोडक्यात लोकान्वय पध्दती मध्ये व्यक्तीच्या दैनंदिन व्यवहारातील कृती अथवा दैनंदिन जीवनामध्ये व्यक्तींचा असणारा सहभाग अभ्यासला जातो.

लोकान्वय पध्दतीमध्ये व्यक्तींच्या आंतरक्रियांचा सापेक्षवादी दृष्टीकोनातून अभ्यास केला जातो. व्यक्तीच्या दैनंदिन कृतीचे सूक्ष्म अध्ययन करुन तिच्या वर्तनाचा अभ्यास करताना, तिचे कृती आणि विचार अभ्यासले जातात. एखाद्या विशिष्ट घटनेबाबत विश्लेषण देत असताना, त्या घटनेचे व्यक्ती कशा पध्दतीने वर्णन, टीका, अथवा वैचारिक मांडणी करते त्याचप्रमाणे घटनेशी संबंधित एखाद्या प्रसंगाबद्दलचे विश्लेषण देत असताना विशिष्ट शब्दावर जोर देऊन, घटने बद्दलची वास्तवता पटवून देण्याची कला व्यक्ती कशा उपयोगात आणतात. अशा प्रकारे लोकान्वय पध्दती व्यक्ती जवळ असणाऱ्या संभाषण चातुर्याचा आणि भाषेचा वापराचा कसा उपयोग करतात आणि त्याचवेळी दुसऱ्या व्यक्ती कडून त्यांचा कसा स्विकार केला जातो. या संबंधी विश्लेषण करते.

गारफिंकल यांच्या मते, समाजशास्त्रामध्ये दैनंदिन स्वरुपात ज्या घटना घडून येतात त्यांचा हा अभ्यास आहे त्या स्वरुपात स्वीकार करुन अभ्यास केल्यामुळे समस्या निर्माण होतात. त्यासाठी अशा घटनांच्या मागे असणाऱ्या अज्ञात व अदृश्य माहितीचा शोध घेत असताना, व्यक्ती वर्तनाचा अभ्यास विशेष महत्त्वाचा ठरतो.

**घटनेचे वैशिष्ट्यपूर्ण विश्लेषण देण्याच्या पध्दती :**

गारफिंकल यांनी, व्यक्तींच्या एखाद्या घटनेसंदर्भात विश्लेषण देण्याच्या वैशिष्ट्यपूर्ण अशा पध्दतींचा अभ्यास केला आहे. त्यांच्या मते काही व्यक्ती घटनेची वास्तवता त्या घटनेसंबंधी असणाऱ्या तथ्यांच्या आधारे स्पष्ट करतात. काही व्यक्ती सामाजिक दृष्टीकोनातून घटनेचे असणारे महत्त्व स्पष्ट करतात. भाषेच्या माध्यमातून घटनेची तीव्रता स्पष्ट करतात. वर्तमान घटनांचे स्पष्टीकरण भूतकाळातील घटनांचा आधार देऊन त्याची भविष्यकालीन स्थिती स्पष्ट करतात. गारफिंकल यांच्या मते, केवळ आंतरक्रियेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्तीच केवळ अशा वैशिष्ट्यपूर्ण कृतीचा अवलंब करतात असे नाही तर संशोधकांनी सुध्दा या कृतींचा अभ्यास करुन, मानवी आंतरक्रियांचा अर्थ जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

गारफिंकल यांच्या मते, समाजशास्त्रीय अभ्यासात सामाजिक घटनांचा अभ्यास करताना, एखाद्या

घटनेचा केवळ एक घटना म्हणून अभ्यास न करता घटना घडून येण्यापाठीमागची प्रक्रिया अभ्यासणे गरजेचे आहे. परंतु बहुतांशी समाजशास्त्रीय लिखाण, नियतकालिके आणि समाजशास्त्रीय विचारांची मांडणी तथ्यांच्या (facts) आधारेच होत असते. परंतु काही मोजकेच अभ्यासक घटनेबाबतची वास्तवता पडताळून पाहत असतान, प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे दिसणाऱ्या घटनाच्या मागील वास्तवता कितपत खरी अथवा खोटी आहे हे तपासण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे समाजशास्त्र हे केवळ तथ्यांचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. त्यामध्ये क्वचितच वैशिष्ट्यपूर्ण अभ्यास पध्दतीचा अवलंब करुन घटनांचे अवलोकन केले जाते.

**लोकान्वय अभ्यास पध्दतीची वैज्ञानिक बाजू :**

समाजशास्त्रीय अभ्यासामध्ये गुंतागुंतीच्या मानवी वर्तनाचा अभ्यास करण्यासाठी म्हणून जरी वैज्ञानिक पध्दती विकसित झाली असली तरी, लोकान्वय पध्दतीच्या अभ्यास पध्दतीचा अवलंब करुन सुध्दा सामाजिक घटनांचा वैज्ञानिक पध्दतीने अभ्यास करता येतो. गारफिंकल यांनी लोकान्वय पध्दती मध्ये असणाऱ्या वैज्ञानिक पध्दतीचे स्वरुप पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.

१) वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब लोकान्वय पध्दतीद्वारे करता असताना, अभ्यास क्षेत्राची मर्यादा असत नाही. कितीही व्यापक स्वरुप असणाऱ्या समाज रचनेचा अभ्यास या पध्दतीद्वारे करता येतो. कोणत्याही स्वरुपाच्या सामाजिक घटनांचा अभ्यास करण्यासाठी म्हणून जरी या पध्दतीचा अवलंब केला तर तो वस्तुनिष्ठ पध्दतीने करता येवू शकतो. संशोधक त्यांच्या इच्छेकनुसार कोणत्याही अभ्यास तंत्राचा अवलंब करुन, घटना केव्हा, कुठे घडली तरी या पध्दतीचा अवलंब करु शकतो. तसेच घटनेचे स्वरुप व्यापक अथवा लहान असो, सर्वच घटनांच्या अभ्यासासाठी लोकान्वय पध्दती उपयुक्त ठरते.

२) पारंपारिक समाजशास्त्रीय अभ्यास पध्दतीमध्ये सामाजिक घटनांचा अभ्यास करताना, मुख्यत: अभ्यासाचे स्वरुप वस्तुनिष्ठ स्वरुपाचे रहावे म्हणून सातत्याने आपण संख्याशास्त्र, आलेखपध्दती, मुलाखती, नमुना निवड, तथ्य विश्लेषण, संशोधन आराखडा इ. अवस्थांचा उपयोग करीत असतो. थोडक्यात अनुभवजन्य स्वरुपाची तथ्ये आणि माहितीचा आधार, वस्तुनिष्ठ पध्दतीने अभ्यास करताना घेतला जातो. परंतु गारफिंकल यांच्या मते, समाजशास्त्राने या पध्दतींच्या पुढे जाऊन सामाजिक घटनांचे वास्तविक स्वरुप जाणून घेण्यासाठी म्हणून लोकान्वय अभ्यास पध्दतीद्वारे घटनेशी समाविष्ट असणाऱ्या व्यक्ती वर्तनाचा अभ्यास करण्यासाठी म्हणून सापेक्षवादी दृष्टीकोन (Subjective) उपयोगात आणावा.

३) वैज्ञानिक अभ्यास पध्दतींचा अवलंब करुन घटनांचा अभ्यास करताना, वास्तविक मानवी वर्तनाचा अभ्यास होणे आवश्यक असते. परंतु अशा वैज्ञानिक पध्दती संशोधनाशी संबंधित नियमांवर अवलंबून असल्याने त्या केवळ दर्जात्मक संशोधन पध्दतींचा अवलंब करतात. गारफिंकल यांच्या मते, लोकान्वय पध्दतीद्वारे मानवी कृतींचा सर्वांग दृष्टीकोनातून अभ्यास करताना, मानवी कृतींचा अर्थ, त्यांची वैशिष्ट्ये, वास्तवता, वस्तुनिष्ठता, सर्वसामान्यता पडताळून पाहिली जाते.

४) लोकान्वय पध्दतीद्वारे सामाजिक घटनांचा अभ्यास करताना, सामाजिक घटनांकडे पहाताना घटनेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्तींच्या मुळे त्या घटना कशा घडत आहेत याकडे विशेष लक्ष दिले जाते. कारण व्यक्ती आपल्याकडे असणाऱ्या विशिष्ट कौशल्याद्वारे घटना उभ्या करण्याचा किंवा त्या विशिष्ट पध्दतीने

साकार करण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यामुळे, घटनांच्या निर्मिती साठी घटनेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्तीकडून वापरल्या जाणाऱ्या पध्दतींचा अभ्यास लोकान्वय पध्दतीमध्ये विशेष महत्त्वाचा समजला जातो.

५) गारफिंकल यांच्या मते, एखाद्या सामाजिक घटनेच्या अनुषंगाने माहिती संकलित करताना संशोधक ज्या वेळी माहिती मिळवतो त्या वेळी निवेदक त्या पध्दतीने माहिती देतो त्या वेळी तो कशा कौशल्यपूर्ण प्रकारे माहिती देण्याचा प्रयत्न करतो, आपले मत तर्कशुध्द पध्दतीने मांडण्यासाठी भाषाकौशल्य, चेहऱ्यावरील हावभाव, टीका, बचावात्मक पवित्रा, दोन वाक्यांच्या मध्ये अंतर ठेवून बोलण्याची लकब इ. वर्तनपध्दतींचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

मानवी वर्तन प्रकारांचे स्वरुप अभ्यासण्यासाठी लोकान्वय पध्दतीचा अवलंब हा प्रामुख्याने मानवी आंतरक्रिया अंतर्गत विशिष्ट प्रसंगी व्यक्ती आपल्या कृतीमधून एखाद्या घटने संदर्भातील सत्य कशा प्रकारे निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. प्रत्यक्षात जे सत्य नाही ते सत्य आहे हे भासवण्याचा त्याचा कसा प्रयत्न चाललेला असतो. अशा अदृश्य मानवी कृती अभ्यासण्यासाठी ही पध्दत उपयुक्त ठरत असते. उदा. न्यायालयीन कामकाज, पोलीस आणि आरोपी यांच्यातील संवाद, अनौपचारिक स्वरुपाच्या मुलाखती, सहभागी निरीक्षण, व्हिडीओ शुटिंग, माहितीपट इ. सारख्या पध्दतींचा अवलंब करुन मानवी वर्तनाचे स्वरुप अभ्यासण्यासाठी लोकान्वय पध्दती उपयुक्त ठरते.

१९६० साली हॅराल्ड गारफिंकल यांनी, या पध्दतीचा सर्व प्रथम वापर करण्यास सुरुवात केली. त्यावेळी त्याला 'Breaching demonstration' अशी संज्ञा देण्यात आली होती. नंतर ही पध्दती, समाजातील व्यक्तींचे दैनंदिन जीवन अभ्यासण्यासाठी संशोधन पातळीवर या पध्दतीचा उपयोग केला जाऊ लागला. या पध्दतीचा अवलंब करुन आपण मानवी वर्तनामध्ये असणाऱ्या गुंतागुंतीचा प्रकारांचा अभ्यास करु शकतो.

**व्यक्ती-व्यक्तींच्या मधील संवादांचे विश्लेषण :**

लोकान्वय पध्दती मध्ये व्यक्ती-व्यक्तींच्या मध्ये घडून येणाऱ्या संवादाचे विश्लेषण अभ्यासले जाते. कारण बहुतांशी मानवी संवादामधून काय बोलले गेले? या पेक्षा काय नाही बोलले? हे जाणून घेणे आवश्यक असते. कारण संवादामध्ये व्यक्ती काय बोलतात या पेक्षा ते काय बोलण्याचे टाळतात याला महत्त्व असते. बोलणारी व्यक्ती आणि ऐकणारा यांच्या मध्ये शब्दाशिवाय कसा संवाद घडून येतो. जोपर्यंत संवाद घडून येत असताना व्यक्ती स्पष्टपणे योग्य आवाजात आपले मत मांडत नाहीत. तो पर्यंत त्यामध्ये सत्यता स्पष्ट होत नाही. भाषा तंत्राद्वारे व्यक्ती-व्यक्तींच्या मधील संवादाचा अभ्यास करता येतो. संवाद कौशल्यामधून व्यक्ती-व्यक्तींच्या मधील आंतरक्रियांचा अभ्यास करता येतो. The goal of conversation analysis is to examine how conversation is organised.

व्यक्ती-व्यक्तींच्यामधील संवाद अथवा संभाषण कशा प्रकारे घडून येते याचे विश्लेषण करण्याचे कार्य लोकान्वय पध्दतीद्वारे केले जाते.

लोकान्वय पध्दतीद्वारे पारंपारिक समाजशास्त्रीय अभ्यास पध्दतीवर केलेल्या टीका :

लोकान्वय पध्दतीच्या अभ्यासाअंतर्गत सामाजिक घटकांचा कमी अभ्यास होतो. उदा. समाजातील सत्ता, वर्ग, संघर्ष, साधनसंपत्तीचे वितरण इ. कारण अशा स्वरुपाचा अभ्यास ज्या समाजशास्त्रामध्ये होतो.

त्या समाजशास्त्राच्या अभ्यासपध्दतीवर लोकान्वय पध्दतीद्वारे काही टीका केल्या जातात. त्यामध्ये –

**१) वस्तुनिष्ठ अभ्यासाबद्दलचा पूर्वग्रह :** समाजशास्त्रीय अभ्यास पध्दतीद्वारे त्यावेळी वेगवेगळ्या सामाजिक घटनांचा अभ्यास अनेक अभ्यासक वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब करुन, सामाजिक घटनांचा अभ्यास वस्तुनिष्ठ असल्याचा दावा करतात. त्यावेळी लोकान्वय पध्दतीचा अवलंब करणारे अभ्यासक काही मुलभूत प्रश्नांची मांडणी करुन समाजशास्त्रीय अभ्यास पध्दतीवर टीका करतात. त्यांच्या मते, ज्या सामाजिक घटनांचा अभ्यास वस्तुनिष्ठ आहे असा दावा करणाऱ्या समाजशास्त्रामध्ये, सामाजिक घटनांचा खरा अर्थ त्या घटनेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्ती प्राप्त करुन देत असतात. कारण घटनेत समाविष्ट असणाऱ्या व्क्तींचे अंतर्गत आणि बाह्य वर्तन एकसारखे नसते. त्यामुळे त्या घटनेबद्दलची वस्तुनिष्ठता, घटनेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्तींच्या वर्तनानुसार बदलणारी असते. जरी समाज आणि समाजातील सामाजिक मुल्ये, भूमिका, सामाजिक नियंत्रण, सामाजिक संस्था, यांच्यामुळे सामाजिक घटनांचा एक निश्चित अर्थ समाजशास्त्रामध्ये अभ्यासला जात असला तरी, घटनेत सहभागी असणाऱ्या व्यक्तींच्या कडून विशिष्ट वर्तन पध्दती आणि प्रकारांचा अवलंब करुन सामाजिक घटनांची सत्यता चुकीच्या स्वरुपात दाखविण्याचा प्रयत्न होऊ शकतो. त्यामुळे समाजशास्त्रीय अभ्यासाबाबत असणाऱ्या वस्तुनिष्ठतेच्या पूर्वग्रहाबाबत लोकान्वय पध्दत आक्षेप घेते.

**२) व्यक्ती घटकाला असणारे दुय्यम स्थान :** समाजशास्त्रीय अभ्यासामध्ये, व्यक्ती वर्तन प्रकार आणि समाजव्यवस्था या दोन प्रमुख घटकांचा अभ्यास करताना, सामान्यीकरण संस्थात्मक माहिती आणि सरासरी सारख्या प्रमुख आधार पध्दती विचारात घेवून सामाजिक घटनांचा अभ्यास वस्तुनिष्ठ असल्याचा दावा केला जातो. परंतु लोकान्वय पध्दतीचा असा आक्षेप आहे की, सामान्यत: व्यक्ती वर्तनासंबंधी काही विशिष्ट ठोकताळा आणि नियमांचा अवलंब करुन समाजशास्त्रामध्ये मानवी वर्तनबद्दलची विशिष्ट मांडणी केलेली असते. वस्तुत:, लोकान्वय पध्दती धर्म, घटस्फोट, आत्महत्या इ. सारख्या समाजशास्त्रीय विषयांची मांडणी जरी करत नसले तरी, अशा स्वरुपाच्या सामाजिक घटनांच्यामध्ये समाविष्ट असणाऱ्या व्यक्ती आपल्या विशिष्ट वर्तन प्रकारांच्या द्वारे, कोणत्याही सामाजिक घटनांना अर्थ प्राप्त करुन देतात. त्याविषयी लोकान्वय पध्दती विशेष महत्त्व देते.

**३) समाजशास्त्रीय वैज्ञानिक अभ्यास पध्दतीवरील टीका :**

समाजशास्त्र एक विज्ञान म्हणून सामाजिक घटनांचा अभ्यास करण्यासाठी वैज्ञानिक पध्दतींचा अवलंब करताना प्रश्नावली, मुलाखत निरीक्षण इ. सारख्या अभ्यास तंत्रांचा उपयोग करुन, वस्तुनिष्ठ माहितींचा आधार घेवून घटनेमागील सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न करते. परंतु लोकान्वय पध्दतीच्या मते समाजशास्त्रातील वैज्ञानिक पध्दतींचा ज्या वेळी प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग होतो त्यावेळी व्यक्ती आपल्या विवेकशील (Rational) वर्तनातून घटनेमागील सत्य लपविण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे सर्वच प्रकारची माहिती सत्य असते असे नाही.

### २.१.१.१ स्वयंअध्ययनासाठीचे प्रश्न :

| अ गट | ब गट |
|---|---|
| १) हॅराल्ड गारफिंकल | अ) भाषा |
| २) संवादाचे माध्यम | ब) लोकान्वय अभ्यास पध्दतीचे तंत्र |
| ३) व्यक्ती वर्तनाचा अभ्यास | क) धार्मिक लोकरुढीचा प्रकार |
| ४) मुलाखतीचा उपयोग | ड) सापेक्षवादी दृष्टीकोन |
| ५) नारळ फोडणे | इ) लोकान्वय पध्दतीचा जनक |

## २.२.२ एर्व्हिन गॉफमन यांची नाटकी तंत्र संकल्पना

एर्व्हिन गॉफमन यांची स्वःत्वाची संकल्पना (Concept of 'Self') Presentation of Self in Everyday life (१९५९) साली लिहिलेल्या ग्रंथात गॉफमन यांनी सांकेतिक आंतरक्रियावादातील 'Self' ची संकल्पना स्पष्ट केली आहे. त्यांच्या 'स्वःत्वा'च्या संकल्पनेमध्ये 'जार्ज हर्बर्ट मीड' यांच्या विचारांशी अधिक सुसंगत असून त्यांनी त्यामध्ये 'व्यक्तीच्या मनात आतल्या आत होणारी घुसमट (तणाव), एखाद्या घटनेबाबत अपल्यातील स्वयंस्फूर्तता (Spotaneous), तसेच 'मी'पणाची भावना, आणि 'आपल्या मनामध्ये असणाऱ्या सामाजिक घटना बाबतचे दबाव' हे सर्व प्रकारच्या व्यक्तींमध्ये सामाजिकरणातून आलेले असतात.

आपण ज्या गोष्टी मनापासून करणार असतो आणि इतर व्यक्ती आपल्याकडून ज्या वर्तनाची अपेक्षा करतात. यामुळेच तणाव निर्माण होत असतो. बहुतांशी व्यक्ती समाजातील इतर व्यक्तींच्या अपेक्षानुसार वागण्याचा प्रयत्न करतात, कारण व्यक्ती सामाजिक नियमनांचे उल्लंघन करणाऱ्या नसतात. कारण व्यक्ती निष्कारण आपल्या नित्य जीवन प्रकारात अडथळा निर्माण करीत नाहीत. त्या समाजातील इतर व्यक्तींच्या समोर 'आपली सामाजिक प्रतिमा' जपण्याचा प्रयत्न करतात. आणि त्या दृष्टीकोनातून व्यक्ती जे वर्तन करतात त्याला गॉफमन यांनी 'नाटकी वर्तन' (Dramaturgy) किंवा आपल्या सामाजिक जीवन जगण्याच्या नाटकी प्रवृत्ती समाज मंचावर कशा पार पाडल्या जातात. या बद्दलचे स्पष्टीकरण आढळते.

**गॉफमनची नाटकी तंत्राची संकल्पना** (Dramaturgy)

**१) स्वःत्वाची व्याख्या :** 'स्वत्व' ही जैविक कल्पना नसून त्याची एक विशिष्ट जागा नसते. त्यामुळे ज्या व्यक्तीच्या संदर्भात आपण 'स्वःत्वा'चा विचार करतो त्यावेळी जर ती व्यक्ती स्वःताच्या फायद्या-तोट्याचा विचार करते. त्या क्षणापुरते 'स्वःत्व' तिच्या ठिकाणी आढळते. त्यामुळे व्यक्तीचे मन म्हणजे स्वःत्व नव्हे.

गॉफमनच्या मते, व्यक्ती आणि तिच्या संपर्कात येणाऱ्या इतर व्यक्ती यांच्यातील नाटकी आंतरक्रियेतून 'स्वःत्व' निर्माण होते.

**व्यक्तींच्या आंतरक्रिये दरम्यानच्या वर्तनपद्धती**

गॉफमनच्या मते, 'स्वःत्व'चा उगम हा व्यक्ती-व्यक्तींच्या दरम्यान घडून येणाऱ्या नाटकी आंतरक्रियातून आपल्या वर्तन पद्धतीमधले चढ-उतार निश्चित करते व ज्या प्रकारच्या वर्तन प्रकारामुळे अडथळा निर्माण होणार आहे त्यावेळी वर्तन पद्धतीमध्ये बदल करते.

'Impression Management' किंवा परिस्थितीनुरूप वर्तनाचे होणारे व्यवस्थापन गॉफमन मते ज्या वेळी एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या सोबत आंतरक्रिया करते त्यावेळी आपल्या विचारातून आपले वर्तन दुसऱ्या व्यक्तीसमोर ठेवत असते. परंतु ते समोरच्या व्यक्तीला योग्य वाटत नाही त्या वेळी ती आपल्या वर्तनाचे व्यवस्थापन करून समोरच्या व्यक्तीला पटेल अशा दृष्टीकोनातून वर्तनाचे तंत्र बदलते. म्हणजेच प्रत्येक व्यक्ती इतरासोबत आपले विचार किंवा मत मांडत असताना आपण कसे बरोबर आहोत हे वर्तनातून व्यक्त करते यालाच 'वर्तनाबाबतचे व्यवस्थापन असे म्हटले आहे. असे तंत्र व्यक्तीला इतरांबरोबर आंतरक्रिया करत असताना येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी उपयुक्त ठरत असते.

**वर्तनव्यक्त होण्यासाठीची भौतिक साधने आणि परिस्थिती**

गॉफमनच्या मते, व्यक्ती वर्तन प्रकारांचा अभ्यास केला तर, व्यक्ती ज्या ठिकाणी एका विशिष्ट परिस्थितीला अनुसरून वर्तन करणार असते त्यासाठी तिला कांही साधने किंवा विशिष्ट परिस्थिती असावी लागते. उदा. 'डॉक्टर' म्हणून वर्तन करावयाचे झाल्यास विशिष्ट प्रकारची केबीन, अंगावर पांढरा झब्बा, कानात टेटेस स्कोप इ. अशा स्वरूपात अनेक व्यक्ती आपण समाजात पहातो आणि त्यांच्या एकूण पोशाख पद्धती वरून इतर व्यक्ती वर्तन प्रकारचे स्वरूप निश्चित करतात. व्यक्ती ज्या प्रकारची भूमिका पार पाडत असते उदा. डॉक्टर, वकिल, प्राध्यापक, ड्रायव्हर, विद्यार्थी इ. त्यानुसार आपले वर्तन नाटकी स्वरूपात ठेवण्याचा प्रयत्न करत असते. कारण त्या भूमिकेला अनुसरून वर्तनाचे विशिष्ट नियम व्यक्तीला ते वर्तन करण्यास भाग पाडते.

**विशिष्ट भूमिकेतून वर्तन – सामाजिक रचनेचा प्रभाव**

गॉफमनच्या मते, विशिष्ट प्रकारच्या भूमिका आणि त्यानुसार व्यक्तीचे होणारे वर्तन यांचा अभ्यास केला तर समाजात कोणत्या भूमिकेचे वर्तन कसे असावे याबद्दल प्रत्येक समाजाचे मापदंड असतात. त्यामुळे व्यक्तीचे वर्तन त्या भूमिकानुसार होत असते. त्यामुळे कोणत्या भूमिकेची नियम आपण करतो. त्या भूमिकेसंबंधीच्या वर्तनाचा अभ्यास अगोदरच आपणास माहित असतो.

**व्यक्ती-व्यक्तींच्या आंतरक्रियेदरम्यान लपवल्या जाणाऱ्या वर्तनाचे स्वरूप**

गॉफमन यांनी त्याच्या सिद्धांतामध्ये प्रामुख्याने 'व्यक्ती-व्यक्तींच्या आंतरक्रियांना विशिष्ट महत्त्व देताना, आंतरक्रिये दरम्यान आपण काही गोष्टी जाणीवपूर्वक इतरापासून लपवतो. उदा.

अ) एखाद्या महत्त्वाच्या पदावर काम करताना मद्यपान किंवा नशा करणे समाजाला मान्य नसेल तर, खाजगी जीवनात त्याचा आस्वाद घेतो किंवा पदावर येण्यापूर्वी तशा स्वरूपाचे व्यसन केले असेल तर पदावर आल्यानंतर ते लपविण्याचा प्रयत्न करतो.

ब) कामावर उशीरा का आलो याचे खरे कारण लपविण्यासाठी आगोदरच कारण निश्चित करून ते आपल्या वर्तनातून स्पष्ट करण्याचा प्रयत्न करणे.

क) एखाद्या घटनेबाबत अधिक परिश्रम घेण्याची आवश्यकता असली तरी, व्यक्ती इतरांपुढे आपण ते सहज करू शकतो असा अविर्भाव आणते.

एखाद्या आंतरक्रियेशी संबंधित कांही नकारात्मक इतरांना न आवडणाऱ्या गोष्टी लपविण्याचा प्रयत्न करते (उदा. शारीरिक अस्वच्छता, बेकायदेशीर कृत्य इ.)

ई) व्यक्ती स्वतःच्या चूकांवर झाकण घालण्यासाठी बाहेर समाजात तशा स्वरूपाच्या चूका किती मोठ्या प्रमाणात होतात यासंबंधी अधिक बोलते.

फ) व्यक्ती तिचा होणारा अवमान, त्रास आणि इतर स्वरूपाचा अन्याय जाणीवपूर्वक टाळत असते. कारण ती ज्या प्रकारची भूमिका पार पाडते ती तशीच पुढे चालू रहावी या उद्देशातून ती जाणीवपूर्वक अशा गोष्टी लपवत असते.

गॉफमनच्या मते, नाटकी तंत्रामध्ये, ज्यावेळी व्यक्ती आंतरक्रियेत समाविष्ट असते. त्यावेळी आपण त्यामध्ये काही व्यक्ती आपल्या वर्तनातून आपण आंतरक्रियेत किती निष्ठापुर्वक समाविष्ट आहोत हे दाखविण्याचा प्रयत्न करतात. कारण तशा स्वरूपाचा प्रयत्न केला नाही तर समोरच्या व्यक्तीवर आपला प्रभाव रहाणार नाही याची तिला कल्पना असते. गॉफमन एक Symbolic Interactionist (संकेतिक आंतरक्रियावादी) गॉफमन यांनी सांकेतिक आंतरक्रियावादी दृष्टीकोनातून व्यक्ती-व्यक्तींच्या मधील आंतरक्रियांचे स्पष्टीकरण करताना, आंतरक्रियेत समाविष्ट असणारे Actors वेगवेगळ्या प्रसंगानुरूप वर्तनाचे स्वरूप निश्चित करत असताना कशा प्रकारच्या युक्त्या करीत असतात या बाबतचे विश्लेषण केवळ एका व्यक्तीच्या दृष्टीकोनातून न करता आंतरक्रियेत समाविष्ट असणाऱ्या सर्व व्यक्तींच्या दृष्टीकोनातून स्पष्ट केले आहे.

**वर्तनाच्या माध्यमातून इतरांवर वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या व्यक्तींच्या कला** (Impression Management)

गॉफमन यांनी, व्यक्ती-व्यक्तींच्या मधील आंतरक्रियेचे स्वरूप जाणून घेत असताना आंतरक्रियेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्ती, इतरांवर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने कांही युक्त्या वापरतात. त्यामध्ये समूहातील व्यक्तींच्या बद्दलची आत्मीयता, वस्तुस्थितीचे भान ठेवून काही गोष्टी टाळण्याचा प्रयत्न करणे, आपल्यावर नियंत्रण ठेवणे. त्याचप्रमाणे चेहऱ्यावरील हावभाव इ. सारख्या कृतीबरोबरच इतरांच्या कृती बाबत शाब्दिक प्रतिक्रिया देताना सावधगिरी बाळगणे इ. या खेरीज आंतरक्रिया करण्या अगोदर त्या बाबत विचार करून ठेवणे, येणाऱ्या सामान्य अडचणींचा आगोदर विचार करणे. आंतरक्रियेसाठी योग्य व्यक्तींची निवड करणे, अशा व्यक्तींच्या समवेत सहभागी होणे की ज्या ठिकाणी कमी अडथळा येईल. या व यासारख्या किती तरी अनेक वर्तन प्रकारांचा व्यक्ती उपयोग करीत असतात.

२.२.२.१ **जोड्या जुळवा**

| | अ गट | ब गट |
|---|---|---|
| १) | Presentation of Self in everyday life | १) मीडच्या विचारांशी सुसंगत |
| २) | Self (स्वःत्व) | २) आंतरक्रियावादाचा प्रभाव |
| ३) | Impression Management | ३) गॉफमनाचा ग्रंथ |
| ४) | गॉफमन | ४) नाटकी तंत्रातील संकल्पना |

उत्तरे : १) ३, २) १, ३) ४, ४) २

**२.२.३ एडमंड हसरेल यांचे घटनाशास्त्र व आल्फ्रेड शूटज यांचा घटनाशास्त्र :**

एडमंड हसरेल हा घटनाशास्त्राचा जनक म्हणून ओळखला जातो. म्हणून सर्वप्रथम, एडमंड हसरेल यांच्या घटनाशास्त्र विचाार संदर्भात मांडणी करणार आहोत.

**एडमंड हसरेल यांचा घटनाशास्त्र दृष्टीकोन**

एडमंड हसरेल यांचा जन्म ८ एप्रिल, १८५९ रोजी जर्मनी मध्ये 'ज्यू' कुटुंबात झाला. त्यानी सर्वप्रथम घटनाशास्त्र सिद्धांत विकसित केला. त्यांच्या मते, १९ व्या शतकाच्या सुरुवातीला सुरू झालेली एक महत्त्वपूर्ण अभ्यास पद्धती असून वैज्ञानिक पातळीवर तात्त्वीक विचारांची मांडणी करत असताना, या पद्धतीच्या आधारे शास्त्रीय अभ्यासासाठी वापरल्या जात असलेल्या पद्धतीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी उपयुक्त असणारी पद्धती आहे. एडमंड हसरेल यांचा घटनाशास्त्र दृष्टीकोन हा घटनेमागील सत्य जाणून घेत असताना त्या घटनेसंदर्भात असणाऱ्या व्यक्तींच्या मनोभूमिका अथवा मानसिक स्थिती पडताळणे' याच्याशी संबंधित आहे. वस्तुनिष्ठ दृष्टीकोनाऐवजी त्यांनी 'सापेक्ष दृष्टीकोन' (Subjective) अधिक सोयीचा समजून घटनेमागील सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न केला. एडमंड हसरेल यांनी घटनाशास्त्रासंबंधीचे विचार आणि संकल्पनाची मांडणी सर्वप्रथम केली. घटनाशास्त्र सिद्धांतकारांच्या मते, आपल्या सभोवतालच्या सामाजिक विश्वाची रचना ही त्या विश्वात असणाऱ्या व्यक्तींना दररोजच्या जीवनात येणाऱ्या अनुभवांच्या अभ्यासाद्वारे जाणून घेता येते. हसरेल यांच्या घटनाशास्त्र सिद्धांताचा प्रभाव जर्मनीमधल्या ज्या विचारवंताच्या मध्ये आढळतो त्यामध्ये आल्फ्रेड शूटज आणि मॅक्स वेबर यांचा समावेश होतो. मॅक्स वेबर यांची (Verstenen) किंवा सापेक्षवादी विचाराची संकल्पना (Subjectivity) घटनाशास्त्र सिद्धांताच्या प्रभावामुळे निर्माण झाली आहे.

Husserl described Phenomenology as a 'doctrine of essences' हसरेल यांच्या मते घटनाशास्त्र म्हणजे एखाद्या घटनेसंदर्भात सारांशात्मक विचार मांडण्याची पद्धती त्याचप्रमाणे घटनाशास्त्र विचारसरणी 'घटनांचे स्वरूप कसे आहे' आणि 'घटना आहेत अथवा नाहीत याच्याशी संबंधित नसते.' हसरेल यांच्या घटनाशास्त्र सिद्धांताचा संबंध हा वास्तव स्वरूपात असणाऱ्या भौतिक विश्वाशी नसून तो व्यक्तींच्या जाणीवेशी आहे. त्यामुळे एखाद्या घटनेचा अर्थ जाणून घेताना संशोधकाला घटनेचा अभ्यास करण्याऐवजी, घटनेशी संबंधित व्यक्तींचा घटनेकडे पहाण्याचा दृष्टीकोन अभ्यासणे आवश्यक आहे. 'Conciousness' was the absolute being with which Philosophy is concerned म्हणजे संपूर्ण अर्थाने हसरेल यांचे

विचार घटनेशी संबंधित असणाऱ्या व्यक्तींच्या वैचारिक अथवा मानसिकतेशी संबंधित आहे. Phenomalogy is not a science of fact, but science of essential being, an edietic science. It is a science that aims at establishing the 'knowledge of essences' घटनाशास्त्र हे तथ्यांवर आधारीत शास्त्र नसून प्रत्यक्ष अनुभवाधिष्टीत शास्त्र असून त्याचा मुख्य उद्देश घटनेमागे असणाऱ्या व्यक्तींच्या कल्पनांचा शोध घेणे शूटज यांनी तथ्ये (facts) आणि व्यक्तींच्या अनुभवाला येणाऱ्या घटना यांचा परस्पर संबंध विचारात घेतल्यास, तथ्यांचे स्वरूप व्यक्तींना येणाऱ्या अनुभवावरून निश्चित होत असते. परंतु 'essence' किंवा घटनेला प्राप्त होणारा अर्थ हा व्यक्ती कशा प्रकारे देतात हे पूर्णता व्यक्तीला येणाऱ्या अनुभवावर निर्भर असते. त्यामुळे घटनेमागे असणाऱ्या व्यक्ती आणि त्यांच्या अनुभवातून घटनेला प्राप्त होणारा अर्थ हा जाणून घेणे घटनाशास्त्रामध्ये महत्त्वाचे आहे.

**मानवी विचार प्रक्रिया आणि वैज्ञानिक पद्धती**

शास्त्रामध्ये ज्या वेळी एखाद्या घटनेचा वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून अभ्यास करताना तथ्यांचे संकलन करून अनुभवाच्या पातळीवर तथ्यांची सिद्धता स्पष्ट करावी लागते किंबहुना सिद्धांताची मांडणी शास्त्रामध्ये, अनुभवाच्या आधारे तथ्यांची पडताळणी करूनच केलेली असते.

परंतु घटनाशास्त्रामध्ये वस्तुनिष्ठतेचा शोध हा व्यक्तीच्या अनुभवावर आधारीत असतो. किंवा तो पडताळून पाहिला जातो. उदा. ध्वनी अथवा 'आवाज' झाल्यानंतर व्यक्तीची प्रतिक्रिया कशी असते हे आपण प्रत्यक्ष अनुभवाद्वारे जाणून घेऊ शकतो.

हसरेल यांच्या मते ज्यावेळी पासून तात्त्विक विचारांची मांडणी करण्याची प्रक्रिया सुरू झाली त्यावेळी पासून केवळ सैद्धांतिक स्वरूपात विचार मांडत असताना, शास्त्रीय मांडणी कशी वस्तुनिष्ठ पद्धती आहे याचाच पाठपुरावा केला गेला. परंतु खऱ्या अर्थाने, तात्त्विक विचार मांडणे किंवा सैदांतिक मांडणी करणे ही पूर्णता शास्त्रीय प्रक्रिया नाही. किंबहुना जी नैसर्गिकशास्त्रे पूर्ण शास्त्रीय समजली जातात ती सुद्धा संपूर्ण अर्थाने शास्त्रीय असू शकत नाहीत. कारण त्यामध्ये सुद्धा काही प्रमाणात उणीवा असतात.

हसरेल यांच्या मते, मानवी विचाार प्रक्रिया ही एक नैसर्गिक प्रक्रिया असून आपण दैनंदिन व्यवहारामध्ये आणि शास्त्रीय अभ्यास पद्धतीमध्ये उपयोगात आणीत असतो. परंतु ज्यावेळी आपण एखाद्या घटनेच्या अभ्यासासंदर्भात जी एक वैचारिक बाजू घेतो. त्यावेळी आपल्या विचारपद्धतीचा कल कशा स्वरूपाचा आहे हे जाणून घेणे सुद्धा वैज्ञानिक पद्धती इतके महत्त्वाचे आहे. अशा प्रकारे हसरेल यांनी शास्त्रीय पद्धतीवर टीका केली आहे. Husserl viewed Phenomonology as a type of science but above all as a method and attitude of mind. हसरेलच्या मते घटनाशास्त्र ही एक पद्धती असून ती एक मनोवृत्ती आहे. व ही सुद्धा एक शास्त्रीय पद्धतच आहे. घटनाशास्त्रामध्ये संशोधनाचा केंद्रबिंदू हा डोळ्याला स्पष्ट न दिसणाऱ्या अशा मानवी कल्पना जाणून घेणे हा संशोधकाचा हेतू असतो.

**घटनेकडे पहाण्याचा दृष्टीकोन** (Perception)

वस्तुनिष्ठता हा विज्ञानाचा जरी प्रमुख गुणधर्म असला तरी, आपण एखाद्या घटनेचा कितीही शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करीत असलो तरी, आपला त्या घटनेकडे पहाण्याचा विशिष्ट दृष्टीकोन असतो. कांही वेळा आपण, मागील काळातील घटनांचा संदर्भ घेवून घटनेचा अर्थ लावू शकतो. वर्तमान घटनेचा अर्थ

भूतकाळात आलेल्या अनुभवावर लावला जाऊ शकतो. त्यामुळे हसरेल यांच्या मते, मानवी वर्तन नेमक्या कोणत्या कारणामुळे प्रभावित झाले आहे याचा नेमका वेध घेणे अभ्यासकाला शक्य नसते. कारण एखाद्या घटनेसंदर्भात व्यक्तींच्या भूतकाळातील कल्पना काळाच्या ओघात नष्ट झालेल्या नसतात. तर त्या त्याच्या स्मृतीमध्ये राहून गेलेल्या असतात. त्यामुळे वर्तमान घटनेच्या निमित्ताने त्या परत जागृत होतात. आणि त्यामुळे वर्तमान घटनेचा अर्थ सुद्धा त्या स्मृतींच्या आधारे लावला जाऊ शकतो. म्हणून घटनेकडे पहाण्याचा व्यक्तीचा दृष्टीकोन हा व्यक्तीच्या वर्तनाशी निगडीत असतो.

अशाप्रकारे एडमंड हसरेल यांनी त्यांच्या घटनाशास्त्राशी संबंधित विचारांची मांडणी करत असताना प्रामुख्याने घटनाशास्त्राचा संबंध हा प्रत्यक्ष घटनेशी नसून घटनेशी संबंधित असणाऱ्या व्यक्तींच्या कल्पनेशी आहे.

'Phenomenology of social world' या ग्रंथामध्ये शूटज यांनी घटनाशास्त्र एक सामाज शास्त्रीय दृष्टीकोन म्हणून अभ्यासला आहे. मॅक्स वेबर यांचा सामाजिक शास्त्राच्या अभ्यासा बद्दलचा जो दृष्टीकोन होता त्या संबंधी शूटज यांना वेबरच्या अभ्यासाबद्दल विशेष आर्कषण होते. त्याचबरोबर १९६७ साली त्यांनी थॉमस लुकमन यांच्या समवेत 'The structure of the Life-world' हा ग्रंथ लिहला.

**⁂ समाजजीवना संबंधीचा घटनाशास्त्र दृष्टीकोन :**

शूटज यांनी अनेक वर्षे चिंतन करुन 'Phenomenology of social world' हा ग्रंथ लिहला. परंतू हा ग्रंथ लिहत असताना, त्यांचा मुख्यते संबंध हा मंक्स वेबर यांच्या मानवी वर्तना बाबतच्या सापेक्षवादी दृष्टीकोनाशी होता. (Subjective approach to the study of human behaviour.)

त्यांच्या मते, केवळ तात्त्विक विचाराचा आधार घेवून, ज्या सामाजिक शास्त्रांच्या मध्ये सैंधातिक मांडणी करण्यात आली आहे. अशा सामाजिक शास्त्रांमध्ये संशोधन करताना समस्या निर्माण होत असतात. प्रामुख्याने समाजशास्त्र हे एक त्यापैकी सामाजिकशास्त्र आहे. त्यामुळे एडमंड हसरेल यांचा घटनाशास्त्र हाच एक वैज्ञानिक दृष्टीकोन, समाजजीवनाचा अर्थ जाणून घेण्यासाठी उपयुक्त आहे. शूटज यांच्या मते, आपल्या सभोवताली असणारे सामाजिक जीवन आणि त्यामध्ये घडून येणाऱ्या रोजच्या दैनंदिन घटना आहे त्या अवस्थेत निरिक्षण म्हणून समाजशास्त्रीय निरक्षण केले पाहिजे. परंतू त्याचप्रमाणे याही गोष्टीचा आपण स्वीकार केला पाहिजे की, सामाजिक जीवनात जसे आपले अस्तीत्व आहे तसे इतरांचे सुद्धा आहे आणि ज्यावेळी एकव्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचे निरक्षण करते त्यावेळी ती व्यक्ती आपले वर्तन इतरांच्या निरक्षणाने प्रभावीत होत असल्याने आपले वर्तन निश्चीत करते.

शूटज यांच्या मते, प्रत्येक व्यक्तीजवळ जाणीव असली तरी, एका व्यक्तीच्या कृतीचा परिणाम हा दुसऱ्या व्यक्तीच्या कृतीवर होत असतो. याचा अर्थ सर्व व्यक्तींच्या जवळ जाणीव असल्याने, त्यांचे अनुभव एकसारखे असू शकणार नाहीत. उदा : एखादा मनोरंजनाचा कार्यक्रम पहाण्यासाठी गेलेल्या दोन मित्रांना सारख्याच स्वरूपात कार्यक्रम आवडतो असे नाही. म्हणून सर्व व्यक्तींच्या जवळ जाणीव (Conciousness) असली तरी त्याचा वापर मात्र एक सारखा होत नसतो.

शूटज यांनी आपल्या सभोवताली असणाऱ्या समाजजीवनाचे विश्लेषण करताना म्हटले आहे की, जर व्यक्ती आणि समाज अशा दोन घटकांचा आपण स्वीकार केला तर आपोआपच 'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती'

या नियमानुसार प्रत्येक व्यक्तीच्या दृष्टीकोनातून समाज संबंधीच्या कल्पना वेगवेगळ्या असतात. प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या सामाजिक अनुभवांचे निरक्षण करीत असते यालाच सापेक्षवादी दृष्टीकोन म्हणतात (Subjectivity). शूटज यांच्या मते व्यक्तीनुरुप समाजजीवना बाबतच्या कल्पना कशा प्रकारे भिन्न-भिन्न स्वरूपाच्या असतात ? तसेच आपण कोणत्या आधारावरती प्रत्यक्ष सामाजिकजीवन आणि व्यक्ती दृष्टीकोनातून असणारे सामाजिक जीवन असा भेद करत असतो ? व्यक्ती-व्यक्तींच्यामध्ये असणाऱ्या दृष्टीकोनातील भिन्नतेचा आधार घेवून आपण कशा प्रकारे व्यक्ती वर्तनाचा अभ्यास करु शकतो ? या सर्व प्रश्नांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न 'शुटज' यांनी घटनाशास्त्रात केला आहे.

शूटज यांच्या मते, आपल्या दैनंदीन व्यवहारामध्ये ज्यावेळी प्रत्येक एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या वर्तनाचा अभ्यास करीत असली तरी, ज्यावेळी संशोधक म्हणून व्यक्ती वर्तनाचा अभ्यास करणारा संशोधक आणि सर्वसामान्य व्यक्ती कडून होणारा व्यक्ती वर्तनाचा अभ्यास करणारा संशोधक या मध्ये फरक असतो. तसेच आपल्या सभोवताली असणाऱ्या वेगवेगळ्या व्यक्तींचे अनुभव, स्वभाव, त्यांच्या वर्तनाचे स्वरूप या संबंधी आपला जवळून अभ्यास असला तरी, ज्यावेळी आपण इतरांच्या वर्तना संबंधी अभ्यासाद्वारे निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न करतो. त्यावेळी ते बिनचूक असतीलच असे म्हणता येत नाही. कारण ज्या वेळी एखादी व्यक्ती आपले विचार, भावना अथवा मत प्रकट करत असते त्यावेळी तिचा नेमका उद्देश कशा प्रकारचा आहे हे आपण जाणून घेवू शकत नाही. उदा : एखाद्या पुस्तकामध्ये लेखकांने मांडलेले विचार वाचल्यानंतर वाचकांना संभ्रम निर्माण होतो की, नेमके काय लेखकाला म्हणावयाचे आहे ? कारण लेखक आणि वाचक यांच्यामध्ये वर्तन भिन्नता असते. तसेच निरक्षणाद्वारे ज्या मानवी आंतरक्रिया पहातो त्यासुद्धा काही वेळा फसव्या असू शकतात. उदा : दोन संशयित तरुण परस्परांशी खाजगीत बोलत आहेत म्हणून ते दहशतवादीच आहेत असे आपण निश्चितपणे सांगू शकत नाही.

त्यामुळे व्यक्ती-व्यक्तींच्या मधील आंतरक्रियांना अनेक बाजू असतात. त्यामध्ये आतील बाजू (Covert action) आणि उघड बाजू (overt action) असते. तसेच मानवीकृती काही वेळा हेतू पूर्वक असतात. उदा : एखाद्या व्यक्तीला मदत करावयाची की नाही यावरुन आपली कृती निश्चित होते. मॅक्स वेबर यांनी सामाजिक संबंधाचे स्वरूप स्पष्ट करताना म्हटले आहे की, आंतरक्रियेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्ती, परस्परांच्या वर्तनामुळे प्रभावित होत असतात. कारण त्यांना परस्परांच्या हेतूची कल्पना असते. त्यामुळे एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या हेतू विचारात घेवून सामाजिक संबंधाचे स्वरूप निश्चित करते. उदा : वारंवार उधार पैसे मागणाऱ्या मित्राशी होणारी आपली आंतरक्रिया किंवा एखाद्या मित्रांशी असणारी जवळिकता आणि एखाद्या मित्रापासून ठेवले जाणारे अंतर या सर्व आंतरक्रिया मधून मानवी वर्तनाचे स्वरूप स्पष्ट होते.

व्यक्ती-व्यक्तींच्या मधील सामाजिक संबंधाचे स्वरूप जर जवळिकतेचे आणि समोरा-समोरचे (Face-to-face) असेल तर, अशा सामाजिक संबंधामध्ये प्रेम, आपुलकीची भावना कशाप्रकारे निर्माण होते या संबंधीचा अभ्यास करताना मानवी आंतरक्रियांचा अभ्यास कसा वेगळ्या स्वरूपाचा असतो या संबंधी शूटज यांनी विश्लेषण केले आहे.

**घटनाशास्त्र अभ्यास पद्धतीचे स्वरूप (Methods of study) :**

सामाजिक शास्त्राचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांनी संशोधन कार्याच्या वेळी कशा स्वरूपाची भूमिका

घेणे गरजेचे आहे या संबंधी शूटज यांनी काही मार्गदर्शक तत्त्वे स्पष्ट केली आहेत. त्यांच्या मते, संशोधकाने आपण स्वत: संशोधक आहोत याचा विसर पडून घेतला पाहिजे. तसेच समाजजीवनाशी संबंधित घटनांचे अवलोकन करताना स्व:ताच्या मानसिक प्रवृत्ती अथवा दृष्टीकोन निश्चित करुन घटनांचे अवलोकन करु नये. त्यासाठी त्याने खालील मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब करावा.

१. संशोधकाने सर्व प्रथम आपल्या स्वत:च्या कृती अशाप्रकारे निश्चित कराव्यात की ज्यामुळे संशोधनाचा उद्देश पूर्ण होईल. त्यांनतर संशोधन कार्याशी संबंधित व्यक्तींच्या कृतींचा अभ्यास करुन त्यांच्या भूमिकेतून संशोधकाने अभ्यास करावा. ज्यावेळी इतरांच्या वर्तनाचे अनुकरण करुन संशोधकाला गृहीतकाची प्रचिती येत असेल तर, व्यक्ती वर्तनाचा अंदाज घेता येतो.

२. संशोधकाने संशोधनाशी संबंधित आढळून येणाऱ्या व्यक्ती वर्तना मधील समानतेचे तत्त्व विचारात घेवून निष्कर्षा पर्यंत जाऊ नये.

३. संशोधनाशी संबंधित असणाऱ्या व्यक्तींच्या अभ्यासामधून आवश्यक ती माहिती उपलब्ध होत नसेल तर, व्यक्ती वर्तनामध्ये आढळून येणाऱ्या भिन्नतेचा विचार करुन त्या तपासून पहाव्यात.

*** संशोधकाचे व्यक्तीगत कौशल्य :**

संशोधन कार्यासाठी संशोधन पद्धती आणि प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाखेरीज स्वत:कडे असणाऱ्या व्यक्तीगत कौशल्याचा आधार घेवून सामाजिक घटनांचा अर्थ जाणून घेण्याचा प्रयत्न करावा कारण दैनंदिन व्यवहारात प्रत्येक व्यक्ती अशा स्वरूपाच्या कौशल्याचा उपयोग परस्परांच्या आंतरक्रिया घडून येत असताना करीत असतात. तसेच एखाद्या घटनेसंदर्भात व्यक्तींच्या कल्पना परंपरेने निश्चित झालेल्या असल्या कारणांने त्याचा उपयोग व्यक्ती आपल्या वर्तनातून मागील अनुभवाच्या आधारे आहे तशाच पुढे करत असतात. अर्थात प्रत्येक व्यक्तीजवळ उपलब्ध असणारी माहिती ही त्याच्या अनुभव आणि शिक्षणावर अवलंबून असते. सामाजिक जीवनातील वेगवेगळ्या क्षेत्रात असणाऱ्या व्यक्तींचे अनुभव त्या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींच्या इतके अंगवळणी पडलेले असतात की, त्यामुळे त्या विशिष्ट अनुभवातून जात असताना त्यांच्या वक्तव्यामधून तशाच प्रकारच्या तथ्यांची मांडणी होत असते. अशा प्रकारे प्रत्येक व्यक्तीजवळ असणारे ज्ञान आणि अनुभव हे एका विशिष्ट मर्यादेपर्यंत सिमीत असतात. त्यालाच व्यक्तीगत कौशल्य असे म्हटले आहे. परंतू ज्ञान मिळवण्याची प्रक्रिया ही अखंडपणे चालत असल्याने व्यक्तीच्या वाढत्या अनुभवातुन तिच्या सभोवतालच्या विश्वाबद्दलच्या संकल्पनामध्ये फरक पडत जातो.

*** सर्वसामान्य वर्तनप्रवृत्ती :**

समाज जीवनाशी संबंधित असणाऱ्या व्यक्तींचा अनुभव आणि ती ज्या क्षेत्राशी संबंधित असते त्या ठिकाणच्या दैनंदिन सवयींचा भाग म्हणून प्रत्येक व्यक्तींच्या वर्तनामध्ये सर्वसामान्य वर्तन प्रकारचे गुणधर्म दिसून येतात. त्यामुळे अशा व्यक्ती- वर्तनाबाबत संशोधकाचे पूर्वग्रह निश्चित होतात. परंतू अशा प्रकारची समजूत धोक्याची ठरते. कारण नेहमी एक सारख्या वर्तन करणाऱ्या व्यक्ती वर्तनामध्ये सुद्धा कोणत्यावेळी, कधी, केव्हा आणि कुठे कसे वर्तन करतील याचा अंदाज घेता येत नसल्याने संशोधकाचे पूर्वग्रह चूकीचे ठरतात. तसेच व्यक्ती-व्यक्तीच्या आंतरक्रियांमध्ये देखील अशा स्वरूपाचा धोका निर्माण होऊ शकतो.

त्यामुळे शूटज यांच्या मते, विज्ञानाशी संबंधित सामान्यीकरण, निष्कर्ष करुन विचारात घेवून जरी आपण

'सत्या' पर्यंत जाण्याचा प्रयत्न करीत असलो तरी, आपण वास्तवते पासून दूर असतो. कारण व्यक्ती वर्तनाची गुंतागुंत आपण अभ्यासली नसल्यामुळे आपण एखाद्या घटनेच्या संदर्भात असणारे सत्य आणि थोड्या प्रमाणात जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला असतो. त्यामुळे आपल्या सभोवतालच्या सामाजिक जीवनाशी संबंधित परंपरेने चालत आलेल्या मानवी प्रवृत्ती, त्याचे वर्तन आणि त्यांच्या बद्दलच्या कल्पना अनुभव यांच्या पुढे आपण एखाद्या विशिष्ट व्यक्ती संदर्भात काही समज करुन घेतलेले असल्या कारणाने आपण त्या व्यक्तीवर्तना संबंधीचे जे खरे रूप आहे त्यापासून दूर गेलेलो असतो अशा वेळी अचानक अनपेक्षित वर्तनातून आपल्या समजूतीला तडा जातो.

**※ सापेक्षवादी विचारांची रचना : (The structure of life world)**

'The structure of life world' या संकल्पनेमध्ये शूटज यांच्या घटनाशास्त्र सिद्धांताद्वारे, समाज रचनेचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न करत आहे. 'life-world' ही संकल्पना घटनाशास्त्र सिद्धांताचे प्रमुख अंग आहे, की ज्यामध्ये आपल्या रोजच्या व्यावहारिक जीवनाचा 'व्यक्ती' हा प्रमुख घटक असतो आणि अशा व्यक्ती वर्तनाद्वारे व्यक्ती आपले सामाजातील स्थान तिच्या वर्तनातून वारंवार बदलत असतात. व्यक्तींचे दैनंदिन व्यवहार अथवा जीवन हीच एक सत्य घटना असते. त्यामुळे 'life-world' हे सुद्धा या दैनंदिन जीवनामध्येच आढळून येते. त्यामुळे व्यक्ती जीवनाशी संबंधीत दैनंदिन घटनांच्या अभ्यासातून आपण वास्तव परिस्थितीचा वेध घेवू शकतो. व्यक्ती-व्यक्तींच्यामध्ये दैनंदिन जीवनात ज्या प्रकारच्या आंतरक्रिया घडतात त्यावेळी व्यक्तीकडून होणारे वर्तन जाणून घेणे म्हणजेच प्रत्येक व्यक्तीचा दुसऱ्या व्यक्तीच्या बद्दलच्या असणारा दृष्टीकोन जाणून घेणे म्हणजेच सापेक्षवादी विचारांची रचना अभ्यासणे होय.

**२.२.३.२ स्वयं-अध्ययनासाठीचे प्रश्न**

जोड्या जुळवा

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. एडमंड हसटेल | अ) The phenomenoligy of social-world |
| २. आल्फ्रेड शूटज | ब) सापेक्षवादी विचार |
| ३. घटनाशास्त्र सिद्धांताचा घटक | क) घटनाशास्त्राचा जनक |
| ४. वस्तुनिष्ठ अभ्यासा विरुद्ध | ड) आल्फ्रेड शूटज |
| ५. मॅक्स वेबरचा प्रभाव | ड) व्यक्तीला असणारी जाणीव |

**पीटर बर्जर आणि लुकमन यांचे सामाजिक वास्तवतेच्या रचनात्मक मांडणी बद्दलचे विचार: (The social Construction of Reality)**

१९६६ मध्ये समाजशास्त्रामध्ये पीटर बर्जर यांनी थॉमस लूकमन यांच्या समवेत सह-लेखक म्हणून जो ग्रंथ लिहला त्याचे नांव 'The social constraction of Reality' असे होते. पीटर बर्जर यांनी धर्माचा अभ्यास करताना समाजामध्ये धर्माचे स्थान किती महत्त्वाचे असते या बद्दल विचार मांडले. त्याचप्रमाणे धर्माशी संबंधित असणाऱ्या अलौकिक शक्ती (supernatural) सारख्या कल्पनांचा व्यक्ती वर्तनाशी असणाऱ्या

संबंधामुळे दैनंदिन जीवनात त्याचा कसा प्रभाव पडतो यासंबंधी त्यांनी विचार मांडले.

**✲ The social constraction of Reality**

समाजशास्त्रातील एक महत्त्वपूर्ण सिद्धांत म्हणून पीटर बर्जर आणि लूकमन यांनी या विचाराची मांडणी केली. त्यांच्या मते, एखाद्या घटनेमागील 'सत्य' (Reality) सामाजिकते मधून निर्माण होत असल्याने समाजशास्त्रीय अभ्यासमध्ये सामाजिकतेची प्रक्रिया कशा पद्धतीने होत असते हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. Reality अथवा 'सत्य' ही एक संकल्पना असून 'Knowledge' अथवा ज्ञान संपादनाची प्रक्रिया फार काळापासून तात्त्विक विचार प्रक्रियेच्या मांडणीतून होत आलेली आहे. एखाद्या घटनेमागील 'सत्य' जाणून घेणे हा समाजशास्त्रीय ज्ञानाचा मुख्य उद्देश असत नाही. कारण समाजशास्त्र ही एक ज्ञान संपादन करणारी विद्या शाखा असल्याने ज्यावेळी समाजाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करते त्यावेळी आपण 'समाज' शास्त्र हे आपल्या अभ्यासपद्धतीद्वारे घटने मागील 'सत्य' (Reality) अभ्यासते असे म्हणत असतो.

परंतु खऱ्या अर्थाने घटनेमागील सत्य (Reality) हे त्या समाजातील संस्कृती घटकामुळे प्रभावित होत असते. उदा : एखाद्या घटने बाबत भारतीय व्यक्तींच्या असणाऱ्या संकल्पना अथवा विचार हे युरोपियन संस्कृतीच्या व्यक्तीच्या असू शकणार नाहीत किंवा द्रारिद्र्य व्यक्तीच्या एखाद्या घटने बद्दलच्या संकल्पना या अतिश्रीमंत संस्कृती मधल्या व्यक्तीच्या असणार नाहीत. अशा प्रकारे, पीटर बर्जर आणि लुकमन यांनी मत स्पष्ट केले आहे.

समाजशास्त्राशी संबंधित असणारे ज्ञान हे प्रामुख्याने समाजातील व्यक्ती-व्यक्तीच्या आंतरक्रिया मधून अथवा विशिष्ट सामाजिक प्रसंगा मधून विकसित झालेले असते, त्यामुळे समाजशास्त्रीय अभ्यासाद्वारे एखाद्या घटनेमागील 'सत्य' (Reality) सामाजिकतेमधून कशा प्रकारे जोडले जाते. हा संबंधीचा अभ्यास हाच खऱ्या अर्थाने समाजशास्त्राचा अभ्यास असतो. Socialogy of Knowledge is concerned with the analysis of the social construction of reality.

'Sociology of knowledge,' ही संकल्पना सर्वप्रथम जर्मन तत्त्ववेत्ता 'मॅक्स सेंचलर' यांनी मांडली. त्यानंतर कार्ल मार्क्स यांनी व्यक्तींच्या कल्पना विचार अथवा जाणीव सामाजिकतेमधून प्रभावित होतात असा विचार मांडला. त्यानंतर मार्क्स यांनी 'Ideology' किंवा 'विचार सरणी' ही संकल्पना मांडताना 'false - conciousness' किंवा अवास्तव विचार/म्हणजे वास्तवते पासून अलग असणारे विचार अशा स्वरूपाचे मत स्पष्ट केले. त्यानंतर डरखियम, वेबर, पॅटोटो पारसन या विचारवंतांनी देखील समाजशास्त्रीय ज्ञानामध्ये भर घातली.

पीटर बर्जर आणि लुकमन यांच्या मते, मानवी दैनंदिन जीवनाशी संबंधित घडून येणाऱ्या विविध घटनांच्या मागील 'सत्य' (Reality) हे समाजजीवनासंबंधी मांडल्या गेलेल्या ज्ञानातून अस्तीत्वात येत असते. वास्तविक अर्थाने घटनेमागील 'सत्य' (Reality) हे समाज-जीवनात व्यक्तीला येणाऱ्या तिच्या दैनंदिन अनुभवातून प्राप्त होत असते आणि समाजशास्त्राचे अभ्यासक म्हणून आपण हे 'सत्य' आपण वस्तुनिष्ठ अभ्यास म्हणून त्याला अभ्यासाचा घटक मानतो. अनुभवजन्य शास्त्राचा एक घटक म्हणून आपण घटनेच्या अभ्यासासाठी तत्थे संकलित करुन 'सत्य' जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. परंतू खऱ्या अर्थाने घटने मागील 'सत्य' हे घटनेशी संबंधित असणाऱ्या व्यक्तींच्या अर्थपूर्ण वर्तनामधून निर्माण झाले असल्या कारणाने व्यक्ती

वर्तनाच्या अभ्यासाकडे मात्र तात्त्विक विचारामध्ये दुर्लक्ष झालेले असते.

सामाजिक वास्तव अथवा सत्य आणि त्याची निर्मिती प्रामुख्याने अनेक घटकांवर आधारीत असते. सर्वप्रथम व्यक्ती आणि समाज या दोन घटकांपैकी व्यक्तींच्या विविध प्रवृत्ती आणि कृतींचा परिणाम म्हणून सामाजिक जीवनाची निर्मिती झालेली असते. समाजव्यवस्था अथवा समाज रचना यांचे व्यक्तींच्या कृतीमुळेच सातत्य टिकून रहाते. त्यामुळे 'सामाजिक सत्य' आणि त्याची निर्मिती ही व्यक्तींच्या भूतकाळातील वर्तन आणि वर्तमान जीवनातील कृतीवर आधारीत असते. परंतु दुसऱ्या बाजूला वास्तव स्वरूपात असणाऱ्या समाजजीवनातील सामाजिक परिस्थिती व्यक्ती वर्तनावर परिणाम करणारी असते. त्यामुळे व्यक्ती सभोवतालच्या समाजजीवनामध्ये नियोजित अशा समाजीक घटनांच्यामध्ये समाज व्यवस्था 'व्यक्ती' घटकाला दुय्यम स्थान देत असते. त्यामुळे व्यक्तीची मानसिकता अशा प्रकारे निश्चित होते की, आपल्या सभोवतालचे सामाजिक जीवन अशाच स्वरूपाचे आहे की, जिचा तिला रोजच्या दैनंदिन जीवनात अनुभव येतो. त्याचप्रमाणे व्यक्ती सभोवतालच्या सामाजिक जीवनामध्ये भाषा, स्थलांतर आणि वेगवेगळ्या सामाजिक परिवर्तनामुळे दैनंदिन सामाजिक जीवनामध्ये बदल घडून येतात व अशा बदलांमुळेच 'सामाजिक सत्य' (Reality) ची निर्मिती होत असते. त्यानंतर समाज अथवा समुदाय हा आपल्या सदस्यांना सामाजिक मूल्ये नियमने यांच्याद्वारे सामाजिकरण करुन समुदायाला अथवा समाजाला अपेक्षित असणारे वर्तन करवून घेण्याचा प्रयत्न करीत असतो.

### ※ विवाह संस्था आणि 'सामाजिक सत्याची' (Reality) निर्मिती :

'Marriage and the construction of Reality' या लेखामध्ये पीटर बर्जन यांनी विवाह प्रक्रियेतून सामाजिक सत्याची कशी निर्मिती होते या संबंधी मांडणी केली आहे. विवाहासारख्या घटनेमुळे व्यक्तीजीवनामध्ये बदल घडून आल्याने, 'सामाजिक सत्य' (Reality) सुद्धा बदलत असते. प्रत्येक मानवी समाजामध्ये 'सत्य' (Reality) अनुभवण्याची आणि त्याची निश्चितीकरण करण्याची विशिष्ट पद्धती असते आणि त्याचा अनुभव आपणास त्या-त्या मानवी समाजात असणाऱ्या विवाहसंस्थे बद्दलच्या दृष्टीकोनातून अनुभवास येतो कारण 'विवाह' ही घटना कशा प्रकारे घडवून यावी या संबंधी प्रत्येक समाजामध्ये निश्चित असे काही लोकरुढी लोकनिती आणि नियम असतात उदा : जवळच्या नातेसंबंधातील वैवाहिक संबंधाबाबत असणाऱ्या रूढी प्रथा विवाहाच्या वेळी असणारे वय, वधू-वर निवडी बाबतच्या कल्पना इ. संबंधी प्रत्येक मानवी संस्कृतीमध्ये विविधता आढळते. अशा प्रकारे समाजातील विशिष्ट अशा सामाजिक नियमनांचा दैनंदिन व्यक्तीजीवनावर परिणाम होत असतो किंवा त्यामुळे व्यक्तीवर्तनावर नियंत्रण ठेवले जाते. त्याचप्रमाणे ज्या वेळी दोन व्यक्ती विवाह करण्याचा निर्णय होतात त्यावेळी त्यापैकी प्रत्येकाच्या कृतीचा अर्थ दोघांच्या भूमिकेतून विचारात घेतला जातो. व्यक्तींच्या एकूण रहानीमानामध्ये विवाहमुळे बदल घडून येतो. म्हणजेच त्याची पूर्वीची वर्तनपद्धती बदलून नविन वर्तन पद्धती सुरु होते. अशा प्रकारे 'विवाह' सारख्या सामाजिक घटनेमुळे 'सामाजिक सत्य' (Reality) कशा प्रकारे बदलते. याचा पीटर बर्जर यांनी उल्लेख केला आहे. विवाह सारख्या घटनेचा परिणाम म्हणून आपली कुटुंबातील भुमिका बदलते. अशा प्रकारे समाजातील बाह्य घटकांच्या दबावामुळे व्यक्तींच्या दैनंदिन जीवनामध्ये बदल घडून येत असतो.

**⁎ बाह्य घटकांचा व्यक्ती वर्तनावर होणारा परिणाम :**

पीटर बर्जर यांच्या मते, 'सामाजिक सत्य' (Reality) आणि त्याचे स्वरूप प्रामुख्याने समाजजीवनात घडून येणाऱ्या वेगवेगळ्या बदलांचा परिणामावरुन निश्चित होते. कारण बाह्य घटकातील बदलांचा परिणाम हा व्यक्तीच्या दैनंदिन आंतरक्रिया आणि वर्तनावर होत असतो. अर्थात बाह्य घटकांवरील बदल हे व्यक्तीच्या योगदानामुळेच घडून येत असतात. उदा. मानवाने घडवून आणलेल्या तांत्रीक बदलांचा परिणाम हा त्याच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करीत असतो. उदा. संगणक युगामुळे अथवा आधुनिकीकरणामुळे आलेल्या तांत्रिक ज्ञानाचा परिणाम व्यक्तींच्या दैनंदिन कृतीवर होत असतो. उदा. इंटरनेट फेस बुक मोबाईल चाटिंग इ. सारख्या तांत्रिक बदलांचे परिणाम व्यक्ती वर्तनावर झाल्यामुळे, अर्थातच त्यातून 'सामाजिक सत्य' (Reality) सुद्धा त्यानुसार निश्चित होऊ लागते. म्हणून आजच्या तंत्रज्ञानातील बदलांचा व्यक्तींच्या मानसिकतेवर झालेला परिणाम अभ्यासताना अशा तांत्रिक ज्ञानाबद्दल व्यक्तींच्या कल्पना कशा नविन स्वरूपात आहेत याचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

**⁎ सामाजिक नियंत्रण आणि शासन व्यवस्थेच्या अधिकारांचे वर्चस्व :**

समाज जीवनातील वास्तव (Reality) एकदा आणि कायम स्वरूपी निश्चित होत नसते, तर त्याची निर्मिती आणि पुर्ननिर्मिती काळाच्या ओघात पुन्हा-पुन्हा होत असते. सामाजिकरणाद्वारे समाजातील सदस्यांना जी सामाजिक मूल्ये शिकवली जातात अशा बाह्य घटकांचा प्रभाव सामाजिक वास्तवावरती पडत असतो. तर दुसऱ्या बाजूला समाजातील व्यक्तींनी विशिष्ट स्वरूपाचे वर्तन करावे म्हणून समाजविशिष्ट अधिकारांचा वापर करीत असते. परंतू व्यक्तीच्या इच्छा आणि विचार स्वातंत्र्य असल्या तरी, सामाजातील सामाजिक नियंत्रणाच्या माध्यमातून तिच्यावर सातत्याने देखरेख ठेवली जाते. पीटर बर्जर यांच्या मते, आपण एक प्रकारे समाजरूपी तुरुंगातील कैद्याप्रमाणे असतो. इतिहास काळापासून समाज नावाच्या तुरुंगाच्या भिंती आपल्याला तुरुंगवासात ठेवत आल्या आहेत. तसेच समाजाला बाधा होईल असे वर्तन करत असेल तर, तशा स्वरूपाच्या वर्तनावर लगेच कारवाई होते. त्यामुळे समाज ही एक बाह्य स्वरूपात आपल्या भौतिक आणि व्यक्तिगत जीवनावर नियंत्रण ठेवणारी शक्ती आहे.

समाजाला विशिष्ट अशा स्वरूपाची उद्दिष्ट साध्य करण्यासाठी म्हणून व्यक्तीकडून खालील उपायांच्याद्वारे वर्तन करवून घेतले जाते.

१. व्यक्तींनी जर कायद्याचा भंग केला तर त्यांना तुरुंगवास देण्यात येतो.

२. समाजाने किंबहुना त्या मधल्या व्यक्तींनी कशा स्वरूपाचे वर्तन ठेवावे.

३. जाहिर बदनाम करण्याची भिती दाखवल्यामुळे व्यक्ती वर्तनावर योणारा दबाव

४. बहिष्कृत होऊ नये म्हणून होणारे व्यक्ती वर्तन

५. व्यावसायिक ठिकाणचे नियंत्रण

पीटर बर्जर यांच्या मते, मुख्यता समाजातील शासन संस्थेच्या माध्यमातून व्यक्ती वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न होत असलेला आहे. राजकारणाच्या माध्यमातून सत्ता ग्रहण करुन व्यक्ती वर्तनावर

अधिकाराचा वापर होतो. त्यामुळे शासन व्यवस्थेखेरिज समाज, समूह यांचे अस्तीत्व अथवा सातत्य टिकून राहू शकत नाही. त्यामुळे समाजातील व्यक्तीवर्तन हे तिचे स्वत:चे नसून एक प्रकारे शासन व्यवस्थेच्या दबावाखाली घडून येणारे वर्तन असते. मग ती उच्च व्यावसायिक अथवा निरक्षर व्यक्ती असो. सर्वांना शासन व्यवस्थेच्या दबाव तंत्रानुसार वर्तन करावे लागते.

**※ धर्माची समाजातील भूमिका :**

पीटर बर्जर यांनी धर्माचे समाजशास्त्र या अभ्यासाअंतर्गत धर्म 'धर्म' या सामाजिक संस्थेचा व्यक्ती वर्तनावर होणारा परिणाम स्पष्ट केला आहे. कारण धर्माचा संबंध हा व्यक्तींच्या सामाजिक जाणीवांशी असतो. धर्माशी संबंधित असणाऱ्या अलौकिक शक्तीचा परिणाम हा व्यक्तीच्या वर्तनावर होत असतो. तसेच आधुनिक समाज व्यवस्थेमधील व्यक्तीच्या धार्मिक वर्तनाबाबत त्यांनी विचार स्पष्ट केले आहेत.

**२.२.३.३ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न :**

जोड्या जुळवा

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. थॉमस लुकमन आणि पीटर बर्जर | (अ) Sociology of knowledge |
| २. मॅक्स वेबर | (ब) अलौकिक शक्ती |
| ३. शासन संस्था | (क) मानवी समाजातील संस्कृती |
| ४. धर्म संस्था | (ड) व्यक्ती नियंत्रणाचे साधन |
| ५. समाज जीवनातील वास्तव | (इ) The social construction of reality |

## २.३ सारांश

समाजशास्त्र आणि सामाजिक घटनांचा अभ्यास करण्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या अभ्यासपद्धती यांचा परस्पर संबंध विचारात घेतल्यास समाजशास्त्रामध्ये प्रामुख्याने वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करुन केवळ घटनेचे बाह्य स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न बहुतांशी समाजशास्त्राचे अभ्यासक करतात. परंतू सामाजिक घटनांचा केवळ वरपांगी अभ्यास घटनांचे खरे स्वरूप स्पष्ट करु न शकल्यामुळे आपण घटनेचे सत्य (Reality) जाणून घेण्यामध्ये अपयशी ठरतो. म्हणून सामाजिक घटनांचे अंतरंग जाणून घेण्याच्या उद्देशाने ज्यावेळी संधोधक प्रयत्न करतो त्यावेळी तो घटनाशास्त्र (Phenomenology) आणि लोकान्वय पद्धती (Ethnomethodology) सारख्या सापेक्षवादी (Subjective) दृष्टीकोनांचा अवलंब करुन घटनेशी संबंधीत असणाऱ्या व्यक्तीवर्तनाचे स्वरूप समजावून घेण्याचा प्रयत्न करीत असतो.

सामाजिक घटनेशी संबंधित व्यक्ती वर्तनाचा अभ्यास करणे म्हणजे व्यक्ती वर्तनाला अनेक बाजू असतात. शिवाय व्यक्तीवर्तन अनेक सामाजिक घटकांच्यामुळे प्रभावित होत असते. व्यक्ती वर्तनाची गुंतागुंत जाणून घेणे हा मुख्य उद्देश या दोन अभ्यासदृष्टीकोनाद्वारे साध्य करता येतो. पारंपारिक समाजशास्त्रीय अभ्यास पद्धती या अनुभवजन्य तथ्यांवर अधिक विसंबुन असल्याने वर्तनात्मक घटकांकडे कमी लक्ष देतात. परंतु वास्तविक अर्थाने सामाजिक घटनांचे खरे स्वरूप व्यक्ती वर्तनाच्या अभ्यासाखेरीज स्पष्ट होत नाही.

आल्फ्रेड शूटज यांनी घटनाशास्त्राच्या ज्या घटनाशास्त्र पद्धतीचा अवलंब केला त्यामध्ये त्यांनी दैनंदिन व्यवहारामध्ये व्यक्ती-व्यक्तींच्या मधील आंतरक्रियांचे स्वरूप अभ्यासताना घडून येणाऱ्या मानवी घटनांचे स्वरूप समजावून घेण्यासाठी एक सापेक्षवादी दृष्टीकोन विकसित केला. यामध्ये व्यक्ती तिच्या व्यक्तीगत भूमिकेतून घटनेचा अर्थ काय होते किंवा घटनेकडे पहाण्याचा तिचा व्यक्तीगत दृष्टीकोन कशा स्वरूपाचा आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो. त्यानंतर पीटर बर्जर आणि लुकमन यांनी त्यांच्या 'Social construction of reality' या अभ्यासातून सामाजिक घटनांची वास्तवता ही सामाजिक घटकांशी कशा प्रकारे निगडीत असते. सामाजिक घटनांच्या मागे असणारे सत्य (Reality) जाणून घेण्यासाठी संस्कृती शासन संस्था सामाजीकरण, सामाजिक नियंत्रण कशाप्रकारे व्यक्ती वर्तनाला वळण देते आणि त्याचा परिणाम व्यक्ती वर्तनावर होत असतो. या बद्दल विश्लेषण केले.

लोकान्वयपद्धती (Ethnomethodology) या पद्धतीमध्ये सुद्धा सामाजिक घटनेशी संबंधित असणाऱ्या व्यक्ती स्वकौशल्याचा अवलंब करुन ज्या संभाषणपद्धती कृती, हावभाव आणि अन्य इतर पद्धतींचा उपयोग करुन इतरांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करतात किंवा घटनेबाबत सत्य भासविण्याचा प्रयत्न करतात, त्याचा अभ्यास लोकान्वय पद्धतीमध्ये जाणून घेण्याचा प्रयत्न हैराल्ड गरफिंकल यांनी केला.

## २.४ पारिभाषिक संज्ञा

१. घटनाशास्त्र : सामाजिक घटनांचा अर्थ जाणून घेण्यासाठीची पद्धती

२. लोकान्वयपद्धती : व्यक्तींनी आंतक्रिया दरम्यान उपयोगात आणलेल्या पद्धतींचा अभ्यास करण्यासाठीच्य पद्धती.

३. सामाजिक सत्य : घटनेमागील वास्तवता किंवा सत्य

४. सापेक्षवादी दृष्टीकोन : व्यक्तीगत भूमिकेतून घटनांचे विश्लेषण करण्याचा दृष्टीकोन

५. आंतरक्रिया : दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यक्तींच्यामध्ये घडून येणारी क्रिया

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### २.१.१.१ जोड्या जुळवा

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. हॅराल्ड गार फिंकल | (अ) लोकान्वय पद्धतीचा जनक |
| २. संवादाचे माध्यम | (ब) भाषा |
| ३. व्यक्ती वर्तनाचा अभ्यास | (क) सापेक्षवादी दृष्टीकोन |
| ४. मुलाखतीचा उपयोग | (ड) लोकान्वय पद्धतीचे तंत्र |
| ५. नारळ फोडणे | (इ) धार्मिक लोकरूढीचा प्रकार |

२.२.२.२ **जोड्या जुळवा**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. एडमंड हसरेल | (अ) घटनाशास्त्राचा जनक |
| २. आल्फ्रेड शूटज | (ब) The phenomenology of social world |
| ३. घटनाशास्त्र सिद्धांताचा घटक | (क) व्यक्तीला असणारी जाणीव |
| ४. वस्तुनिष्ठ अभ्यास विरुद्ध | (ड) सापेक्षवादी विचार |
| ५. मॅक्स वेबरचा प्रभाव | (इ) आल्फ्रेड शूटज |

२.२.३.३ **जोड्या जुळवा**

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| १. थॉमस लुकमन आणि बर्जर | (अ) The social construction of reality |
| २. मॅक्स सेचलर | (ब) Socioligy of knowledge |
| ३. शासन संस्था | (क) व्यक्ती नियंत्रणाचे साधन |
| ४. धर्म संस्था | (ड) अलौकिकशक्ती |
| ५. समाज जीवनातील वास्तव | (इ) मानवी समाजातील संस्कृती |

## २.६ सरावासाठी प्रश्न

१. हॅराल्ड गार फिंकल यांच्या लोकान्वय पद्धतीचे स्वरूप स्पष्ट करा.

२. आल्फ्रेड शूटज यांच्या घटनाशास्त्र दृष्टीकोनाचे स्वरूप स्पष्ट करा.

३. पीटर बर्जर आणि थॉमस लुकमन यांचा दृष्टीकोन स्पष्ट करा.

४. लोकान्वय पद्धतीवरील टीका.

## २.७ संदर्भ ग्रंथ :


1. Abraham francis : Modern Sociological Theory. An Introduction, Oxford University Press, New York 1982
2. Denly Tim : Contemporary Social Theory Investigation & application
3. Harvington Austin : Modern social theory Oxford University, Press New York
4. Ritzer George : Modern sociological Theory 4th edition The Me- Graw Hill Companies, New York.
5. Turner H. Jonathan : The structure of sociological theory Rawat Publication, Jaipur 1995.


●●●

# सत्र ४ : घटक ३
# समाज रचना आणि व्यक्ती
# Structure and Agency

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय - विवेचन

    ३.२.१ अन्थोनी गिडनचा संरचनीकरणाचा सिध्दांत

    ३.२.२ बोर्डिओ यांचे स्वयं-अध्ययनाचे समाजशास्त्र

    ३.२.३ रॉयभास्कर आणि मार्गरेट आर्चर यांचा सामाजिक वास्तववादी सिध्दांत

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ स्वयं-अध्ययनासाठीचे प्रश्न

३.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.८ संदर्भ ग्रंथ


## ३.० उद्दिष्टे :

समाजशास्त्रीय सिद्धांताची मांडणी करताना, विचारवंत ज्या दोन प्रमुख घटकांना स्थान देतात त्यामध्ये समाजरचना (Social Structure) आणि व्यक्ती (Agency) यांचा प्रामुख्याने समावेश होतो. अर्थात कांही अभ्यासक वरील दोन्ही घटकांपैकी कोणता तरी एक आपल्या अभ्यासाचा प्रमुख घटक मानून आपले सिद्धांत समाजशास्त्रीय असल्याचा दावा करतात. त्यामुळे समाजशास्त्रीय वैचारिक मांडणीमध्ये समाजरचनेवर आधारित व व्यक्ती वर्तनावर आधारित असे दोन परस्पर विरोधी विचारांचा प्रभाव आढळून येतो व अशा मांडणीमधूनच सामाजिक घटनांच्या मागील सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो.

अशा स्वरूपाची मांडणी असली तरी, 'संरचना' आणि 'व्यक्ती' या सिद्धांतामध्ये मात्र 'समाज रचना आणि व्यक्ती' या दोन घटकांचा परस्पर संबंध आणि परस्परपूरकता समाजशास्त्रामध्ये कशी असते किंवा दोन परस्परविरोधी विचारांपेक्षा दोन्ही घटकांच्या मधला समन्वय का महत्त्वाचा असतो या संबंधीचा एक

वेगळा विचार या घटकामध्ये स्पष्ट केला आहे. सर्व प्रथम (१) अन्थोनी गिडन यांनी समाजरचना आणि व्यक्ती यांच्या मधल्या परस्पर संबंधांचा विचार संरचनीकरण सिद्धांतामध्ये कशा प्रकारे मांडला हे जाणून घेणार आहोत. (२) बोर्डिओ यांचे स्वयं-अध्ययनाचे समाजशास्त्र समजून घेताना व्यक्ती स्वतःबद्दलच्या वर्तनाचा शोध किंवा दिशा कशा प्रकारे इतर व्यक्तींच्या आंतरक्रिया मधून घेत असते हे जाणून घेणार आहोत. व (३) शेवटच्या उप-घटकांमध्ये रॉयभास्कर आणि मार्गरिट आर्चर यांच्या वास्तववादी सिद्धांतामध्ये 'वस्तुनिष्ठता' या घटकाद्वारे समाजशास्त्रीय विचारांची मांडणी कशी केली जाते या संबंधीचे विश्लेषण करणार आहोत.

## ३.१ प्रास्ताविक

समाजशास्त्र विषयाची ओळख मुख्यता समाजशास्त्राच्या सैद्धांतिक मांडणीमधून होत असते. सुरुवातीच्या कालखंडामध्ये रचनात्मक-कार्यात्मक वाद, मार्क्सवाद यासारख्या सैद्धांतिक मांडणीमधून, समाजरचनेमुळे व्यक्ती वर्तनाला कशी दिशा मिळते. यासंबंधी विश्लेषण दिले गेले. त्यानंतरच्या सैद्धांतिक विश्लेषणामध्ये 'व्यक्तीवर्तन' कशाप्रकारे समाजरचनेवर प्रभाव पाडते असा विचार पुढे आला. त्यामध्ये, मॅक्सवेबरचे सिद्धांत, लोकान्वय पद्धती, सांकेतिक आंतरक्रियावादी सिद्धांत यांचा समावेश होतो. अशाप्रकारे, समाजशास्त्रामध्ये समाजरचना आणि व्यक्ती या दोन्ही घटकांचे एकत्रित स्वरूपात महत्त्व सांगणारा सिद्धांत मांडला जात नव्हता. उलट बहुतांशी समाजशास्त्रज्ञ कोणत्यातरी एक घटकाचा आधार घेवून सामाजिक घटकांचे विश्लेषण करीत होते. परंतु अन्थोनी गिडन यांनी त्यांच्या Structure & Agency किंवा 'समाजरचना आणि व्यक्ती' या सिद्धांतामध्ये दोन्ही घटकांना सारखेच किंवा समान महत्त्व दिले आहे.

फ्रेंच समाजशास्त्रज्ञ पेरी बोर्डिओ यांच्या एकूण सैद्धांतिक मांडणीमध्ये सुद्धा, अन्थोनी गिडन प्रमाणेच 'समाजरचना आणि व्यक्ती' या दोन्ही घटकांचा समन्वय आढळतो. त्यांच्या मते, objectivism (वस्तुनिष्ठतावाद) आणि Subjectivism (व्यक्तीनिष्ठतावाद) यांच्यामधील द्वंद समाजशास्त्रीय अभ्यासामध्ये कशा प्रकारे चुकीचे आहे किंवा अशा विचारांना बगल देऊन दोन्ही घटकांच्या परस्पर संबंधातून कशा प्रकारे समाजशास्त्रीय विचारांची मांडणी होते. हे सिद्ध करण्याचा प्रयत्न पेरी बोर्डिओ यांनी केलेला आहे. त्यांनी आपला सिद्धांत स्पष्ट करताना दोन महत्त्वपूर्ण संकल्पनांची मांडणी केली आहे. त्यामध्ये Habitus & field या दोन्हीचा परस्पर संबंध दर्शविला आहे. यामध्ये Habitus म्हणजे व्यक्तीचे मानसिक विश्व किंवा मनाची रचना, ठेवण की ज्याद्वारे तो आपल्या सभोवतालच्या सामाजिक घटनांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करतो. आणि field म्हणजे Network of relations व्यक्तीच्या सामाजिक संबंधाचे जाळे. अशाप्रकारे या दोन संकल्पनामधून त्यांचे विचार जाणून घेणार आहोत.

शेवटच्या रॉयभास्कर आणि मार्गरिट आर्चर यांच्या सामाजिक वास्तववादी सिद्धांतामध्ये, रॉय भास्कर यांनी अभ्यासक आणि संशोधक यांनी ज्या विचारांची मांडणी त्यांच्या सिद्धांतामध्ये केलेली असते. त्या विचारांचा पडताळा करताना, समाजात वास्तवामध्ये, सिद्धांतामधील किती विचार जुळतात किंवा मांडलेल्या विचारामधून वास्तवामध्ये किती विचार जुळून येतात याचा मागोवा अभ्यासकाने घेतल्याखेरीज सामाजिक वास्तवता जाणून घेता येत नसते. असा प्रमुख उपदेश समाजशास्त्रीय संशोधकांना दिला. मार्गरिट आर्चर यांनी अन्थोनी गिडन यांच्या सिद्धांताचे खंडन करताना 'समाज रचना आणि व्यक्ती' यांच्या परस्पर संबंधाऐवजी

संस्कृती आणि व्यक्ती यांच्यातील परस्पर संबंध महत्त्वाचा ठरतो. असे मत मांडले. थोडक्यात या संपूर्ण घटकांमध्ये, समाजशास्त्रीय अभ्यासातील सामाजिक घटकांचा अभ्यास करण्यासाठी ज्या भिन्न भिन्न सैद्धांतिक विचारसरणी आणि त्यांच्यामधील वैचारिक द्वंद, बाजूला ठेवून समाजशास्त्रीय विश्लेषणामध्ये व्यक्ती, समाजरचना आणि संस्कृती यांचा एकत्रितपणे कसा संबंध असतो. या संबंधी माहिती घेणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

आजपर्यंत आपण अभ्यासलेल्या समाजशास्त्रीय अभ्यासामध्ये, समाजशास्त्र एक विज्ञान म्हणून समाजातील विविध घटकांचे विश्लेषण करताना व्यक्तीवर्तनावरून सामाजिक घटनांचा अर्थ विचारात न घेता, सामाजिक दृष्टीकोनातून घटनांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करीत असलेले दिसते. उदा. एमिल डरखायिम यांनी आत्महत्यासारख्या सामाजिक घटनेचे विश्लेषण व्यक्तीवर्तन ऐवजी सामाजिक दृष्टीकोनातून करताना, वेगवेगळ्या समाजातील आत्महत्येचे प्रमाण विचारात घेवून कारणमीमांसा केली होती. तसेच कार्लमार्क्स यांनी भांडवलशाही समाज रचनेमुळे समाजातील विषमता आणि दारिद्र्य कशाप्रकारे निर्माण होते या संबंधी विचार मांडले होते. तसेच 'कार्यात्मवाद' (Functionalism) सिद्धांतामध्ये, समाजातील सामाजिक संस्थांची कार्यपद्धती बदलली की त्याचे परिणाम आपल्या व्यक्तीगत किंवा वर्तन प्रकारावर होतात असे स्पष्टीकरण दिले जात होते. किंबहुना आपला बी. ए. समाजशास्त्र अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत. समाजशास्त्र एक विज्ञान म्हणून समाजरचनेचा वस्तुनिष्ठ अभ्यास करते. इथेपर्यंतच आपल्या वरती समाजशास्त्राची ओळख होती. परंतु त्याच वेळी, ज्यांनी मॅक्स वेबर यांची अभ्यासपद्धती किंवा एम. ए. अभ्यासक्रमामध्ये लोकान्वय पद्धती (Ethnomethodology) किंवा घटनाशास्त्र (Phenomenology) अभ्यासली त्यावेळी, समाजशास्त्र एक वेगळी अभ्यासपद्धती सांगते, की ज्यामध्ये 'व्यक्तीवर्तन' (Behaviour) हा अभ्यासाचा केंद्रबिंदू समजला जातो, आणि व्यक्ती-व्यक्तीच्या मधील आंतरक्रियांचा अभ्यास, व्यक्तीची मानसिकता, तिचे वर्तन भावना इ. घटनांचा अभ्यास करून त्यांच्यामुळे समाजरचना कशी आकारास येते यासंबंधी विचार केला जातो.

थोडक्यात, सामाजिक घटनांच्या मागील सत्य जाणून घेत असताना कांही अभ्यासक 'समाजरचना' या घटकाचे वर्चस्व मान्य करतात. तर काही अभ्यासक त्याला विरोध करताना, 'व्यक्ती' आणि 'तिचे वर्तन' समाजशास्त्राच्या अभ्यासात महत्त्वाचे समजतात. यामधून एक सिद्धांत दुसऱ्या सिद्धांतावर टीका करून आपला विचारप्रवाह अधिक वास्तववादी असल्याचा दावा करतात.

आता आपण या प्रकरणामध्ये 'समाजरचना' किंवा 'व्यक्तीवर्तन' यापैकी बरोबर कोणता हे जाणून न घेता या दोन्ही घटकांचा समन्वय असेल तरच समाजशास्त्रीय घटनांचे विश्लेषण कसे योग्य ठरते हे समजून घेणार आहोत. त्यामुळे हा सिद्धांत समाजशास्त्रीय विचारामधील विरोधाभास कमी करतो आणि एकत्रित स्वरूपामध्ये, समाजरचना आणि व्यक्तीवर्तन यांना स्थान देतो. अशा स्वरूपाचा विचार घेवून प्रामुख्याने अन्थोनी गिडन यांनी संरचनीकरणाचा सिद्धांत मांडला आहे. त्याचप्रमाणे पेरी बोर्डिओ यांनीसुद्धा Reflexise Sociology किंवा स्वयं अध्ययनाचे समाजशास्त्र कसे असते यामधून एक संतुलनात्मक विचार मांडला आहे. भास्कर रॉय यांनी, वास्तववादी सिद्धांत कशा स्वरूपाचे असावेत, त्यांच्या मांडणीतून आलेल्या विचारांची पडताळणी समाजामध्ये करता येणे आवश्यक आहे. असा 'सामाजिक वास्तववादी' विचार मांडला व मार्गरेट आर्चर यांनी व्यक्ती आणि संस्कृती यांच्यातल्या परस्पर संबंधाचा विचार करताना, मानवी संस्कृतीमुळे व्यक्तीवर्तनावर परिणाम होतो. याविषयी विचार स्पष्ट केले आहेत.

### ३.२.१ अन्थोनी गिडन यांचा संरचनीकरणाचा सिद्धांत

या सिद्धांतामध्ये गिडन यांनी व्यक्ती आणि समाजरचना यांची एकत्रित स्वरूपात मांडणी केलेली दिसून येते. हा सिद्धांत जरी १९७० साली गिडन यांनी प्रत्यक्षात आणला असला तरी, तो परिपूर्ण स्वरूपामध्ये त्यांच्या 'The Constitution of Society' या ग्रंथामध्ये १९८० साली दिसून आला. त्यावेळी त्यांनी त्याला 'Agency and Structure' किंवा व्यक्ती आणि समाजरचना सिद्धांत असे नाव दिले होते. त्यांच्या मते ज्या-ज्या वेळी समाजशास्त्रासारख्या सामाजिक शास्त्रामध्ये 'Agency' म्हणजेच व्यक्तीवर्तन अभ्यासताना त्याचा समाजरचनेच्या संबंधातून विचार संशोधक किंवा अभ्यासक करीत असत. उदा. व्यक्तीवर्तनामुळे समाजरचनेला दिशा प्राप्त होते. परंतु गिडन यांच्या मते, व्यक्तीच्यामुळे समाजरचना प्रभावित होते. किंवा समाजरचनेमुळे व्यक्तीवर्तन प्रभावित होते. अशा स्वरूपाच्या विधानांना काही अर्थ नसतो.

गिडनच्या विचारावरती कार्ल मार्क्सच्या विचाराचा प्रभाव दिसून येतो. परंतु गिडन हे मार्क्सवादी विचाराचे नव्हते. त्यांचा 'The Constitution of Society' हा ग्रंथ म्हणजे कार्ल मार्क्सच्या विचारावर एक प्रकाश टाकण्याचा प्रयत्न होता. कार्लमार्क्स यांनी देखील व्यक्ती आणि सामाजिक परिस्थितीच्या मधील परस्पर संबंध स्पष्ट करताना 'व्यक्ती इतिहास घडवतात (Men Make History) परंतु त्या त्यांच्या समाधानासाठी घडवत नाहीत किंवा स्वतःच्या सोयीनुसार त्या इतिहास घडवत नसतात, तर मानवाच्या इतिहासामधल्या काही घटना किंवा परिस्थितीशी सामना करण्यासाठी म्हणून भूतकाळाला बदलण्याचा प्रयत्न करतात. म्हणजेच संरचनीकरणा सिद्धांताला पूरक असे विचार मार्क्सच्या विचारामधून मांडलेले आढळते. गिडन यांनी मार्क्सच्या विचारांचे विश्लेषण करताना, त्यांचे टीकात्मक परिक्षण करतेवेळी नविन स्वरूपाचे काही विचार मांडले. गिडन यांनी संरचनीकरणाची मांडणी करतेवेळी त्यामध्ये अधिक भर टाकून तो सिद्धांत अधिक अर्थपूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.

गिडन यांनी व्यक्ती (Individual or Agent) यांच्याशी संबंधित असणाऱ्या सांकेतिक आंतरक्रियावादी दृष्टीकोन (Symbolic Interactionism) व समाज किंवा समाज रचनेशी निगडीत असणारे रचनात्मक-कार्यात्मक सिद्धांत यांचा व्यापक स्वरूपामध्ये Survey करून, या दोन्हींच्यामध्ये असणारा परस्पर विरोधाभास नाकारला आहे. त्यांनी आपले मत स्पष्ट करताना समाजातील सद्य परिस्थितीमध्ये असणाऱ्या घडामोडींना महत्त्व दिले. त्यांच्या मते ज्या वेळी आपण सामाजिक शास्त्रांच्या मध्ये, संरचनीकरणाचा विचार करतो त्या वेळी, व्यक्ती वर्तनाचा किंवा एकूण समाजरचनेचा विचार महत्त्वाचा समजत नाही. उलट, एखाद्या विशिष्ट कालखंडामध्ये (Time) आणि विशिष्ट भूप्रदेशात (Space) कशा प्रकारच्या सामाजिक घडामोडी घडतात. या प्रकारच्या विचाराला त्यांनी प्राधान्य दिले आहे. गिडनच्या 'संरचनीकरण' सिद्धांताचा मूळ आशय हा व्यक्ती आणि समाजरचनामधील परस्पर संबंधातून ज्या प्रकारच्या सामाजिक घडामोडी होतात असा होता. संरचनीकरण सिद्धांत, व्यक्ती आणि समाजरचना या दोन घटकांचा स्वतंत्र विचार न करता, या दोन घटकांचा परस्परांच्यावर होणारा प्रभाव विचारात घेते. हे दोन घटक स्वतंत्र नसून, एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यामुळे सर्व प्रकारच्या मानवी क्रिया समजून घेताना त्यांची समाजरचना अभ्यासणे आवश्यक असते आणि सर्व प्रकारच्या सामाजिक रचनांच्यामध्ये सर्व मानवी क्रियांचा समावेश असतो. त्यामुळे मानवी क्रिया आणि सामाजिक घडामोडींच्या मध्ये, व्यक्ती आणि समाज हे दोन्ही घटक परस्परांशी एकरूप झालेले दिसतात. व्यक्ती समाजाचा घटक या नात्याने ज्या एखाद्या प्रसंगी क्रिया करत असते त्यामधूनच जी परिस्थिती निर्माण

होते. ती परिस्थिती व्यक्तीच्या क्रियांना दिशा देत असते. याचा अर्थ व्यक्ती जाणीवपूर्वक सामाजिक क्रियांना जन्म देत नाही, किंवा समाजरचनेचा प्रभाव म्हणून व्यक्तीच्या आंतरक्रियांना अर्थ प्राप्त होतो असे नाही तर मानवी क्रियांच्या मधला एक घटक म्हणून, वारंवार समाजात एकच एक प्रकारच्या मानवी क्रियां करण्याचा सराव करते व त्यामुळे व्यक्ती मनाची जडण-घडण व समाजरचना अस्तित्वात येते. अशाप्रकारे समाजरचनेतील मानवी क्रियांच्या मधील वारंवारता आणि त्या क्रियांची एकूण स्वरूप हे व्यक्तीच्या ठिकाणी असलेल्या स्वःत्वामधून होत नसते, तर वारंवारपणे ज्या प्रकारच्या घटना घडतात किंवा ज्या प्रकारची समाजरचना असते त्याला अनुसरून मानवी क्रियांना अर्थ प्राप्त होत असतो. अशा प्रकारे गिडन यांच्या विचारामध्ये, व्यक्ती आणि समाजरचना यांच्यामधील द्वंद्वात्मक क्रियांचा अभ्यास केला आहे.

**संशोधक आणि निवेदक यांच्यातील आंतरक्रिया :**

गिडन यांनी संशोधक आणि त्यांच्या अभ्यासाशी संबंधित समाजातील सर्व सामान्य व्यक्ती यांच्यातील संबंधाचे स्वरूप स्पष्ट करताना, म्हटले आहे की एखाद्या सामाजिक घटनेसंबंधी समाजातील सर्वसामान्य व्यक्ती तिच्या बौद्धीक कुवतीनुसार घटनांचे विश्लेषण देते, त्याचवेळी संशोधकाने वैज्ञानिक पातळीवर त्या घटनांचा जो अर्थ मनामध्ये निश्चित केलेला असतो, परंतु ज्यावेळी निवेदकाकडून संशोधकाकडे असणाऱ्या वैज्ञानिक माहितीच्या अगदी उलट माहिती मिळते. त्यावेळी खऱ्या अर्थाने तो संशोधनाचा निष्कर्ष असतो.

**गिडन यांचे व्यक्ती घटकावरील विचार** (Agent)

गिडन यांच्या मते, प्रत्येक व्यक्ती तिच्या भौतिक आणि सामाजिक परिस्थितीचा अंदाज घेवून, तिच्या क्रिया आणि विचार निर्धारित करत असते. व्यक्ती नेहमी आपण काय बोलतो या विषयी सावधानतेची भूमिका घेत असताना, आपल्याकडून दिल्या जाणाऱ्या माहितीला Rationalise म्हणजे, वैज्ञानिक स्वरूप देण्याचा प्रयत्न करते. व्यक्ती आपले वर्तन आणि क्रिया यांना सामाजिक परिस्थितीच्या चौकटीतून स्पष्ट करण्याचा प्रयत्न करते. तसेच व्यक्तींच्या असणाऱ्या गरजा (Wants) आणि इच्छा (Desires) हे दोन घटक व्यक्तींच्या क्रियांना चालना देतात. व्यक्तीच्या क्रिया (Action) यांना चालना देणारे घटक प्रत्यक्ष स्वरूपाचे दृश्य स्वरूपात नसतात, तर ते अदृश्य स्वरूपामध्ये (Unconscious) व्यक्तींच्या आतमध्ये मनात असतात.

**मानवी क्रियांच्या संबंधीचे विश्लेषण**

गिडन यांच्या मते, समाजातील व्यक्तींच्या कृती जाणून घेताना त्या दोन स्वरूपाच्या असतात उदा. काही व्यक्ती घटनांचे स्पष्टीकरण करताना आहे तशा शब्दातून मांडतात तर काही व्यक्ती शब्दातून मांडण्यापूर्वी परिस्थितीचे भान ठेवून विचारपूर्वक, मांडणी करतात. अशा व्यावहारिक कृती (Practical Action) करणाऱ्या व्यक्तीच्या मनात विशिष्ट हेतू डोळ्यासमोर ठेवून त्या आपल्या कृती करतात. परंतु सहेतूकक्रिया केल्याने त्याचे घटनेवर होणारे परिणाम विपरीत स्वरूपाचे येवू शकतात व निरहेतूक स्वरूपाच्या क्रिया या संरचनीकरणाचा एक भाग म्हणून महत्त्वाच्या असतात.

गिडन यांच्या मते व्यक्ती हा एक महत्त्वाचा घटक आहे. त्याच्या सहेतूक कृती किंवा वर्तनपद्धती म्हणजे त्या व्यक्तीची ती एक सत्ता (Power) असते. आणि त्या आधारे ती एकूण सामाजिक परिस्थितीमध्ये बदल घडवून आणू शकते. व्यक्ती स्वतःकडे असणाऱ्या वर्तन पद्धतीचा योग्य वापर करण्यामध्ये यशस्वी झाली नाही तर ती निष्कामी ठरते. व्यक्तीवर्तन करताना तिच्या वर्तनावर सामाजिक नियमनांचा दबाव असला

तरी, परिस्थितीवर मात करण्याचे सामर्थ्य व्यक्ती वर्तनामध्ये असते. म्हणून गिडनच्या संरचनीकरणामध्ये, व्यक्तीचे अधिकार म्हणजे तिचे वर्तन आणि वर्तन पद्धती असतात.

**समाजरचनेसंबंधीचे विचार** (Structure)

समाज व्यवस्था किंवा समाज रचना संरचनीकरण सिद्धांताचा मुख्य भाग आहे. व त्याचे (सामाजिक साधनसंपत्ती व सामाजिक नियमने) असे दोन भाग असतात. कालखंड (Time) आणि भूप्रदेश (Space) या दोन घटकांमुळे सामाजिक घटनांचे स्वरूप भिन्न-भिन्न होत असले तरी (१) समाजामध्ये असलेले नियम व साधनसंपत्ती यांच्यामुळे समाजरचना अस्तित्वात येत असते. वास्तविक अर्थाने कालखंड आणि भूप्रदेश या दोन घटकामुळे समाजरचनेचे स्वरूप भिन्न असले तरी, समाजातील सामाजिक घटनांच्यामुळे समाजरचना आकाराला येत असते. सामाजिक घटनांच्यामध्ये समाविष्ट असणाऱ्या व्यक्तींच्या उपक्रमामुळे (Activity) समाज संरचना तयार होते.

गिडन यांच्या मते, अधिकतर समाजशास्त्राच्या अभ्यासकांच्या मते, समाज रचनेचा व्यक्तीच्या क्रियांवर दबाव असतो. परंतु या प्रकारच्या दबावतंत्राबद्दल गिडन सहमत नाहीत. त्यांच्या मते, समाजरचना जरी दबावतंत्राचा वापर करीत असल्या तरी व्यक्तीला, या अगोदर ज्या गोष्टी करणे शक्य नव्हते, त्या गोष्टी करण्याची संधी मात्र समाजरचना देत असते. त्यामुळे समाजातील व्यक्ती समाजरचनेच्या नियंत्रणाचा अस्वीकार करीत नसतात, उलट, विशिष्ट कालखंड (Time) आणि भूप्रदेश (Space) नुसार त्यामध्ये बदल करतात.

**गिडन यांची संरचनीकरणाची संकल्पना** (Concept of Structuration)

गिडन यांच्या संरचनीकरण संकल्पनेमध्ये समाजरचना आणि व्यक्ती या दोन स्वतंत्र कल्पना म्हणून विचार न करता या दोन्ही संकल्पनाच्या मधील परस्पर प्रभाव अपेक्षित धरला आहे. (The dialetical Reationship between Structure & Agancy) त्यामुळे या दोन्हीपैकी कोणताही एक घटक स्वतंत्रपणे आपले अस्तित्व ठेवू शकत नाही.

तसेच, गिडन यांनी कालखंड (Time) आणि भूप्रदेश (Space) या दोन घटकांचे महत्त्व समाजरचनेच्या दृष्टीकोनातून विचारात घेतले आहेत. कारण समाज रचनेच्यामध्ये बदल होत असताना भूतकाळ आणि वर्तमान काळातील मानवी क्रिया आणि समाज रचना बदलतात. तसेच, जगातील सर्व मानवी समाज एकाच प्रकारच्या समाजरचना नसतात. त्यांची व्यवस्था वेगवेगळी असते. तसेच वर्तमान समाजातील दळण-वळण व्यवस्था आणि संपर्क माध्यमे यांचे स्वरूप जाणून घेता येते. ज्याप्रमाणे, समाजशास्त्रामध्ये, Why & how, social phenomena are happen चा अभ्यास होतो तसे, where & when social phenomena are happen चा देखील विचार महत्त्वाचा असतो.

**गिडनच्या संरचनीकरण सिद्धांताचा सारांश**

१) गिडनचा संरचनीकरण सिद्धांत वेगवेगळ्या मानवी समाजरचनांचा अभ्यास करण्याऐवजी, तो कालखंड (Time) आणि भूप्रदेश (Space) यानुसार समाज व्यवस्थांचे स्वरूप विचारात घेतो. तसेच गिडन यांनी, त्यांच्या अभ्यासात सामाजिक घडामोडी (Social Practices), अभ्यासताना, समाजातील व्यक्ती-

व्यक्तींच्या मधील आंतरक्रिया (Symbolic Interaction), Political Institution शासन संस्था Economic Institution (अर्थ संस्था) आणि Law (कायदे व्यवस्था) यासंबंधी अभ्यास केला.

२) गिडन यांच्या मतानुसार मानवी समाज रचनांच्या मध्ये, घडून येणारे परिवर्तन मुख्यता कालखंड (Time) आणि भूप्रदेश (Space) या दोन घटकांच्या अनुषंगाने अभ्यासले जाते.

३) समाजातील वेगवेगळ्या समाजरचनेशी संबंधित असणाऱ्या सामाजिक संस्था व त्यांचे घटक हे समाज परिवर्तनामध्ये कशा प्रकारे पुढाकार घेतात. या संबंधी संशोधक संवेदनशील असला पाहिजे.

४) संरचनीकरणाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकानी किंवा अभ्यासकानी समाजरचनेतील वर्तमान सामाजिक समस्या कोणत्या प्रकारच्या आहेत. या विषयी जागरूक असणे गरजेचे आहे.

### ३.२.२ बोर्डिओ यांचे स्वयं-अध्ययनाचे समाजशास्त्र

अन्थोनी गिडन यांच्या प्रमाणेच, पेरी बोर्डिओ या अभ्यासकाने व्यक्तीसापेक्षता (Subjectivity) आणि वस्तुनिष्ठता (Objectivity) यांच्या मधील परस्पर द्वंद्वात्मक संबंध (Dialetic Relation) स्पष्ट करताना दोन्ही संकल्पनाच्या मधील परस्पर विरोधाभासाला विरोध केला आहे. त्यांच्या मते त्या परस्परापासून भिन्न नसून परस्परांशी निगडीत आहेत. व त्यांच्यामधील परस्पर विरोध अभ्यासणे एक हास्यास्पद प्रकार आहे. त्यामुळे यांच्या पलीकडे जाऊन घटनांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

बोर्डिओ यांनी, त्यांच्या विचाराचा मुद्दा मांडण्यापूर्वी, वस्तुनिष्ठ अभ्यास पद्धतीचे समर्थन करणारे डरखायिम यांचे सामाजिक तथ्यांवरील विचार किंवा साऊसरे यांचा संरचनावाद, लेव्हीस स्ट्रास आणि रचनात्मक मार्क्सवाद यांनी समाजरचनेचे महत्त्व स्पष्ट करताना, कशा प्रकारे व्यक्ती वर्तन, आंतरक्रिया किंवा व्यक्तींच्या प्रवृत्ती चुकीच्या आहेत हे स्पष्ट केले व 'व्यक्ती' (Agent or Agency) घटकाचे महत्त्व नाकारले. परंतू बोर्डिओ यांनी मात्र 'व्यक्ती' घटकाचे महत्त्व विचारात घेवून समाजरचनेचे महत्त्व मांडले.

बोर्डिओ यांच्या मते, Real Life actors किंवा मूर्त समाजातील व्यक्ती आणि त्यांचे वर्तन महत्त्वाचे आहे. त्यानंतर बोर्डिओ यांनी, व्यक्ती वर्तनवादी सिद्धांत म्हणून सार्त्रेचा अस्तित्ववादी सिद्धांत, आल्फ्रेड शूरज यांचा घटनाशास्त्र सिद्धांत, ब्ल्यूमर यांचा सांकेतिक आंतरक्रियावादी सिद्धांत, गारफिंकलची लोकान्वय पद्धती इ. सिद्धांत, समाजात 'व्यक्ती' (Agency) घटकाला स्वीकारून समाजरचना (Structure) या घटकाला नाकारतात.

### बोर्डिओ यांचे व्यक्तीसापेक्ष आणि संरचनावादी सिद्धांतामधील परस्पर संबंधातून मांडलेले विचार

व्यक्ती आणि समाजरचना यांच्या मधल्या परस्पर संबंधाविषयी मत मांडताना बोर्डिओ म्हणतात, 'समाजातील व्यक्तींच्या वर्तनावर समाजरचनेचा दबाव आपल्या कारणाने व्यक्तीवर्तन घडते. तर दुसऱ्या बाजूला, व्यक्ती समाजात दैनंदिन घटनांचा सामना किंवा संघर्ष करताना किंवा एखादा समाजातील समूह युद्ध समाज बदलण्यासाठी जो संघर्ष करतो ती कृती देखील महत्त्वाची असते.

**सामाजिक कृती** (Social Practices) : बोर्डिओ यांच्या मते, व्यक्ती आणि समाज यांच्या परस्पर संबंधामधून (द्वंद्वात्मक) व्यक्तींच्या दैनंदीन कृती निष्पन्न होत असतात. आपल्या दैनंदिन कृती या वस्तुनिष्ठदृष्ट्या तपासल्या जात नसतात किंवा त्या आपल्या इच्छेनुसार घडून येत नसतात.

**प्रवृत्तीवादी संरचनावाद** (Genetic-Structuralism) : बोर्डिओ यांनीं आपल्या विचाराची भूमिका स्पष्ट करताना प्रवृत्तीवादी-संरचनावाद म्हणजे संरचनावाद व्यक्ती वर्तनाखेरिज स्वतंत्ररित्या स्पष्ट करता येत नाही. एवढेच नव्हे तर जीवशास्त्रीयदृष्ट्या व्यक्तीला मेंदूच्या साह्याने विचार करण्यासाठी समाजरचनेचे साह्य घ्यावे लागते. त्यामुळे व्यक्ती आणि समाजरचना स्वतंत्रपणे अभ्यासता येत नाहीत किंवा त्या एकमेकापासून वेगळ्या असू शकत नाहीत. तसेच एखाद्या समूहाला जो विशिष्ट भूप्रदेश मिळालेला असतो (Space) हा त्या समूहाने त्या अगोदर घडवलेल्या इतिहासामुळे मिळालेला असतो व अशा ऐतिहास संघर्षामध्ये व्यक्तीला तिच्या समाजरचनेप्रमाणे स्थान मिळालेले असते व व्यक्ती आपल्या विचारानुसार ते स्थान योग्य किंवा अयोग्य याचा विचार करून स्वीकारत असते.

**भाषा आणि संस्कृतीमधून निर्माण होणारी समाजरचना**

बोर्डिओ यांनी, साऊसरे आणि लेव्हिस स्ट्रॉस यांच्या समाजरचनेचा विचार मान्य केला असला तरी, त्यांनी भाषा आणि संस्कृतीच्या माध्यमातून समाजरचनेचे महत्त्व अभ्यासले आहे. त्यांच्या मते, समाजरचना म्हणून स्वतंत्रपणे समाजशास्त्रामध्ये न पहाता ती समाजामध्ये मूलता अस्तीत्वात असते. परंतु ती त्या समाजातील व्यक्तींच्या कल्पनेप्रमाणे नसते किंवा इच्छेप्रमाणे नसते. उलट समाजातील व्यक्तींना मार्गदर्शन करण्यासाठी व त्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्याची पात्रता समाजरचनेत असते.

**मानसिकता आणि समाजरचना यांच्यातील परस्पर-संबंध**

बोर्डिओ यांच्या संरचनावादी विचारामध्ये वस्तुनिष्ठता आणि व्यक्तीसापेक्षता यांचा एकत्रित विचार करताना त्यांनी व्यक्तीसापेक्षता (Subjectivity) घटकाला समाजरचनेच्या दृष्टीकोनातून स्पष्ट केले आहे, त्यांच्यामते, समाजाची जडण-घडण किंवा समाजाबाबत आपल्या मनातील विचार ज्या स्वरूपाची समाजरचना आहे त्या मधून तो तयार होत असतो. बोर्डिओ यांनी, वस्तुनिष्ठता आणि व्यक्तीसापेक्षता यांच्यामधील परस्पर संबंधाचे विश्लेषण करताना दोन महत्त्वाच्या संकल्पना मांडल्या.

**अ) व्यक्तीमनातील समाजाबद्दलच्या कल्पना** (Habitus)

व्यक्तीच्या मनातील ठेवण कशाप्रकारची आहे, त्यातून व्यक्तीचा समाजाबद्दल दृष्टीकोन तयार होत असतो. व्यक्तीजवळ अनेक स्वरूपाच्या मानसिक कृती असतात, ज्याद्वारे त्या सामाजिक घटनांची ओळख, त्याची समज, स्वीकृती अथवा विश्लेषण करू शकतात. तसेच या सर्व मानसिक क्रियांच्या आधारे त्या आपले वर्तन देखील करू शकतात. परंतु व्यक्तीच्या मनातील सामाजिक विश्व हे व्यक्तीने समाजबद्दल मनात केलेली समाजरचना असते त्यामुळे व्यक्तीच्या मनामध्ये समाजरचना मूर्त स्वरूपामध्ये असते व अशा समाजरचनेचे प्रतिबिंब समाजामध्ये असलेल्या वय, समूह, लिंग व सामाजिक वर्गामध्ये आढळते. तसेच समाजाचा सदस्य म्हणून दीर्घकाळ पर्यंत असल्याने ती समाजरचना अंगवळणी पडलेली असते. तसेच समाजातील सदस्यांना एकसारखे स्थान नसल्यामुळे तिच्या स्थानाप्रमाणे, तिच्या समाजरचनेबाबतच्या कल्पना असतात. तसेच समान स्थानावर असणाऱ्या सदस्यांच्या कल्पना एकसारख्या असतात.

तसेच व्यक्तीच्या सामाजिक विश्वासंबंधीच्या कल्पना समाजातील व्यक्तीपरत्वे भिन्नभिन्न असू शकत नाहीत तो एक सामूहिक परिणाम असतो. परंतु समाजरचनेसंदर्भातील मते मात्र वेगवेगळी असू शकतात. कारण समाजरचनेचा दबाव सर्व व्यक्तींच्यावर एकसारखा नसतो.

तसेच Habitus म्हणजे, एका विशिष्ट कालखंडामध्ये, समाजातील व्यक्तींची ऐतिहासिक सामूहिक कृती असते. व्यक्तीच्या इतिहासाची फलसूत्री म्हणजे Habitus होय. त्यामुळे समाजातील व्यक्तींच्या सामूहिक कृती म्हणजे इतिहास असतो व व्यक्तीच्या कृती इतिहासाचा परिणाम असतो. त्यामुळे व्यक्तीचे विशिष्ट वर्तन आणि कार्ये हे त्या समाजात घडून आलेल्या विशिष्ट कालखंडातील इतिहासाचा परिणाम असतो. परंतु अशा स्वरूपाचा इतिहास काहींना सोयीचा तर काहींना गैरसोयीचा वाटतो. उदा. गांधीवादी विचारांचा आदर्श ठेवणाऱ्या समाजरचनेतील व्यक्तींना, स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भारतीय रचना गैरसोयीची वाटत असल्याने ते त्याच्याशी मिळते-जुळते घेवू शकत नाहीत. तसेच Habitus ची कार्ये स्पष्ट करताना बोर्डिओ यांनी असे म्हटले आहे की, व्यक्तीचे आचार-विचार किंवा वर्तन या संबंधी व्यक्तीला असलेली समाजरचनेची जाणीव, निवड या संबंधी व्यक्ती आपल्या निवडीप्रमाणे आणि चोखंदळपणे करणाऱ्या असतात. आपण आपल्या वर्तनबाबत काटेकोर नसेल तर असे वर्तन प्रकट स्वरूपामध्ये, आपल्या आहार करण्याच्या पद्धती, बोलणे-चालणे, अथवा इतरांच्या संभाषणात नाक खुपसणे इ. मधून स्पष्ट दिसतात. त्यामुळे आपल्या वर्तनामधून समाजरचना कार्यरत असते व व्यक्तीचे समाजरचनेला अनुसरून असणारे वर्तन केवळ तांत्रिक स्वरूपाचे नसते तर ते समाजरचनेतून आलेले असते.

**ब) व्यक्ती मनाबाहेरच्या सामाजिक विश्वाबद्दलच्या कल्पना** (Field)

बोर्डिओ यांच्या मते, समाजरचनेमधील व्यक्ती व्यक्तींच्या मधील परस्पर संबंध म्हणजे Field होय. अशाप्रकारचे व्यक्तीसंबंध, हे व्यक्तीच्या इच्छा अथवा जाणीव यानुसार निर्माण झालेले नसतात. अशा प्रकारच्या संबंधांना, सामाजिक आंतरक्रिया अथवा व्यक्तीसापेक्ष आंतरक्रिया संबोधले गेले नाही. समाजामध्ये विविध पदावर असणाऱ्या व्यक्ती अथवा सामाजिक संस्थांशी संबंधित असणाऱ्या व्यक्ती यांच्याकडून होणाऱ्या कृती, प्रामुख्याने समाजरचना अथवा 'field' यांच्याद्वारे असलेल्या दबावतंत्रामुळे घडून येत असतात. तसेच समाजामध्ये आढळून येणाऱ्या धर्म, कला, आर्थिक व अन्य इतर क्षेत्रातील व्यक्तींच्या कृतीवर त्या-त्या ठिकाणच्या Field अथवा या परिस्थितीचा परिणाम असल्यामुळे, आपल्या कृती घडून येत असतात.

बोर्डिओ यांच्या मते, Field म्हणजे, व्यक्तीला कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे क्षेत्र होय. तसेच Field म्हणजे अशा प्रकारची समाजरचना की, ज्यामध्ये विविध समूहांच्या अथवा व्यक्तींना जे स्थान अथवा पद मिळालेले असते. त्याचे संरक्षण देण्याचे अथवा त्यामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी किंवा इतर समूहांच्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित करताना याच ठिकाणच्या अन्य इतर समूहांना प्रतिष्ठा मिळवून देण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडते. तसेच समाजरचना म्हणजे अशा स्वरूपाची स्पर्धात्मक बाजारपेठ असते की ज्यामध्ये आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक स्वरूपाचे प्रशिक्षण देऊन त्यांना इतरत्र पाठवून देण्याचे कार्य करतात. त्याचबरोबर शासन किंवा सत्ता ही सर्वश्रेष्ठ समाजरचना असते. व राजकीय क्षेत्रामध्ये वेगवेगळे समूह आणि व्यक्तींच्या राजकीय संबंधातून समाजरचनेच्या उर्वरित घटकाची रचना निश्चित होत असते. तसेच राजकीय समाजरचनेचे तीन घटक असतात. (अ) राजकीय घटकांचे समाजातील इतर घटकांशी असणारे संबंध, (ब) समाजातील विविध पदावर असणाऱ्या व्यक्ती आणि समूह यांच्यातील वस्तुनिष्ठ स्वरूपाचे संबंध, (क) एखाद्या व्यक्तीला समाजरचनेमध्ये वेगवेगळ्या पदावर समाजरचनेमुळे जगण्याची संधी कशी मिळते.

त्याचप्रमाणे समाजरचना आणि व्यक्ती यांच्या मध्ये, एखाद्या व्यक्तीकडे किती प्रमाणात आर्थिक साधनसंपत्ती आहे. त्यावरून ती व्यक्ती, स्पर्धा आणि संघर्ष करून आपले स्थान प्राप्त करते. त्यामुळे आर्थिक साधनसंपत्तीची मालकी हे त्या व्यक्तीचे भवितव्य व इतरांचे भवितव्य निश्चित करत असते. बोर्डिओ यांनी व्यक्ती, समूह आणि समाजरचना यांच्यातील परस्पर संबंध स्पष्ट करताना, समूह आणि व्यक्तींना समाजरचनेत प्राप्त झालेल्या स्थानानुसार आपले डावपेच तयार करताना समाजरचनेच्या नियमांच्या चौकटीमध्ये राहून अशा प्रकारचे नियम आणि समाजरचना तयार करीत असतात की, ज्या स्वतःसाठी अथवा समूहासाठी उपयोगाच्या ठरतील. परंतु बोर्डिओ यांनी समूह आणि व्यक्तींचे डावपेच हे विशिष्ट ध्येय अथवा उद्दिष्ट पूर्तीसाठी पूर्वनियोजित अशी कृती नसून, समाजरचनेच्या अनुषंगाने केलेल्या कृती असतात.

बोर्डिओ यांच्या व्यक्ती आणि समाजरचनेच्या मांडणीमध्ये, समाजरचनेतील शासनसंस्था प्रत्यक्षपणे समाजावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करत नसते, तर नियंत्रण करण्याची शासनसंस्था एक वेगळी पद्धत अवलंबत असते. उदा. शिक्षण संस्थांच्या मदतीने, अशा स्वरूपाचे विचार अथवा अभ्यासक्रम तयार केले जातात की, जे इतरांवर सक्तीने लादले जातात. उदा. महिलांच्या संबंधीचे अभ्यासक्रम, तयार करून किंवा अन्य इतर अभ्यासक्रमाद्वारे समाजातील शासन रचनेमध्ये असणाऱ्या वर्गाचा प्रभाव त्यामध्ये आढळतो. त्यामुळे शिक्षण संस्थांच्या माध्यमातून शासन त्यांच्याकडे असणाऱ्या सत्ता आणि अधिकारामध्ये आणि आपल्या वर्गाचे हितसंबंध जोपासण्याचे कार्य करत असतात. अशाप्रकारे समाजरचनेतील राजकीय पदावर असणाऱ्या वर्गाचे आणि त्याचे वर्चस्व कशा प्रकारचे असते हे स्पष्ट केले आहे.

थोडक्यात, समाजशास्त्रामध्ये पूर्वमंपार चालत आलेल्या व्यक्तीसापेक्षता आणि वस्तुनिष्ठता या दोन दृष्टीकोनांचा एकत्रित अभ्यास करताना, व्यक्ती आणि समाज रचना यांच्यातील परस्पर संबंधाचे स्वरूप स्पष्ट केले. त्यांच्या मते, ज्याप्रमाणे समाज रचनांच्यामुळे व्यक्तीवर्तनावर निर्बंध ठेवले जातात. त्याचवेळी व्यक्तीदेखील समाजरचनेला दिशा देण्याचे कार्य करतात. परंतु निर्माण केली जाणारी समाजरचना अर्थपूर्ण व सामाजिक मूल्यांवर आधारीत स्वरूपाची असते.

**व्यक्ती आणि समाजरचना यांची अंमलबजावणी**

बोर्डिओ यांनी केवळ सिद्धांताची मांडणी केली नाही तर, अनुभवाच्या पातळीवर तो सिद्ध करताना तो तात्त्विक स्वरूपाचा नसल्याचे मत मांडले. Distinction या ग्रंथामध्ये त्यांनी सिद्धांताची उपयुक्तता मांडली आहे. त्यांच्या मते, जर समाजातील लहान-मोठ्या भिन्न-भिन्न मानवी संस्कृतीचा अभ्यास केला असता त्यामध्ये वरील प्रकारच्या सिद्धांताचा अनुभव येतो. त्यांच्या मते, मानवी समाजरचनांच्या मध्ये स्थल, काल परिस्थितीन्वये समानता नसल्यामुळे अथवा समाजी स्तर रचना, वर्गरचना एकसारखी नसल्याने सर्व मानवी समाजात संस्कृती (Culture) हा घटक प्रामुख्याने समान स्वरूपात आढळतो. त्यांनी व्यक्ती आणि समाजरचना या सिद्धांताची प्रचिती तपासून पहाण्यासाठी व्यक्तीच्या आवडी-निवडी या त्या समाजरचनेतील संस्कृतीनुसार कशा भिन्न-भिन्न स्वरूपाच्या असतात हे स्पष्ट केले. तसेच त्यांनी समाजातील वर्गरचनेचे स्वरूप आणि संस्कृती यांच्यातील परस्पर संबंधाचे स्वरूप स्पष्ट केले. त्यांच्या मते, समाजातील व्यक्तींच्या क्रियांचे स्वरूप हे त्या समाजातील व्यक्तीला मिळालेले पद आणि त्या पदाबद्दलची व्यक्तीची आत्मीयता यावरून त्यांनी विश्लेषण केले आहे. तसेच कांही व्यक्ती स्वकर्तृत्वाने समाजातील एखादे पद मिळवण्याचा

प्रयत्न करतात. व्यक्तीला तशा स्वरूपाची संधी समाजामध्ये प्राप्त होत असते. परंतु समाजरचनेतील उच्च आणि कनिष्ठ वर्गातील भिन्नतेमुळे, उच्च-वर्गातील व्यक्तींना अधिक संधी मिळते व ते कनिष्ठ वर्गातील व्यक्तींना मिळणाऱ्या संधीमध्ये अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. परंतु बहुतांशी समाजरचना प्रामुख्याने श्रेणीरचनेवर आधारीत असल्याचे आढळते. समाजामध्ये विशिष्ट दर्जावर असणाऱ्या व्यक्तींच्या सुप्त गरजा या त्या समाजातील सांस्कृतिक घटकाचा परिणाम असतो. उदा. आर्थिक बाजारपेठा की ज्यांचा विचार बोर्डिओ यांनी आर्थिक भांडवलाच्या दृष्टीने न करता सांस्कृतिक घटकाच्या आधारे केला आहे. व्यक्तीचे समाजातील एका विशिष्ट वर्गात असणारे स्थान किंवा तिचे शिक्षण या वरून त्या व्यक्ती आपला आर्थिक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न करतात. तसेच संस्कृती घटकानुसार व्यक्तीच्या मद्यपानाच्या सवयी, स्वतःकडे असणारे चारचाकी वाहन अथवा कोणत्या प्रकारचे वर्तमानपत्र वाचतात इ. सवयींच्या वरती, व्यक्ती तुलनात्मक विचार करून, तशा प्रकारच्या संस्कृतीचे आकलन करतात परंतु अशा सवयींच्यामुळे काही आर्थिक वस्तूंच्या वाढत्या मागणीमुळे नफा होतो. तर कांही वस्तूना मागणी नसल्याने तोटा होतो. त्यामुळे एखाद्या समाजाची आर्थिक रचना किंवा त्या ठिकाणच्या संस्कृतीमुळे निर्माण होणाऱ्या बाजारपेठातील वस्तू यामुळे समाजरचना तयार होत नसते, तर उत्पादकांचा वर्ग व्यक्तींच्या सवयी आणि गरजा विचारात घेवून, उत्पादन घेत असल्याने तशा स्वरूपाची आर्थिक रचना आकाराला येत असते.

अशाप्रकारे बोर्डिओ यांच्या Reflexsive Sociology या विचारामध्ये व्यक्ती आणि समाजरचना यांचा परस्परांवर परिणाम होत असताना समाजातील सांस्कृतिक घटक त्याला कशा प्रकारे जबाबदार असतात यासंबंधीचे विश्लेषण आढळते.

### क) Realist Social Theory वास्तववादी सामाजिक सिद्धांत

### मार्गरेट आर्चर आणि रॉयभास्कर

मार्गरेट आर्चर आणि रॉय भास्कर या दोन विचारवंताच्या 'वास्तववादी सामाजिक सिद्धांताचा आशय जाणून घेण्यापूर्वी, दोन्ही विचारवंतांच्या मांडणीमध्ये एक समान अभ्यासविषय आढळतो आणि तो म्हणजे, समाजरचना (Social Structure) या दोन अभ्यासकांनी, वास्तववादी दृष्टीकोनातून समाजरचने संदर्भात विचार स्पष्ट करताना, पुढीलप्रमाणे मांडणी केली आहे.

### अ) मार्गरेट आर्चर यांचा वास्तववादी सामाजिक सिद्धांत

१९८८ मध्ये मार्गरेट आर्चर यांनी, व्यक्ती (Agency) आणि समाजरचना (Structure) या सिद्धांताला नव्या दिशेने घेवून जाताना त्यांनी व्यक्ती (Agency) आणि संस्कृती (Culture) या दोन घटकांच्यामध्ये परस्पर संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचा हा सिद्धांत प्रामुख्याने, अन्थोनी गिडन यांच्या संरचनीकरणाच्या सिद्धांतावर टीका करण्यातून उदयास आला आहे.

आर्चर यांचा सिद्धांत समाज व्यवस्थेसंबंधीच्या (Social System) मधून उदयास आला आहे. यामध्ये समाज-व्यवस्थेमधील केवळ सामाजिक परिवर्तनाचा विचार न करता. त्यापुढे जाऊन समाजव्यवस्था कशा स्वरूपाच्या असू शकताात या संबंधी विश्लेषण आढळते. समाजामध्ये घडून येणाऱ्या व्यक्ती-व्यक्तींचा आंतरक्रियामधून समाजातील काही घटक परस्परापासून वेगळे होतील व त्यातून एक नवीन समाजरचना तयार

होत असते व अशी समाजरचना नव्याने निर्माण होणाऱ्या व्यक्ती-व्यक्तींच्या बदललेल्या आंतरक्रियांच्या नुसार पुढे कार्यरत रहाते. अशाप्रकारे समाज रचनांच्या मध्ये दीर्घ कालखंडापासून अशी प्रक्रिया घडत आली आहे. त्यामुळे समाजरचनांच्यामध्ये विविध प्रकारच्या बदलांचा क्रम सातत्याने घडत असल्याने, व्यक्ती-व्यक्तींच्या आंतरक्रियांवर देखील त्याचा परिणाम दिसून आल्याने त्याला संरचनीकरण असे म्हटले आहे.

गिडन आणि आर्चर यांच्या दोन्ही सिद्धांतामध्ये, मूलभूत फरक हा प्रामुख्याने दिसून येतो की, गिडन यांनी Agency आणि Structure या दोन संकल्पनाच्या साह्याने सिद्धांत मांडणी करताना, सिद्धांताची मांडणी दोन अर्थाने केली आहे. परंतू आर्चर यांच्या मते, व्यक्ती आणि समाजरचना या जरी समाजजीवनाच्या दोन बाजू असल्या तरी त्यांचे स्वरूप परस्परापासून भिन्न आहे. किंबहुना हे दोन घटक परस्परमध्ये सामावलेले आहेत. आर्चर यांनी गिडन यांच्या सिद्धांतावर टीका करताना, असे म्हटले आहे, त्यांच्या सिद्धांतामध्ये वारंवार व्यक्ती आणि समाजरचना या दोन संकल्पना स्वतंत्रपणे अभ्यासल्या आहेत. परंतू या दोन संकल्पनांचा परस्परांवर होणारा परिणाम जोपर्यंत विचारात घेतला जात नाही तोपर्यंत असे सिद्धांत उपयुक्त वाटत नाहीत. तसेच व्यक्ती आणि समाजरचना यांचा परस्परांवर परिणामच होत नाही असे अभ्यासकांना वाटते.

मार्गरेट आर्चर यांच्या मते गिडन यांनी वापरलेल्या दोन संकल्पना, एकूण समाज जीवनाचे विश्लेषण करण्याची भूमिका पार पाडतात. आर्चर यांच्या मते, व्यक्ती आणि समाजरचना यांच्यामध्ये दाखवला गेलेला भेद किंवा त्यांच्यामधील परस्पर संबंध, सर्वच कालखंडात, सर्वच समाज व्यवस्थांच्या मध्ये, एकत्रित आहे की भिन्न आहे यांचे मोजमाप केल्याखेरीज त्यांच्या मधला परस्पर संबंध आहे की, ते भिन्न आहेत याविषयी स्पष्ट विधान करता येत नाही. गिडन यांच्या सिद्धांतावर आणखी एक आक्षेपार्ह मुद्दा म्हणजे, संरचनीकरण ही पूर्णत्वाला जाणारी प्रक्रिया नसून, व्यक्ती आणि समाजरचना यांच्या मधील संबंधाचे सातत्याने दिशाहीन विश्लेषण आहे. त्यामुळे मार्गरेट आर्चर यांनी त्यांच्या विश्लेषणामध्ये व्यक्ती आणि समाजरचना असा परस्पर संबंध न अभ्यासता व्यक्ती आणि संस्कृती यांच्यातील परस्पर संबंधाची मांडणी केली आहे.

**मार्गरेट आर्चर यांचा व्यक्ती आणि संस्कृती घटकातील परस्पर संबंध**

त्यांच्या मते, गिडन यांच्या व्यक्ती आणि समाजरचना यांच्या परस्पर संबंधाच्या मांडणीमुळे व्यक्ती आणि संस्कृतीमधला संबंध नजरेआड झाला आहे. परंतु अनेक समाजशास्त्राचे अभ्यासक याच घटकाला विशेष महत्त्व देतात. वास्तविक अर्थाने समाजरचना आणि संस्कृती परस्परामध्ये सामावून गेलेल्या संकल्पना आहेत. परंतु समाजरचना म्हणजे, विशिष्ट हितसंबंधावर आधारित भौतिक विश्वाची संकल्पना आहे व संस्कृती ही अभौतिक स्वरूपाची विचारसरणीवर आधारीत संकल्पना आहे. त्यामुळे संस्कृती आणि समाज या केवळ दोन भिन्न संकल्पना नसून त्या स्वायत्त स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे या दोन संकल्पना 'स्वायत्त' या अर्थाने समजावून घेतल्या पाहिजेत. त्या केवळ परस्पर संबंधाच्या प्रभावातून विचारात घेवून चालणार नाही. समाजरचनेचे वारंवार विश्लेषण करत राहिल्यामुळे Cultural Sociology च्या अनुषंगाने करावे लागणारे विश्लेषण मागे पडले आहे. या प्रकारच्या विश्लेषणाला दुय्यम स्थान दिले गेल्याने व्यक्ती आणि संस्कृती यांच्यातील परस्पर संबंध बाजूला पडला आहे.

ज्याप्रमाणे गिडन यांच्या व्यक्ती आणि समाजरचना यांचा परस्पर संबंध स्पष्ट करतेवेळी, समाजरचनेमुळे

समाजातील व्यक्ती-व्यक्तींच्या आंतरक्रियावर कसा परिणाम होतो व व्यक्ती-व्यक्तींच्या आंतरक्रियांमधून समाजरचना कशी आकाराला येते याबद्दलची मांडणी, उलट अर्थाने मार्गरेट आर्थर यांनी त्यांच्या सिद्धांतामध्ये करताना सांस्कृतिक रचनेचा व्यक्ती-व्यक्तींच्या सामाजिक सांस्कृतिक आंतरक्रियावर कसा होतो व उलट अशा सामाजिक-सांस्कृतिक आंतरक्रियांच्यामधून, सांस्कृतिक रचना कशी तयार होते. याबद्दलची मांडणी आढळते. या दोन्ही सिद्धांतामध्ये, कालखंड (Time) हा घटक विचारात घेतला आहे. सांस्कृतिक रचनेचे घटक, व्यक्ती-व्यक्तीच्या मधील सांस्कृतिक संबंध विचारात घेवून मार्गरेट आर्चर यांनी आपले विचार मांडले आहेत.

तसेच आर्चर यांच्या मांडणीमध्ये समाज-व्यवस्था आणि त्यामधला संघर्ष या दृष्टीकोनातून विचार मांडले आहेत. त्यांच्या मते मानवी समाजरचनेमधल्या संस्कृतीचे वेगवेगळे घटक परस्परांशी एकजूट किंवा विरोधी असू शकतात. व त्यावरून त्या मधील व्यक्तींचे परस्पर संबंध समाजरचनेशी अनुकूल किंवा संघर्षात्मक आहेत हे समजून येते. तसेच अशा सांस्कृतिक संबंधाच्या स्वरूपावरून ते स्थायी स्वरूपाचे आहेत की ते बदलणारे आहेत याचा अंदाज घेता येतो. सांस्कृतिक समाजव्यवस्थेच्या अंगाने अभ्यास करताना, आर्चर यांनी व्यक्तींच्या सामाजिक-सांस्कृतिक क्रियांच्यावर होणारा परिणाम अभ्यासला आहे. व अशा आंतरक्रियांचा परिणाम व्यक्ती घटकावर कशा प्रकारे होतो. हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. व त्यानंतर अशा त्या व्यक्ती, सांस्कृतिक समाजव्यवस्थेत कशा प्रकारचा प्रतिसाद देतात. थोडक्यात व्यक्ती-व्यक्तींच्या मधील सामाजिक, सांस्कृतिक संबंधाचा, सांस्कृतिक व्यवस्थेवर कसा परिणाम होतो व सांस्कृतिक व्यवस्थेचा परिणाम म्हणून सामाजिक-सांस्कृतिक संबंध कसे प्रभावित होतात हा प्रमुख घटक आर्चर यांच्या सिद्धांतामध्ये होता. आर्चर यांच्या मते, सांस्कृतिक व्यवस्थेमधील व्यक्तीकडे अशी क्षमता असते की, ती व्यवस्थेवर दबाव आणू शकते किंवा व्यवस्थेकडून आलेल्या दबावाला प्रतिकार करू शकते.

मार्गरेट आर्चर यांनी, व्यक्ती आणि संस्कृती या घटकांचा व्यापक अर्थाने अभ्यास करताना, समाजातील व्यक्ती घटक संस्कृती आणि समाजरचना यांचे एकत्रित स्वरूपात विश्लेषण केले आहे. तसेच भविष्यात देखील जर एखाद्या अभ्यासकाला समाजरचना आणि संस्कृती यांच्यातील परस्पर संबंध स्पष्ट करावयाचा असेल तर या दोन्ही घटकांचा व्यक्तींच्या वर कसा परिणाम होतो हे मांडता येईल. आर्चर यांनी संस्कृती या घटकाची व्यापकता समाजव्यवस्थेपेक्षा व्यापक अर्थाने विचारात घेवून त्यांनी समाजव्यवस्थेचे सैद्धांतिक विश्लेषण केले आहे. त्यांनी समाजातील संस्कृती या घटकाचे तीन अर्थाने विश्लेषण केले आहे. (अ) संस्कृती एक अथवा व्यापक घटक आहे की जो व्यक्तीवर अप्रत्यक्ष परिणाम करणारा असतो. (ब) संस्कृतीशी संबंधित एखादा सांस्कृतिक समूह असा असतो की, जो आपला दृष्टीकोन, दुसऱ्या समूहावर लादण्याचा प्रयत्न करतो. (क) अन्थोनी गिडन यांनी स्वतंत्रपणे सामाजिक-सांस्कृतिक घटकांचे विश्लेषण नाकारल्यामुळे आर्चर यांनी व्यक्तींच्या आंतरक्रियांचे प्रतिबिंब सांस्कृतिक घटकांमध्ये आढळते हे स्पष्ट केले.

अशा प्रकारे मार्गरेट आर्चर यांच्या सिद्धांत मांडणीमध्ये एकूण चार घटक मुख्यत्वे आढळतात (अ) सांस्कृतिक व्यवस्था आणि त्यांच्या घटकांच्या मधील तार्किक स्वरूप, (ब) सांस्कृतिक व्यवस्थेचा सामाजिक-सांस्कृतिक संबंधावर होणारा परिणाम, (क) सामाजिक सांस्कृतिक पातळीवर समाजातील वेगवेगळ्या व्यक्ती आणि समूहांच्या मध्ये असणाऱ्या परस्पर संबंधाचे स्वरूप, (ड) व्यक्तींच्या सामाजिक-

सांस्कृतिक संबंधाच्यामधील बदलाचा परिणाम एकूण सांस्कृतिक व्यवस्थेवर होत असतो. अशा प्रकारे आर्चर यांच्या मांडणीमधून, व्यक्ती आणि संस्कृती यांच्यामधील परस्पर संबंधाची सुरुवात झालेली आढळते. परंतु समाजरचना आणि संस्कृती यांच्यातील संबंधाचे सविस्तर विश्लेषण होण्यासाठी म्हणून अधिक व्यापक पातळीवर सिद्धांताचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

अन्थोनी गिडन आणि मार्गरेट आर्चर या दोन अभ्यासकांच्या मांडणीमधला मूलभूत फरक जाणून घेतला असता. समाजशास्त्रामध्ये संरचनीकरण हा विचार किती व्यापक स्वरूपाचा आहे हे समजून येते. संरचनीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की, तिचे स्वरूप त्यामध्ये असलेल्या विविध घटकावर आधारित असते. उदा. संस्कृती, समाजरचना आणि व्यक्ती परंतु या तिन घटकापैकी, कोणत्या घटकाचा परिणाम कसा होतो किंवा एका विशिष्ट कालखंडात अथवा मानवी व्यवस्थेवर त्याचे स्वरूप किती परिणामकारक आहे. या सर्व विश्लेषणासाठी गिडन आणि आर्चर यांचे विचार महत्त्वपूर्ण आहेत. त्यांच्या वैचारिक मांडणीमध्ये वेगवेगळा दृष्टीकोन असला तरी, समाजरचना आणि त्यांचे संरचनीकरण हे भविष्यातील समाजशास्त्रीय अध्ययनासाठी अत्यंत उपयुक्त असे विश्लेषण आहे.

**ब) रॉय भास्कर यांचा सामाजिक-वास्तववादी दृष्टीकोन**

वास्तववादी सामाजिक सिद्धांताची मांडणी करण्यामध्ये, रॉयभास्कर हे एक विचारवंत आहेत. त्यांच्या दृष्टीकोनाचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

रॉयभास्कर यांचे नोव्हेंबर २०१४ साली निधन झाले. त्यांनी वास्तववादी स्वरूपामध्ये अनेक घटकाचे विश्लेषण केले आहे. त्यांच्या दृष्टीकोनाचा प्रभाव आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापक स्वरूपाचा आढळतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर असलेल्या अनेक अभ्यासकांच्या वरती रॉयभास्कर यांचा विचाराचा प्रभाव आढळतो. उदा. १९८७ साली अलेक्झांडर वेंडिग यांनी सर्व प्रथम ३० वर्षापूर्वी रॉयभास्कर यांचे विचार मान्य केले होते. त्याच प्रमाणे इतर कांही विचारवंताच्या मध्ये डेसलर १९८९, पॅटोमॅकी २००२, वेट २००६, कुरकी २००८ इ. अभ्यासकानी आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासासाठी भविष्यात अशा प्रकारच्या अभ्यासाची गरज निर्माण होण्यासंबंधी पूर्वकथन केले होते.

परंतु, वास्तवामध्ये तरूण अभ्यासक, सामाजिक वास्तववादी सिद्धांताचे टीकात्मक विश्लेषण करतात का? परंतु सध्या या सिद्धांताचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. शिवाय या सिद्धांताचे परिक्षण करताना, Pactice Theory, Pragmatism, Actor Network theory व New materalism सारख्या सिद्धांतानी टीकात्मक संशोधन केले आहे.

सामाजिक वास्तववादी सिद्धांत केवळ एक उत्तर-संरचनावादी सिद्धांत म्हणून सामाजिक विश्वासंबंधी (Social World) जे विचार मांडतो. त्या सामाजिक विश्वाबद्दलच्या सविस्तर कल्पना देण्याऐवजी केवळ वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणाऱ्या किंवा Knowledge (ज्ञान) देणाऱ्या सिद्धांतावर टीका करतो. त्यामुळे रॉय भास्कर यांचा वास्तववादी दृष्टीकोन, वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणाऱ्या शास्त्रांना दुय्यम स्थान देतो. शिवाय, वैज्ञानिक अभ्यास पद्धतीने अभ्यास करणाऱ्या शास्त्रांखेरिज दुसरा पर्यायी दृष्टीकोन मात्र देत नाही. त्यामुळे संशोधनामध्ये केवळ, चिंतन करून आजयर्पंत झालेल्या अभ्यासांना टीकात्मक संशोधनाद्वारे पहातात. त्यासाठी अभ्यास-पद्धतीद्वारे संशोधन करीत नाहीत. तसेच, वास्तववादी दृष्टीकोन किंवा सखोल चिंतनाच्या

साह्याने केलेली विधाने अथवा विचार जरी, बरोबर असली तरी, व्यवहारामध्ये अशाप्रकारच्या विचारांना फार कमी महत्त्व असते.

अशाप्रकारे रॉयभास्कर यांचे विचार कशाप्रकारे मांडणी करतात व त्या विचारांचा आंतरराष्ट्रीय संबंधासाठी कसा उपयोग होतो हे जाणून घेणार आहोत.

१) वास्तव स्वरूपातील समाज अभ्यासक्रमाच्या कल्पनेबाहेरचा असतो. रॉयभास्कर यांच्या वास्तववादी दृष्टीकोनामध्ये, कार्यप्रर्वततावादी (Constructivism) किंवा संरचनावादी उत्तरार्ध (Post structuralism) दिसून येतो व त्यानुसार समाजशास्त्र अभ्यासकांच्या विचारामध्ये 'समाज' अथवा विश्व बद्दल ज्या कल्पना किंवा अभ्यासाद्वारे ज्ञानातून ज्या कल्पना, संज्ञा, आहेत, त्यापेक्षा समाज किंवा विश्व ही एक स्वतंत्रपणे निर्माण होणारी आहे. त्यामुळे वेगवेगळा दृष्टीकोन घेवून, वेगवेगळ्या विचारांचे अभ्यासक त्यांच्याजवळ असलेल्या ज्ञानांच्या आधारे समाज अथवा विश्वाबद्दलचे सिद्धांत स्पष्ट करतात किंवा परस्परांच्या विचारांचे खंडन करतात. या उलट, कांही विज्ञानवादाचे (Positivism) समर्थन करणारे अभ्यासक यांनी समाजाचे स्वतंत्र अस्तित्व मान्य केले नसले तरी, त्यांच्या अभ्यासाची अनुभव प्रामाण्यता सिद्ध करण्यासाठी वास्तववादी दृष्टीकोनावर विशिष्ट मर्यादा ठेवल्या आहेत. त्यांनी त्यांच्या अनुभव प्रामाण्यता जपण्यासाठी समाजातील विविध घटनांच्या संकल्पनाचे, आणि घटनांच्यामधील गुंतागुंतीचे स्वरूप स्पष्ट करण्याकडे दुर्लक्ष केले आहे. याउलट, रॉयभास्कर यांचा वास्तववादी दृष्टीकोन हा आपल्या सभोवतालच्या मानवी विश्वाचे टीकात्मक परिक्षण करण्यावर भर देतो. अशाप्रकारे वास्तववादी दृष्टीकोन (Positivism) आणि रॉयभास्कर यांचा टीकात्मक वास्तववाद या दोन विचारसरणीमध्ये, आपल्या सभोवतालच्या समाजाचे केवळ ज्ञान अथवा माहितीच्या आधारे स्पष्टीकरण देता येत नाही, असा विचार नव्याने पुढे आलेला दिसतो.

२) रॉयभास्कर यांच्या टीकात्मक वास्तववादी दृष्टीकोनामध्ये, तात्त्विक मांडणीला महत्त्व देण्यात आले आहे. त्यांच्या मते, विज्ञानवाद दृष्टीकोन आपल्या सभोवतालच्या मानवी समाजाबद्दलचे ज्ञान एक विशिष्ट तयार केलेल्या अभ्यास पद्धतीच्या चौकटीतून अभ्यासत असले तर मानवी विश्वाबद्दलचे जे काही वादाचे मुद्दे असतील त्यांचा देखील अभ्यास होणे आवश्यक आहे. मानवी विश्वातील घटनांचे जे-जे म्हणून प्रश्न असतील त्या प्रश्नांचा उलगडा ज्ञानाच्या आधारे करता येतो. परंतु तो एका विशिष्ट अभ्यासपद्धतीच्या चौकटीत न रहाता चौकटीबाहेर असणाऱ्या ज्ञानाद्वारे केला पाहिजे. त्यामुळे रॉयभास्कर यांचा दृष्टीकोन, मानवी विश्वाबद्दल संपूर्ण विश्लेषण देतो व अद्यापपर्यंत आपण सर्व अभ्यासक, विज्ञानवादी दृष्टीकोनाच्या प्रभावाखाली असल्याने, त्यापासून वेगळ्या दिशेकडे घेवून जाण्याचा प्रयत्न टीकात्मक वास्तववादी दृष्टीकोनाने केलेला दिसतो.

३) रॉयभास्कर यांचा टीकात्मक वास्तववादी दृष्टीकोन हा मुख्यता विज्ञानवादी सिद्धांताच्या कार्य-कारण भाव या विचारावर टीका करतो. कारण विज्ञानवादी विचारामध्ये एखाद्या घटनेमागे असलेल्या विविध कारणांचा शोध घेताना, एखादी सा. घटना वेगवेगळ्या कारणांचा कसा परिणाम असतो याबद्दल विश्लेषण करतो. परंतु कांही सामाजिक घटनांच्या मागे, वर्तमान कारणांच्यापेक्षा, अनुवंशिक किंवा ऐतिहासिक कारणे असतात, परंतु अशा कारणांची चर्चा विज्ञानवादामध्ये, गृहीत धरली जात नाही. परंतु काही प्रमाणात अशी कारणे दृश्य स्वरूपात पडताळून घेता येत नाहीत. त्यामुळे टीकात्मक वास्तववादी दृष्टीकोन, विज्ञानवादाच्या

कार्य-कारण संबंधाच्या अभ्यासाला गुंतागुंतीचा, पूर्वनिर्धारीत, आणि विशिष्ट चाकोरीमध्ये अभ्यास करणार आहे अशी टीका करतो.

४) रॉयभास्कर यांच्या टीकात्मक वास्तववादी दृष्टीकोनानुसार विज्ञानवादी दृष्टीकोन मानवी विश्वाबद्दलचे सत्य (Reality) जाणून घेण्याचा प्रयत्न करतो व मानवी घटनांच्या मागील सत्य जाणून घेण्याची प्रक्रिया गुंतागुंतीची समजली जाते. तसेच एकूण मानवी विश्वाचे विश्लेषण विविध घटकांच्या अनुषंगाने तपासले जाते. त्यामुळे सा. घटनांच्या मागील सत्य जाणून घेण्यासाठीची विविध कारणे शोधली जातात. घटनांची अनुभव प्रामाण्यता संशोधकाने प्रत्यक्ष घटनांचे केलेले निरीक्षण, घटना घडत असतानाचा संबंध यावरून घटनांची सत्यता पडताळली जाते. परंतु घटनांची अनुभव प्रामाण्यता, केवळ त्या अनुभवाला येतात. यावरून ठरत नसते, कारण समाजातील कांही घटनां या, जशा प्रत्यक्ष निरीक्षणामध्ये दिसून येतात तसे त्यांचे स्वरूप असतेच असे नाही परंतु मानवी समाज जीवनातील घटनांच्या संबंधीचे निष्कर्ष, विज्ञानातील नियमांच्या चौकटीतून करता येत नाही. कारण भौतिक विश्वासंबंधीच्या घटना आणि मानवी विश्वाबद्दलच्या घटनां यामध्ये फरक असतो.

५) रॉयभास्कर यांचा टीकात्मक वास्तववादी दृष्टीकोन हा मुख्यता नव्याने उदयास येत असलेल्या समाज रचनांच्या अभ्यासासाठी उपयुक्त आहे. हा दृष्टीकोन केवळ विश्लेषणात्मक मांडणी नसून, त्यांची प्रचिती वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासामध्ये केली जाते. त्यामुळे या दृष्टीकोनाला आंतरराष्ट्रीय दृष्टीकोनातून महत्त्व प्राप्त झाले आहे. परंतु तो वेगळ्या सामाजिक परिस्थितीमधून या दृष्टीकोनाचे स्वरूप निश्चित होत असते. उदा. ज्याप्रमाणे आपल्या सभोवतालच्या नैसर्गिक घटनांचा अभ्यास विज्ञानामध्ये विचारात घेताना, तो नेहमीच निश्चित अशा संकल्पनाच्या आधारे होत आला आहे. पाणी ($H_2O$) या विज्ञान संकल्पनेमधल्या हायड्रोजन आणि ऑक्सीजन, या दोन मूलद्रव्यांना परस्परापासून अलगपणे स्पष्ट करता येत नाहीत. कारण त्या मूलद्रव्यांचे गुणधर्म कमी-जास्त करता येत नाहीत. त्याचप्रमाणे जर सामाजिक शास्त्रांच्यामध्ये अर्थशास्त्र आणि शासन व्यवस्था यांच्यातील संबंध स्पष्ट करताना समाजातील आर्थिक संबंधावरून शासन व्यवस्थेचे स्वरूप निश्चित होते. हे स्पष्ट करतााना संशोधकाला अशा घटनांचे स्वरूप स्पष्ट करताना, स्वतःच्या काही मर्यादा असतात.

६) टीकात्मक वास्तववादी सिद्धांत, घटनेमागील सत्य विविध प्रकारच्या घटकांवर अवलंबून असते असे मत मांडतो, तसेच आपले सभोवतालचे मानवी विश्व, बौद्धीक असून, ते सर्वांसाठी संशोधनाला खुले आहे. तसेच आपले ज्ञान आणि आपल्या भोवतालचे विश्व या दोन भिन्न संकल्पना असून, टीकात्मक वास्तववादी सिद्धांत सभोवतालचे विश्व वेगळे पहातो. आपल्या सभोवतालच्या विश्वाबद्दलचे ज्ञान अथवा माहिती अर्थपूर्ण असून ज्या विश्वामधून माहिती मिळाली ते अर्थपूर्ण नाही. असे ज्या वेळेस म्हटले जाते त्यावेळी विज्ञानवादी दृष्टीकोन विचारात घेणाऱ्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, ज्ञानाची प्रतवारी ते कोणत्या पद्धतीवर अवलंबून नसून ज्या मानवी विश्वाबद्दल ज्ञान संकलित केले त्या मानवी विश्वाला महत्त्व असते. विज्ञानवादी दृष्टीकोन, मानवी घडामोडींचा केवळ अभ्यास करीत नाही तर अशा प्रकारच्या मानवी घडामोडींचा खोलवरपर्यंत अभ्यास करीत असते. मानवी समाजातील व्यक्तींच्या श्रद्धा आणि विविध घटनांच्यामध्ये असणारे त्यांचे संबंध यांचे बौद्धीक पातळीवर संशोधन केले जाते. त्यामध्ये जर नैसर्गिक शास्त्रातील शोध लावणारे शास्त्रज्ञ विचारात घेतले तर, ते कार्यकारण संबंध आणि गृहीतकांचा आधार घेवून

कशा प्रकारे संशोधन करतात याची कल्पना असते. परंतु याच पद्धतीने मानवी विश्वाबद्दलचे संशोधन करणारे संशोधक ज्यावेळी नैसर्गिक शास्त्राप्रमाणे मानवी घटनांचे संशोधन करतात, त्यांना त्या प्रकारचे कौशल्य असणे आवश्यक समजले जाते.

७) टीकात्मक वास्तववाद मानवी विश्वातील व्यक्ती संबंधाचे स्वरूप मान्य करतो. परंतु अशा प्रकारच्या सामाजिक संबंधातून तयार होणारी समाजरचना नैसर्गिक शास्त्रातील एखाद्या रचनेसारखी नसते. त्यामुळे व्यक्ती-व्यक्ती संबंधापासून वेगळे अस्तित्व समाजरचनांचे असत नाही. उलट व्यक्तीकडून होणाऱ्या काही हेतू पुरस्कर घटनांचे परिणाम समाजरचनेवर होत असतात. त्यामुळे सा. शास्त्रांचे स्वरूप नैसर्गिक शास्त्रांच्या तुलनेत व्यक्तीसापेक्ष (Subjective) स्वरूपाचे असते. तसेच सामाजिक रचनांचे स्वरूप स्थल, काल, परिस्थितीनुसार बदलणारे असते.

८) समाजरचना आणि व्यक्ती यांच्यावर आधारीत सिद्धांतासंबंधी रॉयभास्कर यांनी व्यक्तींच्या बदलणाऱ्या कृती या अभ्यास मांडणीतून स्पष्टीकरण केले आहे. त्यानुसार समाजरचना या व्यक्तींच्या कृतीमुळे बदलत असतात. परंतु रॉयभास्कर यांच्या मते केवळ व्यक्ती आणि समाजरचना यांच्यामधील परस्पर संबंधाचे स्वरूप स्पष्ट करणे व व्यक्तींच्या कृतीचा परिणाम समाजरचनेवर होतो. असे म्हणणे सर्वअर्थाने बरोबर नाही. कारण व्यक्तींच्या कृती, जाणीवपूर्वक अथवा अजाणीवपूर्वक कोणत्या या संबंधी जोपर्यंत स्पष्टीकरण दिले जात नाही तोपर्यंत योग्य अर्थ स्पष्ट होत नाही. कारण व्यक्तींच्या अजाणीवपूर्वक (unconciousness) कृतींच्या मधूनच समाजरचना आकाराला येत असतात. समाज ही संकल्पना स्पष्ट करताना रचना (structure) practices (सा. घडामोडी) आणि Convention सोयीप्रमाणे बदलणाऱ्या असतात, की ज्यामध्ये व्यक्तींच्या कृतींना स्वतंत्र स्थान नसते. परंतु व्यक्तींच्या कृती या स्थल, काल परीस्थिती अनुरूप, घडून येणाऱ्या असतात. तसेच व्यक्तींच्या कृती, समाजात व्यक्ती ज्या पदावर असते त्याला अनुरूप विशिष्ट कर्तव्ये, भूमिका आणि जबाबदाऱ्या अंगीकृत करते.

९) टीकात्मक वास्तववादी दृष्टीकोनामध्ये, केवळ अनुभवप्रामाण्यता हाच एकमेव दृष्टीकोन विचारात न घेता एकापेक्षा अधिक दृष्टीकोनाचा स्वीकार केला आहे. त्यांच्या मते, विज्ञानवादी दृष्टीकोनाला, आव्हानात्मक मांडणी करण्याचा प्रयत्न नसून, विज्ञानवादी दृष्टीकोनामध्ये संख्यात्मक माहितीला देण्यात येणारे अवास्तव महत्त्व चुकीचे आहे. सिद्धांत आणि वैज्ञानिक पद्धतीद्वारे मानवी रचनेचे स्पष्टीकरण देताना आकडेवारी संकल्पनांचे स्पष्टीकरण देत असतो. परंतु त्याद्वारे सर्वच घटनांचे अथवा समाजाच्या सर्व घटकांचे स्पष्टीकरण होतेच असे नाही. अशावेळी, समाजाच्या विविध अंगाचे स्पष्टीकरण सुद्धा विविध अंगी दृष्टीने केले पाहिजे. वैज्ञानिक पद्धती या केवळ ज्ञान मिळवण्याचे साधन असल्याने, ज्या घटनांचे निरीक्षण करणे शक्य नाही त्याबद्दलची सैद्धांतिक मांडणी विविध संकल्पनाच्या साह्याने केली पाहिजे.

१०) रॉयभास्कर यांच्या मते, वास्तववादावरील विश्वाची संकल्पना, मानवी ज्ञानातून मांडलेल्या विश्वाच्या कल्पनेपेक्षा भिन्न आहे. तसेच वैज्ञानिक अभ्यासातून अभ्यासकांनी मानवी विश्वाचे जे स्वरूप मांडले आहे ते तशाच प्रकारचे आहे. याबद्दल आपण खात्रीपूर्वक सांगू शकत नाही. त्यामुळे संरचनावादाच्या उत्तरार्धामध्ये आपण अजूनही सामाजिक घटनांचे वैज्ञानिक स्पष्टीकरपण देऊ शकतो. परंतु हे स्पष्टीकरण विज्ञानवादी दृष्टीकोनामध्ये नसून, आज ज्या प्रकारचे मानवी विश्व आहे त्यासंबंधी असणाऱ्या ज्ञानामध्ये आहे. Judgemental Rationalism म्हणजे, मानवी विश्वाबद्दलचा वैज्ञानिक अंदाज आपण करू शकतो व

त्याद्वारे मानवी विश्वाबद्दलची, विश्वामध्ये असणाऱ्या व्यक्तींचे काय अंदाज आहेत.

११) अशाप्रकारे, रॉयभास्कर यांनी टीकात्मक वास्तववादी दृष्टीकोनातून, विज्ञानवादी दृष्टीकोनातील दोषावर जी टीका केली आहे त्याचे स्वरूप आणि संरचनात्मवादाच्या उत्तरार्धामधील मांडणी यामध्ये साम्य आढळत असले तरी १९९३ नंतरच्या रॉयभास्कर यांच्या मांडणीमध्ये, ज्या संकल्पना मांडल्या त्यामध्ये अनिश्चितता नव्हती त्या निर्विवाद स्वरूपाच्या होत्या. त्यामुळे त्यामध्ये शक्यतेपेक्षा नेमकेपणा अधिक आहे. त्यामुळे रॉयभास्कर यांचा दृष्टीकोन Problem Solving approach की जो सामाजिक घटनांचे as they are अवलोकन करतो. अशाप्रकारे रॉयभास्कर यांचा दृष्टीकोन हा (Positivism) किंवा विज्ञानवादाचे टीकात्मक परिक्षण करताना, अत्यंत बारकाईने सर्व दृष्टीकोनाची मांडणी केली आहे.

## ३.३ सारांश

समाजरचना (Stracture) आणि समाजातील व्यक्ती (Agency) या युनिट मध्ये, ज्या अभ्यासकांनी आपले विचार स्पष्ट केले आहेत. त्यामध्ये, अन्थोनी गिडन, पेरी बोर्डिओ, मार्गरेट आर्चर आणि रॉयभास्कार यांचा समावेश केला आहे. या युनिटमधून समाजरचना (Structure) आणि Agency (व्यक्ती) अशा ज्या दोन घटकांचा विचार केला आहे. त्यामध्ये हे दोन्ही घटक, समाजशास्त्रीय मांडणीला वेगळा अर्थ देऊ शकतात असा दावा सुरुवातीपासून म्हणजे १७ व्या शतकामध्ये समाजशास्त्राच्या अभ्यासातील प्रमुख विचारवंत, कार्ल मार्क्स, ऑगस्ट कॉम्त, एमिल डरखायिम व अन्य काही अभ्यासक Society (समाज) हा घटक प्रमाण मानून समाजशास्त्रीय विश्लेषण करीत होत्या.

परंतु जर्मन समाजशास्त्रज्ञ मॅक्सवेबर यांनी, वर्तन (Behaviour) हा घटक व्यक्ती (Individual) च्या संदर्भात अभ्यासणे आवश्यक आहे. कारण सा. घटनांची केवळ आकडेवारी सा. घटनांच्या मागील सत्य उघड करू शकत नाही. त्यासाठी घटनेत सहभागी असणाऱ्या व्यक्तीच खऱ्या अर्थाने घटनांचे स्वरूप निश्चती करतात, म्हणून व्यक्ती वर्तनमागील उद्देश देखील विचारात घेणे गरजेचे आहे असा नविन विचार प्रवाह समाजशास्त्रामध्ये सुरू झाला. त्यामध्ये कांही मानसशास्त्राचे अभ्यासक 'वर्तनवादी' विचारांचे समर्थक म्हणून समाजशास्त्रामध्ये विचार मांडू लागले.

थोडक्यात, समाजशास्त्रीय अभ्यासाचा प्रमुख आधार. समाजरचना (Structure) किंवा समाज (Society) आहे असे समजणाऱ्या अभ्यासकांना Macro Sociologist समजले जाऊ लागले. त्यातून समाजशास्त्रीय अभ्यास मांडणीमध्ये जे दोन परस्पर विरोधी विचार प्रवाह निर्माण झाले त्यांना व्यक्तीसापेक्षता (Subjectivity) आणि Objectivity (वस्तुनिष्ठता) Macro theory (व्यापक सिद्धांत) व Micro theory (सूक्ष्म सिद्धांत) यांच्यामध्ये, परस्पर विरोधी समाजशास्त्रीय लिखाण होऊ लागले व आजदेखील असा परस्परविरोधाभास अभ्यासकांमध्ये आढळतो.

संरचनीकरण (Structuration) हा एक नवा विचारप्रवाह, रूढ होऊ लागला. त्यामध्ये, समाजरचनेची प्रक्रिया किंवा बदल हा चालूच असतो. परंतु यामध्ये समाजरचना आणि व्यक्ती (Structure & Agency) हे परस्पर विरोधी म्हणून न अभ्यासता, दोन्हींच्यामधील परस्परपूरकता स्पष्ट करणारा विचार अन्थोनी गिडनच्या विचारांतून आला. त्यांच्या सिद्धांतामध्ये, दोन्ही घटनांचे महत्त्व समाजरचनेसाठी कसे आवश्यक असते याबद्दलचे स्पष्टीकरण आढळते.

त्यानंतरचे अभ्यासक पेरी बोर्डिओ यांनी Reflexsive Sociology म्हणजे व्यक्ती आणि समाजरचना यांच्यातील संबंधाचे स्वरूप वेगळ्या स्वरूपामध्ये व्यक्त करताना, व्यक्तीसापेक्षता (Subjectivity) आणि वास्तववाद (Objectivity) यामधील वादाला पूर्ण विराम देऊन, समाजरचनेचा विचार व्यक्तींच्या मनात एक असतो तर वास्तवामध्ये समाजरचना आहे त्याच स्वरूपात कार्य करीत असते. परंतु, व्यक्तींच्या मनातील कल्पना समाजरचनांच्या मधून तयार झालेल्या असतात. त्यामुळे समाजरचना (Structure) हा घटक व्यक्तीपेक्षा कसा प्रभावी ठरतो हे त्यांच्या विचारातून स्पष्ट होते.

नंतरचे अभ्यासक मार्गरेट आर्चर यांनी, व्यक्ती आणि समाजरचना या दोन घटकांना जोड देणारा संस्कृती (Culture) हा घटक कसा उपयुक्त ठरतो. हे, त्यांनी आपल्या विचारातून स्पष्ट करतात, समाजरचना (Structure) व व्यक्तीवर्तन (Behaviour) या दोन्हीचा संबंध संस्कृती (Culture) या घटकाशी कसा असतो. या बद्दलचा विचार संरचनीकरणामध्ये येतो.

रॉयभास्कर यांचे विचार उत्तर-आधुनिकवादी (Post structural) म्हणून संबोधले जातात यामध्ये १९ व्या शतकातील विचारवंतांची समाजशास्त्राची मांडणी विज्ञानवादावर (Positivison) वर करताना, समाजशास्त्र हे एक विज्ञान आहे व ते अनुभवावर आधारीत घटनांचा कार्यकारण संबंधाद्वारे विश्लेषण करते असा जो एक वास्तववादी दृष्टीकोन होता त्यांचे टीकात्मक विश्लेषण करताना ज्या मानवी विश्वाबद्दल शास्त्रीय दृष्टीकोन तयार केला जातो. ते मानवी विश्व (Human World) एक स्वतंत्र व्यवस्था आहे व ती स्वयंचलित असते. आपण संशोधक आपल्या Knowledge किंवा ज्ञानांच्या चौकटीतून मानवी विश्वाबद्दलच्या ज्या कल्पना किंवा गृहीतके मांडतो, तशा नियमबद्ध आणि आकडेवारीतून विश्वाचे सिद्धांत मांडू शकत नाही. थोडक्यात १७ व्या शतकामध्ये, ज्या समाजशास्त्रीय अभ्यासकांनी वैज्ञानिक अभ्यासपद्धती ज्या पद्धतीने जोर दिला होता त्या वस्तुनिष्ठ दृष्टीकोनाचे टीकात्मक विश्लेषण रॉयभास्कर यांच्या विचारामध्ये आढळते.

सद्य-स्थितीला संरचनीकरणाचा सिद्धांत हा उपयुक्ततावादी दिसतो. कारण, समाजशास्त्रीय अभ्यासाला आशय, सुरुवातीला जो एका वैज्ञानिक पद्धतीला महत्त्व देत होता ते महत्त्व गृहीत धरूनच समाजरचनांचा अभ्यास केला पाहिजे. फक्त त्या पद्धतींचे अवास्तव महत्त्व न पहाता आंतरविद्याशाखीय, दृष्टीकोनातून (Interdisciplinary Approach) सामाजिकशास्त्रांचा अभ्यास करताना, सा. घटनांचा, समाजरचनांचा आणि आधुनिक बदलत्या मानवी विश्वाचा विचार समाजशास्त्रामध्ये अपेक्षित आहे. त्यामुळे संरचनीकरण ही अखंडपणे चालणारी प्रक्रिया आहे. त्याचप्रमाणे, ज्या एका नाविन्यपूर्ण अभ्यासांच्याद्वारे, वरील सिद्धांताची मांडणी केली आहे. ती सुरुवातीच्या समाजशास्त्राइतकीच दमदार आहे. संशोधक आणि अभ्यासकांनी याच सिद्धांताचा पाठपुरावा करून समाजशास्त्रीय विचारामध्ये नवीन भर टाकली पाहिजे. एकूणच नव्याने तयार होत असलेले समाजशास्त्र पूर्वीच्या काही विचारांना अथवा तथ्यांना वेगळे स्वरूप देताना, संकल्पनात्मक मांडणी आणि त्यांना वास्तवाची जोड कायम ठेवतात. त्यामुळे या सिद्धांताचे महत्त्व समाजशास्त्रामध्ये महत्त्वाचे वाटते.

## ३.४ पारिभाषिक संज्ञा

१) **संरचना** (Structure) : मानवी समाजरचनांचा आकार.

२) **व्यक्ती** (Agency) : समाजाचे माध्यम, किंवा समाजाचा घटक.

३) **कालखंड आणि ठिकाण** (Time & space) : सा. घटनाचा अर्थ ठरवणारे निर्धारक घटक.

४) **विवेकता** (Rationality) : वैज्ञानिक पातळीवर घटनांचे विश्लेषण

५) **व्यक्तीसापेक्षता** (Subjectivity) **व वस्तुनिष्ठता** (Objectivity) : विज्ञानातील तथ्यांचे निकष ठरवणारे घटक.

६) **सामाजिक घडामोडी** (Social Practices) : समाजातील व्यक्तींच्या कृती

७) Habitus : व्यक्तीमनातील मानवी विश्वाबद्दलच्या कल्पना

८) Field : व्यक्तीमनाबाहेर असलेल्या मानवी विश्वाचे स्वरूप

९) Reflexsive Sociology : परस्परांना प्रभावित करणारे शास्त्र

१०) **सामाजिक वास्तवादी दृष्टीकोन** (Realist objective Approach) : समाजातील वास्तवतेबाबतचे विश्लेषण

११) **मानवी विश्व** (Social Word) : आपल्या सभोवतालचे मानवी समाज

१२) **अंदाजावर आधारीत विज्ञानवाद** (Judgemental Rationalism) : संशोधकाने आपल्या अभ्यासावरून घेतलेला घटनेबद्दलचा अंदाज.

१३) **उत्तर–संरचनावाद** (Post-structuralism) : समाजरचनेबाबतचे नव्याने मांडलेले विचार किंवा जुना समाजरचनांचे टीकात्मक परिक्षण

## ३.५ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

### ३.२.१.१ रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१) अन्थोनी गिडन यांच्या विचारामध्ये ............. दोन घटकांचा एकत्रित विचार केला आहे.

२) 'Constitution of society' ग्रंथ ........... यांनी लिहला.

३) गिडन यांच्या मते ............ या दोन घटकांच्यामुळे सा. घटनांचे स्वरूप बदलते.

४) गिडन यांच्या मते ............. हे दोन घटक व्यक्तींच्या विचारांना चालना देतात.

५) ................ संबंध 'व्यक्ती' आणि 'समाज रचना' यांचे असतात असे गिडन म्हणतात.

### ३.२.२.२ रिकाम्या जागा भरा.

१) 'व्यक्तीसापेक्षता' आणि 'वस्तुनिष्ठता' यांच्यातील परस्पर संबंध ........... यांच्या सिद्धांतामध्ये स्पष्ट केला आहे.

२) व्यक्तीच्या दैनंदीन कृती ............ सिद्धांतामधील महत्त्वाचा घटक आहे.

३) बोर्डिओ यांच्या मते ................. हे घटक समाजरचनेचे आहेत.

४) मानवी इतिहासातील घटनांचे महत्त्व ............ सिद्धांतामध्ये महत्त्वाचे आहे.

५) बोर्डिओ यांनी ............ बदलत्या समाजरचनांचे दोन प्रकार स्पष्ट केले.

**३.२.३.३ जोड्या जुळवा**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) मार्गरेट आर्चर | १) विज्ञान वादावर टीका |
| २) रॉय भास्कर | २) मार्गरेट आर्चर |
| ३) टीकात्मक वास्तववाद | ३) मानवीविश्व |
| ४) संस्कृतीक समाजशास्त्र | ४) रॉय भास्कर |
| ५) उत्तर-संरचनावाद | ५) संस्कृती घटक |

## ३.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.२.१.१

१) व्यक्ती आणि समाज रचना

२) अन्थोनी गिडन

३) कालखंड आणि ठिकाण

४) इच्छा आणि गरजा

५) परस्परपूरक

३.२.२.२

१) पेरी बोर्डिओ

२) बोर्डिओ

३) मानवी इतिहास

४) बोर्डिओ

५) व्यक्तीच्या मनातील रचना आणि समाजरचना

३.२.३.३ जोड्या जुळवा

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) मार्गरेट आर्चर | - संस्कृती घटक |
| २) रॉय भास्कर | - विज्ञानवादावर टीका |
| ३) टीकात्मक वास्तववाद | - रॉय भास्कर |

४) सांस्कृतिक समाजशास्त्र – मार्गरेट आर्चर

५) उत्तर – संरचनावाद – रॉय भास्कर

### ३.७ सरावासाठी स्वाध्याय

समाजशास्त्राचे बदलते अध्ययन जाणून घेण्यासाठी, पाश्चात्य विचारवंताच्या समाजशास्त्राविषयी असणाऱ्या मूलभूत संकल्पनांचा अर्थ सुरुवातीला समजून घेण्यासाठी. त्यांच्या मूलभूत सिद्धांताचे अध्ययन करा. त्यानंतर नव्याने समाजशास्त्रीय विचार मांडताना मूळच्या संकल्पनांच्या मधील अर्थ संरचनाकरण विचार कसा मांडला आहे. त्यामध्ये अभ्यासकांनी कशाप्रकारे टीकात्मक विश्लेषण केले आहे व कोणत्या नवीन संकल्पनाची मांडणी केली आहे हे जाणून घ्यावे.

### ३.८ संदर्भ ग्रंथ


१. Ritzer Geogre (2000) Sociological Theory, New York, McGraw-Hill.

२. Collins, Rardall (1997) Sociological Theory, Rawat Jaipur & New Delhi.


❑❑❑

## सत्र ४ : घटक ४
## संरचनावाद आणि उत्तर-संरचनावाद
## Structuralism and Post-Structuralism


घटक संरचना :

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ संरचनावाद : सौसर आणि क्लाउड-लेवी स्ट्रॉस

४.२.२ दरिदा : भेद आणि विखंडन

४.२.३ मिशेल फूको : विमर्श, ज्ञान आणि शक्ती.

४.३ सारांश

४.४ स्मरणार्थ संज्ञा

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

४.६ स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


**४.० उद्दिष्टे :**

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हाला,

- संरचनावादा संबंधीच्या सौसर आणि क्लाउड लेवी स्ट्रॉस यांच्या प्रमुख कल्पनांचे आकलन होईल.
- दरिदा यांच्या भेद आणि विखंडन या संकल्पना स्पष्ट करता येतील.
- मिशेल फूको यांच्या विमर्श, ज्ञान आणि शक्ती या संकल्पनाचे स्वरूप विशद करता येईल.

**४.१ प्रास्ताविक :**

संरचनावाद आणि उत्तर संरचनावाद हे समाजशास्त्रातील अलिकडील काळातील महत्त्वपूर्ण असे प्रवाह (Trends) आहेत. संरचनावादाचा उदय १९६० च्या सुमारास फ्रान्समध्ये झाला व त्याचा विकास हा फ्रान्सबरोबरच ब्रिटनमध्ये झाला. फ्रेंच तत्त्वज्ञ जीन पाल सार्त्र (१९०५-१९८५) यांनी मांडलेल्या अस्तित्त्ववादी

विचारांना विरोध करण्याच्या भूमिकेतून संरचनावाद उदयास आला. सार्त्र यांनी ''व्यक्ती जे काही करते तो तिचा निर्णय असतो. त्या निणर्यावर संरचनेचा किंवा समाजाचा कोणताही दबाव नसतो.'' असे मत प्रारंभी मांडले. पुढे त्यांच्यावर कार्ल मार्क्स प्रभाव पडला व त्यांनी आपल्या मतात बदल केला व असे म्हटले की, व्यक्ती मूलत: स्वतंत्र असते पण तिच्यावर दमनकारी संरचनांचा दबाव पडून तिच्या कृतीवर मर्यादा पडतात. असे असले तरी सार्त्रनी समाजाची किंवा संरचनेची भूमिका अतिरंजित स्वरूपात मांडू नये असेच म्हटलेले आहे. मार्क्स प्रमाणेच सार्त्रही मानवतावादी व मानव मुक्तीचे पुरस्कर्ते होते. सार्त्रच्या या मानवतावादी व अस्तित्त्ववादी विचारांना विरोध म्हणून संरचनावाद उदयास आला.

**संरचनावादाचा आशय :**

संरचनावादाच्या पुरस्कर्त्यांच्या मते, व्यक्तीला कोणतेही स्वातंत्र्य नाही. ती समाजसंरचनेच्या हातातील बाहुली आहे. सार्त्रच्या अस्तित्त्ववादी विचारात व्यक्ती केंद्रस्थानी आहे तर संरचनावादात समाजसंरचना केंद्रस्थानी आहे. थोडक्यात व्यक्ती विरुद्ध संरचना या वादात संरचनावाद हा समाजाच्या किंवा संरचनेच्या निर्णायक शक्तीवर जोर देतो. फर्डिनंड ही सौसर, क्लाऊड लेवी स्ट्रॉस, नॅडेल पीअरे बोरदियू, पीटर ब्लॉ इत्यादी संरचनावादाचे पुरस्कर्ते आहेत.

**उत्तर – संरचनावाद :** पुढे मानवशास्त्रज्ञांनाचा संरचनावाद व संरचनात्मक मार्क्सवाद या दोन प्रवाहातून उत्तर – संरचनावाद हा नीवन प्रवाह उदयास आला आहे. अनेकदा उत्तर संरचनावाद व उत्तर आधुनिकतावाद ह्या दोन्ही संज्ञा पर्यायी संज्ञा म्हणून अनेकजन वापरतात. कारण या दोन्ही संकल्पनाच्या विषय सामग्रीत विशेष भेद नाही. दोन्हीचाही उद्देश उत्तर–आधुनिक समाजाचे स्वरूप समजावून घेणे हाच आहे. आधुनिक समाज हा उत्तर–आधुनिक समाजात परावर्तीत झाल्यानंतर त्याचे स्वरूप समजावून घेताना संरचनावाद अपूरा पडू लागला. त्यामुळे उत्तर–आधुनिक समाजाचे स्वरूप समजावून घेण्यासाठी संरचनावाद हा उत्तर–संरचनावादात परिवर्तीत झाला. ल्योटार्ड, बोडिलार्ड, जेमेसन दरिदा, मिशेल फूको इत्यादी उत्तर–संरचनावादाचे पुरस्कर्ते आहेत.

या घटकात तुम्ही संरचनावादी विचारवंत सौसर व स्ट्रॉस आणि उत्तर–संरचनावादी विचारवंत दरिदा व फूको यांचे विचार अभ्यासणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन :

विवेचनाच्या दृष्टीने या घटकाचे तीन विभाग पाडलेले आहेत. पहिल्या विभागात सौसर व स्ट्रॉस यांचे संरचनावादी विचार मांडलेले आहेत. दुसऱ्या विभागात दरिदा यांचा भेद व विखंडन या संकल्पना स्पष्ट केलेल्या आहेत. तर तिसऱ्या विभागात मिशेल फूको यांच्या विमर्श, ज्ञान व शक्ती या संकल्पनांची चर्चा केली आहे.

### ४.२.१ सौसर व स्ट्रॉस यांच्या प्रमुख कल्पना : (Major Ideas of Saussur and Strauss)

प्रास्ताविकात नमूद केल्याप्रमाणे सौसर व स्ट्रॉस हे संरचनावादी विचारवंत आहेत. या दोघांच्या संरचनावादासंबंधीच्या प्रमुख कल्पनांची किंवा विचारांची आपण याठिकाणी चर्चा करणार आहोत. त्यासाठी

प्रथम संरचनावादाचे स्वरूप थोडक्यात समजावून घेऊ.

**संरचनावाद : (Structuralism)**

संरचनावादानुसार व्यक्तीला स्वातंत्र्य नसते. व्यक्ती जे कांही निर्णय घेते, जी कृती किंवा वर्तन करते, त्यावर समाजसंरचनेचा प्रभाव / दबाव पडत असतो. अशा या समाज संरचनेचे (Social Structure) समाजशास्त्रीय विश्लेषण म्हणजे संरचनावाद होय असे म्हणता येते. ''मानवी क्रियांवर समाजसंरचनेचा जो प्रभाव पडतो त्याचे विश्लेषण म्हणजे संरचनावाद होय.'' संरचनावाद हा असा पद्धतीशास्त्रीय व सैद्धांतिक दृष्टिकोन आहे ज्यामध्ये संरचनेच्या मानवी क्रियांवरील प्रभावाचे सखोल विश्लेषण केले जाते. समाजसंरचनेचे वास्तविक स्वरूप निर्धारित करणे हा संरचनावादाचा उद्देश आहे.

संरचनावादात संरचनेची संकल्पना केंद्रस्थानी आहे. पण संरचनेच्या अर्थाबाबत मोठी मतभिन्नता आढळते. यासंदर्भात एस. एफ. नॅडेल (Nadel) त्यांच्या The thoery of Social Structure (1958) या ग्रंथात म्हणतात की, ''संरचना ही तांत्रिक संज्ञा (Technical Term) असून ती निश्चित अर्थाने वापरली पाहिजे.'' तथापि, ही संज्ञा सामाजिक शास्त्रांबरोबरच तत्त्वज्ञान, साहित्य, संस्कृती, मानवशास्त्र इत्यादीत वापरली जाते. त्यामुळे तिचा सर्वमान्य होईल असा अर्थ देणे कठीण आहे.

येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे व ती म्हणजे समाजशास्त्रात प्रकार्यवादी विचारवंत संरचनेचा जो अर्थ घेतात तो अर्थ संरचनावादामध्ये अभिप्रेत नाही. प्रकार्यवादी विचारवंत हे प्रकार्यास संरचनेशी जोडतात. मर्टन जेंव्हा संरचना व प्रकार्य यांची चर्चा करतात तेंव्हा ते संरचना म्हणजे जी प्रकार्यामुळे निर्माण होते ती असा अर्थ घेतात. मात्र संरचना ही संज्ञा जेंव्हा सरळपणे वापरली जाते तेंव्हा ती प्रकार्य या संज्ञेशी जोडली जात नाही.

**नॅडेल** यांच्या मते संरचना म्हणजे विविध भाग (Parts) व्यवस्थीतपणे जोडले जाणे होय. कोणत्याही समग्रतेत (Totality) अनेक भाग असतात. त्या भागांमध्ये परस्परसंबंध असतात आणि हे भाग संरचनेची निर्मिती करतात. संरचना ही साधारणत: अपरिवर्तनीय असते. मात्र तिचे भाग हे परिवर्तनशील असतात. नॅडेल पुढे म्हणतात की समाजात अनेक व्यक्ती असतात. त्या नियम व उपनियमांद्वारे बांधलेल्या असतात. नियमभंग करणाऱ्या व्यक्तीस समाज शिक्षा करतो. समाजातील सर्व व्यक्तींना एका सुत्रात बांधण्याचे काम हे नियम करतात. म्हणजेच व्यक्तीच्या वर्तनावर समाजाचे म्हणजेच संरचनेचे नियंत्रण असते. समाजाचे विविध नियम-उपनियम, रूढी परंपरा हे संस्थात्मक रूप धारण करतात. या अर्थाने विचार करता समाजसंरचना ही सामाजिक संबंधाची निर्मिती आहे व अशी निर्मिती म्हणजेच समाजसंरचना व्यक्तींच्या व्यवहाराचे नियंत्रण करते.

**टर्नर** यांच्या मते व्यक्ती व समूह यांच्यातील सामाजिक आंतरक्रिया व सामाजिक संबंध जे समाजात चालत आलेले असतात तेच संरचना आहेत.

**रुथा वेलेस व एलिसन वूल्फ** यांच्या मते दैनंदिन व्यवहाराविषयी आपला जो अनुभव आहे त्याचे सार समाजसंरचना आहे.

**संरचनावादाचे दोन संप्रदाय :** संरचनेच्या अर्थाबाबत दोन संप्रदाय आहेत.

**१. युरोपियन संप्रदाय :**

या संप्रदायानुसार संरचनेचा मूळ आधार मनुष्याचे विचार व भाषा आहेत. जगातील सर्व वस्तू तसेच आपल्या सामान्य कल्पना (General ideas) या भाषेचीच रूपे (Forms) आहेत. जेंव्हा आपण इतरांशी बोलतो तेंव्हा शब्दांचा (पदांचा) वापर करतो. या शब्दांचा जो आपण सामान्य अर्थ घेतो त्यामागे एक तार्किक व्यवस्था (Logical Order) असते. पण बाह्य जगात आपणास अनेक वेळा अतार्किकता आढळते. संरचनावाद हा या यथार्थतेच्या (वास्तविकतेच्या) अंतर्यामी पोहचतो व त्यामध्ये असलेल्या तार्किक प्रतिमेचा शोध घेतो. आपण जर प्रयत्न केला तर भाषिक संरचनेच्या आधारे ही यथार्थता लक्षात येते. व्यक्ती या आपल्या विचारांच्या हातातील बाहुले असतात. व्यक्ती ज्या गोष्टी पसंत करते, जे कांही निर्णय घेते, ती पसंत व निर्णय प्रत्यक्षात तिचे नसतात तर त्यांच्या विचारांच्या संरचनेचे असतात. संरचनावादी म्हणतात की, आपल्यावर नेहमीच आपल्या विचारांचे नियंत्रण असते.

**२. अमेरिकन-ब्रिटिश संप्रदाय :**

या संप्रदायानुसार व्यक्ती व्यक्तीत असलेले सामाजिक संबंध म्हणजे समाजसंरचना होय. विक्रेता व ग्राहक, डॉक्टर व रोगी यासारख्या भूमिकांमधील सामाजिक संबंध संरचना आहे हा संप्रदाय वास्तविक व्यवहाराच्या अभ्यासाच्या आधारे समाजाचे स्वरूप समजावून घेतो, अनुभवजन्य अभ्यासाद्वारे समाज संरचना काय आहे हे सांगतो.

**संरचनावादाचे प्रकार :**

संरचनावादाचे पुढील प्रकार आढळतात.

१. जर्मन तत्त्वज्ञ इमॅन्युअल कांट यांचा तात्त्वीक संरचनावाद : कांटच्या मते व्यक्तीमध्ये तार्किक लक्षण असते व त्याद्वारे तो जगात व्यवस्था निर्माण करतो.

२. फर्डिनंड ही सौसरचा भाषिक संरचनावाद

३. क्लाऊड लेवी स्ट्रॉस यांचा मानवशास्त्रीय संरचनावाद

४. रालँड बार्थस (Roland Barthes) यांचा समाजशास्त्रीय संरचनावाद : बार्थस यांना लक्षणशास्त्रात (Semiotic) रस होता. त्यांनी भाषेतून लक्षणे घेतली व ती सामाजिक घटनांना लागू केली. बार्थसच्या मते प्रत्येक क्षेत्रात व प्रत्येक कृतीत लक्षणे आढळतात.

वरील चारपैकी याठिकाणी तुम्ही सौसर व स्ट्रॉस यांचा संरचनावाद अभ्यासणार आहात.

**फर्डिनंड डी सौसर : (Ferdinand de Saussure) १८५७-१९१३**

सौसरला कांही विचारवंत आधुनिक भाषाशास्त्राचा जनक मानतात. त्याने भाषिक संरचनावाद निर्माण

केला आहे. सौसरवर डुर्खीमचा मोठा प्रभाव आहे. डुर्खीमच्या मते व्यक्तीवर समाजाचे प्रभुत्त्व असते. समाजाहून मोठे असे काहीही नसते. (Society is Par Excellence) समाज हाच देव आहे. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येते की, डुर्खीमच्या मते सामाजिक तथ्य (Fact) व्यक्तीचा नियंत्रक आहे. डुर्खीमचा हाच विचार संरचनावादाचा मूलभूत गाभा आहे. सौसर डुर्खिमला आपण मार्गदर्शक मानतो. सौसर म्हणतो की, ज्याप्रमाणे समाजाचा विविध भागांचा अभ्यास करुन आपण संपूर्ण समाज समजावून घेतो त्याप्रमाणेच भाषेच्या विविध भागांतील परस्पर संबंध समजावून घेऊन आपण संपूर्ण भाषेस समजावून घेऊ शकतो. प्रत्येक भाषेचे एक व्याकरण असते व तेच भाषेला वाणी किंवा बोलीपासून वेगळे करते.

सौसरचा भाषिक संरचनावादाचे स्वरूप आपणास पुढील प्रमाणे स्पष्ट करता येते.

**१. वाणी व भाषा : (Speech and Language)**

सौसर म्हणतो की भाषेचा उद्देश हा आपले विचार इतरांपर्यंत पोहचविणे हा असतो. भाषेचे भाग (घटक) हे एक दुसऱ्याशी जोडलेले असतात व त्यांच्याद्वारे आपण इतरांशी संवाद (संप्रेषण-Communication) साधत असतो. कोणताही एक शब्द संपूर्ण अर्थ (आशय) व्यक्त करू शकत नाहि. त्यासाठी आपणास संपूर्ण भाषा समजावून घ्यावी लागते. त्यासाठी वाणी व भाषा यांच्यात फरक करावयास हवा. तोंडाने आपण जे कांही बोलतो ती वाणी किंवा बोली (Speech) आहे. भाषा, जे लोक ती बोलतात ती त्या सर्व लोकांची असते. भाषा एक प्रकारे कच्चा माल आहे. तिला आपण वाक्याचे स्वरूप देतो. भाजी, भाकरी, पाणी इत्यादी भाषेतील शब्द आहेत. भाषेचा वापर करून आपण म्हणतो की, आपणास भाजी, भाकरी, पाणी हवे आहे. हे भाषेचे भाग असून त्यांना आपण वाणीद्वारे व्यक्त करतो. प्रत्येक शब्दास ध्वनी (Sound) असतो. प्रत्येक भाषेस व्याकरण असते. व्याकरणात नियम असतात. क्रिकेट या खेळाचे उदाहरण घेऊन आपण हा मुद्दा समजावून घेऊ शकतो. या खेळात बॅट, बॉल, पॅड, स्टॅम्सस इत्यादी असतात. तसेच या खेळाचे कांही नियम असतात. त्यामुळे क्रिकेट या खेळाची स्वत:ची अशी एक ओळख निर्माण होते. वाणी ही व्यक्तीची स्वत:ची ओळख असते. भाषा ही वाणीमध्ये अंतर्भूत असलेली एक संरचना आहे.

**चिन्हे : (Signs)**

भाषेच्या संरचनेचे कांही घटक असून त्यांना चिन्हे किंवा संकेत म्हणतात. दैनंदिन जीवनात आपण या घटकांचा आपण उपयोग करीत असतो. जेंव्हा आपण गळ्यात कवड्याची माळ घालतो तेंव्हा आपण जगदंबादेवीचे भक्त आहोत असे त्या माळेद्वारे आपणास सुचवावयाचे असते. चौकातील लाल दिवा (सिग्नल) पाहून आपणास वाहन थांबविले पाहिजे हा संकेत मिळतो. आकाशातील काळे ढग पाहून आपणास पाऊस पडणार हा संकेत मिळतो. सी. एस. पीइरसे (Peirce) या अमेरिकन तत्त्वज्ञाच्या मते, संरचनावादात तीन प्रकारचे संकेत वापरले जातात.

१. पहिले संकेत हे प्रतिमा (Icon) संकेत असतात. ते समानता दर्शवितात. गळ्यातील कवड्याची माळ जगदंबच्या भक्तगण संप्रदायाची विशिष्टता दर्शविते.

२. दुसरे संकेत हे अभिसूचक (Index) प्रकारचे असून त्यांच्याद्वारे दोन किंवा अधिक वस्तुंमधील आकस्मिक संबंध दर्शविले जातात. काळे ढग व पाऊस यांचा संकेत हा आकस्मिक संबंधाचा संकेत आहे.

३. तिसरे संकेत हे स्वैर किंवा मनमानी (Arbitrary) प्रकारचे असतात. उदाहरणार्थ, लाल रंगाचा अर्थ थांबणे हा नाही. थांबण्याचा संकेत म्हणून कोणताही रंग चालेल. पण सर्वांनी त्यासाठी लाल रंगास संमती दिलेली असल्याने त्यास थांबणे हा अर्थ प्राप्त झालेला आहे. हा अर्थ समाजाने मनमनीपणे चिकटविला आहे. जर कोणी लाल रंग म्हणजे 'पुढे जाणे' व हिरवा रंग म्हणजे 'थांबणे' असा अर्थ घेईल तर त्याचे विपरित परिणाम होतील. व अशाने ती व्यक्ती समाजाची सदस्य ठरणार नाही.

एकंदरीत भाषेचे मूलभूत घटक हे संकेत असून ते मनमानी प्रकारचे असतात. ज्याला आपण गाढव म्हणतो त्याचा अर्थ चार पायाचा प्राणी असा नव्हे. त्यास आपण मानव सुद्धा म्हणू शकलो असतो. पण शब्दाचे अर्थ आपण मनमानेल त्याप्रमाणे लावतो व त्यामुळे गाढव या शब्दाचा अर्थ आपण गाढव असाच घेतो, मानव असा होत नाही. कारण गाढव या शब्दाचा संकेत गाढव हाच घेतलेला आहे.

संकेतास संकेतर (Signifier) व संकेतिक (Signified) असे दोन पैलू असतात व त्यांच्यात घनिष्ठ संबंध असतो. संकेतर ही एक भौतिक वस्तू असते व ती कोणतातरी संकेत देत असते. संकेतिक ही एक संकल्पना असून तिचा अर्थ समाज ठरवित असतो. उदाहरणार्थ, लाल रंगाचा अर्थ 'धोका' असा घ्यावयाचा हे समाज निर्मित गोष्ट आहे. या दोन्ही पैलूस आपण संरचनात्मक स्वरूपात घेतले तर आपण म्हणू शकतो की, 'संकेतर' चा ध्वनीशी व 'संकेतिक' चा अर्थ विचाराच्या कोणत्यातरी विभेदीकृत वस्तुंशी किंवा मानसिक प्रतिनिधित्वाशी आहे. संकेतर व संकेतिक यांना एकत्र जोडल्याने संकेताची निर्मिती होते. या दोन्हीतील संबंध मनमानी स्वरुपाचा आहे. भाषेची रूपे व त्यांना दिलेले अर्थ यांच्यात स्वाभाविक किंवा आंतरिक संबंध नाही.

सौसरच्या मते, भाषेतील कोणत्याही शब्दाचा किंवा संकेताचा अर्थ हा या गोष्टीवर अवलंबून आहे की, त्याचा इतर शब्दाशी किंवा संकेताशी कोणता संबंध आहे. संकेताचा संबंध वस्तूशी नसतो. एका शब्दास वा संकेतास इतर शब्दाच्या वा संकेताच्या संदर्भातच अर्थ प्राप्त होतो. भाषेची जी मुलभूत संरचना म्हणजेच नियम-उपनियमांतील जे परस्पर संबंध आहेत त्याचा शोध संरचनावाद घेतो.

**संरचनावादाचे प्रतिमान : (Model or Paradigm)**

सौसरने भाषेच्या आधारे संरचनावादाचे एक प्रतिमान तयार केलेले आहे. त्या प्रतिमानातील घटक पुढीलप्रमाणे आहेत.

**१. गृहीतक : (Assumption)**

भाषेत गृहितक अंतर्भूत असते त्यामुळे आपण वाणीपेक्षा भाषेकडे लक्ष देणे अधिक योग्य ठरते.

**२. वाणी :**

वाणीचे निर्धारण भाषा करते असे समजू नये. अशिक्षित लोक वाणीचा वापर करतात. त्यांना भाषेचे व

व्याकरणाचे ज्ञान नसते. वाणीची उपेक्षा करु नये.

**३. इतरांशी संबंध :**

एखाद्या शब्दाचा किंवा संकेताचा अर्थ त्याचा इतर शब्दांशी वा संकेतांशी काय संबंध आहे यावर अवलंबून असतो. शब्दाचा अर्थ त्याचा वस्तूशी काय संबंध आहे यावर अवलंबून नसतो.

**४. मूलभूत संरचना :**

संरचनावाद हा भाषेची जी मूलभूत संरचना असते तिचे विश्लेषण करतो.

**थोडक्यात :**

सौसरने भाषिक संरचनावाद निर्माण केला त्याच्या मते भाषेचे व्याकरण असते व ते भाषेस वाणीहून वेगळे करते. त्याच्या मते भाषा ही सामान्य किंवा अमूर्त व्यवस्था आहे. तिच्यात स्वर व वचन असतात. स्वर व वचन यात भेद आहे. प्रत्येक भाषेत निश्चित स्वर व्यवस्था असते. स्वराचे अनेक घटक असतात. व त्या घटकांच्या परस्परसंबंधाचे निर्धारण नियमांद्वारे होते. स्वराचे हे घटकच वाणी समजण्यासाठी उपयोगी पडतात. सौसरचा हा भाषिक संरचनावाद मानवशास्त्रज्ञांनी समाजाच्या विश्लेषणास लागू केला आहे. संरचनावादाचा स्त्रोत हा भाषेची संरचना आहे. जगातील सर्व वस्तू या भाषेचीच रुपे आहेत. भाषा ही एक संकेतांची व्यवस्था आहे. भाषेत शब्द असतात. व एका शब्दाचा अर्थ हा दुसऱ्या शब्दाच्या संदर्भात निष्पण होत असतो. वाक्याच्या मागे एक मूलभूत अर्थ असतो व हा अर्थ काढण्याचे काम संरचना करते. संरचनेच्या मूलभूत अर्थामागे कांही पूर्वमान्यता (गृहितक) असतात. ह्या पूर्वमान्यता नसतील तर संरचनेचा अर्थ स्पष्ट होत नाही.

**क्लाउड लेवि-स्ट्रॉस :**

लेवि-स्ट्रॉस हे मुळचे बेल्जियमचे असले तरी त्यांना फ्रान्समधील सामाजिक मानवशास्त्रज्ञ म्हणून ओळखले जाते. मूळचे तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी असलेल्या स्ट्रॉसनी ब्राझीलमध्ये संशोधनकर्ता म्हणून आपल्या अकॅडमिक जीवनाचा प्रारंभ केला. १९३० मध्ये ते मानवशास्त्राचे प्राध्यापक झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ते अमेरिकेत गेले. १९५० मध्ये फ्रान्समध्ये आले. स्ट्रॉसला डूर्वीम व मॉसचा बौद्धिक वारसदार मानले जाते. या दोघांशिवाय स्ट्रॉसवर मार्क्स, फ्राईड, जॉकोबसन यांचाही प्रभाव होता. स्ट्रॉसने पुराणकथा (Muthology) आप्तसंबंध व्यवस्था व देवकवाद यावर मूलभूत विचार मांडलेले आहेत.

**ग्रंथसंपदा :** स्ट्रॉसने पुढील ग्रंथ लिहिलेले आहेत.

१. The Elementary Structures of Kinship

२. Structural Anthropology

३. Mythologiques (Four Volumes)

४. The Savage mind

५. The Totemism

६. The way of the Masks

**स्ट्रॉसचा संरचनावाद :**

स्ट्रॉस हे संरचनावादी विचारवंत आहेत. त्यांचा संरचनावाद हा मानवशास्त्रीय संरचनावाद म्हणून ओळखला जातो. स्ट्रॉसच्या संरचनावादाचे दोन प्रवाह (Trends) आहेत. पहिला प्रवाह हा विश्लेषणात्मक प्रकारचा असून त्यामध्ये ते सामाजिक संघटन व विचाराचे प्रतिमान यामध्ये जी संरचना आहे ती उघड करण्याचा प्रयत्न करतात. दुसरा प्रवाह हा क्षेत्र-कार्याचा (Field-work) असून त्यामध्ये ते आदिम समाजात सहभागी होऊन जे क्षेत्र-कार्य करतात त्याद्वारे प्राप्त झालेल्या तथ्यांच्या आधारे संरचनावादी सिद्धांत विकसित करतात.

स्ट्रॉसचे सामाजिक संरचनेसंबंधीचे विचार त्यांच्या Structural Anthropology या ग्रंथात पाहावयास मिळतात. त्यांच्या मते सामाजिक संरचना या संकल्पनेचा संबंध हा कोणत्याही अनुभवजन्य वास्तविकतेशी (empirical reality) नाही तर तिच्या आधारे जी प्रतिमाने (Models) विकसित केली जातात त्यांच्याशी आहे.

स्ट्रॉसनी संरचनेचे तीन प्रकार पाडलेले आहेत.

**१. विशाल स्वरुपाचा संरचना : (Structures of large nature)**

या प्रकारात सामाजिक विश्वातील मोठ्या स्वरूपाच्या सामाजिक संरचना व संस्था मोडतात.

**२. प्रतिमान बांधणी : (Construction of the Model)**

समाजाच्या संरचनेतील आंतरिक महत्त्वाच्या आधारे सामाजिक शास्त्रज्ञ ज्या एखाद्या प्रतिकृतीची (प्रतिमानाची) बांधणी करतात त्याच्या या प्रकारात समावेश होतो.

**३. मानवी मनाची संरचना : (Structure of Human Mind)**

स्ट्रॉस म्हणतात की, सामाजिक विश्वाची जी प्रतिकृती शास्त्रज्ञ तयार करतात त्यामध्ये जी विविधता आढळते त्यातून अनेक मानवी फलिते (human Products) आकाराला येतात. त्या सर्वांचा मूळ स्त्रोत मानवी मन आहे. समाजाची मूळ किंवा प्रारंभिक संरचना ही मानवी संरचना आहे.

**स्ट्रॉसची आप्तसंबंध संरचना : (Strauss's Kinship Structure)**

स्ट्रॉसचा Elementary Structures of Kinship हा ग्रंथ १९४९ मध्ये फ्रेंच भाषेत प्रकाशित झाला व त्यांचा इंग्रजी अनुवाद १९६७ मध्ये प्रकाशित झाला. या ग्रंथात त्यांनी संरचनावादाचे विवेचन केलेले आहे. त्यांच्या मते आप्तसंबंध व्यवस्था ही मूलभूत संरचना असून ती सर्वच समाजात / संस्कृतीत आढळते. स्ट्रॉस म्हणतात की, आप्तसंबंधाविषयी जे प्रचलित सिद्धांत आहेत ते विश्वसनीय नाहीत. कारण हे सिद्धांत एक

आप्तसंबंध व्यवस्था ही दुसऱ्या आप्तसंबंध व्यवस्थेहून वेगळी का आहे हे स्पष्ट करीत नाहीत. त्यांच्या मते आप्तसंबंध व्यवस्था ही शुद्ध स्वरूपात एक सांस्कृतिक घटना आहे. सर्वच आप्तसंबंधी व्यवस्थेमध्ये आपणास एक नियम हमखासपणे दिसून येतो व तो म्हणजे ''कुटुंबांतर्गत लैंगिक संबंध निषेध नियम'' (Incest taboo) हा होय. या निषेध नियमाच्या पाठीमागे विनिमयाची प्रथा आहे. या नियमानुसार व्यक्तीला आपल्या भाऊ किंवा बहिणीशी विवाह करण्यास मनाई केलेली आहे. त्यामुळे व्यक्तीला आपल्या विवाहाचा जोडीदार हा दुसऱ्या कुटुंबातून निवडावा लागतो. यावरुन स्ट्रॉस असा निष्कर्ष काढतात की, आप्तसंबंध व्यवस्था ही मूलत: संकेताच्या संबंधाची व्यवस्था आहे. जेंव्हा एका संकेतास दुसऱ्या संकेताच्या विरोधात आपण पाहतो तेंव्हा तो संकेत अर्थ देणे सुरु करतो. भाषाशास्त्राचा एक नियम असा आहे की, शब्द वा संकेताचा अर्थ हा वस्तूंतून निघत नाही तर शब्दाचा वा संकेताचा दुसऱ्या शब्दाशी वा संकेताशी जो संबंध आहे त्यातून त्याचा अर्थ स्पष्ट होतो.

स्ट्रॉसच्या मते भाषेतील प्रत्येक संज्ञेचा जसा वेगळा अर्थ असतो तसा आप्तसंबंध व्यवस्थेच्या प्रत्येक अंगास वेगळा अर्थ असतो. उदाहरणार्थ, आप्तसंबंध व्यवस्थेतील 'माता' या संज्ञेचा अर्थ पिता, पुत्र, काका, काकी इत्यादी संज्ञेपेक्षा वेगळा करता येतो. या संदर्भात आपणास पुढील उदाहरण घेता येईल. समजा आपण एक रेषा काढली व म्हटले की ही रेषा लांब आहे की आखूड आहे, जाड आहे की पातळ आहे हे ओळखा. अशावेळी आपणास कांहीच उत्तर देता येणार नाही. कारण त्या रेषेस स्वत:चा असा अर्थ नाही. पण जर त्या रेषेशी समांतर अशी दुसरी एक रेषा काढली तर मात्र या दुसऱ्या रेषेच्या संदर्भात पहिल्या रेषेस अर्थ प्राप्त होतो. मग आपण सांगू शकतो की, पहिली रेषा कशी आहे. थोडक्यात एका रेषेचा अर्थ दुसऱ्या रेषेशिवाय सांगता येत नाही. भाषा देखील अशीच आहे. तिच्यातील एका शब्दाचा अर्थ दुसऱ्या शब्दामुळे स्पष्ट होतो. शब्दांची ही जी संरचना आहे ती स्ट्रॉसने आप्तसंबंधास लागू केलेली आहे. संपूर्ण आप्तसंबंध व्यवस्था ही एक प्रकारची अचेतन संरचना आहे. सर्व आप्तसंबंधव्यवस्थांना एकमेकापासून वेगळे करण्याचे कार्य कुटुंबांतर्गत लैंगिक संबंध निषेधाचा नियम करतो. जेंव्हा हा नियम आप्तसंबंध व्यवस्थेचा मूलभूत नियम मानला जातो तेंव्हा इतर नियम आपोआप निर्माण होतात. जेंव्हा एका कुटुंबातील सदस्यांना विवाह करण्यास मनाई केली जाते तेंव्हा आपोआपच इतर कुटुंबातील सदस्याशी विवाह करणे भाग पडते व त्यातून आप्तसंबंध व्यवस्था निर्माण होते. ही व्यवस्था एक प्रकारच्या विनिमयाची व्यवस्था ठरते.

स्ट्रॉसच्या मते, आप्तसंबंध व्यवस्था ही संरचनात्मक विश्लेषणाचा एक उत्तम नमुना आहे. कोणत्याही समाजात – मग तो मातृसत्ताक असो वा पितृसत्ताक असो विनिमयाची परंपरा अवश्य आढळते. स्ट्रॉसना त्यांच्या अभ्यासात तीन प्रकारचा विनिमय दिसून आला.

१. दैनंदिन जीवनात वापरावयाच्या वस्तूंचा विनिमय

२. संप्रेषणाचा विनिमय

३. समूहासमूहात होणारा स्त्रियांचा विनिमय

विनिमय सिद्धांताने स्ट्रॉसला कुटुंबांतर्गत लैंगिक संबंधांचा जो निषेध नियम आहे तो नव्याने समजून

घेण्याची संधी मिळाली. स्ट्रॉस म्हणतात, या नियमास आपण जैविक दृष्टिकोनातून चांगल्या प्रकारे समजावून घेऊ शकत नाही. थोड्या कालावधीसाठी जरी हा नियम आपण काढून टाकला तर समूहासमूहात विनिमय होणे बंद होईल.

स्ट्रॉस यांचा मूलभूत सिद्धांत असा आहे की, ''आप्तसंबंध व्यवस्थेत जर कांही बदल झाला तर तो बदल हा अनिवार्यपणे संरचनात्मक स्वरूपाचा असेल.'' कारण भाषिक संरचनेप्रमाणेच आप्तसंबंधाच्या व्यवस्थेतील एक भाग हा दुसऱ्या भागाशी जोडलेला असतो. येथे एक मुद्दा महत्त्वाचा आहे व तो म्हणजे भाषा व ध्वनी दोन्हीही मानवाच्या डोक्यातून उदयास आलेल्या गोष्टी आहेत. या गोष्टी अचेतन असल्या तरी त्या तार्किक आहेत. जेंव्हा आपण रात्रीविषयी बोलतो तेंव्हा अचतेन स्वरुपात आपण दिवसाच्या संदर्भात त्याचा अर्थ लावीत असतो. हेच भाषेचे दुहेरी (binery) स्वरुप आहे. पुरुषाचा संदर्भ स्त्रीशी आहे, सत्याचा संबंध असत्याशी आहे, तर अंधाराचा संबंध उजेडाशी आहे. आप्तसंबंधाचे विश्लेषण करताना स्ट्रॉस हे दुहेरी संज्ञांचा (binery terms) वापर करतात. संरचनावादात स्ट्रॉसने टाकलेली मौलिक भर ही आहे की, ''कोणत्याही सामाजिक संरचनेत सदस्यांमधील संबंध हे binery pairs या स्वरुपाचे असतात. विशिष्ट घटक (व्यक्ती) स्वतंत्रपणे कृती करीत नाही. दोन घटकांतील संबंधांचे विश्लेषण हे binery pairs द्वारे करणे शक्य असते. हे दोन घटक निसर्गत:च परस्परविरोधी असतात. उदाहरणार्थ, उष्ण-थंड, सक्रिय-निष्क्रिय, चांगला-वाईट, अंधार-उजेड इत्यादी. स्ट्रॉस पुढे म्हणतात की, आप्तसंबंध संरचनेत अनेक घटक उदाहरणार्थ, माता, पिता, पुत्र, कन्या इत्यादी समाविष्ट असतात. या घटकांतील परस्परसंबंधांचे विश्लेषण हे संरचनेद्वारे करता येते. हे चार घटक आप्तसंबंध व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावतात. आप्तसंबंधाच्या संरचनेतील प्रथम श्रेणीतील संबंध हे द्वितीय श्रेणीतील संबंधाची प्रकार्य आहेत.

अशा प्रकारे आप्तसंबंध व्यवस्थेचा अन्वयार्थ लावताना स्ट्रॉसने संरचनात्मक तत्त्वांचा विचार केला व आप्तसंबंधावर नवीन प्रकाश टाकला. हे करताना त्यांच्यावर सौसरच्या भाषिक संरचनेविषयीच्या विचारांचा प्रभाव पडलेला आहे. स्ट्रॉसनी भाषिक व्यवस्था व आप्तसंबंध व्यवस्था यांच्यात पुढील साम्ये दाखविली आहेत.

१. भाषेतील स्वररचनाशास्त्राप्रमाणेच (Phoneme of language) आप्तसंबंध हे संरचनात्मकवाद्यांच्या विश्लेषणाचे मूलभूत घटक आहेत.

२. आप्तसंबंध व स्वरशास्त्र या दोन्ही संकल्पनांना अंतर्गत अर्थ नाही. या दोन्ही संकल्पना जेंव्हा एखाद्या मोठ्या व्यवस्थेचा भाग बनतात तेंव्हाच त्यांना अर्थ प्राप्त होतो. कोणत्याही व्यवस्थेची एकूण संरचना ही त्यातील विविध घटकांना अर्थ प्राप्त करुन देतात.

३. स्वरशास्त्रव्यवस्था व आप्तसंबंध व्यवस्था या दोन्हीत परिस्थितीनुरुप अनुभवाधिरीत अशी विविधता आढळते. सामान्य नियम व गर्भित (implicit) नियम यांच्या अंमलबजावणीतून ही विविधता शोधणे शक्य होते.

४. स्वरशास्त्र व्यवस्था व आप्तसंबंध व्यवस्था या दोन्ही व्यवस्था मनाच्या संरचनेची निर्मिती आहेत. त्यांची निर्मिती ही जाणिवपूर्वक होत नसून नकळतपणे घडणाऱ्या मनाच्या तार्किक संरचनेतून होते.

**परीक्षण :**

लेवी स्ट्रॉसचा हा भाषिक संरचनावाद नंतरच्या संरचनावादी विचारवंतांनी स्वीकारलेला नाही. स्ट्रॉस हे भाषेच्या पुढे जाऊन संरचनेची व्याख्या विचाराच्या आधारे करु लागले होते. हीच गोष्ट नंतरच्या विचारवंतांना मान्य नव्हती. स्ट्रॉसच्या संरचनावादावर पुढीलप्रमाणे टीका केली जाते.

१. स्ट्रॉसचे अध्ययन हे आदिम समाजापुरते मर्यादित होते. तथापि, त्यांना असे वाटत होते की सर्वच समाजांचे अध्ययन हे संरचनात्मक पद्धतीने करता येऊ शकते. त्यांनी आपले अध्ययन केवळ आदिम समाजापुरते मर्यादित ठेवले होते कारण या समाजात विकृती कमी आहेत. त्यामुळे त्यातील संरचनेचा शोध सहजपणे घेता येतो. आधुनिक समाजात अनेक नवीन व्यवस्था उदयास आल्याने त्यांच्यातील वास्तविक संरचनेचा शोध घेणे कठीण जाते.

२. स्ट्रॉस हे आपले संरचनावादी सिद्धांत मानसिक संरचनेच्या संदर्भात प्रस्तुत करतात. मात्र स्ट्रॉस ज्या सार्वत्रिक संरचनेचा शोध घेत होते त्याविषयी इतर मानवशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञ यांना रस वाटत नव्हता. म्हणूनच १९८० मध्ये कुर्जवेलने म्हटले की स्ट्रॉसच्या संरचनावादाचा मृत्यू झालेला आहे.

३. सामाजिक वैज्ञानिक हे स्ट्रॉसच्या संरचनावादाकडे संशयाने पाहतात. त्यांच्या मते स्ट्रॉसने केवळ हातचलाखी केलेली आहे. आपल्या स्पष्टीकरणात त्यांनी भद्दे तथ्यांना स्थान दिलेले नाही.

स्ट्रॉसवर वरीलप्रमाणे टीका केली जात असली तरी त्यांच्या विश्लेषणात कांही महत्त्वाची तथ्ये अंतर्भूत आहेत. त्यांनी विविध समाजात आढळणाऱ्या सार्वत्रिक गोष्टी निदर्शनास आणून दिलेल्या आहेत.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न : क्रमांक १**

अ) बहुपर्यायी प्रश्न सोडवा.

१. खालीलपैकी कोण भाषिक संरचनावादी विचारवंत आहे ?

अ) कांट ब) सौसर क) बार्थस ड) स्ट्रॉस

२. कोणत्या संप्रदायानुसार सामाजिक संबंध हे संरचना आहेत.

अ) युरोपियन ब) अमेरिकन क) भारतीय ड) अमेरिकन-ब्रिटिश

३. भाषिक संरचनेचे घटक कोणते आहेत ?

अ) व्याकरण ब) वाक्ये क) चिन्हे ड) मूल्ये

४. कोणत्या विचारवंताचा संरचनावाद हा मानवशास्त्रीय संरचनावाद म्हणून ओळखला जातो ?

अ) स्ट्रॉस ब) कांत क) बार्थस ड) सौसर

५. सर्वच आप्तसंबंधव्यवस्थेत कोणता नियम आढळतो ?

अ) कुटुंबांतर्गत लैगिंक संबंध निषेध नियम ब) गटाबाहेर लैंगिक संबंध स्वीकृती नियम

क) अधिमान्य विवाह निषेध नियम ड) आंतरधर्मिय निषेध नियम

ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१) कोणत्या तत्त्वज्ञाच्या अस्तित्त्वावादी विचारास विरोध करण्यासाठी संरचनावाद उदयास आला ?

२) संरचनावादाच्या पुरस्कर्त्यांची नावे सांगा.

३) समाजशास्त्रीय संरचनावादी शास्त्रज्ञाचे नाव सांगा.

४) संकेताचे दोन पैलू कोणते आहेत ?

५) स्ट्रॉसच्या मते कोणती संरचना ही मूलभूत आहे ?

**४.२.२ दरिदा : भेद आणि विखंडन**

सौसर व स्ट्रॉस यांचा संरचनावाद अभ्यासल्यानंतर आता तुम्ही दरिदा व फूको यांचा उत्तरसंरचनावाद अभ्यासणार आहात. मानवशास्त्रीय संरचनावाद व संरचनात्मक मार्क्सवाद या दोन प्रवाहातून उत्तरसंरचनावाद हा नवीन प्रवाह उदयास आला आहे. उत्तरसंरचनावादाचा प्रारंभ केंव्हा झाला हे ठरविणे कठीण आहे. १९८० मध्ये कुर्जवेल यांनी म्हटले की, स्ट्रॉसच्या संरचनावादाचा मृत्यू झाला आहे. किमान पॅरीसमधून तरी संरचनावाद समाप्त झाला आहे. चार्लस लेमर्टच्या मते, १९६६ मध्ये दरिदा यांनी दिलेल्या व्याख्यानातून उत्तरसंरचनावादाचा उदय झाला. जॉर्ज रिट्झर म्हणतात की, संरचनावादावरची प्रतिक्रिया किंवा बंड म्हणून उत्तरसंरचनावाद उदयास आला. उत्तरसंरचनावादाची उभारणी ही संरचनावादावर झाली असली तरी तो संरचनावादाहून भिन्न आहे.

उत्तरसंरचनावादाच्या उदयाची दोन कारणे सांगता येतात.

१. आधुनिक समाज हा उत्तर-आधुनिक समाजात परिवर्तित झाल्याने या समाजाचे स्वरुप समजावून घेण्यासाठी संरचनावाद सक्षम ठरेणासा झाला. म्हणून उत्तर-आधुनिक समाजाचे स्वरुप समजावून घेण्यासाठी संरचनावादास उत्तर-संरचनावादात परिवर्तित होणे भाग पडले.

२. दुसरे कारण असे की, परंपरागत संरचनावाद हा भाषेवर आधारलेला होता. सौसर म्हणतात की एखाद्या शब्दाचा अर्थ त्या शब्दात नसतो तर त्याचा दुसऱ्या शब्दाशी जो संबंध आहे त्या संबंधावर आधारलेला असतो. तसेच परंपरागत संरचनावाद असेही मानतो की, शब्दाचा वाक्यरचनेत जो अर्थ असतो तो पक्का व व्यवस्थित असतो. या मतास विरोध करण्यासाठी उत्तरसंरचनावाद उदयास आला. उत्तरसंरचनावाद व्याकरण मान्य करतो पण त्याची व्याकरणाची व्याख्या वेगळी आहे. दरिदा म्हणतात त्याप्रमाणे उत्तरसंरचनावादात भाषेपेक्षा लेखन (writing) अधिक महत्त्वाचे आहे. लेखन वाचकावर दबाव टाकत नाही. ते पुढे म्हणतात, सामाजिक संस्था ह्या अन्य काही नसून केवळ लेखन आहेत. दरिदाने लेखनाचे विखंडन करण्यावर भर दिला आहे.

**उत्तरसंरचनावादाचा अर्थ :**

१. ऑक्सफर्ड समाजशास्त्र शब्दकोशानुसार उत्तरसंरचनावाद हा समाजशास्त्रीय अध्ययनातील महत्त्वाचे साध्य असून त्याचा शोध सौसरच्या भाषेच्या सिद्धांतातून लागला असून त्याचा विस्तार तार्किक शक्यतेच्या संदर्भात केला गेला व त्यामध्ये भाषा ही प्रघटनांचे प्रतिनिधित्त्व करण्याऐवजी त्यांचा निर्देश करते.

२. संरचनात्मकतेत भाषिक संरचनेचा अंतर्भाव करुन भाषेचा समाजशास्त्रीय दृष्टीने केलेला सर्वांगीण परिपूर्ण अभ्यास म्हणजे उत्तरसंरचनावाद होय.

३. उत्तरसंरचनावादी विचारवंत लेखनावर जेंव्हा भर देतात तेंव्हा त्याचा संबंध हा 'विमर्श (discourse)' याच्याशी असतो. त्यांच्या मते कोणत्याही शब्दाचा किंवा विमर्शाचा अर्थ निश्चित नसतो. एका विमर्शाचा अर्थ दुसऱ्या विमर्शांशी (एक किंवा अनेक) असलेल्या संबंधातून निष्पन्न होतो. याचा परिणाम म्हणून जेंव्हा आपण एका विमर्शाचा अर्थ शोधत असतो तेंव्हा संबंधामुळे आपण दुसऱ्या विमर्शाकडे पोहचतो, दुसऱ्या विमर्शाकडून तिसऱ्याकडे, तिसऱ्याकडून चौथ्याकडे पोहचतो व ही परंपरा चालू राहते. याचा परिणाम असा होतो की, एका विमर्शाचे आपल्यासमोर अनेक अर्थ (meaning) व अन्वयार्थ (interpretation) उभे राहतात. त्यामुळे कला, साहित्य, समीक्षा इत्यादी क्षेत्रात असंख्य अन्वयार्थांचा ढीग तयार होतो. या सर्व गोंधळातून आपणास कधी कधी आपणास विमर्शाचा खराखुरा अर्थ सापडतो असे उत्तरसंरचनावादी म्हणतात.

थोडक्यात उत्तरसंरचनावादी शब्दाऐवजी लेखनास प्राधान्य देतात. लेखनाचा अर्थ काढणे अवघड असते. एकाच लिखाणाचे अनेक अर्थ निघू शकतात. एखाद्या विमर्शाचे जेंव्हा अनेक अर्थ निघतात तेंव्हा तो संपूर्ण विमर्श गोंधळाच्या स्थितीत सापडतो. सर्व कांही अस्पष्ट होते. अर्थाच्या क्षेत्रात संभ्रमाची स्थिती निर्माण होणे हेच उत्तरसंरचनावादाचे वैशिष्ट्य आहे. जे अव्यक्त (लपलेले) आहे. त्याच्या तार्किक अर्थाची प्रचिती घेणे ही गोष्ट संरचनावादात अभिप्रेत आहे. मात्र उत्तरसंरचनावादाच्या मते हा अर्थच भ्रम निर्माण करीत असतो. म्हणूनच टिकाकारांच्या मते, उत्तरसंरचनावादात निश्चित असे काहींच नाही. जे हवे ते करा अशी स्थिती आहे. या संदर्भात लेमर्ट Modern Social Theory या आपल्या ग्रंथात म्हणतात की, उत्तरसंरचनावादाची दिशा व दबाव अनेक व्यवस्थांवर पडतो. त्याचे अर्थ भ्रामक असतात.

**उत्तरसंरचनावादाचे पुरस्कर्ते :**

जे विचारवंत उत्तर आधुनिकतावादाचा पुरस्कार करतात तेच उत्तरसंरचनावादाचेही पुरस्कर्ते आहेत. यामध्ये दरिदा, ल्योटार्ड, बोड्रिलार्ड, जेमेसन, फूको इत्यादी. त्यापैकी दरिदा व फूको यांचे उत्तरसंरचनावादी विचार तुम्ही याठिकाणी अभ्यासणार आहात.

**जॅकस दरिदा : (Jacaues Derrida 1930 - 2004)**

दरिदा हे उत्तर आधुनिकतावादी विचारवंत मानले जातात. मूलत: ते तत्त्वज्ञ होते. पण त्यांनी उत्तर आधुनिक समाजावर लिखाण केल्याने त्यांना कांहीजण समाजशास्त्रज्ञ मानतात. १९३० मध्ये अल्जेरियात एका

ज्यू कुटुंबात जन्मलेल्या दरिदाचे शिक्षण पॅरिसमध्ये झाले. १९६५ मध्ये 'क्रिटीक' नावाच्या संशोधन पत्रिकेत व्याकरणशास्त्र (grammatology) या विषयावर दरिदाचे दोन निबंध प्रकाशित झाले व त्यांना फ्रान्समध्ये विचारवंत म्हणून मान्यता मिळाली. भाषेविषयी असलेल्या रुची ने त्यांना उत्तरसंरचनावादाचा जनक बनविले. सौसरचा दरिदावर मोठा प्रभाव होता. ल्योटार्ड व बोड्रिलार्ड यांच्याप्रमाणेच दरिदाने आपल्या उत्तरआधुनिकतावादावरील लिखाणात ज्ञान मिमांसेची समस्या मांडली आहे. पण दरिदा त्या दोघांपेक्षा वेगळे आहेत. पहिल्या दोघांच्या मते उत्तर-आधुनिकतावादा हा प्रत्यक्षात 'उत्तर-इतिहास' (Post-History) आहे. दरिदानी मात्र ज्ञानाची मीमांसा ही त्याच्या शुद्ध रुपात झाली पाहिजे असे मत मांडले. म्हणून त्यांना शुद्ध ज्ञानमिमांसक (Pure Epistomologist) असे म्हणतात. दरिदावर जॉन लॉक, बर्कले, ह्युम या पाश्चात्य तत्त्वज्ञांचा प्रभाव होता. या तिघांप्रमाणेच दरिदाचेही असे मत आहे की, समाजाच्या विखंडनाचा जो विमर्श आहे त्याची चर्चा ही भाषा व ज्ञानमिमांसा यांचा संदर्भ घेतल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. तसेच भाषा, शब्दांचे अर्थ आणि सत्य यांची व्याख्या ही समाशास्त्राच्या संकल्पने (concept of Ontology) शिवाय होऊच शकत नाही. ग्रंथसंपदा -दरिदाने फ्रेंच भाषेत १५ ग्रंथ लिहीले त्यापैकी पुढील ८ ग्रंथाचा इंग्रजी अनुवाद झाला आहे.

१. Speech & phenomena and other essays - 1973.

२. Of Grammatology - 1967

३. Writing & Difference - 1967

४. Positions - 1972

५. Dissemination - 1972

६. Margins of Philosophy - 1972

७. Glass - 1974

८. The Truth in painting

**दरिदाचा उत्तरसंरचनावाद :**

यापूर्वीच नमूद केल्याप्रमाणे दरिदा हा उत्तरसंरचनावादाचा जनक आहे. १९६६ मध्येच त्यांनी याबाबतचे आपले विचार मांडण्यास प्रारंभ केला. मूलत: दरिदा हे भाषिक संरचनावादाचेच पुरस्कर्ते आहेत. त्यांच्यावर सौसरचा प्रभाव असला तरी त्यांनी सौसरच्या व्याकरणवादात बदल केला. त्यांनी भाषेच्या संरचनेऐवजी 'लेखनावर' (writing) लक्ष केंद्रीत केले. यातून त्यांच्यापुढे एक समस्या उद्‌भवली व ती म्हणजे एका लिखाणाचा अर्थ हा दुसऱ्या लिखाणाच्या संदर्भात समजावून घ्यावा लागतो. लिखाण हे नेहमीच समस्याग्रस्त असते. एकाच लिखाणाचे अनेक अर्थ निघू शकतात. अशा अवस्थेत दरिदाने विखंडन ही संकल्पना मांडली. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या आधारे दरिदाने विखंडन व भेद या दोन संकल्पना विकसित केल्या.

**विखंडन संकल्पना : (Concept of Deconstruction)**

दरिदाने १९८० मध्ये विखंडन संकल्पना मांडली. त्यांनी प्लोटोपासून आजपर्यंतच्या तत्त्वज्ञांच्या लिखाणाचे विश्लेषण केले. ते म्हणतात हे सर्व लिखाण हे अशा एका सामान्य नियमाच्या शोधात आहे की, ज्याद्वारे जगास 'सत्य, शिव व सुंदरता' या मूल्यांची प्राप्ती होईल. या शोधानेच मानवाची वास्तविक विचारसरणी दाबून टाकली आहे. या लिखाणास दरिदाने Logocentrism असे म्हटले आहे. या लिखाणाचा कांहीच फायदा नाही. कारण ते एक मृगजळ आहे. म्हणून अशा या लिखाणाचे विखंडन झाले पाहिजे असे ते म्हणतात. दरिदाने अनेक ग्रंथांचा (Texts) उल्लेख केला आहे. त्यांनी या ग्रंथातील विमर्शाची तुलना इतर विमर्शाशी केली असता ते निराश झाले. कारण सत्य शिव व सुंदरता यांच्या शोधात असलेल्या मानवास या ग्रंथांनी धादांत खोटारडेपणा, फसवणूक व कुरुपता यांच्या दारात नेऊन उभे केले आहे. या ग्रंथातून मानवास कांहीच प्राप्त झालेले नाही. म्हणून पश्चिमेकडील या ग्रंथांचे व विमर्शाचे विखंडन झाले पाहिजे असे ते म्हणतात.

**विखंडनाचा अर्थ :**

Deconstruction या शब्दाचा शब्दकोशातील अर्थ ''टीका करण्याचे कौशल्य'' असा आहे. दरिदाच्या मते ग्रंथांचे (Texts) टीकात्मक अध्ययन करणे, त्या ग्रंथाविषयीची छुपी गृहीतके शोधून काढणे म्हणजे विखंडन होय. दरिदा विखंडनाचा अर्थ पुढीलप्रमाणे स्पष्ट करतात.

विखंडन म्हणजे ग्रंथाचे / पाठाचे (Texts) वाचन हे त्या ग्रंथाचा निर्देश, संकेत, अनिश्चितता इत्यादीच्या संदर्भात करणे होय. हे करताना हे पाहाणे की त्या ग्रंथातील कोणते अर्थ स्पष्ट आहेत व कोणते अस्पष्ट आहेत. अस्पष्ट अर्थ जर तर्कबुद्धीच्या कसोटीवर खरे म्हणून उतरले नाही तर त्यांच्या अस्वीकार करणे म्हणजे विखंडन होय.

एखादा पाठ स्पष्ट होण्यासाठी किंवा अस्पष्ट पाठाचे विखंडन करण्यासाठी दुसऱ्या पाठाशी त्या पाठाचा काय संबंध आहे हे पाहिले पाहिजे. त्यामुळे आपल्या हे लक्षात येईल की स्पष्ट पाठ कशाप्रकारे अस्पष्ट पाठास आपल्या समोर घेऊन येतो आणि स्पष्ट पाठ किती अस्पष्ट व अपर्याप्त आहे. विखंडनाद्वारे आपण एखादा पाठ त्याच्यातील उणिवासह समजावून घेऊ शकतो.

विखंडनाची संकल्पना ही भाषेशी संबंधित आहे. दरिदा म्हणतात की, व्यक्तीला तिच्या 'स्व' (Self) ची ओळख समाजामुळे होते. समाज जसा असतो तशी 'स्व' ची चेतना निर्माण होते. ही चेतना आणण्याचे माध्यम भाषा आहे. भाषेचा संबंध ग्रंथांशी / पाठाशी आहे. जेंव्हा आपण एखादा ग्रंथ वाचत असतो उदाहरणार्थ, महाभारत - तेंव्हा त्या ग्रंथाचे संपूर्ण विवरण हे आपल्यासाठी पाठ असतो. या पाठात कांही अर्थ स्पष्ट (व्यक्त) तर कांही अर्थ अस्पष्ट (अव्यक्त) असतात. अशावेळी विखंडनाचे प्रथम कार्य हे आहे की, जो अर्थ अस्पष्ट आहे तो स्पष्ट केल्यानंतर जो अर्थ निघतो तो तर्कबुद्धीच्या (reason) कसोटीवर उतरत नाही त्याचे विखंडन करणे.

ग्रंथांचे विखंडन करताना दरिदा म्हणतात आज आपल्या समोर जे लिखाण आहे ते विमर्शाचे एक गाठोडे

आहे. हे गाठोडे नष्ट झाले पाहिजे. यासंदर्भात त्यांनी नाट्यगृहाचे उदाहरण दिले आहे. नाट्यगृहात सुरु असलेल्या नाटकातील अनेक कलाकार हे वेगवेगळ्या भूमिका करीत असतात. हे भूमिकाधारक जे संवाद बोलतात ते नाटककाराने लिहिलेले असतात. तर ते जे अभिनय करतात तो दिग्दर्शकाने सांगितल्याप्रमाणे असतो. कलाकारांच्या हातात कांहीच नसते. सर्व कांही नाटककार व दिग्दर्शकाच्या हातात असते. नाटकातील सर्व प्रसंग हे पूर्वनिर्धारित असतात. त्यामध्ये बदल करता येत नाही. अशा या नाट्यगृहास दरिदा निष्ठूर नाट्यगृह (Theatre Cruelty) म्हणतो. कारण त्यामध्ये कलाकार हा इतरांच्या तालावर नाचणारी कठपुतली असतात. हे निष्ठूर नाट्यगृह धार्मिक (Theological) आहे. व्याख्येच्या स्तरावर ते एक लिखाण असून ते कोण्या एका महान लेखकाने लिहिलेले आहे व हा लेखक भाग्यविधाता बनला आहे. म्हणून असे हे नाट्यगृह नष्ट करुन त्याजागी 'पर्यायी नाट्यगृह' उभारले पाहिजे असे दरिदा म्हणतात. हे पर्यायी नाट्यगृह विकेंद्रित (decentering) असेल. त्यामध्ये कलाकारांना अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य असेल. ते लेखक व पूर्वनिर्धारित गोष्टीकडे (परंपराकडे) लक्ष देणार नाहीत. पूर्वीचे विचार व मते यांच्यावर आघात करुन निष्ठूर नाट्यगृहाच्या मान्यता नष्ट करतील. जेंव्हा अशी नाट्यगृहे नष्ट होतील तेंव्हा आधुनिक समाज ही नष्ट होईल असे दरिदा म्हणतात. मात्र रिट्झरनी म्हटल्याप्रमाणे पाश्चिमात्यांच्या सत्य, शिव व सुंदरता या संकल्पनांचे, ग्रंथांचे वा लिखाणाचे विखंडन केल्यावर पुढे काय होईल त्याजागी नवीन कोणता पर्याय असेल (पर्यायी नाट्यगृह कसे असेल) हे दरिदानी स्पष्ट केलेले नाही.

थोडक्यात आपल्या उत्तरसंरचनावादी सिद्धांतात

१. दरिदा शब्दाऐवजी लिखाणावर भर देतात. कारण शब्द हे आपल्यावर दबाव टाकतात. शब्दाचा अर्थ समाज जो घेतो तोच व्यक्तीला घ्यावा लागतो. विवाहाचा अर्थ कुटुंब असा घेता येत नाही. लिखाण मात्र दबाव टाकत नाही. लिखाणात विमर्श असतो व एका विमर्शाचा अर्थ दुसऱ्या विमर्शाच्या संदर्भात घेतला जातो.

२. दरिदा या अगोदरच्या महान ग्रंथांचे विखंडन करुन विमर्शाचे वास्तविक अर्थ समजावून घेऊ इच्छितात.

३. दरिदा समाजास निष्ठूर नाट्यगृहासारखे मानून त्यास म्हणजेच समाजास नष्ट करु इच्छितात. व त्याजागी नवीन पर्यायी समाजव्यवस्था आणली पाहिजे असेही म्हणतात. म्हणून दरिदा हे भाषिक उत्तरसंरचनावादी तसेच उत्तरआधुनिकतावादी विचारवंतात ठरतात. मात्र दरिदा स्वत:स उत्तरसंरचनावादी मानत नाहीत. त्यांनी विखंडन व भेद या संकल्पनांचे जे विवेचन केले आहे ते त्यांना उत्तरसंरचनावादी बनवितात. म्हणून या दोन संकल्पना समजावून घेणे आवश्यक ठरते.

विखंडन ही संकल्पना दरिदांनी तत्त्वमिमांसेचे (metaphysics) विखंडन करण्यासाठी वापरली आहे. तत्त्वमिमांसा ही तत्त्वज्ञानाची एक शाखा असून ती जगातील यथार्थतेच्या (सत्याच्या) स्वरुपाची चर्चा करते. या शाखेचा उदय ग्रीकमध्ये झाला. पुढे १७ व्या शतकात तिचा विकास युरोपमध्ये झाला. देकार्त, लयबनिझ स्पिनोझा या पाश्चात्य तत्त्वज्ञांनी यथार्थतेचा प्रश्न उपस्थित केला व असे प्रतिपादन केले की, जर आपण ज्ञानाचा पद्धतशीर विकास केला तर जगाची यथार्थता समजू शकेल. दैनंदिन जीवनात आपण ज्या पद्धतीने यर्थार्थता

समजावून घेतो ती एक भ्रम आहे. डोळ्यांना जे दिसते ते यथार्थ नाही. कांट व ह्युम यांनी पाश्चात्त्य तत्त्वज्ञानातील तत्त्वमिमांसेकडे संशयाने पाहिले व दररोज वापरल्या जाणाऱ्या शब्दांद्वारे यथार्थतेची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. येथुनच दरिदानी विखंडनाची सुरुवात केली. त्यांचे विखंडन भाषेच्या भेदापासून सुरु होते. दररोज वापरले जाणारे शब्दा घेऊन दरिदा वैज्ञानिक विमर्श बनवितात व अशा निष्कर्षापर्यंत येतात की, तत्त्वमिमांसा कधीच यथार्थता समजावून घेण्यासाठी उपयुक्त ठरत नाही म्हणून तिचे विखंडन करावे.

**भेदाची संकल्पना : (Concept of Difference)**

दरिदाची विखंडन ही संकल्पना भेदाच्या तर्कशास्त्रावर (Looric of difference) आधारलेली आहे. भेद ही विखंडनाच्या संकल्पनेतील कळीची संज्ञा आहे. भेदाचे दोन अर्थ आहेत.

१)मतभेद (differe) असणे आणि २) स्थगित (difer) करणे. विखंडनाची व्यूहरचना ही भेदाची व्यूहरचना आहे. विखंडनाचा मुख्य उद्देश हा उलथून टाकणे किंवा नष्ट करणे हा आहे. विखंडनाचा साधा अर्थ असा आहे की कोणत्याही ग्रंथास / पाठास उलथुन टाकणे किंवा नष्ट किंवा स्थगित करणे असा आहे. दरिदाने विखंडन ही संकल्पना भेदाच्या संदर्भात मांडली खरी पण भेदाचा निश्चित अर्थ त्यांनी स्पष्ट केलेला नाही. भेदाचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी त्याने पुढील उदाहरण दिले आहे. पोस्टाच्या पेटीत आपण आज पत्र टाकतो व ते संबंधित व्यक्तीस तीन दिवसानंतर मिळते. पत्राच्या प्रतिक्षेचा हा तीन दिवसाचा काळ आहे तो पत्र टाकणे व ते मिळणे यातील अंतर किंवा भेद आहे. दरिदाच्या भेदाचा अर्थ असा आहे की, विखंडनाची आज जी स्थिती आहे ती एक मध्यवर्ती (intermediate) स्थिती आहे, ती अंतिम स्थिती नाही. एका ठिकाणी दरिदा म्हणतात की, भेदाचा संबंध तत्त्वमिमांसेशी आहे. तत्त्वज्ञानाच्यादृष्टीने दरिदाने सौसरचे मत व संरचनावाद यांचे मिश्रण करुन भेद ही संकल्पना १९६८ मध्ये मांडली. सौसरच्या मते भाषा ही भेदाची व्यवस्था आहे. भाषेद्वारे निर्माण होणाऱ्या भेदाची चर्चा व्यवहारात सामान्य माणूसदेखील करतो. उदाहरणार्थ, जेंव्हा आपण म्हणतो की, सुरेश व रमेश यांच्यात भेद आहे, तेंव्हा त्याचा अर्थ असा असतो की जे कांही सुरेश मध्ये आहे ते रमेश मध्ये नाही. त्यांच्या गुणधर्मांचे मोजमाप करुन आपण त्या दोघांतील भेद सांगू शकतो. व्यवहारातील हा भेदाचा अर्थ दरिदास मान्य नाही. त्यांच्या मते तत्त्वज्ञानाच्यादृष्टीने भेद म्हणजे मतभेद व स्थगिती असा दोन्हीही आहे. सुरेश व रमेश यांच्यात गुणधर्माचा अभाव नाही. सुरेश असा आहे की जो कांही गुणधर्माच्या उपस्थितीशी मतभेद दर्शवितो व कांही गुणधर्म असे आहेत की जे तो आता स्वीकारु इच्छित नाही. भविष्यात तो ते कदाचित स्वीकारेल. सद्या मात्र तो ते गुणधर्म स्थगित ठेवतो. याचाच अर्थ असा की, सुरेशचा कांही गुणधर्मांशी मतभेद आहे तर कांही गुणधर्म तो स्थगित ठेवतो.

पुढे दरिदा भाषेचे विवेचन करतात. ते म्हणतात लेखन हे भाषेचे एक लेखाचित्र आहे. मात्र मूळरुपात वाणी (ध्वनी Phonic) ही मौलिक असून ती प्रथम स्थानी तर लेखन द्वितीय स्थानी आहे. कारण वाणी ही आपल्या अधिक जवळ असून तिचा संबंध आपल्या भावभावना व मनोवृत्तीशी असतो. वाणी व लेखन यांच्यातील भेदाविषयी सौसरने मांडलेले विचार दरिदास मान्य नाहीत. दरिदाच्या मते बोलणे व लिहणे यातील

भेदास स्थगित करणे कठीण आहे. तरीही दरिदा भेदाची संकल्पना सामाजिक क्षेत्रास लागू करण्याचा प्रयत्न करतो.

लेखनात रेखाचित्र असल्याने लेखन अशुद्ध असते. त्यामुळेच लेखन तादात्म्य (Identity) नाकारते. आपल्या विखंडनाच्या संकल्पनेत दरिदा याच अशुद्ध व शुद्धतेची म्हणजेच लेखन व वाणी यातील भेदाची चर्चा करतात. ते म्हणतात विखंडन हा शब्दांचे अर्थ समजावून घेण्याचा एक सिद्धांत आहे. विखंडनाच्या मदतीने आपण शब्दांना इतर शब्दांशी अशा घटनांशी जोडता कामा नये, ज्यांच्या विषयी आपण असा विचार करतो की, अमूक शब्द अमूक घटना दर्शवितो. जी व्यक्ती घटना कथन करते तिला दरिदा संकेतक (Signifier) म्हणतो. व्यक्ती जी भाषा किंवा शब्द वापरते त्यांचे अनेक अर्थ असतात. त्यामध्ये सत्य किंवा पूर्ण अर्थ हा नेहमीच स्थगित असतो. सत्याचे अनेक अर्थ असतात, जे व्यक्तीसमोर निवडीसाठी अनेक पर्याय ठेवतात. दरिदा म्हणतात, भाषेचा अर्थ कोणत्यातरी मूर्त वास्तविकतेत किंवा सत्यात शोधता येत नाही. हा अर्थ भाषेच्या संदर्भातच शोधता येतो. आणि याची संरचना सामाजिक रुपात होते. विखंडनाद्वारे हे दाखवून देता येते की, कशाप्रकारे भाषेचा उपयोग विषमता व पिडा (त्रास) वाढविण्यासाठी केला जातो. ते म्हणतात जुने व नवे यातील संबंध क्षणिक नाहीत. हा असा संबंध आहे, ज्यामध्ये जुने व नवे या दोन्हीत बदल होतो.

**विखंडन म्हणजे मूळ ग्रंथांचा (पाठांचा) टिकात्मक अभ्यास :**

दरिदाने विखंडनाची व्याख्या पाश्चात्त्य तत्त्वज्ञान व भाषा यांच्याद्वारे केलेली आहे. मात्र त्यांची व्याख्या ही संदिग्ध आहे. मात्र एक गोष्ट निश्चित आहे व ती म्हणजे दरिदाच्या मते विखंडन म्हणजे मूळ ग्रंथांचे किंवा पाठांचे टिकात्मक अध्ययन करणे होय. मूळ ग्रंथात किंवा पाठात कांहीतरी सत्य आहे असे मानून चालणे चूक आहे. असे मानने एकदम सोडून दिले पाहिजे. लक्ष्मणरेषा ओलांडून कोणी मायावी आत येऊ शकत नाही. असे मानने थांबविले पाहिजे. पार्सन्स, असे मानतो की, समाज व्यवस्थेवर येणारे संकट लेटेन्सी (Latency) द्वारे ती आपले प्रतिमान टिकवून ठेविल. हे सत्य आहे हे नाकारले पाहिजे. थोडक्यात मूळ पाठात सत्य आहे असे गृहीत धरुन आपण चालतो. असे सोडून दिले पाहिजे.

याचा अर्थ दरिदा सत्याच्या विरोधी आहे असे नव्हे. तो सत्याचा पुरस्कर्ताच आहे. फक्त तो तथाकथित (so called) सत्याच्या विरोधी आहे. मूळ पाठात जे सत्य आहे असे मानले जाते त्याची प्रचिती घेतली जात नाही. लोक त्यास सत्य मानून चालतात. दरिदा म्हणतो त्याचे विखंडन झाले पाहिजे. एका पाठाची तुलना दुसऱ्या पाठाशी झाली पाहिजे. त्यामुळे सत्याचे ज्ञग्न होईल.

व्याकरणाच्या माध्यमातून दरिदा विखंडन संकल्पना विकसित करतो म्हणून त्यास कांहीजण व्याकरणतज्ज्ञ मानतात. दरिदाच्या मते कोणत्याही पाठाचा केवळ एकच अर्थ आहे असे नाही मूळ पाठचा लेखक जो अर्थ काढतो तो अर्थ वाचकापर्यंत मूळ पाठ पोहचेपर्यंत बदलतो हा शब्दांचा किंवा व्याकरणाचा खेळ आहे. उत्तर-आधुनिकतावाद असे सूचवितो की वाचक व समीक्षक यांनी मूळ पाठाचा अभ्यास आपल्या वैयक्तिक अर्थाच्या आधारे केला पाहिजे. असा अभ्यास करताना हे पाहिजे पाहिजे की मूळ पठात कोठे कोठे विसंगती

प्रतिवाद व विरोध आहे.

दरिदाचा मूळ तर्क असा आहे की जे लिहिले जाते त्यामध्ये वस्तुनिष्ठ अर्थाचा अभाव असतो. एका शब्दाचे अनेक अर्थ होतात. प्रत्येक शब्दाचा एक संदर्भ असतो म्हणून शब्दाचा अर्थ त्या संदर्भातच शोधला पाहिजे. उदाहरणार्थ, वेदामध्ये असे म्हटले आहे की जेथे स्त्रीची पूजा होते तेथे देवांचे वास्तव्य असते. मात्र तुलसीदास त्याच्या रामायण या पाठात म्हणतात की पशू, अडाणी, शुद्र व स्त्री यांना नेहमी मार दिला पाहिजे. अशावेळी दरिदा म्हणतात की यातील स्त्री विषयी नेमक काय सत्य आहे ? अशा ठिकाणी विखंडन करण्याची गरज आहे. हे सत्य शोधताना मूळ पाठाची तुलना करावी, त्याचा भाषा संदर्भ पाहावा, लेखकाचा दृष्टिकोन पाहावा म्हणजे सत्य सापडेल असे तो म्हणतो.

**सारांश**

दरिदाची विखंडन संकल्पना महत्त्वपूर्ण उपलब्धि आहे. ही संकल्पना स्पष्ट करण्याचा त्याने प्रयत्न केला आहे. पण त्यात कांही त्रुटी आहेतच. विखंडन व भेद या संकल्पना संदर्भात पुढील मुद्दे सारांश रुपात मांडता येतात.

१. विखंडन संकल्पनेद्वारे दरिदा पाश्चिमात्त्य विचारातील सर्व सिध्दांत नाकारतात. त्यासाठी ते प्लेटोपासून अलिकडील विचारवंतांच्या विचाराचे टिकात्मक परिक्षण करतात.

२. पाश्चिमात्त्य तत्त्वमिमांसा सदोष आहे. तिने शोधलेले सत्य वा यथार्थता अस्पष्ट आहे कारण ती भाषाशास्त्र व व्याकरण यांच्याकडे दुर्लक्ष करते. तत्त्वज्ञानातील तत्त्वमिमांसा नाकारण्यासाठी दरिदा सॉसरच्या भाषा विषयीच्या संरचनेचा स्वीकार करतात.

३. विखंडनाचा हा अर्थ आहे की मूळ पाठास स्पष्ट व अस्पष्ट या संदर्भात पाहणे शब्दाचे पर्यायी अर्थ असतात. म्हणून मूळ पाठाचा अर्थ यथार्थता जाणणे हा असावा.

४. दरिदाच्या मते पाश्चिमात्त्य तत्त्वमिमांसा भाषेच्या चुकीच्या अर्थावर आधारलेली आहे. ज्या संकेताची (Logo) चर्चा तत्त्वमिमांसा करणे ते असत्यावर आधारित आहे. म्हणून तत्त्वमिमांसेचे विखंडन झाले पाहिजे. दुसऱ्या शब्दात, विखंडनाद्वारे पाश्चिमात्त्य तत्त्वमिमांसा नष्ट करणे हा दरिदाचा हेतु आहे.

५. दारिदाची अभ्यास पद्धती व्याकरण आहे. त्याने स्वत:चे असे व्याकरणशास्त्र विकसित केले आहे. यासंदर्भात त्याने नित्से व हैडेगर यांचे अनुकरण केले आहे.

६. तो व्याकरणाची व्याख्या नव्या संदर्भात देतो. त्याच्या मते वाणीचे स्थान लिखाणाहून श्रेष्ठ आहे. वाणी ही भाषेपेक्षा अधिक शक्तीवान आहे. भाषेतील हा भेदच विखंडनाचा मुख्य आधार आहे. भाषा शक्तीशाली असतानाही तिची पाश्चिमात्त्य तत्त्वमिमांसकानी केलेली उपेक्षा अचंबित करणारी आहे.

दरिदा तत्त्वज्ञ असूनही त्यास समाजशास्त्रज्ञ मानले जाते. कारण त्याने भाषेची व्याख्या सा संदर्भात केली आहे. भाषा ही कोण्या एका व्यक्तीची निर्मिती नाही. स्वरुप व संरचना यादृष्टीने भाषा सामाजिक, सांस्कृतिक

गोष्ट आहे. भाषेशिवाय सत्याचा शोध घेता येत नाही. देकार्त, स्पिनोझा कांत इ. तत्त्वज्ञांनी भाषेची उपेक्षा केल्याने दरिदा त्यांची तत्त्वमिमांसा नाकारतो. म्हणून तिचे तो विखंडन करतो. अर्थात, दरिदा हे विखंडनास केवळ तत्त्वमिमांसेपुरते मर्यादित ठेवीत नाहीत. कोणत्याही ग्रंथाचे किंवा पाठाचे विखंडन झाले पाहिजे असे ते म्हणतात. सत्याचा शोध केवळ तत्त्वज्ञानात न घेता सर्वसाधारण जीवनातही घेतला पाहिजे. लेकांच्या भाषेत व शब्दात असलेले अस्पष्ट व संदिग्ध अर्थ काढून टाकले पाहिजेत असे दरिदा म्हणतात.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न : क्रमांक २**

**अ) बहुपर्यायी प्रश्न सोडवा.**

१. कोणाच्या व्याख्यानातून उत्तर-संरचनावादाचा उदय झाला ?

अ) फूको ब) स्ट्रॉस क) सौसर ड) दरिदा

२. दरिदाने कोणती संकल्पना मांडली आहे ?

अ) विखंडन ब) खंडन क) ज्ञान ड) शक्ती

३. उत्तरसंरचनावादी सिद्धांतात दरिदा शब्दाऐवजी कशावर भर देतात ?

अ) भाषेवर ब) वाणीवर क) लेखनावर ड) व्याकरणावर

४. विखंडन ही संकल्पना दरिदाने कोणत्या ज्ञानशाखेचे विखंडन करण्यासाठी वापरली आहे ?

अ) ज्ञानमिमांसा ब) तत्त्वमिमांसा क) विज्ञान ड) तत्त्वज्ञान

५. दरिदाने विखंडन ही संकल्पना कशाच्या संदर्भात मांडली आहे ?

अ) ज्ञानाच्या ब) भेदाच्या क) शक्तीच्या ड) विमर्शाच्या

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. उत्तरसंरचनावादाचा जनक कोण आहे ?

२. दरिदांच्या मनाप्रमाणे उत्तरसंरचनावादात भाषेपेक्षा काय अधिक महत्त्वाचे आहे ?

३. विखंडन म्हणजे काय ?

४. दरिदाची विखंडन ही संकल्पना कशाच्या तर्कशास्त्रावर आधारलेली आहे ?

५. दरिदास व्याकरणतज्ज्ञ का मानले जाते ?

## ४.२.३ मिशेल फूको : विमर्श, ज्ञान आणि शक्ती

### (Michel Focault : Discourse, Knowledge & Power)

**अल्पपरिचय :**

फूको हे फ्रेंच उत्तर-संरचनावादी व उत्तर-आधुनिकतावादी विचारवंत असून ते अष्टपैलू व्यक्तीमत्त्वाचे धनी होते. ते तत्त्वज्ञ, विज्ञानवादी, संस्कृती व साहित्याचे विश्लेषक, राजकारणी, इतिहासकार व सामाजिक विचारवंत म्हणून ओळखले जातात. त्यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९२६ रोजी फ्रान्समधील 'पोईटर्स' नावाच्या गावात झाला. पॅरिसमधील ''निकोल नोर्मले'' नावाच्या विद्यापीठातून त्यांनी तत्त्वज्ञान व मानसशास्त्र या विषयातील पदवी घेतली. 'वेडेपणा व सभ्यता' याविषयावर पीएचडी पदवी प्राप्त केली. त्यानंतर अल्पकाळ स्वीडन मध्ये व्याख्याता म्हणून काम केले. पुढे १९६५ पासून पॅरीसमधील 'विन्सेजेज' नावाच्या विद्यापीठात मृत्यपर्यंत तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून काम केले. या विद्यापीठात असताना त्यांनी विद्यार्थी चळवळीत भाग घेतला. तसेच १९७६ मध्ये इराणमध्ये मानवी हक्काची पायमल्ली झाली तेंव्हा तेथे जाऊन इराणच्या शाहाच्या विरोधात त्यांनी मोठे आंदोलनही केले. मानवी हक्कांवर अनेक लेख लिहून इराणी लोकांचे नेतृत्त्व केले. १९८० मध्ये पोलंडमध्ये समाजवादाचे दमन होऊ लागले तेंव्हा त्यास विरोध केला व बौद्धिक व कामगार संघटनांमध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. २५ जून १९८४ रोजी पॅरीसमध्ये फूकोंचा मृत्यू झाला.

**ग्रंथसंपदा :**

फूकोने वेडेपणा, चिकित्सा, तरुंग, कामूकता इत्यादी विषयांवर आपले विचार मांडले. त्यांचे प्रमुख ग्रंथ पुढीलप्रमाणे :

१. Madness and Civilization (1961) : यात त्यांनी विभिन्न कालखंडाच्या आधारे वेडेपणाचे विश्लेषण केलेले आहे.

२. The Birth of Clinic (1963) : यात त्यांनी रोगनिदानाची चर्चा केलेली आहे.

३. Archaeology of Knowledge (1966) : यात ज्ञान व त्याच्या घटकांची चर्चा केलेली आहे.

४. Genealogy of Power (1969)

५. Discipline and Punish (1975) : यात त्यांनी कारागृहव्यवस्थेचे तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून विश्लेषण केलेले आहे.

६. History of Sexuality Vol. I (1976) : यात ज्ञानमिमांसेची चर्चा करुन ज्ञान व शक्ती यांच्या संबंधाची चर्चा केली आहे.

**फूकोवरील प्रभाव :**

फूकोने आपल्या विचारात अनेक सिद्धांताचा समावेश केला असल्याने त्यांच्यावर नेमका कोणाचा प्रभाव होता हे सांगणे कठीण आहे. तथापि, पुढील विचारवंतांचा फूकोंवर प्रभाव होता.

१. मॅक्स वेबरच्या 'विवेकता (Rationality)' या संकल्पनेचा फूकोवर मोठा प्रभाव होता.

२. मार्क्सच्या समाजवादाने प्रभावित होऊन त्याने शक्तीच्या सूक्ष्म राजकारणाची (Micro Politics of Power) संकल्पना विकसित केली. फूको स्वत:स मार्क्सवादी मानत. मार्क्सवादाने प्रभावित होऊन फूकोने प्रचलित विचारांचे खंडन केले.

३. जर्मन तत्त्वज्ञ निल्सेने परंपरागत नीतीस विरोध करुन शक्ती व प्रभुत्त्व यावर आधारलेल्या नवीन नीताचा पाया घातला. नित्येस ज्ञान व शक्तीतील संबंध समजावून घेण्यात रस होता. फूकोनेही ज्ञान व शक्ती यांच्यातील संबंधावर प्रकाश टाकला व ज्याच्याजवळ ज्ञान आहे त्याच्याजवळ शक्ती आहे असा सिद्धांत मांडला.

४. जॉन पॉल सार्त्र, फर्डिनंड सौसर व लेवी स्ट्रॉस यांच्या विचाराच्या प्रभावातूनच फूको उत्तर संरचनावादी बनलेला दिसतो.

**फूकोचा उत्तर-संरचनावाद :**

फूको दरिदाप्रमाणेच उत्तर-संरचनावादी होते. मात्र दरिदाप्रमाणे त्यांचा उत्तर-संरचनावाद स्पष्ट नसून अत्यंत संकीर्ण आहे. कारण त्यांच्या उत्तर संरचनावादात भाषेबरोबरच इतरही अनेक सिद्धांतील विचार घेतलेले दिसतात. उदाहरणार्थ, मॅक्स वेबरच्या विवेकतेच्या संकल्पनेचा फूकोवर प्रभाव आहे तरीही तो वेबरच्या या संकल्पनेस विरोध करुन म्हणतो की विवेकता हा कांही लोखंडी पिंजरा नव्हे ज्यातून आपणास बाहेर पडता येणार नाही. पुढे या संकल्पनेचा तो त्याग करतो. मार्क्सच्या प्रभावाने फूको शक्तीच्या सूक्ष्म राजकारणाचे विवेचन करतो. खोलवर दडलेल्या सत्याचा शोध घेण्यात फूकोला रस नाही. त्याच्यावर प्रघटनावादाचा (Phenomenology) प्रभाव आहे पण तो हे मान्य करीत नाही की कोणतीही वस्तू स्वायत्त (Autonomous) आहे व तिचा अर्थ तिच्यातच असतो. निल्सेने शक्ती व ज्ञान यांच्या संबंधाची केलेल्या चर्चेचा प्रभाव फूकोवर आहे. म्हणूनच त्याने ज्ञान व शक्ती यांच्यातील संबंधास सैद्धांतिक स्वरुपात प्रस्तुत केले आहे.

फूकोचा उत्तर संरचनावाद समजावून घेताना त्याने विकसित केलेल्या विमर्श (Discourse), ज्ञान (Knowledge) व शक्ती (Power) या तीन संकल्पना अभ्यासाव्या लागतात. त्याच्या Archaeoligy of Knowledge या ग्रंथात त्याचा उत्तर-संरचनावाद आढळतो. या ग्रंथात त्याने ज्ञान व त्याचे घटक, विचार व विमर्श इत्यादीचे विवेचन केले आहे. या पुस्तकात ते ज्ञानाचे पुरातत्त्व इतिहासाच्या कसोटीवर तोलतात व येथेच आपणास त्यांचा संरचनावाद आढळतो. ते म्हणतात जेंव्हा आपण लेखन व वाणी मधील विधानांची तुलना करतो तेव्हा आपणास त्यामध्ये मोठा भेद असल्याचे दिसून येते. ते पुढे म्हणतात कांही विमर्श असे

आहेत ज्यांना आपण व्यवहारात लागू करु शकतो व असे विमर्शही वैज्ञानिक विमर्श या प्रकारात मोडतात. या ग्रंथात फुको कुठेही ज्ञान व शक्ती यांच्यातील संबंध दाखवत नाहीत. त्यामुळे सुरुवातीस त्यांची रुची ही भाषिक संरचनावादात होती असे म्हणता येते.

पुढे Genealogy of Power : या १९६९ मध्ये प्रकाशित केलेल्या ग्रंथात फुकोने उत्तर-संरचनावादी सिद्धांत स्वीकारलेला दिसतो. या ग्रंथात त्यांच्यावर निल्सेचा प्रभाव दिसून येतो. येथे फूको असा सिद्धांत मांडतात की, ''ज्ञानाच्या द्वारे विमर्श निर्माण केला जातो व हा विमर्श म्हणजेच विचारधारा लोकांचे दृष्टिकोन बनविते, निश्चित करते उदाहरणार्थ, मध्ययुगात वेडया लोकांना समाजात हानिकारक, त्रासदायक मानले जात नव्हते कांहीजण तर असे मानत की वेड्यांना ईश्वराने कांही खास शक्ती दिलेली आहे. पण आधुनिक काळात वेडेपणा हा एक मानसिक रोग मनाला जातो व इतर रोगाप्रमाणेव त्याचे निदान होऊ शकते असे मानले जाते. या ठिकाणी वेडेपणा हा एक विमर्श आहे. त्याबाबत आम्ही जे ज्ञान निर्माण केले आहे ते ज्ञान वेडेपणाविषयीचा आपला दृष्टिकोन निश्चित करणे. ज्याच्याजवळ ज्ञान आहे तो इतरांचे विमर्श निश्चित करतो. ज्ञान व शक्ती यांच्यातील या संबंधास फूको संरचनात्मक संबंध मानतो.

**फूकोची विमर्श, ज्ञान व शक्तीची संकल्पना :**

फूको हे उत्तरसंरचनावादी व उत्तर आधुनिकतावादी विचारवंत आहेत. त्यांनी संघटन व्यवस्थेच्या संदर्भात विमर्श, ज्ञान व शक्ती यांच्यातील परस्परसंबंधाचे विवेचन केलेले आहे.

**विमर्श : (Discourse)**

समाजशास्त्रात शक्ती (Power) चा अभ्यास महत्त्वाचा मानला जातो. व्यक्ती व समूह शक्तीचा वापर करुन आपले हितसंबंध कसे साध्य करतात हा महत्त्वाचा प्रश्न आहे. मार्क्स वेबर व यांनी या प्रश्नाची गहन चर्चा करुन त्याची उत्तरे शोधले आहे. या संदर्भात फूकोने विमर्श ही नवी संकल्पना मांडली आहे. एखाद्या वस्तुविषयी लोक ज्या पद्धतीने बोलतात व विचार करतात त्याच्याशी विमर्श संकल्पनेचा संबंध आहे. या पद्धती एकत्रिपणे लोकांची त्या वस्तुविषयी एक सामान्य धारणा बनवितात. उदाहरणार्थ, उत्तर भारतात गार्यीविषयी असे बोलले जाते असा विचार केला जातो की, गाय एक पशू आहे. ती आपणास दूध व वासरू देते, आपले पूर्वज तिच्याकडे आदराने पाहतात व म्हणून गाय पवित्र व पूजनीय आहे. जवळपास सर्वच लोक असा विचार करतात, बोलतात. यातूनच गाय पवित्र आहे अशी सामान्य धारणा तयार झाली आहे. या सामान्य धारणेसच फूको म्हणतो की तेथे वेडेपणा हा एक विमर्श आहे.

ज्यांनी फूकोचे लिखाण काळजीपूर्वक वाचलेले नाही ते लोक Discourse म्हणजे वादविवाद असा अर्थ घेतात. तसेच Discourse व Discussion या दोनचा अर्थ भिन्न आहे. त्याच्यादृष्टीने विमर्श म्हणजे एका निश्चित अशा चौकटीत एखाद्या विषयासंबंधी विचार करणे, धारणा बनविणे होय. ही धारणा एखाद्या विशिष्ट व्यक्तीची नसते तर सर्वसामान्य लोकांची असते. उदाहरणार्थ, दारुड्याविषयी लोक काय बोलतात, काय विचार करतात, कोणती धारणा बाळगतात, या सर्वांना विमर्श म्हणतात.

फूको म्हणतो की लोक विमर्शाच्या माध्यमातून लोक शक्तीचा उपयोग करतात. प्रथम शक्ती असते. मात्र तिला स्वत:चा कांही अर्थ नसतो. शक्तीला अर्थपूर्ण बनविण्यासाठी विमर्शाचा वापर केला जातो. वस्तुविषयी असलेल्या लोकांच्या अभिवृत्ती बदलतात. त्या बदलण्याचे काम शक्ती करते. थोडक्यात शक्ती विमर्शाच्या माध्यमातून काम करते. गुन्हेगारी, वेडेपणा, कामूकता इत्यादी विषयीच्या अभिवृत्ती बदलण्याचे काम शक्तीच करते. वेड्या लोकांविषयी अगोदर आपला असा विमर्श (धारणा) होती की, त्यांना देवानेच तसे बनविले. ते समाजात राहण्यास पात्र नाहीत. त्यांना पागलखान्यातच ठेवावे. आज मनोरुग्ण तज्ज्ञांजवळ विशिष्ट ज्ञान आहे व त्याद्वारे ते वेड्यांवर उपचार करुन त्यांना सुधारु शकतात. त्यांनी आपल्याजवळील तज्ज्ञतेच्या शक्तीद्वारे परंपरागत विमर्शास आव्हान दिले व वेड्यांना सुधारले. म्हणजेच वेडपणाविषयीचा आपला विमर्श बदून टाकला. अशाप्रकारे विमर्शाच्या माध्यमातून शक्तीचा प्रयोग केला जाऊ शकतो. शक्ती व विमर्श परस्परांशी जोडलेले आहेत. हा संबंध जोडण्याचे काम फूकोने केले आहे.

फूको वैज्ञानिक ज्ञानाकडे संशयाने पाहतो. निसर्गाच्या स्वरुपाविषयी वैज्ञानिक ज्ञानाची जी साधारण सहमती आहे तिला फूको विरोध करतो. या बाबतीत त्याचे विचार इतर सा. शास्त्रज्ञापेक्षा वेगळे आहे. साधारणत: सा.शास्त्रज्ञ परिचित गोष्टींची तुलना अपरिचित गोष्टींशी करुन अपरिचित गोष्टींचा ते शोध घेतात, त्यांची माहिती घेतात व त्या माहितीच्या आधारे परिचित गोष्टींची व्याख्या करतात. थोडक्यात इतर सा. शास्त्रज्ञ परिचिताच्या आधारे अपरिचितास विरोध करतो व त्यानंतर अपरिचिताकडे वळतो. आज प्रचलित असलेल्या धारणा, विश्वास मान्यता इत्यादींमध्ये जे अदृश्य आहे त्याचा शोध भूतकाळात घेऊन त्यांना दृश्य बनविणे असे फूकोचे पद्धतीशास्त्र आहे.

फूकोच्या सिद्धांतात विमर्शास महत्त्वाचे स्थान आहे. तो म्हणतो भुतकाळच्या तुलनेत आपल्या विमर्शामध्ये खूपच फरक पडला आहे. विमर्शामधील हा बदलच आधुनिक समाजास उत्तर आधुनिक बनवितो. इतर विचारवंतांप्रमाणेच फूकोपुढे ज्ञानाचे उगमस्थान काय आहे ? दुसरे सिद्धांत काय आहेत ? असे प्रश्न होते. त्यांची उत्तरे शोधताना त्याने विमर्श ही संकल्पना मांडली आहे. आपल्या अभ्यासात ते ज्ञान व शक्तीच्या संघटनांची चर्चा करतात. सामाजिक नियंत्रणाच्या क्षेत्रात शक्ती, ज्ञान व विमर्श यांची महत्त्वाची भूमिका असून त्यावरच उत्तर आधुनिक समाज निर्माण होईल.

**ज्ञान :**

इतर उत्तर-आधुनिकतावादी विचारवंताप्रमाणेच फूकोस ज्ञानमिमांसेत रस होता. ज्ञानाचा उगम कशात आहे, त्याचे कोणकोणते स्त्रोत आहेत, त्याचे स्वरुप कसे आहे इत्यादी प्रश्नांची चर्चा फूको करतात. फूको ज्ञानाचा शोध पुरातत्त्वशास्त्रात घेतात. त्यांनी Archaeology of Knowledge हा ग्रंथ लिहिला. त्यामध्ये त्यांनी ज्ञानाविषयीचे मुद्दे मांडले आहेत. त्यासाठी विशिष्ट पद्धती स्वीकारली आहे. फूको पुरातत्त्वशास्त्राच्या माध्यमातून ज्ञाना विषयीचा विमर्श समजावून घेऊ इच्छितात. व भूतकाळात लोकांचा ज्ञानाविषयीचा विमर्श काय होता हे ते जाणू इच्छितात.

पुरातत्त्वशास्त्र हे पुरातन काळातील वस्तुंच्या अवशेषाच्या आधारे तत्कालीन गोष्टी विषयीचे ज्ञान मिळविते. फूकोला या वस्तुंच्या अवशेषात रुची नाही पुरातनकाळातील (भूतकाळात) कोणत्या पद्धती, प्रक्रिया व सिद्धांत लोकांच्या विचारांना प्रभावित, नियमित व नियंत्रित करीत होते हे जाणून घेण्यात फूकोला रुची आहे. वस्तु पाहून त्यामागील विमर्श जाणून घेणे हा त्याचा उद्देश आहे. जे नियम व सिद्धांत मानवाविषयीचे विमर्श निर्माण करतात त्यांचा तो शोध घेऊ इच्छितो. विशेषत: जे व्यावहारिक विमर्श पुढे जाऊन वैज्ञानिक विमर्श बनले त्या मुलभूत विमर्शाचा शोध तो घेऊ इच्छितो. यासंदर्भात तो असा निष्कर्ष काढतो की सुरुवातीस विमर्शाच्या निर्मितीत व्यक्ती अप्रासंगिक आहे. वस्तुविषयीचे तिचे विचारांना महत्त्व नाही. कारण प्राचीन काळात व्यक्तीस महत्त्व नव्हते. त्यामुळे त्याकाळात निर्माण झालेल्या विर्मशाचा किंवा ज्ञानाचा उगम व्यक्तीत नसून लोकांमध्ये होता.

उपरोक्त ग्रंथात फूकोने विधानां (Statements) विषयी पुष्कळ लिहिले आहे. विभिन्न लोकांच्या व्यवहारात व विचारात आढळणाऱ्या समानतेस फूको विधान म्हणतो. ही समानताच मग ती ज्ञानाविषयीची वा शक्तीविषयीची असो विमर्श निर्माण करते. या ग्रंथातील फूकोचा महत्त्वाचा निष्कर्ष असा आहे की, पुरातनकाळात आपले ज्ञान हे वस्तुविषयीचे होते; आता आपल्या ज्ञानाने वळण घेतले असून ते व्यक्तिकेंद्रित बनले आहे. मानवी इतिहासात व संस्कृतीत जी कांही वळणे आलेली आहेत, जे बदल झाले आहे ते मानवामुळेच झाले आहे. फूको म्हणतो इतिहासावरुन हे स्पष्ट होते की मनुष्य हा मनुष्याला दुय्यम बनवितो. ज्ञान हे व जसे माणसाला प्रभुत्त्वशाली बनविते, तसेच ते त्याला दयनिय व असहाय बनविते. व्यक्ती ही प्रभावशाली आहे की असहाय्य हे तत्कालीन समाजातील ज्ञानामुळेच कळते. या ग्रंथात फूको ज्ञान व व्यक्ती यांचा संबंध जोडतात व म्हणतात की, ज्ञान हे प्रत्येक युगात बदलत असते व हे ज्ञानच व्यक्ती काय आहे हे ठरवित असते.

Madness and Civilization या आपल्या ग्रंथात फूकोने ज्ञान व शक्ती यांच्यातील संबंध स्पष्ट केला आहे. ते म्हणतात की, ज्यांच्याजवळ विशिष्ट ज्ञान (expert knowledge) असते, तो शक्तीशाली असतो. फ्रान्समध्ये अभिजत वर्गाने, वेडे, भिकारी, गरीब, बेकार अशा लाखो लोकांना तुरुंगात टाकले कारण ते भिकारी अभिजन अशा लोकांना आपल्या समवेत राहण्याच्या पात्रतेचे मानत नव्हते. म्हणून त्यांनी त्यांच्या जवळील विशिष्ट ज्ञानाच्या आधारे नको असणाऱ्या व्यक्तिंना तुरुंगात टाकले. एखादा मानसोपचार तज्ज्ञ हा त्याच्याजवळील विशेष ज्ञानाच्या आधारे एखाद्यास वेडा ठरवतो व त्यास वेड्यांच्या दवाखान्यात भरती करण्यास सांगतो. एखाद्या चोरास न्यायाधीश गुन्हेगार ठरवितो व त्यास तुरुंगात डांबण्याचा आदेश देतो. या दोघांचे विशेष ज्ञान हीच त्यांची शक्ती असून त्यांच्या या शक्तीला कोणी आव्हान देत नाही. अशाप्रकारे फूको ज्ञान, शक्ती व व्यक्ती ही त्रिकोणाची तीन टोके मानून त्यांना जोडण्याचा प्रयत्न करतो.

The Birth of The clinic : Life and Death या ग्रंथातही फूकोने ज्याच्याकडे ज्ञान आहे तोच शक्तीशाली आहे असा निष्कर्ष काढला आहे. तो म्हणतो १८ व्या शतकापर्यंत वैद्यकीय तपासण्या केल्या जात नव्हत्या. केवळ नाडी परिक्षण करुन रोग्यावर इलाज केला जाई. पुढे वैद्यकिय चिकित्सा पद्धतीने परिवर्तन झाले.

शवचिकित्सा पद्धती उदयास आली व जिवंत राहण्यासाठी शरीराचे विभिन्न अवयव व त्यांचे कार्य यांचे ज्ञान उपलब्ध झाले. म्हणजे मृतदेहांचे अवलोकन करुन जिवंत मानवास समजावून घेतले. वैद्यकिय उपचाराबाबतचे ज्ञान वृद्धिंगत होत गेले. त्यामुळे वैद्यकिय तज्ज्ञ आपल्या विशेष ज्ञानाच्या आधारे रुग्णांना रोगमुक्त करु लागला. वैद्यकिय तज्ज्ञाची ही क्षमताच त्याला ज्ञानी बनविते व त्याच्याजवळ ज्ञान असल्याने तो शक्तीशाली बनतो. फूको पुढे म्हणतो की, ज्याच्याजवळ अशी शक्ती आहे तोच संपत्तीही कमावतो. वैद्यकीय तज्ज्ञच नव्हे तर वकील, शिक्षक, अभियंता यांच्याजवळ विशेष ज्ञान आहे, तेच शक्तीशाली आहेत. व ही शक्ती त्यांना अधिक संपत्तीही मिळवून देते. अशाप्रकारे फूको पुन्हा ज्ञान, शक्ती व व्यक्ती यांच्यातील परस्परसंबंध दाखवून देतात.

**शक्ती :**

फूकोवर नित्सेचा प्रभाव होता. नित्सेने परंपरागत नीतीमत्तेस विरोध करुन नवीन नैतिकतेचा पाया घातला. त्याची ही नवी नैतिकता शक्ती व प्रभुत्व यावर आधारलेली होती. फूकोने शक्ती संकल्पनेचा विकास नित्सेच्या प्रभावामुळेच केला. फूकोच्यापूर्वी मॅक्सवेबर व अल्ट्युजर (Althussr) यांनी शक्ती संकल्पनेची मीमांसा केली आहे. त्यांनी शक्ती ही राज्यसंस्थेकडे असते असे मत मांडले होते. फूकोने हे मत अमान्य केले. व सर्वप्रथम असे मत मांडले की, शक्तीचे केंद्रिय स्थान राज्यसंस्था नाही. त्याने शक्तीच्या सूक्ष्म राजकारणास (micro-politics of power) आपल्या विश्लेषणाचा आधार बनविलेले आहे. ही शक्ती व्यक्तीमध्ये आहे असे तो म्हणतो. तो म्हणतो शक्ती केवळ राज्यसंस्थेकडेच नसते तर सर्वत्रच असते. ती सार्वत्रिक आहे. दवाखाना, विद्यापीठ, शाळा इत्यादीतही आहे. मानवी शरीरदेखील शक्तीचे घर आहे. कारण सर्व कष्ट जुलूम शेवटी शरीरास सहन करावे लागतात. तो म्हणतो विरोधाशिवाय शक्तीचा संबंध नाही तो म्हणतो, शक्तीची कोणतीही लढाई ही स्थानिक पातळीवरुन सुरु झाली पाहिजे.

शक्तीची संकल्पना :

शक्ती ही संकल्पना स्पष्ट करण्यापूर्वी फूको कोणत्या गोष्टीस शक्ती म्हणत नाही हे स्पष्ट करतो. तो म्हणतो, शक्ती ही कोणाची क्षमता व पात्रता नाही. शक्ती म्हणजे अशा प्रकारची प्राप्त गोष्ट नव्हे जिच्यामुळे इतरांना बदलता येते. शक्ती ही एखाद्या संस्थेची किंवा संरचनेची पर्यायीवाची संज्ञा नाही. तिचे ना कोणते रुप आहे ना ठिकाण. शक्ती ही प्राथमिक स्वरुपात विनाशकारी व विघातक नाही. शक्तीची ही नकारार्थी लक्षणे सांगितल्यावर फूको तिची पुढील प्रमाणे व्याख्या करतात. शक्तीचा संबंध प्राथमिक बळ किंवा सामर्थ्याशी आहे व हे सामर्थ्य सर्वच सामाजिक संरचनांचा पाया आहे. शक्ती ही सर्वच सामाजिक संबंधाची संघटक आहे. अशाप्रकारे प्रत्येक सामाजिक संबंध हा वस्तुत: शक्ती संबंध असून त्यामध्ये कोठेना कोठे तरी सामर्थ्याची भूमिका अवश्य असते.

फूको शक्तीच्या संकल्पनेस सूक्ष्म-भौतिकीमध्ये (Micro-phusics) पाहतात. शक्तीचे वेगळे (पृथक) असे अस्तित्त्व नाही. ती सदैव सामाजिक संबंधात आढळते. ती तटस्थ असते. बळ किंवा सामर्थ्याप्रमाणे ती क्रियान्वीत (operational) होते.

**शक्तीचे पैलू :**

फूकोच्या मते शक्तीचे तीन पैलू आहेत.

१. शक्तीचा संबंध कोणत्या ना कोणत्या संस्थेशी असतो. ही संस्था तुरुंग, शाळा, लष्कर, राज्य इ. काहीही असू शकते.

२. शक्ती व ज्ञान परस्परावलंबी आहेत. शक्तीद्वारे ज्ञान प्राप्ती होते तर ज्ञानाद्वारे शक्ती प्राप्त होते.

३. शक्तीचा संबंध व्यक्तीशी देखील आहे.

फूको शक्तीला कोणत्याही संस्थेचा पर्याय मानीत नाहीत. ते म्हणतात की, प्रथम शक्तीचे अस्तित्त्व असते व त्यानंतर संस्थेचे. संस्था शक्तीचे प्रतिक आहे पण संस्था शक्तीला जन्म देत नाही. राज्य, कुटुंब, धर्मसंस्था, विज्ञान, बाजार इत्यादीत शक्तीचे केंद्रिकरण होते व तेथूनच ती सर्वत्र पसरते.

**ज्ञान व शक्तीचा संबंध :**

फूको शक्ती व ज्ञानातील परस्परावलंबन दाखवितात. त्यांचा मुख्य मुद्दा हा आहे की, ज्ञानाला शक्तीपासून कधीच वेगळे करता येत नाही. या तथ्याचा पडताळा फूको आधुनिक ज्ञानाच्या आधारे घेतात व त्याआधारे अंतिम सत्य शोधण्याचा प्रयत्न करतात. या प्रयत्नात व्यक्ती स्वत:देखील अभ्यासाचा एक केंद्रबिंदू आहे. व्यक्ती व ज्ञान यांच्यात अशी आंतरक्रिया चालते की ज्ञान व्यक्तीला समृद्ध करते व व्यक्ती ज्ञानाचे भांडार वाढवित राहाते. याचाच अर्थ असा की, व्यक्तीला ज्ञानामुळे फायदा होतो व ती आपल्या स्तरावर नवीन ज्ञान निर्माण करते. ज्ञानातून ज्ञान निर्माण होते व त्याची निर्मिती व्यक्ती करते. ज्ञानप्रक्रियेत व्यक्ती ज्ञान ही मिळविते व नवीन ज्ञानही निर्माण करते. पुढे हे ज्ञान सामाजिक क्षेत्रात पसरते. म्हणजे कुटुंब जात, वर्ग, समुदाय इ. समूह ज्ञान मिळवितात व त्या समुहाद्वारेच ज्ञानाचे सादरीकरण होते. उदाहरणार्थ, एखाद्या हृदयरोग तज्ज्ञ हृदयरोगी व्यक्तीस तेल वर्ज्य करण्यास सांगतो व रोगी त्याचा सल्ला मानतो. कारण हृदयरोगतज्ज्ञ जवळ विशेष ज्ञान आहे. हे ज्ञान त्याची शक्ती ठरते. जर त्या तज्ज्ञाने अमूक कंपनीचे तेल हे हृदयरोग्यासाठी नुकसानकारक नाही असे सांगितले तर त्या तेलाची नक्कीच विक्री वाढेल. म्हणजे हृदयरोगतज्ज्ञाची शक्ती रोग्यापुरती मर्यादित न राहता बाजारपेठेपर्यंत (समुहापर्यंत) पोहचते. म्हणजेच ज्याच्याजवळ ज्ञान आहे त्याच्याजवळ शक्ती आहे. ज्याच्याजवळ शक्ती आहे तो हवे ते ज्ञान मिळविण्यासाठी पैसा खर्च करु शकत नाही.

जन स्विकी (Jana sawicki) यांनी शक्तीची कायदेशीर संकल्पना व फुकोची शक्तीची संकल्पना यामध्ये पुढीलप्रमाणे भेद दाखविले आहेत.

**शक्तीची कायदेशीर संकल्पना :**

१. शक्ती कोणाच्या तरी मालकीची असते.

२. शक्ती ही केंद्रस्थानापासून खालच्या दिशेने पसरते.

३. व्यवहारात शक्ती प्राथमिक स्वरुपात दमनात्मक आहे.

**फूकोची शक्तीची संकल्पना :**

१. मालकी हक्क मिळविण्यासाठी शक्तीचा व्यवहारात वापर केला जातो.

२. शक्ती खालून वर म्हणजे केंद्राकडे जाते.

३. प्राथमिक स्वरुपात शक्ती दमनात्मक नाही, तर उत्पादक आहे.

थोडक्यात, फूको एक श्रेष्ठ उत्तर-आधुनिकतावादी विचारवंत आहेत. ते शरीरास एक शक्तीच्या रुपात प्रस्थापित करतात. जेंव्हा ते ज्ञान, शक्ती व व्यक्ती यांच्यासंबंधी विवेचन करतात तेंव्हा त्यांच्यादृष्टीने व्यक्ती म्हणजे मनुष्याचे शरीर असाच अर्थ आहे. संकल्पनेच्या संदर्भात ते शरीरास जैविक शक्ती (Bio-Power) म्हणतात. शरीर शक्ती धारण करते व शरीर शक्तीचे उत्पादनही करते. शक्तीचे विवेचन करताना ते म्हणतात, आजचा भांडवलशाही समाज अनुशासनात्मक शक्तीद्वारे व्यक्तीला पूर्णपणे आज्ञाधारक बनवितो. फूकोने ज्ञानाच्या समाजशास्त्रातही मोठे योगदान दिले आहे. त्याने एका नवीन समाजशास्त्राचा पाया घातला. आहे. ते म्हणतात ज्ञानाचे उत्पादन संस्थात्मक देखील असते. राज्यशास्त्रज्ञ शक्तीचा उगम सांविधानिक संस्थांमध्ये आहे असे मानतात. फूको मात्र शक्तीच्या संकल्पनेस सामाजिक स्तरावर मांडतात.

**स्वयंअध्ययन प्रश्न : क्रमांक ३**

**अ) बहुपर्यायी प्रश्न सोडवा.**

१. वेबरच्या कोणत्या संकल्पनेचा प्रभाव फूकोवर पडलेला आढळतो ?

अ) विखंडन ब) विवेकता क) शक्ती ड) विमर्श

२. फूको कोणत्या ज्ञानाकडे संशयाने पाहतात ?

अ) वैज्ञानिक ब) तात्त्विक क) तार्किक ड) व्यावहारिक

३. फूकोच्या मते मानवास प्रभुत्त्वशाली किंवा दयनिय कोण बनविते ?

अ) शक्ती ब) संपत्ती क) ज्ञान ड) अधिकार

४. फूकोच्या मते शक्ती हे नेहमी कशामध्ये आढळते ?

अ) सामाजिक संरचनेत ब) सामाजिक संघटनेत

क) सामाजिक गतिशीलतेत ड) सामाजिक संबंधात

५. कशाच्याद्वारे ज्ञानाचे सादरीकरण होते ?

अ) समूह ब) व्यक्ती क) समाज ड) शक्ती

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) फूकोने लिहिलेल्या ग्रंथांची नावे सांगा.

२) फूकोवर कोणकोणत्या विचारवंतांचा प्रभाव होता ?

३) विमर्श म्हणजे काय ?

४) कोणत्या तत्त्वज्ञाच्या प्रभावाने फूकोने 'शक्ती' या संकल्पनेचा विकास केला आहे ?

५) फूकोच्या मते सर्वच सामाजिक संबंधांची संघटक कोण आहे ?

## ४.३ सारांश :

या चौथ्या घटकात तुम्ही संरचनावाद व उत्तरसंरचनावाद समजावून घेतलेला आहे. संरचनावाद हा सार्त्रच्या अस्तित्त्ववादास विरोध करण्यासाठी उदयास आलेला सिद्धांत असून सौसर, स्ट्रॉस, नॅडेल पिटर ब्लॉ, पीअरे बोरदियू इत्यादी त्याचे पुरस्कर्ते आहेत. त्यापैकी सौसर व स्ट्रॉस यांचे संरचनावादी विचार तुम्ही येथे अभ्यासलेले आहेत. सौसरचा संरचनावाद हा भाषिक संरचनावाद म्हणून ओळखला जातो. त्यांच्या मते प्रत्येक भाषेचे व्याकरण असते व ते भाषेस बोलीहून वेगळे करते. त्यांच्यामते भाषा ही सामान्य व अमूर्त व्यवस्था आहे. तिच्यात स्वर असतात. त्या स्वरांची एक निश्चित व्यवस्था असते. स्वरांचे अनेक घटक असतात व त्या घटकांतील परस्परसंबंध नियमांद्वारे निर्धारित होतात. स्वराचे हे घटकच भाषेची वाणी समजण्यास उपयोगी पडतात. सौसरच्या भाषिक संरचनेची संकल्पना मानवशास्त्रीय संरचनावाद्यांनी समाजाच्या विश्लेषणास लागू केलेली आहे. भाषेतील संकेत व त्या संकेताच्या लक्षणांना समजावून घेण्याचा प्रयत्न संरचनावादी करतात. लेविस्ट्रॉस देखील संरचनावादाचे पुरस्कर्ते असून त्यांचा संरचनावाद हा मानवशास्त्रीय संरचनावाद म्हणून ओळखला जातो. कारण त्यांनी आदिम समाजात क्षेत्र-कार्य करुन आपले संरचनावादी विचार मांडलेले आहेत. स्ट्रॉसच्या मते आप्तसंबंध व्यवस्थेमध्ये कुटुंबांतर्गत लैंगिक संबंध निषेध हा नियम आढळतो. या नियमामागे विनिमयाची प्रथा आहे. हा नियमामुळे विविध कुटुंबात विनिमय होऊन आप्तसंबंध व्यवस्थेची संरचना निर्माण होते. स्ट्रॉसचे अध्ययन जरी आदिम समाजापुरते मर्यादित होते तरी त्यांचा असा विश्वास होता की, सर्वच समाजाचे अध्ययन संरचनात्मक पद्धतीने करता येते.

यानंतर तुम्ही उत्तर-संरचनावादाचे स्वरुप समजावून घेतलेले आहे. उत्तरसंरचनावाद हा संरचनावादावरील एक प्रतिक्रिया म्हणून उदयास आला असून दरिदा हा त्याचा जनक आहे. त्यांच्या मते उत्तरसंरचनावादात भाषेपेक्षा लेखन महत्त्वाचे आहे. दरिदाने विखंडन व भेद या दोन संकल्पना मांडून त्यांच्या आधारे उत्तरसंरचनावादाची चर्चा केलेली आहे. कोणताही मूळ ग्रंथ हा सत्य न मानता त्याचे विखंडन केले पाहिजे असे दरिदा म्हणतात. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानातील तत्त्वमिमांसेस विरोध करण्यासाठी दरिदा विखंडन संकल्पनेचा वापर करतात. विखंडन करणे म्हणजे मूळ ग्रंथांचे टिकात्मक अध्ययन करणे होय. दरिदाची विखंडनाची संकल्पना ही भेदाच्या तर्कशास्त्रावर आधारलेली आहे. तथापि, भेद या संकल्पनेचा निश्चित अर्थ दरिदाने

स्पष्ट केलेला नाही. यानंतर तुम्ही मिशेल फूकोचा उत्तर-संरचनावाद अभ्यासलेला आहे. आपला उत्तरसंरचनावाद मांडताना फूकोनी विमर्श, ज्ञान व शक्ती या तीन संकल्पनांची चर्चा केलेली आहे. विमर्श म्हणजे एका निश्चित अशा चौकटीत एखाद्या विषयासंबंधी निश्चित अशी धारणा बनविणे होय. शक्तीला अर्थपूर्ण बनविण्यासाठी विमर्श वापरले जातात असे फूको म्हणतात. शक्तीस स्वतंत्र अस्तित्त्व नसते तर ती नेहमीच सामाजिक संबंधात असते. फूकोने शक्ती व ज्ञान यांच्यातील परस्परसंबंधाचे विवेचन केलेले आहे. ते म्हणतात ज्ञानाला शक्तीपासून वेगळे करता येत नाही. ज्ञान हीच शक्ती आहे असे फूकोंचे मत आहे.

**४.४ स्मरणार्थ संज्ञा :**

- **अस्तित्त्ववाद :**

मानवी अस्तित्त्वावर भर देणारी व मानव आपले निर्णय घेण्यास स्वतंत्र आहे असे प्रतिपादन करणारी तत्त्वज्ञानातील एक प्रवृत्ती.

- **संरचनावाद :**

मानवी क्रियांवर पडणाऱ्या संरचनेच्या प्रभावाचे विश्लेषण.

- **संप्रेषण :**

सामाईक प्रतिकांच्याद्वारे व्यक्तीव्यक्तीत होणारी ज्ञानाची, माहितीची, कल्पनांची देवाणघेवाण.

- **चिन्ह (संकेत) :**

कशाचे तरी प्रतिनिधित्त्व करणारी वस्तू किंवा घटना.

- **गृहितक :**

एखादी गोष्ट खरी आहे असे मानने.

- **मानवशास्त्र :**

मानव व त्याच्या कार्यांचे अध्ययन.

- **आप्तसंबंध :**

नातेसंबंध.

- **कुटुंबांतर्गत लैंगिक संबंध निषेध नियम :**

एकाच कुटुंबाचे सदस्य असलेल्या स्त्रीपुरुषांना लैंगिक संबंध ठेवण्यास मनाई करणारा नियम.

- **विनिमय :**

देवाणघेवाण.

- **विधान :**

निवेदक वाक्य जे सत्य किंवा असत्य असते.

- **पुरातत्त्वशास्त्र :**

मानवाने वापरलेल्या भौतिक वस्तुंच्या अवशेषांच्या आधारे मानवाच्या प्राचीन संस्कृतीचे.

- **अध्ययन करणारे विज्ञान**

**४.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

**स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक १ ची उत्तरे**

**अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे.**

१) ब २) ड ३) क ४) अ ५) अ

**ब) एका वाक्यात उत्तरे.**

१. जान पॉल सार्त्र

२. सौसर, लेवि-स्ट्रॉस, नॅडेल, बोरदियू, पीटर ब्ला

३. रोलँड बार्थस

४. संकेतर व संकेतिक

५. आप्तसंबंध व्यवस्थेची संरचना

**स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक २ ची उत्तरे.**

**अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे.**

१) ड २) अ ३) क ४) ब ५) ब

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. दरिदा

२. लेखन

३. मूळ ग्रंथांचा किंवा पाठांचा (Texts) टिकात्मक अभ्यास करणे म्हणजे विखंडन होय.

४. भेदाच्या तर्कशास्त्रावर

५. कारण व्याकरणाच्या माध्यमातून दरिदाने विखंडन ही संकल्पना विकसित केलेली आहे.

**स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक ३ ची उत्तरे.**

**अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे.**

१) ब २) अ ३) क ४) ड ५) अ

**ब) एका वाक्यात उत्तरे.**

१. Madness and civilization, Discipline and Punish, The Birth of the Clinic, History of Sexuality इत्यादी.

२. वेबर, मार्क्स, नित्से, सार्त्र.

३. एखाद्या विषयासंबंधीची सामान्य धारणा म्हणजे विमर्श होय.

४. नित्से

५. शक्ती

## ४.६ स्वाध्याय :

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. सौसरचा संरचनावाद सविस्तर स्पष्ट करा.

२. लेवि-स्ट्रॉसच्या संरचनावादाची चर्चा करा.

३. दरिदाच्या विखंडन व भेद या संकल्पना स्पष्ट करा.

४. मिशेल फूकोच्या विमर्श, ज्ञान व शक्ती या संकल्पनांची चर्चा करा.

**ब) टीपा लिहा.**

१. संरचनावाद

२. उत्तरसंरचनावाद

३. आप्तसंबंधव्यवस्था

४. विखंडन

५. विमर्श

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ :


१. Ritzer, George (2000), Sociological Theory, New York, Mc Graw - Hill.

२. Turner, Jonathan H. (2005), The structure of Sociological Theory, Rawat, Jaipur & New Delhi.

३. Collins, Randall (1997), Sociological Theory, Rawat, Jaipur & New Delhi.

४. Austin Harrington (Ed) (2005), Modern Social Theory; An Introduction, Oxford University Press, 2005.

५. डॉ. एस. चंद्रकुमार रॉय (२००४), प्रमुख समाजशास्त्रीय सिद्धांत अर्जून पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली.


●●●